
सूर्यपुत्र लोकमान्य
डॉ. स्मिता दामले

# या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!

# सूर्यपुत्र लोकमान्य

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो, मजा येते.

पण

तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हाला आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना आमच्याबद्दल मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# सूर्यपुत्र लोकमान्य

डॉ . स्मिता दामले

ई साहित्य प्रतिष्ठान

# सूर्यपुत्र लोकमान्य

## लेखिका : डॉ. स्मिता दामले

३०३, सुकल्याण, २९, आयडियल कॉलनी,

कोथरूड, पुणे, ४११०३८.

मोबाईल :- ९८६७३६४६३४.

smitasuhas67@rediffmail.com

suhasdamle341@hotmail.com

Mobile: 9867364634

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

www.esahity.in

esahity@gmail.com

प्रकाशन : १० जानेवारी २०२१

©esahity Pratishthan®2021

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# डॉ. स्मिता दामले



ई साहित्यतर्फे आज डॉ. स्मिता दामले यांचे पहिले पुस्तक “सूर्यपुत्र लोकमान्य” पुनःप्रकाशित होत आहे. त्यांची यापुर्वी आठ पुस्तके ई साहित्यने प्रकाशित केली आहेत व इतर अनेक पुस्तके विविध प्रकाशनांतर्फे प्रकाशित झाली आहेत.

डॉ. स्मिता दामले या एक नामवंत लेखिका व इतिहासाच्या मान्यवर अभ्यासक आहेत. “सुर्यपुत्र लोकमान्य” हे लोकमान्य टिळकांचे एक वेगळ्या अंगाचे, त्यांच्या मानवी कंगोऱ्यांचे दर्शन घडवणारे चरित्र, “रक्षा” हा रक्षा या शब्दाच्या विविध सात अर्थांतून निर्माण होणाऱ्या कथांच्या संग्रहानंतर त्यांनी “कलाटणी" हे भारताच्या हजारो वर्षांच्या भव्य इतिहासाचे मिनिएचर दर्शन घडवणारे पुस्तक लिहीले. अशा पुस्तकांनी ई साहित्य चे पुस्तक संग्रहालय समृद्ध होत आहे. त्यांचे “मनसोक्त” हे वर्तमानपत्रातील बातम्या वाचल्यानंतर उमटलेल्या तरंगांचे

पुस्तक हे. ई साहित्य तर्फे डॉ. स्मिता दामले यांचे हे चौथे पुस्तक. पाचवे पुस्तक होते "इतिहासाची विलग पाने". इतिहासातील काही महत्त्वाच्या पण कमी प्रसिद्ध अशा घटना व व्यक्तींभोवती हे पुस्तक आहे. कावेरीचा दुभंग हे कर्नाटकाच्या मध्ययुगीन इतिहासावरचे त्यांचे पुस्तक व सल्तनत हे दिल्लीच्या गादीवर आलेल्या मोघलपुर्व सुलतानांचे सखोल दर्शन घडवणारे पुस्तक ही दोन्ही वाचकांना अतिशय आवडली. सातहीही पुस्तके वेगवेगळी आणि तरीही एकाच धाग्यातली. तो धागा म्हणजे इतिहास. आणि त्यातली फ़ुले मात्र दुर्मिळ, अप्रसिद्ध व्यक्ती आणि घटना.

इतिहासाच्या लभ्यासक व लेखिका असल्या तरी त्यांची लेखणी चतुरस्त्र आहे आणि त्या सर्व घटनांचे वर्णन अशा रंजकतेने करतात की वाचक खिळून रहातो. रंजकता आणि सत्य यांचा नेमका मिलाफ़ त्यांच्या लेखणीत आहे. ऑटोमन साम्राज्याच्या जन्मापासून ते अंतापर्यंतचा वेध घेणारे त्यांचे आठवे पुस्तक "एका ओथमनचा अंत" हेही तितकेच अभ्यासपूर्ण व रंजक आहे.

डॉ स्मिता दामले यांना राजकारणाची आवड असल्यामुळे आजवर इतिहासाचा अभ्यास करून त्यातच लेखन केलं. इतिहास म्हणजे पूर्वकालीन सत्ताधीशांच्या यशापयाशाची कहाणी. इतिहास विषयातच त्यांनी Ph.D केलं. इतिहास वाचत असताना त्यांच्या एक गोष्ट लक्षात आली, ती म्हणजे १७ व्या

आणि १८ व्या शतकातील उत्तर भारतातील राजकारणावर आणि शिंदे-होळकर-मोगल आणि थोरले बाजीराव यांच्यातील सत्तेच्या रस्सिखेचावर विपुल लेखन लिहिलं गेलं आहे. पण १८ व्या शतकात दक्षिण भारतात मोठं राजकारण खेळणाऱ्या संभाजी पुत्र शाहू, पेशवाईचे संस्थापक बाळाजी विश्वनाथ, हैदर अली, त्याचा पुत्र टिपू सुलतान आणि या सर्वांचा लढा झाला त्या प्रबळ इंग्रजांवर मराठीत लेखन झालेलं नाही. म्हणून मनोव्यापाराच्या आधाराने, कादंबरी अंगाने, इतिहास मांडणारं लेखन त्यांनी अभ्यासपुर्वक केलं. ते लेखन म्हणजे, शिवरायांच्या पश्चात संभाजी-राजाराम-शाहू या त्यांच्या तीन वारसांचा आणि पेशवाई शतकाची स्थापना करणाऱ्या बाळाजी विश्वनाथ- पुत्र बाजीराव - आणि नानासाहेब पेशवा यांच्या कारकीर्दीचा, बाजीरावांच्या मातोश्री राधाबाई ज्यांनी ७५ वर्षाचं दीर्घायुष्य मिळाल्यामुळे राजकारण फार जवळून पाहिलं त्यांना नायिका करून इतिहास सांगणारी "मातोश्री" ही कादंबरी. त्यानंतर त्यांनी मिरजेचे सरदार पटवर्धन यांच्या घराण्याचा इतिहास मांडणारी " उदयास्त " ही कादंबरी लिहीली. त्यांनी लिहीलेलं " मी टिपू सुलतान " हे टिपू सुलतानचं राजकीय आणि व्यक्तिगत चरित्र नुकतंच प्रसिध्द झालं आहे.

त्यांनी आजवर लिहीलेल्या इतिहासावरील पुस्तकांना नामवंत प्रकाशकांनी मानधनासहित प्रसिद्धी दिली. वाचकांची उदंड पसंती त्यांना मिळाली. अशा वेळी ई साहित्य ही संस्था कोणतेही

धन देत नसताना त्यांनी आपली सात मौल्यवान पुस्तकं ई साहित्यच्या वाचकांसाठी विनामूल्य द्यावीत यातच त्यांची खरी ओळख होते.

ई साहित्य टीम व ई साहित्यचे वाचक डॉ. स्मिता दामले यांचे कायम ऋणी राहतील.

**टीम ई साहित्य**



बाळ गंगाधर टिळक.

हा फोटो प्रसिद्ध चित्रकार रघुनाथ फडके यांनी काढला होता.

# चार शब्द

लोलकातून (प्रिझम् मधून) सूर्यकिरणं आरपार गेली की त्यातले सप्तरंग उजळून निघतात.

कै. सदाशिव विनायक बापट यांच्या लोकमान्य टिळकांच्या ' आठवणी आणि आख्यायिका ' या दोन खंडांचंही तसंच! स. वि. बापटांनी चिवटपणे, अफाट मेहनत घेऊन ह्या आठवणींच्या रूपाने लोकमान्यांना आपल्यासमोर कायमचं जिवंत केलं. शब्दकळांचा एक पुतळाच जणू ! ह्या आठवणी लोकांकडून गोळा करण्यासाठी त्यांनी साडेतीन हजार जोडकार्डे लोकांना पाठवली. त्यातल्या फक्त १७ कार्डांना उत्तरं आली. त्यातील ९ लोकांनी आठवणी पाठवायची वचनं दिली. ५ लोकांनी दुसऱ्यांकडे बोटं दाखवली आणि उरलेल्या तिघांकडून फक्त औपचारिक मजकूर आला. पण बापटांनी चिकाटी सोडली नाही. अनेक लोकांना गाठून त्यांच्याकडून आठवणी काढून घेतल्या. दुसऱ्या खंडाच्या वेळी साडेसहाशे लोकांना शोधून त्यांच्याकडून आठवणी काढून घेण्यासाठी २८७२ पत्रं लिहिली. आणि विशेष हे की प्रत्येक मजकूर छापील न करता प्रत्येक पत्र हाताने लिहिलं. त्यांच्या या अफाट परिश्रमांमुळेच आज आपल्याला लोकमान्य कळत आहेत. स. वि.

बापटांचे उपकार अगणित आहेत. लोकमान्यांवर भरपूर लिखाण झालं. न. चिं. केळकरांनी चरित्र खंडांमधे खूप लेखन केलं. त्या सर्वांमधून लोकमान्यांचे सप्तरंग, नव्हे, सहस्त्रकिरणं झगमगून बाहेर पडली. त्यांचं देशकार्य, त्यांचे विचार, त्यांचे अग्रलेख, इंग्रजांशी लढण्याचा त्यांनी घेतलेला वसा, ह्याचा तो इतिहास आहे.

राष्ट्रपुरुष टिळक आणि स्वराज्य हा माझा जन्मसिध्द हक्क आहे असं म्हणणारे लोकमान्य एवढी दोनच वाक्यं लोकमान्यांबद्दल माहीत असलेल्या आताच्या पिढीला लोकमान्यांची जवळून ओळख व्हावी म्हणून हा लेखन प्रपंच! माझे थोरले बंधू आणि गुरु कै. डॉ. वा. द. दिवेकर यांच्याकडून मला लोकमान्यांच्या आठवणींचा दुसरा खंड फार मौल्यवान इस्टेटीच्या रूपाने मिळाला होता पण पहिल्या खंडासाठी पुणे ग्रंथालयात जाऊन त्यातल्या निवडक आठवणीचा अभ्यास करतांना ते रोजचे पाच पाच तास पुण्यवान होऊन गेले.

बापटांच्या पुस्तकातून आणि इतर काही ठिकाणी वाचलेलाही मजकूर यात आहे. कै. डॉ. वा. द. दिवेकर यांच्या "Lokamanya Tilak In England 1918-19 Dairies And Documents ’ या पुस्तकाचाही उपयोग त्यात केला आहे. एका अर्थाने लोकमान्यांच्या आयुष्यातल्या महत्त्वाच्या राजकीय घडामोडींचा व

इतर वैयक्तिक घटनांचा हा एक सारांश आहे. त्यांच्या वैयक्तिक आयुष्याची, स्वभावाची, विचारांची, कुटुंबाची, मित्रांची, ओळख आहे. निदान एवढे तरी टिळक आपल्याला माहीत हवेतच. त्यामुळेच राष्ट्रीय पक्ष, होमरूल लीग, सुरत कॉंग्रेसची सभा, लखनौ सभा, हे ऐतिहासिक भारतीय राजकारण आणि त्यातला लोकमान्यांचा वादळी सहभाग, यांचा विस्तृत उल्लेख त्यात आलेला नाही. कारण तो देशाचा इतिहास आहे.

हे लेखन सर्वांना आवडेल याची पूर्ण खात्री आहे.

पुस्तकाचे मुखपृष्ठ श्री. शैलेंद्र परांजपे यांनी केले आहे. त्यांचे आभार.


डॉ. स्मिता दामले.

**मोबाईल नं.** 9867364634

smitasuhas67@rediffmail.com

# सूर्यपुत्र .

सूर्याला लोकमान्यता लोकमान्यांच्या एवढी की लोकमान्य सूर्याएवढे तेजस्वी?

दोन्ही खरं.

कोकणातील दापोलीजवळच्या चिखलगावातील टिळकांचं खोतांचं घराणं अनेक पिढ्यांपासून स्थायिक झालेलं होतं. जो पुरुष एखाद्या ओसाड गावात जलसंचय करुन पिकांची लागवड करेल, जंगल साफ करून गाव वसवेल, धरण बांधून पाणी अडवेल, त्याला राजाकडून जमीन बक्षिस दिली जायची. ती खोतकी जमीन आणि तो खोत. त्या पुरुषाने मग स्वत:च गावचा सारा गोळा करुन राजाकडे पोचवायचा. टिळक घराण्यात असाच एक कुणी धडाडीचा पुरुष होऊन गेला होता. त्याच घराण्यातील गंगाधररावांच्या पत्नी पार्वतीबाई या तपस्विनीने पुत्रप्राप्तीसाठी सूर्याचं तप केलं. योग्य समयी त्या प्रसूत झाल्या आणि रत्नागिरीच्या सदोबा गोरे यांच्या वाड्यात पुत्ररत्नाचा जन्म झाला. २३ जुलै, १८५६, शके १७७८, आषाढ कृष्ण षष्ठी, सूर्योदयानंतर दोन घटका, हा तो भाग्योदयी दिवस. सदोबा गोऱ्यांच्या वाड्याने तो सुवर्ण क्षण

अनुभवला. बाळाचं पाळण्यातलं नाव केशव पण आई लाडाने बाळ म्हणायला लागली आणि त्याच नावाने हे बाळ जगप्रसिध्द झालं. आईने लाडाने ठेवललं नाव हे शास्त्राने ठेवलेल्या नावापेक्षा कमी योग्यतेचं नाही हे स्वत: या स्वयंभू चिरंजीवांनीच ठरवलं आणि कायमचं स्विकारलं.

त्या बाळाचं पूर्ण नाव बाळ गंगाधर टिळक.

हा सूर्यपुत्र भारतीय राजकीय क्षितिजावर उगवला. आळसावून थंडपणे झोपलेल्या भारतीयांच्या कानात याने, उठा, जागे व्हा, शत्रू तुमच्या घरात शिरलाय, आपलं जडजवाहीर, जंगलं, सगळी दौलत, तुम्हाला लुटतोय, त्याला बाहेर घालवा, हा देश तुमचा आहे, त्याला स्वतंत्र करा, आपण पारतंत्र्यात आहोत, तुम्ही राज्य करा. " हा गायत्री मंत्र म्हटला आणि लोकांना आपल्या हक्कांची जाग यायला लागली. हा प्रखर ज्ञानमार्तंड माथ्यावर आला तेव्हा त्याच्या मध्यान्हीच्या झळांनी इंग्रज सरकार पाचोळयासारखं भिरभिरायला लागलं. या सूर्याला झाकण्यासाठी इंग्लंड-दिल्ली-मुंबईचं इंग्रज सरकार कपट कारस्थानांची कपाटं धुंडाळून जुनीपानी कायद्याची कलमं शोधू लागली. आपल्या हीनतम कुटील बुध्दीचा आसरा घ्यायला लागली.

गंगाधरपंतांचे वडील रामचंद्रपंत, आपली पत्नी वारल्यावर संसार सोडून चित्रकूटाला पेशव्याच्या आसऱ्याला निघून गेले. मग त्यांना संन्यास घ्यावासा वाटू लागला, तेव्हा आप्तांना शेवटचं भेटण्यासाठी परत रत्नागिरीला आले, आपल्या नातवाचं मुखावलोकन करून काशीला निघून गेले. आणि मग संन्यास घेतला. रत्नागिरीच्या मुक्कामात, आपल्या नातवाला, बाळला, १८५७ च्या बंडातील स्वत: अनुभवलेल्या आणि ऐकलेल्या घटनांच्या कहाण्या सांगितल्या. भारतीय राजकारणाशी आणि आपल्या भावी शत्रूशी, इंग्रजांशी, झालेली बाळची ती पहिली ओळख. प्रखर बुध्दीच्या बाळने त्या कहाण्या लक्षात ठेवल्या.

गंगाधरपंतांना पहिल्या तीन मुली झाल्या. बालवयातच लग्न करण्याचा काळ होता तो. लोकमान्यांच्या जन्माच्या वेळी थोरल्या मुलीचं लग्न झालेलं होतं. तिचाच मुलगा धोंडोपंत विद्वांस पुढे आपल्या मामाचा उजवा हात बनला. गंगाधरपंत रत्नागिरीला शिक्षण खात्यात इन्स्पेक्टर पदावर नोकरीला होते. त्यांना सगळे नाना म्हणत. त्यावेळी रत्नागिरी इंग्रजी, संस्कृत, मराठी शिकण्यासाठी प्रसिध्द होतं. मुंबई युनिव्हर्सिटीत पहिल्या प्रथम जे एम. ए. झाले ते डॉ. रामकृष्ण भांडारकर या रत्नागिरीच्या शाळेत मुख्याध्यापक होते. त्या शाळेत गंगाधरपंत गणित शिकवत.

गंगाधरपंत गणितात फार हुशार होते. सर्क्युलर ट्रिग्नॉमेट्रीवर त्यांनी लिहिलेलं पुस्तक फार प्रसिध्द होतं. शालेय अभ्यासाला उपयोगी पडणारी आणि व्याकरण या विषयावर पुस्तकं लिहून आणि ती विकून, त्यांनी काही पैसे मिळवले. लोकमान्यांना तेव्हा गावातले लोक गुरुजींचा बाळ्या या नावाने ओळखत. पहाटे पहाटे बाळच्या पाठांतराचा आवाज वाड्यात घुमायला लागला. अमरकोशाचे तीनही खंड, पुरुषसूक्त, संस्कृत श्लोक, बाळ पाठ करायला लागला. त्याच्या गणित आणि संस्कृत विषयातील तेजस्वी ग्रहणशक्तीचा आणि अद्भूत स्मरणशक्तीचा अनुभव गंगाधरपंतांना होऊ लागला. घरी कुणी गणिती आला की गंगाधरपंत त्यांना बाळला गणितं घालायला सांगायचे. बाळही ती गणितं तोंडीच सोडवायचा.

बाळ ५ वर्षांचा झाला आणि दसऱ्याच्या मुहूर्तावर सन १८६१ मध्ये शाळेत जायला लागला. आठव्या वर्षी त्याची मुंज केली. त्यानंतर १८६६ सालात गंगाधरपंत पुण्याला असिस्टंट डेप्युटी इन्स्पेक्टर म्हणून बदलून गेले. त्यांना निरोपाचा समारंभ रामकृष्ण भांडारकरांच्या हस्ते झाला तेव्हा भांडारकर आपल्या भाषणात म्हणाले की गंगाधरपंतांची विद्वत्ता, निरलसता, सदयता, नि:स्पृहता, आणि कल्पकता घेण्यासारखी आहे. गंगाधरपंतांचा हा वारसा बाळकडे आपोआप आला. त्याच वर्षी २४ जुलैला, बाळच्या १० व्या वाढदिवसाच्या दुसरे दिवशी, पार्वतीबाईंचं निधन

झालं. पुण्यात आल्यावर गंगाधरपंत बाळला घेऊन तुळशीबागेतील कॉन्ट्रॅक्टर दातारांच्या वाड्यात राहायला लागले.

पुण्यात सिटी स्कूलमध्ये बाळचं शिक्षण सुरू झालं. दोन वर्षांमध्ये बाळने तीन इयत्ता पूर्ण केल्या. डोक्यावर पांढरी गोंड्याची लोकरी टोपी, अंगात बंडी अशा वेषातील बाळ पत्र्यामारुतीजवळच्या शाळेत जायला लागला. मुलगा तेजस्वी. गणित आणि संस्कृत विषयावर तर असामान्य प्रभुत्व. बाळला सगळेच विषय सोपे वाटत. शिक्षकांनी गणित सोडवायला सांगितलं की तोंडीच सोडवत असे. खडूने हात कोण खराब करून घेतो म्हणे. मास्तरांनी संस्कृत श्लोकाचं मराठीत भाषांतर करून पाठ करायला सांगितलं की मीही अशी भाषांतरं करतो, आपण केलेली भाषांतरं लगेच लक्षात राहतात, असं म्हणून स्वत:चीच भाषांतरं म्हणत असे. मनाला योग्य वाटेल तेच करायचं. भीती मुळी नाहीच आणि उलट उत्तरं द्यायचे काय दुष्परिणाम होतील याची जराही फिकीर नाही. शेंगांच्या टरफलांची आणि संत शब्दाची गोष्ट तर सर्वांनाच माहीत आहे. तेव्हा वय १० वर्षेसुद्धा नव्हतं. पुण्यातल्या शाळेचे हेडमास्तर जेकब नावाचे होते. एकदा एका संस्कृत शास्त्रीबुवांचा आणि बाळचा संस्कृत साहित्यावरून वाद झाला आणि जेकब मास्तरांनी शास्त्रीबुवांची बाजू घेतली. झालं. हे वीर शाळा सोडून बाहेर पडले आणि बाबा गोखल्यांच्या शाळेत गेले. जेकब मास्तरांची बदली

होऊन तिथे जेव्हा कुंटे मास्तर आले तेव्हा स्वारी परत पहिल्या शाळेत आली. ज्या काळात तरुण मुलंसुद्धा आपल्या पालकांसमोर निमूटपणे, मान वर न करता, उभे राहत, तेव्हा हे एवढं धाडस. जे गुण बाळा ते जन्मकाळा याचा अनुभव सर्वांनाच यायला लागला. नारायणराव जोशी मास्तरांनी फळयावर लिहिलेलं गणित चुकीचं आहे म्हणून त्यांच्याशी वाद घातला आणि आपलं मत खरं खोटं करायला थेट केरूनाना छत्रे यांच्याकडे दोघांची वरात गेली. केरूनाना मोठे गणिती, खगोल शास्त्रज्ञ, वैज्ञानिक, त्यांची साक्ष, गणित सातव्या इयत्तेतलं, विद्यार्थी १२ / १३ वर्षाचा. पण पटेल तेच करायचं आणि कुणाचाही मुलाहिजा ठेवायचा नाही, हे गुण पाळण्यातच होते, त्यातच पुढे इंग्रजही आले. प्रचंड बुद्धिमान पण तंटेखोर, अतिशय हुशार पण हट्टी ही ख्याती पुढे जे जे संपर्कात आले, त्यांनी सर्वांनी अनुभवली. पण अन्यायाविरुद्ध पुढारीपण घ्यायचं धाडसही सर्वांनी अनुभवलं. वर्गमित्रांच्या अभ्यासात मदत करायची कायम तयारी त्यामुळे मुलांच्यात अतिशय आवडते. एका मुलाने काहीतरी खोडी काढली म्हणून जेकब मास्तरांनी प्रत्येक मुलाच्या हातावर दोन दोन छड्य्या मारायला सुरुवात केली. बाळचा नंबर आला तेव्हा मी खोडी काढली नाही म्हणून मी मार खाणार नाही असं निक्षून सांगून निघून गेला. त्यांच्या पाठोपाठ सर्व मुलंही गेली. बाळच त्यांचा निर्भय नायक.. जिथे अन्याय तिथे

संघर्ष. हेच तत्त्व आयुष्यभर बाळगलं. शाळेचा हा अभ्यास सुरू असतांना केरूनानांच्या घरी रात्री बाळ जायचा कारण केरूनाना छत्रे रात्री आपल्या विद्यार्थ्यांना दुर्बिणीतून आकाश दर्शन घडवायचे. गंगाधरपंत आणि केरूनाना मित्र असल्यामुळे बाळलाही प्रवेश मुक्त होता. या रात्री केलेला अभ्यास हा त्यांच्यासाठी, भविष्यातील ओरायन आणि आर्यांचे मूळ वसतिस्थान या अमर पुस्तकांच्या तयारीचा पाया होत्या.

सोळाव्या वर्षी सन १८७१ च्या वैशाखात, लाटघरच्या बाळ घराण्यातील तापीबाईंशी विवाह झाला. त्यांचं नाव सत्यभामाबाई ठेवलं. गंगाधरपंतांनी या मित्राकडे, बाळांकडे आपले ८००० रुपये व्याजाने लावण्यासाठी ठेवले होते आणि त्यातून ते थोडी कमाई करत होते. बाळचं लग्न करण्याचं गंगाधरपंतांनी ठरवल्यावर या मित्राने, आपली बहीण लग्नाची असल्याचं सांगितलं आणि हे लग्न पार पडलं. बाळसाठी सुंदर मुली सांगून येत होत्या, पण बाळांचं घराणं चांगलं आहे, शिवाय आपले पैसेही सुखरूप राहतील म्हणून त्यांचीच मुलगी करा असा गंगाधरपंतांना काशीहून वडिलांचा निरोप आला. ह्या बाळांचा चांगुलपणा काय तर, एकदा त्यांच्याकडे सकाळी एक भिकारी आला तेव्हा घरातील बाईंनी त्याला डब्यातील तांदूळ काढून घातले. ते घालताना बाईंना एक दागिना त्याच्या झोळीत पडलेला दिसला. त्या काळात

चोरांपासून सोनं वाचवण्यासाठी धान्याच्या डब्यात ते रात्री घालून ठेवत. त्या काळातील दागिनेही ग्रॅममध्ये नसत तर वजनात तोळे आणि शेरात असत. भिकाऱ्याला दागिना मिळाल्यावर घरातल्यांनी निर्णय केला की त्याला दिलं ते दिलं. आता परत घ्यायचं नाही. हा त्यांचा चांगुलपणा.

सत्यभामाबाई म्हणजे साक्षात सावित्री, साध्वी. शेल्याच्या पदरात सूर्य बांधला गेला पण पदर कधी विरला नाही. त्यांना ४ मुलगे आणि ३ मुली झाल्या. घरात सतत माणसांचा जत्रेसारखा लोकमान्यांनी जमवलेला राबता, पण त्या कधी बाहेर येऊन गप्पा मारत बसलेल्या कुणाला दिसल्या नाहीत. गप्पा मारायला, शेजारीपाजारीही त्या जात नसत. थोरली मुलगी कृष्णा नाशिकचे सुधारक वकील गंगाधर केतकर यांच्या वकील चिरंजीवांना, विश्वनाथ यांना दिली, दुसरी मुलगी फर्ग्युसनमधील फेलो, पांडुरंग रामचंद्र वैद्य यांना दिली. आणि मथुरा या तिसऱ्या कन्येचे पती, तिसरे जावई, अलाहाबादचे श्रीरंग साने, जर्मनीहून केमिस्ट्रीमध्ये पीएच.डी करून आले होते. हाताशी आलेला तरुण मोठा मुलगा विश्वनाथ हा १९०२ सालच्या प्लेगच्या साथीत गेला. वामन लहानपणीच अतिसाराने वारला. ज्या रात्री तो गेला त्यावेळी त्या आजारी मुलाला घेऊन फेऱ्या मारणाऱ्या आपल्या भाच्याला ते मृत बालक गुपचुप सत्यभामाबाईंच्या जवळ नेऊन ठेवायला

लोकमान्यांनी सांगितलं. सकाळी सत्यभामाबाई जाग्या झाल्या आणि मुलगा खूप वेळ झोपलाय असं म्हणाल्या तेव्हा लोकमान्य आपल्या पत्नीला म्हणाले की, काही इच्छा असेल तर पुढचा जन्म घेईल. राम आणि श्रीधर व्यवस्थित आयुष्य जगले. घरात आपल्या बहिणीचे चिरंजीव धोंडोपंत आणि त्यांचे धाकटे बंधू गंगाधर हे दोन भाचे, लोकमान्यांचे खासगी सचिवच होते. लोकमान्यांचा सगळा मोठा व्याप धोंडोपंतच सांभाळायचे. वाड्यात येणाऱ्या प्रत्येकाला चहा आणि जेवणाची वेळ असेल तर जेवण मिळे. कचेरीतील गडी घराचीही झाडलोट करत असेल. घरात, फर्निचर असं काही नव्हतंच. एक लोकमान्यांची प्रसिद्ध आरामखुर्ची, त्यांच्या पुस्तकांचं कपाट, २ खुर्च्या आणि एक डेस्क. सर्वांचीच राहणी अगदी साधी होती.

सत्यभामाबाई जरीची रेशमी लुगडी नेसल्यात असं कुणी पाहिलं नाही. लोकमान्यांचं खडतर आयुष्य, कोल्हापूर प्रकरणापासून झालेला तुरुंगवास, पंचहौद चहा प्रकरणानंतरचं ग्रामण्याचं संकट, आणि शेवटी मंडालेचा विजनवास, सारं त्यांनी निमूटपणे सहन केलं. लोकमान्य मंडालेला गेल्यावर मात्र त्यांनी काळ्या बांगड्या, काळ्या मण्यांचं मंगळसूत्र एवढंच अंगावर धारण केलं. लोकमान्य मंडालेत असतांना ७ जून १९१२ ला सत्यभामाबाईंचं निधन झालं. ज्या पत्रातून त्यांना ही बातमी आली,

ती वाचल्यावर त्यांनी घरी लिहिलेल्या पत्रात '' बातमी वाचून मी हादरलो '' असा जो शब्द वापरला, तो अनेक संकटकाळातही त्यांनी कधी वापरला नव्हता. त्यातच आणखी लिहिलं की तिच्या मरणसमयी मी तिच्या जवळ नाही याचंच दु:ख जास्त आहे. माझ्या जीविताचा एक भाग समाप्त झाला. सत्यभामबाईंच्या सर्व वस्तु जपून ठेवायल्या सांगितलं. मंडालेहून सुटका होऊन परत पुण्याला गेल्यावर, सत्यभामबाईंचं आपण काढलेलं चित्र घेऊन एक चित्रकार आला आणि त्याने लोकमान्यांना सत्यभामाबाईंचं चित्र दाखवलं. धोंडोपंत म्हणाले, किती छान काढलंय ना चित्र ! तेव्हा चित्राकडे निरखून पाहत लोकमान्य म्हणाले, हवं तसं नाही आलंय चित्र.. धोंडोपंतानी परत चित्र छान वाटतंय आपल्याला असं म्हटल्यावर गहिंवरून म्हणाले, अरे, ती तुला जास्त माहीत की मला? लोकमान्य मंडालेला गेल्यावर सत्यभामाबाईही एकही दिवस घराबाहेर पडल्या नाहीत.. तेही एका खोलीत बंद, ह्याही एका घरात बंद. बंदिवासात राहायला, मंडालेत हवं असं कुठाय? मंडालेहून लिहिलेल्या पत्रात सत्यभामाबाईंना त्यांनी सांगूनच ठेवलं होतं, की आपली आणि दुर्दैवाची टक्कर जुंपलली आहे. त्यातून कोणीतरी एक जिंकणार किंवा हरणार. अर्थात आपण हार न जाण्याचा निश्चय केला तर आपणच जिंकू. त्या काळातील पुरुषांच्या तुलनेत लोकमान्यांचंही शील हेच सामर्थ्य होतं म्हणूनच

त्यांच्या शीलावर शिंतोडे उडवण्याचा अश्लाघ्य, निंदनीय प्रकार इंग्रजांना ताईमहाराज प्रकरणात करावा लागला, इतकं शत्रुत्व इंग्रजांच्या मनात होतं लोकमान्यांबद्दल.

लोकमान्यांचाही तोच प्रसिद्ध पोशाख, जरीकाठी पांढरं उपरणे, पगडी, अंगरखा आणि धोतर आणि लाल जोडे. अगदी सुरुवातीच्या काळात पागोटे आणि रंगीत सदरा घालत असत. पण नंतर पांढरा पोशाख आणि पगडी कायम झाली. घरी सकाळी जेवणात पोळी असे मात्र रात्री फक्त भात आमटी. जेवतांना पानात पडेल ते जेवायचं. त्याच्या चवीवर टीकाही करत नसत आणि छान झाला असेल पदार्थ तर कौतुकही करत नसत. जेवायचं आणि माडीवर लगेच जायचं हाच नित्यक्रम. दुपारी छान झोप घेत. लोकमान्यांची चैन म्हणजे उन्हाळयात बर्फ घातलेलं जिंजरेड किंवा थंड सोडावॉटर. पुस्तक, सुपारी आणि चहा ही लोकमान्यांची तीन जबरदस्त व्यसनंच. अडकित्ता नसला तर दातानेच सुपारी फोडत. पुस्तकांच्या कपाटात कोणतं पुस्तक कुठे आहे हे त्यांनाच माहीत असे. अतिशय शिस्तीचे, व्यवस्थित होते लोकमान्य. पत्राची घडी कशी घालायची, स्टॅम्प कसा आणि कुठं लावायचा याची शिस्त असे. वेळ मिळाला की त्यांच्या आरामखुर्चीत, एक पाय खुर्चीच्या हातावर टाकून पुस्तक वाचत बसणे ही त्यांच्यासाठी मोठी पर्वणी, जी फार थोड्या वेळेला त्यांच्या वाट्याला येई. पुस्तक कितीही मोठं

जाडजूड असलं तरी दोन तासात ते संपवून टाकत. एवढ्यात पुस्तक वाचून संपलं? असं आश्चर्याने कुणी विचारलं की सांगत, एकदा का लेखकाच्या विचाराचा धागा कोणत्या रोखाने जातो हे कळलं की मग पुस्तक वाचून होतं. वाचलेल्या पुस्तकातला कोणता मजकूर कोणत्या पानावर आहे हेही ते सांगू शकत ही त्यांच्या अफाट स्मरणशक्तीची कमाल होती. परत त्यावरही त्यांचं उत्तर असे की जो मजकूर मनाला भावतो, तो कुठे आहे हे आपोआप लक्षात राहतं. ही पुस्तकंही कथा कादंबऱ्यांची नसून धर्मग्रंथ, तत्त्वज्ञान, वेद-पुराणं-उपनिषद अशा जड विषयांवरची असत. चहा हे आवडतं पेय. मुलांनाही चहा हवा असायाचा पण त्यांना ते दूध प्यायला लावायचे आणि मुलांनी, तुम्ही मात्र चहा पिता, अशी तक्रार केली की बाप दारू प्यायला म्हणून मुलांनी प्यायची नसते असा त्यांना दम मिळे. झोपेवर त्यांचा कमालीचा ताबा होता. आता मी झोपतो हे ज्या क्षणाला म्हणत, त्याच्या दुसऱ्या क्षणी घोरायला लागलेले असत, आणि जेव्हा त्यांची उठायची वेळ असेल त्या क्षणी जागे होत असत.

त्यांच्या घरात होमहवन, व्रतवैकल्य, कुठल्यातरी पूजा असं कधी होत नसे. धार्मिकपणा होता, पण त्याचं प्रस्थ नव्हतं.

वाड्यात सतत लोकांची वर्दळ असे पण कोणता माणूस कोणत्या कामासाठी लायक हे गुण जोखूनच ते त्या माणसाला सांभाळीत असत. त्या वर्दळीतील काही लोक हे त्यांचं गुप्तहेर खातंच होतं, पोलिस खात्यातून निघालेल्या बातम्या आधी त्यांच्याचकडे पोचत, काही चतुर लेखक, काही अंगमेहनत करणारे, काही निष्ठावंत, काही नुसते चतुर बोलके, काही दुसऱ्याच्या अंगावर सोडायला लायक, काही कोर्ट कचेरीची कामे करायला लायक, काही विश्वासू, काही धाडसी, काही लोकमान्यांच्या पक्षाची वाहवा आणि प्रतिपक्षाची निंदा करण्यात पटाईत, काही उसनं अवसान आणून तोंडाचा पट्टा चालवून भांडणारे, असे अनेक असत. अगदी जवळचे खरे मित्र म्हणजे चित्रशाळेचे मालक वासुदेवराव जोशी, दाजीसाहेब खरे, बडोद्याचे बापट,आणि त्यांचे भाचे धोंडोपंत एवढेच होते. त्यांच्याबरोबरच खलबतखान्यातील गुप्त कारवाया आखल्या जात. गावातील चळवळीतील गुप्त डाव आखणे, महत्त्वाची बातमी छिद्र पाडून मिळवणे, बाहेर मुद्दाम काय बोलायचं आणि न बोलायचं याचं धोरण आखणे, आणि आर्थिक व्यवस्था पाहणे, या साऱ्यांचा विचार फक्त या मित्रांबरोबर होत असे. एवढे आपण लोकमान्य, लोकांचे नेते, पण आपण शिष्य तयार का करू शकला नाहीत असं एकाने विचारल्यावर ते म्हणाले, माझ्याबरोबर काम करणं म्हणजे

लाडू खाणं नाही..ती सुळावरची पोळी आहे. इथे सक्तमजुरी करावी लागते, पुढारीपण मिळवणं म्हणजे पी हळद, हो गोरी नव्हे.. आताच्या मुलांना ते हवं असतं. अंगमेहनत नको असते. ती सक्त मजुरी सिंहासनासारखी स्वराज्यासाठी लोकमान्यांनी आनंदाने उपभोगली..

त्यांची आरामखुर्ची हीच त्यांच्या सबंध आयुष्यातील कर्तृत्वाची एकमेव साक्षीदार. स्वत: लोकमान्य याच खुर्चीवर बसून वर्तमानपत्राचा सर्व मजकुर लेखकाकडून लिहून घेत. याच खुर्चीवर बसून लोकांच्या भेटीगाठी, गप्पा गोष्टी, इंग्रजांविरुद्धच्या चाली, आकार घेत. मजकुर सांगत असतांना अडकित्त्याने सुपारी कातरत ती तोंडात टाकण्याचं काम चाले. काही कठीण स्वरूपाचा मजकुर असेल तेव्हा डोक्यावर हाताने थापण्याची त्यांना सवय होती. झोपण्याव्यतिरिक्ताचा सारा वेळ ते या खुर्चीतच असत. अनेक पुस्तकांच्या विषयांचं चिंतन-मनन याच खुर्चीवर झालं.

आपल्या मुलांवरही त्यांचं बारीक लक्ष असे. त्यांची नखेही ते तपासत. अभ्यासाच्या वह्या बघत. तालमीच्या व्यायामावर त्यांचा विश्वास होता. रोज सकाळी ते स्वत: तालीम करत आणि मुलांनाही करायला लावत. एक तालीम मास्तर मुलांसाठी ठेवला होता आणि घरातच व्यायामशाळा उघडली

होती. जेवायला मुलं आली की मेहनतीचं जेवणार की फुकटचं असं विचारात, म्हणजे अभ्यास करत होतात की रिकामे होतात? ' कोणताही उद्योग करा पण त्यात प्रावीण्य मिळवा, चामड्याचे जोडे बनवून विकलेत तरी हरकत नाही, पण जोडे म्हटलं की लोकांच्या मनात तुमचं नावच आलं पाहिजे, जसं चहा म्हटलं की लिप्टनच लोकांना आठवतो, बिस्किटं म्हटलं की पामरचं नाव आठवत तसं. आपापल्या मनोवृत्तीनुसार व्यवसाय करायचं प्रत्येकाने ठरवलं तर हा देश सुधारायला वेळ लागणार नाही, ' हा त्यांचा मुलांना सल्ला होता. मुलांसाठी त्यांनी कॅमेरा आणून दिला होता. एक तट्टू ठेऊन मुलांना घोडेस्वारी शिकवली होती. एक तालिम मास्तरही ठेवला होता.

सिंहगड हे लोकमान्यांचं अत्यंत आवडतं ठिकाण, तिथली गार हवा, मावळे आणि महाराजांची सतत आठवण हे जिव्हाळ्याचे विषय. मावळ्यांशी बोलणं हा आवडता छंद. १८९० साली रामलाल नाईक यांच्याकडून त्यांनी जमीन विकत घेतली आणि दाजीसाहेब खरे यांच्याबरोबर मिळून एक कौलारू बंगला बांधला. सर्व कार्याचा व्याप मागे ठेवून, मे महिन्यातील काही दिवस ते तिथे एकत्र घालवत..संध्याकाळी सूर्यास्त पाहायला लोकमान्य कुटुंबाबरोबर बालेकिल्ल्यावर जात आणि मुलं खेळत असतांना पती-पत्नी गप्पा मारत बसत. तिथेही लोक भेटायला येत. एकदा

टिळक-खरे, दोघांची मुलं बुद्धिबळ खेळत बसली होती, तेव्हा हे दोघे बाप लोक आधी मुलांच्या मागे खेळ बघत बसले आणि मग त्यांना बाजूला सारून आपणच खेळत बसले. सत्यात असलेले गोरे विरुद्ध काळे हा कठीण खडतर डाव खेळणारे दोघे सोंगट्यांच्या डावातही तेवढेच रमले.

तापीबाईंशी १८७१ सालामध्ये विवाह झाल्यावर त्याच वर्षी ३१ जुलै, १८७१ ला गंगाधरपंत जलोदराने वारले. हा योग विचित्र होता. लोकमान्यांचा कैलासवास ३१ जुलै, मध्यरात्री १२.४० वाजता झाला, म्हणून १ ऑगस्ट तारीख लागली. त्याच साली, १६ व्या वर्षी, लोकमान्यांनी डेक्कन कॉलेजात प्रवेश घेतला. कॉलेजच्या वसतिगृहातच ते राहायला लागले. गंगाधरपंताना आपल्या चिरंजीवांच्या प्रखर बुद्धिमत्तेचा अनुभव असल्यामुळे त्याला शिष्यवृत्ती मिळणारच म्हणून आपल्या त्यांनी आपल्या मिळकतीचे दोन भाग केले, त्यातील सुमारे ५००० रुपये मुलाच्या शिक्षणासाठी ठेवले आणि थोडे पैसे आपल्या धाकट्या बंधूंना ठेवले पण चिरंजीवांचं पाणी काही वेगळंच होतं. कठीण प्रश्न सगळे आणि पास होण्यापुरतेप बाकी प्रश्न सोडवायचे, मग कशी मिळणार शिष्यवृत्ती मुलाला? वडील गेल्यावर लोकमान्य काकांकडेच राहिले.

डेक्कन कॉलेजमध्ये केरोपंत छत्रे आणि प्रो. शूट मुलांचे आवडते प्रोफेसर होते. आणि फॉरेस्ट नावाचे जे प्राध्यापक होते, ते इंग्रजी विषयाला चांगले पण गणित अगदीच वाईट शिकवायचे. म्हणून लोकमान्यांच्या नेतृत्वाखाली सर्व विद्यार्थ्यांनी प्रिन्सिपालांकडे अर्ज करायचं ठरलं. पण पहिली सही करणाराला शिक्षा होईल म्हणून लोकमान्यांनी अर्जावर गोलाकार सह्या करायला सांगितल्या. तरीही सर्वांना एक वर्षे परीक्षेला बसू न देण्याची शिक्षा झालीच. मग ती टर्म लोकमान्यांनी मुंबईच्या एल्फिन्स्टन कॉलेजमध्ये प्रवेश घेऊन पूर्ण केली. तिथे त्यांचे गणिताचे प्रोफेसर होते. मि. हॅथोर्नवेट त्यांनी लोकमान्यांची गणितातील अचाट बुद्धी पाहून, गणितातील इतर हुशार मुलांबरोबर त्यांनाही कठीण गणितं घातली. ती लोकमान्यांनी सहज सोडवली तेव्हा प्रोफेसरांनी ते केंब्रिजची जर्नल्स ते मागवत असत त्यातील कठीण गणितं सोडवायला दिली, तीही लगेच लोकमान्यांनी एका बैठकीत सोडवली आणि वही प्रोफेसरांना दाखवली. तेव्हा प्रोफेसर म्हणाले,

‘ Oh, Good chap. I never thought you were capable of solving them in such intelligent methods ’ मग झालं. प्रोफेसरांनी लगेच हा माझा शिष्य आहे असं सांगायला सुरुवात केली. खरंतर ते चूकही नव्हतं. पण सत्यवचनी या महामानवाला हे

कसं मानवावं? त्यांनी प्रोफेसरांना सरळ शब्दात सांगितलं की मी तुमचा नाही, केरूनानांचा शिष्य आहे. या सत्यं ब्रूयातचा परिणाम मात्र अप्रियम न ब्रूयातमध्ये झाला. बी.ए. झाल्यावर गणितात त्यांनी एम.ए. करायचं ठरवलं. त्या परीक्षेला तेच Hathornwet परीक्षक म्हणून आले आणि जुना राग धरून प्रोफेसरांनी लोकमान्यांना गणितात नापास करून टाकलं. नियतीचीच ती इच्छा असावी बहुतेक, कारण पुढच्या आयुष्याला त्यांना वकिली ज्ञानाची गरज होती. एम.ए. त नापास झाल्यावर लोकमान्यांनी सरळ कायद्याच्या अभ्यासाठी लॉ कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. रात्री सगळीकडे निजानीज झाली की हिंदू लॉ आणि हिंदू धर्मशास्त्राचा अभ्यास करून त्यात त्यांनी प्राविण्य मिळवलं. दोन वर्षांमध्ये कायद्याची पदवी १८७९ सालात मिळवली. हायकोटाची वकिलीची सनदही मिळाली पण पुढचं ध्येय निश्चित होतं. त्यांचा अभ्यास रात्रीच चाले. दिवसभर काहीतरी ‘ निष्काम कर्मयोग ’ चाले.

लॉ कॉलेज सन १८६६ मधेच पुण्यात सुरू झालं होतं. कॉलेजचा कारभारही अजून नीट सुरू झाला नव्हता. या कॉलेजने पहिली परीक्षा घेतली तेव्हा फक्त ५ विद्यार्थी होते. त्या सर्व मुलांनी एकत्र मिळून उत्तर पत्रिका लिहिली. कारण पेपर कसा लिहायचा ते कुणालाच माहीत नव्हतं. तेव्हा लोकांनी कॉलेजवर टीकाही केली होती आणि लॉटरी पद्धतीने मुलांना पास करायला हवं होतं असा

कुत्सित शेरा मारला होता. इ. स. १८७९ सालापर्यंत या कॉलेजची संख्या मात्र भराभर वाढत गेली. लोकमान्यांनी कायद्याची पदवी मिळवली, पण वकिली करायची नव्हतीच. देशासाठी स्वराज्य मिळवायचं ध्येय होतं. देश आपण चालवायचा निर्धार होता. डेक्कन कॉलेजमध्ये तेव्हा त्यांचे सहकारी होते ते, दाजीसाहेब खरे, दादासाहेब खापर्डे जे पुढे मोठे वकील झाले, सर नारायण चंदावरकर, सुधारक गोपाळ गणेश आगरकर, श्रीधर उपासनी, शारंगपाणी, आर. डी. सेठणा, दस्तूर, असे मोठे जे आपल्या क्षेत्रात पुढे खूप चमकले. गोपाळ गणेश आगरकरांची विशेष मैत्री. दोघांची स्वप्नं सारखीच होती. देशकार्याला वाहून घ्यायचं.

लोकमान्य आणि आगरकर जोडी महाराष्ट्राच्या इतिहासात प्रचंड गाजली. दोघेही बुद्धीमान. दोघेही त्यागबुद्धीने भारलेले, दोघेही आक्रमक, आग्रही आणि हट्टी. दोघेही देशकार्यासाठी सुखासीन आयुष्याकडे पाठ फिरवलेले..पण एकाचा प्रवास समाज सुधारणा या उत्तर ध्रुवाकडे तर एकाचा आधी स्वराज्य मिळवणं या दक्षिण ध्रुवाकडे. देशासाठी तळमळणारे पण एकत्र आलेच नाहीत दोघे. कॉलेजच्या दिवसांमध्ये, नेहमी फिरायला जात, सादीलबाबाच्या टेकडीवर बसून देशाच्या अवनीतीची चर्चा करत असत. आगरकर समाजाच्या सर्व जुनाट चालीरीती मोडून टाकून नवीन आधुनिक दृष्टी देण्यासाठी झपाटलेले आणि

लोकमान्य, इंग्रजांना घालवून आधी स्वराज्य मिळवू आणि मग आपले कायदे आपण करून समाजातील रूढी बदलून टाकू या विचारांचे. आपल्या जुन्या परंपरांच्या मागचा शुद्ध हेतु शोधून तो सांभाळावा आणि ओंगळ, दुष्ट प्रथा घालवण्यासाठी आधी जनमत तयार करून मग आपोआप त्या बदलतील या विचारांचे लोकमान्य. त्यामुळे या दोघांचे विचार म्हणजे देशाला प्रगतीकडे नेणाऱ्या गाडीचे दोन समांतर रूळ होते. सामाजिक सुधारणांपेक्षा स्वराज्य लवकर मिळेल याची लोकमान्यांना खात्री होती. एकाच वेळी सुधारणा आणि स्वराज्य या दोन भिन्न मार्गांवरून जाण्याने काहीच साधी होणार नाही हेही ते जाणत होते. सर्वात महत्त्वाचं म्हणजे त्यांना जनजागृती करून स्वराज्य प्राप्तीसाठी इंग्रज सरकारविरुद्ध जनचळवळ उभी करायची होती, तर समाज सुधारणा करणारांना वाळीत जाऊन पडावं लागत होतं ते त्यांना चालणारच नव्हतं. मनुष्य संग्रह हा त्यांचा आत्मा होता. सुधारणांना त्यांचा विरोध नव्हता तर त्या घाईघाईने करण्याला होता. इंग्रजांनी आपल्या धर्मपीठांच्या, शंकराचार्यांच्या अधिकारात लुडबूड करून पीठांचा आब जाणं मंजूर नव्हतं म्हणूनच धार्मिक कायद्यातील सरकारचा हस्तक्षेप त्यांना मंजूर नव्हता. लोकांच्या घोळक्यात

रमणारे ते होते म्हणूनच मला तुमचा पैसा नको, काही नको, फक्त तुमचं अंत:करण द्या असं ते म्हणत.

लोकमान्य हा एवढाच शब्द उच्चारला तरी कोणत्याही भारतीयांच्या समोर लोकमान्य बाळ गंगाधर टिळकच येतात. न्यू इंग्लिश स्कूल आणि फर्ग्युसन कॉलेज काढून शिक्षणात आयुष्य घालवायचं म्हणता म्हणता, केसरीचे संपादक झाले, केसरी मराठा हातात आल्यामुळे सार्वजनिक आयुष्यात शिरले, सार्वजनिक आयुष्यात शिरले म्हणून आपोआप राजकारणाशी संबंध आला. राजकारण हाती घेतलं आणि भारतीय भूमीवर सर्व क्षेत्रात सर्वांगाने प्रवाही झाले. एकीकडे वेद-पुराणे-महाभारताचा अभ्यासक तपस्वी, राजकारणात शिरून स्वराज्य लढ्याचा सेनापती झाले. एक महान गणिती, कायद्याचा अभ्यासक होऊन आपल्याविरुद्ध चालणाऱ्या खटल्यांमध्ये कायद्याचा कीस पडायला लागला, एक महान संस्कृत पंडित, गणपति उत्सव आणि शिवाजी उत्सवाचा, चळवळींचा प्रारंभकर्ता झाला, एक कुटुंब वत्सल, लोकप्रेमाचा भोक्ता, शाळेतील शिक्षक होण्याची स्वप्नं पाहणारा पुरुष राजबंदी म्हणून ६ वर्षांच्या विजनवासात जाऊन पडला आणि गीतारहस्य या महान ग्रंथाचा कर्ता ठरला. या धकाधकीच्या मानसिक ताणांच्या आणि वादळी आयुष्याक्रमातही त्यांचे ‘ ओरायन ’ आणि ‘ आर्यांचे मूळ

वसतिस्थान ’हे अलौकिक इंग्रजी शोधग्रंथ जागतिक खगोलशास्त्रीय ऐतिहासिक साहित्यात अमूल्य भर टाकून गेले...

मनस्वी बेडर आणि कणखर स्वभाव, प्रचंड आत्मविश्वास, हाती घेतलेल्या कार्याचा सखोल अभ्यास करून त्यावर तुटून पडणं, आपल्या अफाट स्मरणशक्तीवर समोर येणाऱ्या माणसांचे चेहेरे कायम लक्षात ठेवणं, चैनीची निष्ठूर अनासक्ती, पदरचा पैसा खर्च करून सामान्यांच्या अडचणी सोडवायला धावून जाणं, देशाच्या स्वातंत्र्यासाठी लढून हाल अपेष्टा, तुरुंगवास सोसणं, अन इंग्रज सत्ताधिकाऱ्यांसाठी एक जबरदस्त शत्रू होणं, ही बहूआयामी, बहूपेडी, त्यांची ओळख.

या गुणांनी ते सार्वजनिक आयुष्यात उतरले आणि सुधारक आगरकरांपासून विभक्त झाले. कॉलेज संपल्यावर दोघांनी विचार करून एक निर्णय नक्की केला तो म्हणजे सुरुवात शिक्षण क्षेत्रात करायची आणि त्यासाठी शाळा काढायची. या दोघांनी सर्व तरुणांना एकच मंत्र दिला होता तो म्हणजे, ‘‘ आपल्या राष्ट्राचा विचार करा, कामाला लागा, नुसत्या आहार विहारासाठी मानव जन्म नाही. ’ **असं हे सूर्यबिंब..आभाळ कोसळलं तर त्याच्या छातीवर उभा राहीन म्हणणारा दुर्दम्य राष्ट्रपुरुष.. स्वराज्याची आग हृदयात घेऊन भारतीय राजकीय क्षितिजावर चमकला**

**आणि अस्ताला जाईपर्यंत इंग्रजांना आपल्याभोवती नाचवलं आणि अखेरची बाबा महाराज केस जिंकून नाहीसा झाला.**

कुटील राजकारण, लबाड्या, भारतीयांच्यामध्ये तोडफोड, भारताच्या नैसर्गिक साधनसामग्री आणि जडजवाहिराची लूट यावरच इंग्रजांनी सत्ता काबीज केली. आपली जंगलं इंग्लंडमधील आगगाडीच्या स्लीपर्ससाठी, कापसाच्या गाठी मॅंचेस्टरमधील कापड गिरण्यांसाठी, शिवाय खनिजं जहाजं भरभरून जात होतं. लोकमान्य हे उघड्या डोळ्यांनी पाहत होते आणि तळमळत होते. इंग्रजांचं खरं रूप ओळखणारे जे काही थोडे होते, त्यात लोकमान्यही होते. बाकीचे इंग्रजांपुढे हांजी हांजी करणारे होते. हिंदू-मुसलमान धर्मीयांमध्ये फूट पाडून त्यांनी आपल्या सत्तेचा पाया रचला. त्या आधी दिल्लीच्या सल्तनतीवर सर्व अफगाण आणि तुर्की सुलतान होते, पण हे दोन्ही धर्म एकत्र नांदत होते. सम्राट अकबराने तर ही दरी बुजवण्याचा स्वत:च खूप प्रयत्न केला. हैद्राबादच्या निजामाचा दिवाण विठ्ठल सुंदर मराठी होता, तर महंमद तुघलकाची आई स्वत: हिंदू होती. शिवाजी महाराजांकडे विजापूरचे पठाण चाकरी मागायला आले तेव्हा गोमाजी पानसंबळ यांनी महाराजांना, आता तुम्ही राज्यकर्ते आहात, त्यांना चाकरीत घ्या असा सल्ला दिला होता. या दोन धर्मीयांवर सत्ता गाजवायची

तर त्यांच्यात भांडणं लागणं जरुरीचं होतं. तोच इंग्रज राज्यलोलूपांचा पाया होता. अफगाणी-तुर्की-मुघल राज्यकर्ते भारतात आले आणि इथेच रमले, इथल्याच मातीशी एकरूप झाले. पण ब्रिटिश मात्र भारत लुटून निघून गेले..म्हणूनच त्यांना ‘ चले जाव ’ हे शब्द गांधीजींनी ऐकवले.

या ब्रिटीशांसाठी लढण्यासाठी लोकमान्यांनी त्यांच्याच विचारांच्या शस्त्राने लढाई दिली. लोक जेव्हा त्यांना विचारत की एवढे इंग्रजांशी लढता तर त्यांच्या न्यायव्यवस्थेवर तुमचा एवढा विश्वास कसा? तेव्हा त्यांनी दिलेलं मार्मिक उत्तर त्यांच्या राजकीय मुत्सद्दीपणाची आणि रणनीतीचं होतं. ते म्हणाले,

‘ माझा न्यायसंस्थेवर विश्वास आहे, हा माझा विश्वास अनाठायी आहे असं खूप लोक म्हणतात. पण त्यांना खरं कळत नाही. ब्रिटिश लोक जात्याच कायद्याचे अभिमानी आहेत. अन्यायसुद्धा ते कायद्याच्या चौकटीत करतात. तेव्हा त्यांच्या या शास्त्राचा त्यांच्याच विरुद्ध मी उपयोग करतो. प्रिव्ही कौन्सिलपर्यंत भांडत जातांना, कायद्याचा कीस काढतांना, त्यांच्या स्वभावाचं हिडीस रूप लोकांपर्यंत पोचवण्याची मला संधी मिळते. कोर्टात मला त्यांच्या विरुद्ध बोलता येतं ही संधी काय कमी आहे? लोकजागृती करण्याचं ते अमोघ शस्त्रच आहे. सुलतानांच्या किंवा

मुघलांच्या दरबारात आपल्याला लगेच तोफेच्या तोंडी दिलं गेलं असतं, जुन्या राजवटीत आणि या राजवटीतला हाच फरक आहे.' हे ते बोलून दाखवत. न्यायालयातील पिंजऱ्यात उभे राहून ते जे बोलत त्याने राज्यकर्त्यांची जाहीर बदनामी करता येत असे, त्यालाच इंग्रजी राज्यकर्ते घाबरत असत. कारण याचा सगळा तपशील जगभरच्या इंग्रजांना आणि युरोपियन राष्ट्रांना मिळत असे.

इंग्रजी सरकारला छळण्याची एकही संधी ते सोडत नसत, नव्हे निर्माणच करत असत त्याचं उत्तम उदाहरण म्हणजे, कॉँग्रेसची प्रांतिक सभा धारवाडला होती. तिथे जातांना ते, दाजीसाहेब खरे, गोपाळ कृष्ण गोखले एकत्र जात होते. वाटेत दाजी खऱ्यांनी आपलं अध्यक्षीय भाषण लोकमान्यांना दाखवलं. ते वाचून त्यावर लोकमान्य म्हणाले,

' भाषण उत्कृष्ट आहे यात शंका नाही. पण आपली सर्व मते सरकारला दाखवून सरकारला निरुत्तर करण्यापेक्षा जाणून बुजून एखादं सामान्य विधान असं करून ठेवावं की ते खोडण्याच्या लोभाने सरकारने आपल्यावर धावून यावे, आणि त्याचा फायदा घेऊन काटेरी कुंपणावर टाकलेल्या वस्त्राप्रमाणे त्यांची अवस्था आपण करून ठेवावी. आणि मग असं धोपटावं की कशाला आपण

यांच्या वाटेला गेलो असं त्यांना झालं पाहिजे. ' ही त्यांची खुमखुमी सर्वांना झेपणारी नव्हती.

एकदा विंचूरकर सरदारांच्या जमिनीच्या कामासाठी लोकमान्य मनमाडला गेले होते. काम झाल्यावर ते औरंगाबादला जाण्यासाठी स्टेशनवर गेले. तेवढ्यात लॉर्ड कर्झन यांची गाडी स्टेशनात शिरली. स्टेशनात प्रचंड पोलिस बंदोबस्त होता. तेव्हा लोकमान्य विंचूरकरांना म्हणाले की आत्ता जर इथल्या दुसऱ्या कुणी या आगगाडीवर खडा जरी मारला ना तर हे पोलिस मलाच पकडतील. इंग्रज त्यांचा द्वेष करत होते हे लोकमान्यांना माहीतही होतं. इंग्रजांनाही त्यांची लोकप्रियता हाच खरा धाक होता.

**प्रखर बुद्धिमत्ता.**

त्यांच्या संगतीत अगदी दहा मिनिटेही जरी ज्याने ज्याने घालवली त्याला लोकमान्यांच्या प्रखर आणि अलौकिक बुद्धिमत्तेचा अनुभव आल्याशिवाय राहिला नाही. त्यांचे विचार अत्यंत सुस्पष्ट, मतं निखालस, अभ्यासपूर्ण, आणि स्वत:चा विचार न करता समाजाचा विचार करून घेतलेली असत. गणित आणि संस्कृत या विषयांवर त्यांची पकड तर होतीच, पण इतर विषयांमध्येही त्यांचं असामान्य प्रभुत्व होतं. तरीही कुणी त्यांना जिनियस म्हटलं की म्हणत, मी कसला जिनियस, खरे हुशार तर न्या. माधवराव रानडे आणि लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख.

त्यांचा गायकवाड वाडा भेटीसाठी सर्वांसाठी सर्वकाळ खुला असे. वाड्याच्या दारात एक भैय्या उभा असे. त्याला कुणी लोकमान्य आहेत का विचारलं की तो वरच्या माडीकडे बोट दाखवून तिथे जा म्हणत असे. वाड्यात अशा भेटीला येणाऱ्या लोकांची सतत वर्दळ असे. बरेचजण लोकमान्यांच्या ज्ञानाचा उपयोग आपले प्रश्न, चिंता, मिटवण्यासाठी करून घ्यायलाच येत.

एकदा उत्तरेकडचा एक संगीतज्ञ आपला संगीतावरचा प्रबंध घेऊन त्यांना दाखवायला आला. दीड दोन तास

लोकमान्यांशी बोलून खाली उतरल्यावर म्हणाला, ‘ मला असं कळलं होतं की लोकमान्यांना संगीतामध्ये अजिबात रुचि नाही. पण दोन तास ते माझ्याशी जुनी ओळख असल्यासारखे बोलले. पण माझा सगळा निबंध पाहून इतक्या सूचना केल्या की त्यांना गाण्यातील काही कळत नाही, असं म्हणण्याची माझी छातीच होणार नाही. ’ स्वरांच्या सरोवरात पोहणाऱ्या त्या नारायण राजहंसाला बालगंधर्व उपाधी देऊन यथोचित सन्मान करणाऱ्या लोकमान्यांना संगीत कळत नाही असं म्हणणार तरी कोण? तुम्हाला भारतीय संगीत आवडत नाही का? असं विचारलं तर ते म्हणत की एकदा का वेदांचा घनगंभीर स्वर ऐकला की बाकी काही गोड लागत नाही..

असाच एक कापड व्यापारी त्यांच्या दर्शनासाठी आला. त्याच्याशी तेजी मंदी, भांडवल, किंमती, यावर लोकमान्य एवढे बोलले की जातांना तो माणूस म्हणाला की आमचा पिढीजात धंदा असूनही यांच्यामुळे आपण धंदा कसा करावा ते शिकलो. ते कापडाचा व्यापारही करतात का? आणि तो व्यापारी निघून गेल्यावर लोकमान्य घरातल्यांना म्हणाले की हाती घेतलेल्या विषयाचा अभ्यास न करता हे कसा काय व्यवसाय करतात कुणास ठाऊक.

एकदा एक मित्र आपल्या मित्राला म्हणाला, " काय रे ! तू नेहमी वाड्यावर जात असतोस. तुझे ते लोकमान्य घरी असतात तेव्हा करतात तरी काय? नुसते ह्याच्याशी त्याच्याशी बोलतच बसलेले असतात ना? " मित्राला त्याचं हे बोलणं आवडलं नाही. तो म्हणाला की उद्या मी तुला वाड्यावर घेऊन जाईन. तिथे बसून तूच बघ ते काय करतात ते ! " दुसरे दिवशी सकाळी साडेसात वाजता दोघे वाड्यावर पोचले तेव्हा लोकमान्य अंगणातल्या आरामखुर्चीत बसले होते. त्यांचे एक जुने मित्र तिथे आलेले होते. दोघांची, कालिदास, भवभूती, भास यांच्या संस्कृत साहित्यावर चर्चा चालू होती. भासाचा काळ कोणता यावर दोघं त्याच्या साहित्यावरून ठरवत होते. इतक्यात, लोकमान्यांच्या एका झालेल्या सभेचा वृत्तान्त घेऊन एक माणूस प्रूफं दाखवायला आला. त्यामुळे आधीच्या चर्चेत खंड पडला. लोकमान्यांनी ते लिखाण काळजीपूर्वक  वाचलं आणि म्हणाले, ‘ यातील ही दोन रावबहादूरांची नावे काढून टाका. पोलिसांकडे यांची नावे गेली असतीलच, पण आपल्याकडे ती नकोत. त्यांना कधीतरी त्रास होईल कदाचित . मग तो कारकून निघून गेला. गाडी परत भवभूतीच्या रुळावर आली. थोड्या वेळाने एक माणूस सरकारला लिहिलेला अर्जं दाखवायला आला. त्याच्या जर्मनीहून परतलेल्या भावाला अटक झाली होती. लोकमान्यांनी तो अर्ज वाचला आणि

म्हणाले, ‘ तुमच्या या सुंदर इंग्लिशला सरकार भुलणार नाही. त्यांना फक्त कायद्याची भाषा कळते. सरकारला नेमके मुद्दे घालून लिहावं लागेल. ’ असं म्हणून त्यांनी तोंडानेच कायदेशीर भाषेचा मजकूर सांगितला. तो माणूस परत अर्ज लिहायला निघून गेला. परत भवभूती सुरू झाला. इतक्यात एक मुलगा एक कागद घेऊन आला. तो कागद बौध्दधर्मग्रंथावर ज्यांचा अभ्यास आहे अशा पाली भाषेच्या पंडिताकडून आलेला होता. गीतारहस्याच्या दुसऱ्या आवृत्तीत लोकमान्यांना तो मजकूर घालायचा होता म्हणून त्या पंडिताने लिहून पाठवला होता. हे सगळं तीन तास अवलोकन केल्यावर दोघे मित्र परत आले, तेव्हा त्या ३ तासांवर एक शब्दही कुणी काही बोललं नाही.

एकदा एक राणा सरतानसिंह नावाचा अचूक नेमबाज आपल्या मोगलाईतल्या २/३ निशाणबाजांना घेऊन चिरंजीवासह लोकमान्यांना भेटायला आला. हे सरतानसिंह शब्दवेधाने बाण मारत. सरतानच्या डोळ्यांवर पट्टी बांधून निरनिराळ्या रंगाने रंगवलेली मडकी त्यांचे साथीदार त्यांना एकेक करून वाजवून दाखवत आणि नंतर कोणत्याही क्रमाने रांगेत कशीही मांडून ठेवत. मग जे मडकं वाजवलं जाई त्यावर नेम साधत सरतानसिंग ते मडकं फोडत. हा खेळ पाहून झाल्यावर लोकमान्यांनी त्याचं कौतुक तर केलंच, वर त्याला म्हणाले, ‘ तुमच्या खेळात बंदुकीच्या एका

गोळीतून दोन गोष्टींचा वेध घ्यायचा खेळ ठेवा. अशी कला साध्य करा. त्यात कठीण काहीच नाही. थोडा अभ्यास करावा लागेल. पहिल्या वस्तूचा वेध घेतला की ती दुसरीवर जाऊन पडेल असं बघा.  डायनामिक्सच्या शास्त्राने हे सिध्द केलेलं आहे. गोळीचा वेग म्हणजे व्हेलोसिटी आणि ग्रॅविटि जाणून जिथे गोळी पडेल तिथला पदार्थ फुटेल. गोळी सरळ जात नसते हे लक्षात ठेवा. हवेच्या घर्षणाने ती तिरपी जाते आणि तिचा वेगही मंदावतो हे लक्षात ठेवून अभ्यास करा. आम्ही त्याचा अभ्यास करत असतो. म्हणजे एका दगडात दोन पक्षी. तिच्या वस्तूच्या पुढे आणखी एक वस्तू अशी ठेवा की गोळीची दिशा बदलली की पहिली वस्तू दुसऱ्या वस्तूवर पडून तीही वस्तू पडेल. युरोपात आता नवीन निघालेल्या तोफा वर तोंड करून उडवायच्या ही नवीन पध्दत आली आहे.'

आपला गायकवाड वाडा बडोद्याच्या महाराजांना विकायचा होता. त्यांनी लिलाव पध्दतीने तो विकायचा ठरवलं. लोकमान्यांनी जी किंमत सरकारना सांगितली ती सर्वात किफायतशीर बोली होती म्हणून बडोदे सरकारांनी लोकमान्यांना तो वाडा विकला. गायकवाडवाड्यात राहायला आल्यावर काही काही गोष्टींची डागडुजी करावी लागली. त्या कामावर लोकमान्य स्वत: लक्ष ठेवत. वाड्याच्या बाजूच्या भिंतीला एक जिना

काढायचा असं लोकमान्यांच्या मनात आलं. एवढ्या लहान जागेत लाकडी वाटोळा जिना निघणार नाही असं सुतार म्हणाले. मग लोकमान्य पुढे सरसावले. त्यांनी फळया कशा आणि किती आकाराच्या कापायच्या हे सुतारांना शिकवलं आणि जिना तयार करून घेतला. एका इमारतीतून दुसऱ्या इमारतीत जाण्यासाठी पूल बांधायची नवीन कल्पना तिथे त्यांनी राबवली. वरच्या माडीत दोन दालनांमधे मिळून एकच मोठी हंडी उजेडासाठी लावायची असे लोकमान्यांनी ठरवलं. पण भिंतीची जाडी खूप असल्याने अंधार येईल म्हणून त्यांनी एक युक्ती केली. मधल्या भिंतीला भोक पाडलं होतंच. तिथे भिंत दोन्ही बाजूंनी निमुळती केली.

इ. स. १८९५ मधे लोकमान्य कौन्सिलच्या निवडणुकीला उभे राहिले. तेव्हा काही कागदपत्रं बघायची त्यांना जरूर होती. पण तिथले मुख्य, स्पेन्स यांचं तुमच्याबद्दल चांगलं मत नाही असं मुख्य दप्तरदार पेंडसे यांनी लोकमान्यांना सांगितलं. तेव्हा पेंडशांच्या दबावाला बळी न पडता लोकमान्यांनी सरळ स्पेन्स यांची वेळ मागून घेतली. त्या भेटीत स्पेन्स यांची भेट गेतल्यावर स्पेन्स इतके प्रभावित झाले की ते म्हणाले, " हा माणूस किती बुध्दीमान आहे! आणि स्पष्टवक्ता आणि परखडही. आमचे सरकार का एवढे यांच्याविरुध्द आहे कुणास ठाऊक!" माधवराव नामजोशी आणि लोकमान्य दोघेही कौन्सिलर असतांना सरकारशी

म्युनिसिपालिटीचं भांडण सुरू झालं. सरकारकडून आलेल्या पत्राची नक्कल दोघांना पाहायला हवी होती, पण प्रेसिडेंटनी ते नाकारलं आणि फक्त त्याच्यासमोर बसून वाचायची परवानगी दिली. नामजोशी आणि लोकमान्य त्याच्यासमोर वाचायला बसले. दोघांनी अर्धे अर्धे लक्षात ठेवायचं ठरलं. लोकमान्यांनी ते कागद वाचले आणि फोटोग्राफिक मेमरीसारखे लक्षात ठेवले ते दुसरे दिवशी केसरीमधे आलेल्या मजकूरावरून कळलं.

कलकत्यात काँग्रेसची सभा झाली. नेहमीप्रमाणे कडाक्याचा वाद वगैरेही झाला. तिथून लगेच ते हिंदी भाषेच्या परिषदेला आले आणि हिंदीत इतकं विद्वत्तापूर्ण आणि माहितीने भरलेलं भाषण त्यांनी केलं की म. गांधी चकित झाले. त्यांना ते एक कोडंच वाटलं. जगदीशचंद्र बोस यांचं व्याख्यान ऑपेरा हाऊसमधे होतं. अध्यक्ष होते लोकमान्य. नामवंत असे खूप भारतीय आणि युरोपिअन लोक त्या भाषणाला आले होते. आपल्या प्रास्ताविक भाषणात लोकमान्यांनी जगदीशचंद्रांची आणि जगदीशचंद्रांच्या संशोधनाची इतकी सुंदर ओळख करून दिली की आपल्या भाषणाच्या सुरुवातीला लोकमान्यांचे आभार मानून बोस म्हणाले की माझ्या संशोधनाचं लोकमान्यांनी इतकं सुंदर आणि स्पष्ट स्वरूप दाखवून माझं काम खूप सोपं करून ठेवलंय. एखाद्या व्यावसायिक शास्त्रज्ञालाही हे जमलं नसतं.

कुणी ग्रंथकर्ता कितीही मोठा असला तरी त्याचे विचार बरोबर आहेत की नाहीत याकडे त्यांचं लक्ष असे. कुणी जर म्हटलं की तुम्ही त्यांच्यापेक्षा जास्त हुशार की काय, तर स्पष्टपणे म्हणत की तेही माणूस आणि मीही माणूस. तो ग्रंथकर्ता चूक नाही असं मी का समजावं? मला देवाने बुध्दी दिली आहे त्याचा मग उपयोग काय? म्हणूनच लोकमान्यांच्या गीतारहस्यात पंडितांनी १०० चुका काढल्या. तेव्हा लोकमान्यांनी लगेच उठून आदिशंकराचार्यांनीही अशी व्याकरणातली चूक केली आहे हे दाखवल्याबरोबर पंडितही चकित झाले. इतक्या बारकाईने लोकमान्यांचं वाचन चाले.

लंडनमधे असतांना केसरीसाठी मशीन बघायला गेले तर जे मशीन बघितलं, त्याचा सगळा अभ्यास केला आणि मशीन घ्यायचं ठरवलं. कारखानदार म्हणाला, हे मशीन अमेरिकन तज्ञांनी निरुपयोगी ठरवलं आहे. तरी लोकमान्यांनी त्या मशीनचा सौदा ठरवला. लोकमान्य ते मशीन घेत आहेत हे कळल्याबरोबर जास्त किंमत द्यायला काही अमेरिकन तयार झाले. पण सौदा लोकमान्यांशी झालेला असल्याने ते मागे राहिले. हे मशीन पुण्यात केसरीच्या छापखान्यात आल्यावर मशीन बिघडलं की लोकमान्यांना कळवलं जाई, ते असतील तिथून यायचे, मशीन मधे हात काळे करून दुरुस्त करून जायचे. मशीन विकत घेण्यापूर्वीच प्रत्येक स्क्रुसकट त्यांनी अभ्यास केलेला होता. त्यामुळे त्यांना त्या

मशीनचा प्रत्येक भाग माहीत होता. लंडनमधे राहतांना त्यांना तिथल्या लोकल ट्रेनचं वेळापत्रकही पाठ होऊन गेले होतं आणि लंडनचा नकाशाही. चिरोल केसच्या वेळी लंडनमध्ये बॅरिस्टर जोसेफ बाप्तिस्टा त्यांच्या सहवासात होते. लोकमान्यांना बायबल तोंडपाठ आहे हे कळल्यावर ते थक्क झाले.

1918सालच्या मार्चमधली गोष्ट. प्रबोधनकार ठाकऱ्यांचं ' वक्तृत्वशास्त्र' हे पुस्तक पुण्याच्या चित्रशाळेत छापलं जात होतं. म्हणून पुस्तकाच्या कामानिमित्त ठाकरे तिथे आले तेव्हा चित्रशाळेच्या जोशीकाकांबरोबर लोकमान्य बोलत होते. जोश्यांनी ठाकरे-टिळक यांची एकमेकांशी ओळख करून दिली.

" तुमचं पुस्तक वाचलं. छान आहे " लोकमान्य त्यांना म्हणाले.

" पण अजून ते बाहेर आलेलं नाही " ठाकरे.

" हो! पण प्रूफं बाहेर ये जा करतात ना! पुस्तक झालं की मला द्या. अभिप्राय देईन.....आपण देशस्थ का? "

" नाही! कायस्थ."

" तरीच ही लेखणी इतकी टणत्कार करते आहे. कायस्थांची लेखणी हल्ली झोपाळू झाली आहे. ती जागी होईल तर देशकार्याचा वेग आणखी वाढेल."

" वाङ्मय क्षेत्र काबीज करणाऱ्या ब्राह्मणांकडून तिला योग्य ते उत्तेजन मिळत नाही आहे."

" अहो ! आम्ही ब्राह्मण म्हणजे भिक्षुक. भिक्षुकांच्या आश्रयाची क्षत्रियांनी अपेक्षा करावी यालाच मी झोप म्हणतो आहे. कायस्थ म्हणजे स्वावलंबन आणि आत्मतेज यांचा आदर्श हवा. त्याने कुणाच्या अभिप्रायाची, उत्तेजनाची पर्वा न करता आत्मबळानेच पुढे सरकलं पाहिजे. शिवाजीच्या वेळी शेकडो कायस्थ देशकार्यासाठी पुढे सरसावले ते काय ब्राह्मणांच्या उत्तेजनाने का? पुस्तक छापून आल्यावर प्रबोधंनाकारांनी ते पुस्तक लोकमान्यांना दिलं. लोकमान्यांनी त्यावर सुंदर अभिप्राय कीर्तन नावाच्या मासिकात छापला. यातला एक विलक्षण योगायोग असा की एक बाळ गंगाधर बोलत होते, त्यांचं पाळण्यातील नाव केशव होतं. ज्यांच्याशी लेखणीच्या टणत्काराबद्दल बोलत होते ते केशव होते आणि या केशव ठाकरे यांच्याच पोटी वर्तमान पत्रातून लेखणीच्या टणत्काराने महाराष्ट्र गाजवणारा एक बाळ केशव नावाचा क्षत्रिय टणत्कार जन्मायचा होता तो त्या दोघांनाही माहीत नव्हतं, हे आज लक्षात येतं.

मंडालेच्या तुरुंगात असतांना त्यांनी के.के. आठवल्यांच्या सल्ल्यावरून जर्मन आणि फ्रेंच भाषेचा अभ्यास ह्युगोच्या पध्दतीने

सुरू केला आणि अवघ्या सहा महिन्यांनंतर त्या भाषेतली ऐतिहासिक आणि निबंधात्मक पुस्तकं त्यांनी आठवल्यांकडून मागवली. मंडालेहून परत आल्यावर आठवले त्यांना भेटायला गेले तेव्हा लोकमान्यांनी एक पुस्तक आठवल्यांच्या हातात ठेवलं. त्या पुस्तकाचं नाव होतं, " अ व्ही इंकोन्यू जेसू ख्रिस्त. " ते एक लॅटिन भाषेत येशूचं अप्रसिध्द चरित्र होतं. त्याचा उपयोग लोकमान्यांनी आपल्या गीतारहस्यात " गीता आणि ख्रिस्ती बायबल या प्रकरणात करून घेतला. नोटेव्हिश याचं पुस्तक १८९४ साली मधे फ्रेंच भाषेत प्रसिध्द झालं आणि लोकमान्यांनी त्याचा उपयोग करून घेतला.

कॉलेजमध्ये असतांना शरीर शास्त्र कळावं म्हणून बैलाचं हृदय आणि डोळा कापून पहिला होता.

# गणित.

बालवयापासून गणितातील कोडी ते तोंडीच सोडवत असत. लहानपणी वडिलांबरोबर पुण्याला आल्यावर केरूनाना छत्रे यांचे विद्यार्थी बनले. स्वत: केरूनाना छत्रे फार मोठे गणिती. सूर्यावरच्या डागांचा वादळं आणि हवामानाचा जवळचा संबंध असतो असं त्यांनी शोधून ठेवलं होतं. लोकमान्य केरूनाना छत्रे यांचे लाडके विद्यार्थी. केरूनानांकडे भारतभरचे गणिती आपल्याला न सुटणारी गणितं घेऊन यायचे. नाना त्या लोकांना लोकमान्यांकडे पाठवायचे. एकदा दक्षिणेकडचे म्हैसाळकर नावाचे गणिती केरूनानांकडे आले. केरूनानांनी त्यांना लोकमान्यांकडे पाठवलं. त्यांनी गणित सोडवून दिलं. तेव्हा लोकमान्य फक्त १३-१४ वर्षांचे होते. केरूनानांचा या शिष्यावर अति लोभ आणि शिष्याचंही गुरुंवर फार प्रेम. केरूनाना आपल्या इतर विद्यार्थ्यांना म्हणत,

**" हे सूर्याचं पिल्लू आहे. आता उगवता सूर्य आहे. काही काळानंतर ह्याचा मध्यान्ह तुम्ही पाहाल, तेव्हा त्याच्या झळा सोसाल. " इंग्रजांनी त्या झळा सोसल्याच. केरूनानांचा अंत जवळ आला तेव्हा त्यांना विचारलं की तुमची गादी**

**चालवणारं कोण आहे? तेव्हा कोपऱ्यात बसलेल्या लोकमान्यांकडे बोट दाखवून ते म्हणाले की हा मुलगा दिग्विजय करेल.''** न्यू इंग्लिश स्कूल आणि फर्ग्युसन कॉलेजमध्ये त्यांनी गणित आणि संस्कृत विषयाचंच अध्यापन केलं.

रँग्लर र. पु. परांजपे इंग्लंडहून रँग्लर होऊन आले आणि फर्ग्युसन कॉलेजमधे गणित शिकवायला लागले. त्यांच्या वर्गात लोकमान्यांचा मोठा मुलगा विश्वनाथ होता. एक दिवस वर्गात शिकवतांना परांजप्यांना गणित फळ्यावर मांडता येईना तेव्हा ते मुलांना म्हणाले की उद्या मी तुम्हाला हे गणित सोडवून देईन. विश्वनाथाने घरी आल्यावर ते गणित लोकमान्यांना दाखवलं. लोकमान्यांनी ते गणित ३ स्टेपस्मधे सोडवलं. दुसरे दिवशी प्रोफेसरसाहेबांनी आठ-दहा पायऱ्यांमधे सोडवलं. मग विश्वनाथाने आपली वही त्यांना दाखवली तेव्हा गणित सोडवायची ती पध्दत बघून रँग्लर चाट पडले. तुझे वडील कोण आहेत असं त्यांना विचारलं तेव्हा परांजप्यांना हा लोकमान्यांचा मुलगा आहे हे कळलं.

न्यू इंग्लिश स्कूलमध्ये मुलांना गणित शिकवतांना लोकमान्य इतकं सुंदर शिकवत की दोऱ्याच्या गुन्त्याचं एक टोक हाती यावं आणि ते ओढायला लागलं की गुंता सुटून यावा, तसं

वाटायचं. सगळी गणितं तोंडी शिकवत. एका तासात वीस- बावीस गणितं सोडवून ते बाहेर पडत आणि इतर शिक्षक एका तासात पाच- सहा गणितं शिकवत. महाराष्ट्रातल्या एका प्रख्यात गणितीला एक कोडं सुटेना तेव्हा त्यांनी ते सगळ्यांना पाठवलं. पण कुणाला सोडवता आलं नाही. पुढे ते काही कामासाठी पुण्यात आलेले असतांना त्यांनी लोकमान्यांची भेट घेतली आणि त्या गणिताबद्दल सांगितलं. लगेच लोकमान्यांनी तो कागद हातात घेतला, सात-आठ मिनिटं त्यावर एकाग्रतेने विचार केला आणि उलगडून दाखवलं. फर्ग्युसन कॉलेजमधे लोकमान्य भूमिती, बीजगणित, आणि संस्कृत शिकवत. संस्कृतमधे भर्तृहरीची शतके ते विद्यार्थ्यांना शिकवत. भूमिती शिकवतांना विद्यार्थ्याला फळ्याजवळ बोलावून त्याच्याकडून आकृती काढून घेत आणि त्याच्या मर्जीप्रमाणे अक्षरं द्यायला सांगत. लोकमान्यांची फळ्याकडे पाठ असे. ते एकदा आकृती पाहात आणि मग परत परत वळून न बघता, अक्षरं ध्यानात ठेवून एका पुढे एक पायरी बिनचूक सांगत जात आणि प्रमेय पूर्ण करीत असत. विद्यार्थ्यांच्या शंका दूर करण्यात त्यांना बिलकूल आळस नसे. उलट मुलांच्या घोळक्यातून ते त्यांच्याशी गप्पा मारत जात. तेव्हाही बौध्दिक घेणं चालूच असे. काव्य, व्याकरण शिकवतांना गंगेसारखा, बलवान ओघ होता. त्यांच्या कॉलेजच्या दिवसांमध्ये जे गणित सुटणार नाही ते गणित डेक्कन कॉलेजमधले

त्यांचे मित्र लोकमान्यांच्या टेबलवर आणून ठेवत. कारण त्यांना माहीत होतं की एकदा लोकमान्य ते सोडवायला बसले की ते सोडवूनच उठणार..

त्यांचे वेदांग ज्योतिषशास्त्राचे ज्ञान तर पूर्णपणे गणितातल्या त्यांच्या पांडित्याचाच आविष्कार होता.

## कायदेपंडित.

लोकमान्यांचा कायद्याचा अभ्यास दांडगा होता. हिंदू धर्मशास्त्राप्रमाणे हिंदू लॉचाही अभ्यास दांडगा होता. त्यामुळे त्यांच्या वाड्यावर त्यांचे कायदेविषयक सल्ले घेण्यासाठी दूरदूरच्या गावाहून येणाऱ्या लोकांचा सतत राबता असे. सर्व सल्ले फुकट. परत त्यांनी आल्यासरशी जेवूनच जायचं. भारतभरचे लोक त्यांच्या कायद्याच्या ज्ञानाची कीर्ति ऐकून आपापल्या निरनिराळ्या केसेससंबंधी सल्ला विचारण्यासाठी त्यांच्याकडे येत. कारण त्यांना हा अभ्यासपूर्ण कायदेशीर सल्ला फुकट मिळत असे. विजापूर जिल्ह्यातल्या वजनदार, सधन संसारी माणसावर तिथल्या सरकारचा रोष झाला आणि त्या कलेक्टरने त्या माणसाची सगळी संपत्ती जप्त केली. मात्र त्याच्या मृत्यूनंतर त्याच्या कुटुंबियांना ती संपत्ती मिळण्याची अट त्यात होती. या आर्थिक संकटामुळे त्या माणसाचं सुख हरपलं. त्याने मोठे मोठे वकील नेमून दाद मागितली. पण कुठेच दाद लागेना. आता आपल्या कुटुंबाला अन्न मिळायचं तर त्याच्यासमोर त्याने आत्महत्या करण्यावाचून पर्याय राहिला नाही. पण एका शुभ क्षणी त्याला लोकमान्यांच्या कीर्तीची आठवण झाली. मरण्यापूर्वी एकदा प्रयत्न करून पहावा म्हणून ते

गृहस्थ पुण्याला आले. त्यांची सगळी हकीकत लोकमान्यांनी ऐकून घेतली आणि म्हणाले, " तुम्ही माझ्यासाठी एक  कराल का? " जो माणूस जीव द्यायला तयार होता तो काहीही करायला तयार होता. लोकमान्यांनी मग त्याला संन्यास घ्यायला सांगितलं. संन्यास घेतलेल्या माणसाचा पूर्वाश्रमीच्या त्याच्या स्थावर, जंगम संपत्तीवर हक्क राहत नाही. संन्यास घेतल्याने कायदेशीरपणे तो मृत म्हणून मानला जातो. ह्या गृहस्थाने संन्यास घेऊन कलेक्टरला कळवलं तेव्हा तो कलेक्टर, पुण्याच्या चित्पावनाने हा सल्ला दिलेला दिसतोय असं उघडपणे म्हणाला. शेवटी कलेक्टरला सर्व संपत्ती त्या गृहस्थांच्या कुटुंबाला द्यावी लागली.

ताईमहाराज प्रकरणात त्यांची केस चालू होती तेव्हाची गोष्ट. पी. पी. खरे ताईमहाराजांकडून केस लढवत होते. एक दिवस कोर्ट संपल्यावर, तुमच्या जागी असतो तर कधीच मी ही केस जिंकलो  असतो असं लोकमान्य खऱ्यांना म्हणाले. त्यांच्याकडून ज्ञान काढून घ्यावे  म्हणून खऱ्यांनी त्यांना  चिथावलं आणि हेसुध्दा तावातावाने आपल्याविरुध्द कसं बोलावं हे त्यांना शिकवायला लागले.  त्याबरोबर लोकमान्यांच्या वकिलाने त्यांची बाही पकडून बाहेर काढलं आणि त्यांना रागावले. तेव्हा लोकमान्य शांतपणे आपल्या वकिलाला म्हणाले, " अरे, शत्रूला आपली शस्त्र दाखवून

मग त्याच्याशी लढण्यातच खरा पुरुषार्थ आहे. आणि युध्दकौशल्यही! " एवढा स्वत:वर त्यांचा प्रचंड विश्वास होता.

सरदार विंचूरकर केसमधे विंचूरकरांच्या वतीने प्रसिध्द वकील चांदोरकर केस लढवत होते. सख्खा भाऊ आणि सावत्रभाऊ यांच्यात सख्खा भाऊ हा जवळचा वारस ठरतो असं आहे. पण सावत्र चुलता आणि सख्खा चुलता अशी दूर दूर जाणारी नाती असली तर ती केव्हा एकाच पातळीवर मानली जातात यावर खल सुरू असतांना, विंचूरकरांनी लोकमान्यांची गाठ घेतली. त्यांनी चांदोरकरांना आपल्याकडे पाठवून द्यायला सांगितलं, पण चांदोरकरांनी ते नाकारलं. तेव्हा लोकमान्य म्हणाले.. त्यात काय, चला मी त्यांना जाऊन भेटतो. लोकमान्यांनी धर्मशास्त्राच्या पोथ्या काढून कायदेशीर नातं कोणतं यावर स्वत: निर्णय दिला. हा सगळा खटाटोप स्वत:च्या अंगावर घेऊन त्यांना मदत केली, इतकंच नाही तर दोन्हीकडच्या पक्षांना, त्यांनी काय काय बोलायचं हे घटवूनही घेतलं. तरी चांदोरकरांना सगळं उमगलं नाही. म्हणून विंचूरकरांच्या परवानगीने ते स्वत: लोकमान्यांना भेटायला गेले. यावेळी मात्र त्यांचा ताठा कमी झाला होता. पण तेव्हाच लोकमान्यांच्या घरातले तिघेजण प्लेगने मृत्यू पावले होते. त्यात त्यांचा थोरला मुलगा विश्वनाथही होता. म्हणून लोकमान्य मदत करतील की नाही याची चांदोरकरांना थोडी शंका होती. पण तरीही ते गेले. लोकमान्यांचा

सल्ला घेतला, पण चांदोरकरांना नीट सगळं समजलेलं नाही हे त्यांच्या लक्षात आलं, म्हणून ते स्वत: उलट बाजूचे झाले आणि त्यांनी चांदोरकरांकडून केस घटवून घेतली. विंचूरकरांच्या विरुद्धपक्षाचे वकील होते, लोकमान्यांचे परम मित्र दाजीसाहेब खरे. पण एकदा मदत करायची म्हणजे करायची. दिलेला शब्द परत कधीही मागे फिरला नाही.

होमरूल चळवळीच्या प्रचाराच्या वेळी लोकमान्य एकदा त्यांच्या सबजज्ज मित्राकडे विश्रांतीला म्हणून गेले. हे जज्ज अतिशंकेखोरपणामुळे गतीमंद होते. त्यांना त्याबाबत समजही मिळाली आहे हे लोकमान्यांना कळल्याबरोबर घरी बसल्या बसल्या त्यांनी मित्राची सगळी तुंबलेली जज्जमेंटस् स्वत: लिहून ठेऊन त्यांचं काम हलकं केलं. सोलापूरातला एका टिळक नावाचा माणूस स्टॅम्प लिहिण्याचा धंदा करत असे. तो नेहमीच आपल्याजवळ कुऱ्हाड बाळगी. लोक त्याला कुऱ्हाडी टिळक म्हणत. एकदा रेवचंद रायचंद नावाच्या गुजराथ्याशी त्याचं कडाक्याचं भांडण झालं आणि त्यात टिळकांच्या कुऱ्हाडीने तो माणूस मेला. त्याच्यावर खटला भरला गेला. तेव्हा त्या टिळकाने लोकमान्यांना पत्र लिहून ‘ मी फक्त तुमचा आडनाव बंधू आहे पण माझ्या हातून हत्येचा गुन्हा घडला आहे, तरी तुम्ही मला मदत कराल का असं पत्र लिहिलं. लगेच लोकमान्यांनी त्या गावातल्या

आपल्या मित्रांना त्याचं वकीलपत्र घ्यायला सांगितलं. आणि त्याच्या चौकशीची तारीख कळवायला सांगितली. त्यानंतर त्याच्या चौकशीच्या तारखेस स्वत: हजर राहिले आणि केस लढून त्याला चक्क दोषमुक्त केलं.

बडोद्याला बापटांची केस चालू असतांना त्यांच्या अवतीभोवती गुप्त पोलिसांचा सुळसुळाट असायचा. तरी लोकमान्य बेधडक एकटे फिरत. लोकमान्यांनी ते ५/६ दिवस सहन केलं आणि नंतर शेवटी बडोद्याच्या दिवाणांना चिठ्ठी लिहिली,

" तुमचे हे पोलिस किंवा डिटेक्टिव्हचे शिपाई माझ्यामागून फिरतात. परंतु मी कुठे कुठे जातो, आणि काय काय करतो ते त्यांना कळत नाही. म्हणून त्यांचे आणि आपले श्रम वाचवण्यासाठी मी आपली डायरी, कोठे गेलो, काय केले, याबद्दलची माहिती उद्यापासून नियमितपणे पाठवीत जाईन " चिठ्ठी पोचल्याबरोबर पोलिसांचं मागेमागे फिरणं बंद झाले. बडोद्याच्या या बापटांची केस आणि ताई महाराज केस हे दोन्ही खटले मित्रांना एकदा शब्द दिला की त्याच्या पूर्ततेसाठी कितीही मानसिक, शारीरिक आणि आर्थिक त्रास झाला तरी तो वसा टाकून द्यायचा नाही, याची ज्वलंत उदाहरणं होती. बापट हे बडोद्याच्या महाराजांकडे रेव्हेन्यू खात्यात नोकरीला होते. अत्यंत सचोटीचे, इमानदार सेवक म्हणून महाराजांच्या मर्जीतले

होते. हे बापट मूळचे दापोलीचे आणि डेक्कन कॉलेजचे विद्यार्थी आणि लोकमान्यांचे सहाध्यायी, पण घरच्या आर्थिक परिस्थितीमुळे त्यांना शिक्षण पूर्ण करता आलं नव्हतं. या आर्थिक गरजेमुळे त्यांनी रेव्हेन्यू खात्यात नोकरी मिळवली. बापटांची सचोटी आणि स्वच्छ कामगिरी बघून त्यांना इंग्रजी अधिकाऱ्याने बडोदा महाराजांच्या कारभारात घेतलं. तिथे जहागिरी, इनामं, वतनं, देणग्या यांच्यातील पळवाटा शोधणे अशा भ्रष्टाचाराची कुरणे चरणाऱ्या अनेकांना त्यांचा इमानीपणा खटकायला लागला त्यात संस्थानचे दिवाणजीही होते. या इमानदार माणसाला नोकरीतून घालवून देण्यासाठी बापटांच्या विरुद्ध कुभांड रचण्याची संधी या हितशत्रूंना अखेर एकदाची मिळाली. बडोद्याचे महाराज काही महिन्यांसाठी इंग्लंडला गेले तेव्हा या सर्व भ्रष्टाचाराच्या आड येणाऱ्या बापटांवर दोषारोप ठेवून खटला भरला. साहजिकच बापटांना आठवण झाली ती आपल्या मित्राची, लोकमान्यांची. लोकमान्यांनीही लगेच आपल्या एका वकिलाला बडोद्याला पाठवलं. तोपर्यंत आपल्या जीवाला धोका असल्याचं बापटांचं आणखी एक पत्र लोकमान्यांना मिळालं.

त्यामुळे आता बापटांना बडोद्यातून हलवायला हवंच होतं. तेव्हा एक अफलातून थरारक योजना आखून लोकमान्यांनी आपल्या मित्राची बडोद्यातून सुटका केली. त्यांनी पाठवलेल्या

वकिलाने बापटांकडे त्यांचा नातेवाईक म्हणून मुक्काम केला. बापटांच्या आजूबाजूला फिर्यादींच्या गुप्तहेरांची पाळत तर होतीच. बापटांवर खटला भरलेला असल्याने पोलिसांचीही पाळत होती. त्यामुळे बडोद्यातून बापटांना पुण्याला आणण्याचं जोखमीचं काम काळजीपूर्वक करायचं होतं आणि बेमालूमपणे करायचं होतं. ते यशस्वीपणे पार पडलं. झालं असं की बापटांच्या घरी उतरलेला ' पाहुणा ' ८ /१० दिवसांनी परत जायंला निघाला. त्याला स्टेशनवर पोचवायला बापटही गेले. बापटांच्या हातात काहीच सामान नव्हतं, फक्त पाहुण्याच्या हातात त्याचं प्रवासाचं सामान होतं. ते दोघे स्टेशनवर आल्यावर गुप्तहेरही आले आणि पोलीसही त्यांच्या मागे उभे राहिले. बराच वेळ गाडीच्या डब्यापाशी बापट आपल्या पाहुण्याबरोबर बोलत उभे होते. शेवटी गाडीची सुटायची वेळ झाली. गाडीचा भोंगा वाजला आणि गाडी सुरू झाली तेव्हा स्टेशनवरच्या पोचवायला आलेल्या लोकांची हालचालीमुळे गर्दी उसळली. त्याच क्षणी ' पाहुण्याने ' बापटांना आपल्या डब्यात वर खेचून घेतलं.. पाळतीवर असलेले पोलिस काहीही करू शकले नाहीत कारण तोपर्यंत गाडीने वेग घेतला होता आणि थोड्याच वेळात संस्थानची हद्द ओलांडली होती. पाहुण्याने दोन तिकिटे घेऊन ठेवलेलीच होती. पुढे लंडनहून आल्यावर महाराज आल्यावर त्यांना बापटांची सचोटी माहीत होती म्हणून एक मध्यम

मार्ग म्हणून बापटांना निवृत्त करून पेन्शन चालू करून दिली आणि त्यांचा सन्मान केला. राजद्रोहाचा खटला, ताईमहाराज प्रकरणातील खटला, अशा अनेक वैयक्तिक खटल्यांमध्येही लोकमान्यांचा कायद्याचा गाढा अभ्यास त्यांना उपयोगी ठरला.

## सुधारक.

लोकमान्य प्राचीन विद्येचे, संस्कारांचे प्रेमी. त्यामुळे लोक त्यांना जुन्या विचारसरणीचे समजत. पण जुन्यातलं चांगलं काय आणि नवीन नजरेने त्याकडे कसं बघता येईल हे फक्त लोकमान्यच अभ्यासपूर्ण रीतीने सांगू शकत. सुधारकांमधे आणि लोकमान्यांमधे मूलभूत फरक होता तो सुधारणांच्या गतीचा. त्यांचं तत्त्व होतं की लोकांना भिऊन मागे राहायचं नाही, आणि लोकांना टाकून पुढेही जायचं नाही. लोकांना सारखे तयार करत राहायचे, आणि आपण त्यांच्यापुढे एक-दोन पावलं राहून पुढे जायचं. समर्थांनी केलेला ' मुलाच्या चालीने चालावे ' हा उपदेश त्यांनी उपयोगात आणला होता. " तुम्ही सुधारकांबरोबर समाजसुधारणांच्या बाबतीत एकमत दाखवता पण केसरीमधे मात्र त्यांच्याविरुध्द लिहिता, असं का " असं त्यांना विचारल्यावर ते म्हणाले, " एकतर स्वराज्यासाठीची चळवळ किंवा समाजसुधारणा यापैकी एकच मार्ग श्रेयस्कर. कारण मी दोन्हीत लक्ष घातलं तर काहीच पुढे जायचं नाही. दुसरं म्हणजे मला लोकांना आपल्याबरोबर घेऊन पुढे जायचं आहे. कारण एकदा एक काम हाती घेतलं की त्यात झोकून दिल्याशिवाय मला चैन पडणार नाही आणि मग मनाची द्विधा स्थिती झाली की

कोणतंच काम नीट होणार नाही. स्त्री शिक्षणाबद्दल त्यांचं मत होतं की पाश्चात्य शिक्षणाने आपणही श्रध्दाहीन झालो आहोत. आपल्या संस्कृतीतील प्रत्येक उच्च भावनेबद्दल आता आपले लोक संशय घ्यायला लागले आहेत. आपल्या संस्कृतीवर निदान आपल्या स्त्रियांची तरी अजून श्रध्दा आहे. ती घालवून उपयोग नाही कारण आपल्या स्त्रिया हे आपलं राष्ट्रीय धन आहे. त्यांच्यामुळे तुळशीपूजन, वटपौर्णिमा या प्रथा परंपरा अजून जिवंत आहे.

थोर पुरुषाचं द्रष्टेपण म्हणजे काय असतं ते लोकमान्य लंडनला असतांना प्रत्ययाला आलं. लंडनच्या वास्तव्यात त्यांच्याबरोबरच्या लोकांना सगळीकडे खूप हॉटेल्स दिसली. जागोजाग डिनर हॉल्स, रेस्टॉरंटस्, दिसली. त्यांच्याबरोबर मोतीराम वेलकर होते. ते म्हणाले..इंग्रज लोक काय झोपायलाच घरी जातात की काय? लोकमान्य त्यांना म्हणाले,

" इंग्रजांना हसू नका. थोडे दिवस थांबा. आपल्याकडेही बाहेर जेवायची वेळ लवकरच येणार आहे. सध्याच्या इंग्रजी शिक्षणाचा हा परिणाम आहे. पुरुषांप्रमाणे इकडे स्त्रियाही द्रव्यार्जन करतात, मग घरी स्वयंपाक कोणी करायचा. आपल्याकडेही ही वेळ येणारच आहे. कारण स्त्रियांना शिक्षण तर दिलंच पाहिजे. आणि मग त्या द्रव्यार्जनही करणारच." विलायतेला जाऊन आल्यावर त्यांनी

आपल्या स्त्रियांना सांगितलं की तिथल्या मध्यम वर्गातल्या बायका सर्व घरकामं स्वत:च करतात. आपल्या बायका इकडे आलेल्या युरोपियन बायकांची नक्कल करतात. मोटारीतून फिरायला जाणं, खेळणं, हे सिव्हिल सर्वंट्सना हजारो रुपये पगार मिळतो म्हणून त्या ही चैन करतात. आपल्या सुशिक्षित स्त्रिया मात्र त्यांच्या या डामडौलाला अंधपणाने, खोट्या समजुतीमुळे अनुसरतात. आणि नुकसान करून घेतात. हे खरं गृहशिक्षण नव्हे. त्याकाळच्या समाजसुधारकांनी सांगितलेल्या त्यांच्या आठवणींमध्ये लोकमान्यांबद्दल ते सुधारणावादी होते हेच मत लिहिलं आहे.

त्याकाळचे अस्पृश्योध्दारक लक्ष्मण भिडे यांनी सांगलीला लोकमान्य पंचांगपरिषदेला आलेले असतांना त्यांना आपल्या आश्रमात बोलावलं. भिडे अस्पृश्यांसाठी महारवाड्यात शाळा चालवत. लोकमान्य आले आणि त्यांनी सर्व समुदायासमोर सुंदर भाषण केलं. ते म्हणाले,

" माझ्याबद्दल जे गैरसमज आहेत त्याचं निराकरण करण्याची ही चांगली वेळ आहे. अस्पृश्यांना स्पृश्य मानणाऱ्यांपैकी मी एक आहे. गणपती उत्सवात माझ्या गणपतीबरोबर चांभारांचा गणपतीही मिरवणूकीत असतो. अस्पृश्यांच्या उध्दाराची सुधारकांएवढीच मलाही तळमळ आहे. पण मतभेद आहेत ते मार्गाबद्दल. एकदम

धर्मभोळ्या समाजाला बंड करून दुखवावे हे मला मान्य नाही. पुरातन काळापासून चालत आलेली ही रीत लोक पटकन मोडणार नाहीत. स्पृश्य लोकांचं मत अनुकूल करून घेण्याचा जोरात प्रयत्न झाला पाहिजे. पण त्यापेक्षा अस्पृश्यांनीही बदललं पाहिजे. आपले दोष काढून टाकले पाहिजेत. स्वच्छ राहिलं पाहिजे. मेलेल्या जनावराचे मांस खाणे बंद केलं पाहिजे. शिक्षण घेतलं पाहिजे आणि शिक्षण घेतल्यावर आपला व्यवसाय सोडून देण्याची काही गरज नाही. पण पांढरपेशांसारखे नोकरीत शिरण्यापेक्षा तुमच्या व्यवसायात, तो घाणेरडा न मानता त्यात नवीन सुधारणा करा. मी सर्वच लोकांसाठी काम करत असल्यामुळे अप्रत्यक्षपणे अस्पृश्यांच्याही उध्दाराला झटतो आहे हेही लक्षात असू द्यावं."

एकदा श्री. म. माटे आणि त्यांचे मित्र हरिभाऊ फाटक यांनी सर्व हिंदूंना मुक्त प्रवेश मिळेल असं देऊळ बांधायचं ठरवलं. म्हणून ते विठ्ठल रामजी शिंद्यांकडे गेले आणि त्यांना म्हणाले की, आमच्या या कल्पनेबद्दल तुम्हाला काय वाटते? तर शिंद्यांनी तुम्ही लोकमान्यांकडून आला आहात का, असं माट्यांना विचारलं. श्री. म. माट्यांना त्याचा अर्थ कळेना. ते म्हणाले की " नाही. आपण अस्पृश्य निवारण विषयातले जाणते म्हणून आम्ही तुमच्याकडे मार्गदर्शनासाठी आलो आहोत. आमची आणि लोकमान्यांची ओळखही नाही." तेव्हा विठ्ठल रामजी यांनी माट्यांना सांगितलं की

असं देऊळ बांधायची कल्पना लोकमान्यांची आहे. त्यासाठी तेही शिंद्यांना भेटले होते. तेव्हा माटे दुसरे दिवशी सकाळी आठ वाजता लोकमान्यांच्या घरी गेले. आपला येण्याचा हेतू सांगितला. लोकमान्यांनी माट्यांना आपल्या समोर बसवून चौकशीचे प्रश्न विचारायला सुरुवात केली. माटे पाल्हाळिक बोलायला लागले की ते त्यांना थांबवत आणि ' ते निराळं " असं म्हणून नेमकं बोलायला लावत. शेवटी म्हणाले " हे देऊळ खुशाल बांधा. उगीचच खोपटाच्या आकाराएवढं बांधू नका. चांगलं मोठं बांधा. मुंबईच्या भाट्यालाही ( खाडी) आत येतांना संकोच वाटणार नाही असं बांधा." मग तुमच्या नावाचा जाहिरातीसाठी उपयोग करून घेऊ का असं विचारलं तेव्हा खुशाल करा. आणि मी येईन आणि जरूर ती अनाऊन्समेंट करीन असं प्रोत्साहनही दिलं.

सन १८९३ मधे धोंडो केशव कर्व्यांनी विधवेशी पुनर्विवाह केला. त्यांच्या पानसुपारी समारंभाला लोकमान्यांना आमंत्रण होतं. आणि ते गेलेही होते. जे कर्मठ होते त्यांनी या विवाहाचा कडाडून निषेध केला होता. पुनर्विवाहाच्या संबंधाने जेव्हा कर्व्यांनी सुशिक्षितांची मतं गोळा करण्याचा प्रयत्न केला तेव्हा लोकमान्यांनी पुनर्विवाहितांबरोबर पंक्तीप्रपंच करण्यास हरकत नाही असा स्पष्ट लेखी अभिप्राय दिला होता. त्यानंतर कर्व्यांच्या आमंत्रणावरून ते

अनाथ बालिकाश्रम बघायला गेले आणि शेरेबुकात चांगला अभिप्राय लिहून दिला होता. त्यानंतर ह्या आश्रमाची प्रसिध्दी व्हावी म्हणून कर्व्यांनी एक मोठा लेख केसरीत छापायला दिला. तो केसरीने छापला यातच सगळं भरून पावलं, कारण केसरीचा वाचक वर्ग मोठा होता. लोकमान्यांनी काहीही लिहिलं असतं तरी आश्रमाची बदनामी व्हायला वेळ लागला नसता. जनमानसही बदललं असतं. त्यामुळे केसरीकडून एवढी मोठी मदत होणं म्हणजे अमूल्य मदत होती. स्त्रियांना शिक्षण देण्याबद्दलचं त्यांचं मत कळावं म्हणून कर्वे एकदा त्यांच्या खनपटीलाच बसले. तेव्हा लोकमान्यांनी स्पष्ट सांगितलं की या शिक्षणाने गृहसौख्य हरवून जाण्याचा मला धोका दिसतोय. या शिक्षणाने आपण पुरुष जसे स्केप्टिक झालो आहोत तशा आपल्या स्त्रियाही होतील. यावर दुसरं कोणतं शिक्षण द्यायला पाहिजे हे मात्र त्यांना कळत नव्हतं असं कर्व्यांना वाटलं. स्त्री शिक्षणाची तेव्हा नुकतीच कुठे सुरूवात झाली होती.

लोकमान्यांच्या मुली आगरकरांचं " सुधारक " वाचायच्या. एकदा त्यांची मुलगी लोकमान्यांना म्हणाली, ..दादा, मला आगरकरांची मतं पटतात काहीकाही! ...लगेच लोकमान्य तिला म्हणाले, " मग? हुशार लोकांची मतं नेहमी बरोबरच असतात.' मग तुम्ही का त्यांना विरोध करता? असं तिने

विचारल्यावर ते म्हणाले, मला रानात जाऊन नाही पडायचं. लोकांना घेऊन काम करायचं आहे. ( त्याकाळी सुधारकांना बहिष्कृत केलं जायचं. लोक अशा लोकांकडे पाणीसुध्दा प्यायचे नाहीत.) स्वत: टिळकांनी आपल्या मुलींची लग्न उशीराच केली होती. त्यांना शाळा- कॉलेजातही घातलं होतं. लोकमान्य नेहमी म्हणायचे, आधी आपलं राष्ट्र विधवा झालंय...त्याला पारतंत्र्यातून मुक्त करूया. मग देशातल्या लोकांच्या सुधारणा..आपल्या पुरूषांना पुरुषार्थ गाजवायला देश स्वतंत्र करू.

विवाह संमत वयाचा प्रश्न विचारवंतांमधे चर्चिला जायला लागला, तेव्हा लोकमान्यांनी आपली मतं स्पष्ट मांडली. मुलीचे विवाह वय १६ वर्षापेक्षा कमी असू नये. 2. मुलाचे वय विसाच्या आत असू नये. 3. मुलींचे केशवपन केलं जाऊ नये. ४. पुरूषांनी चाळीस वर्षांनंतर विवाह करू नये. करावयाचा असल्यास विधवेशीच करावा. ५. हुंडा पध्दत बंद व्हावी. ६. पुरुषांनी मद्य सेवन करू नये.

हिंद महिला समाजाच्या महिला संमेलनात लोकमान्य भाषण देतांना लोकमान्यांनी ३ मुद्दे मांडले.

पहिला, स्त्रियांनी राष्ट्रीय पुरुष निर्माण करणं, दुसरा, स्त्रिया राष्ट्राच्या शिक्षक असतात. लहान मुलं त्यांच्या सहवासात असतात. तेव्हा

त्यांना जे शिक्षण मिळेल तसे ते तयार होतात. हे शिक्षण पुस्तकी नसून शीलवान पुरुष तयार करण्याचे धडे देणं, स्वार्थत्यागी आणि दीर्घोद्योगी समाज बनवणं हे त्यांचं योगदान फार जरुरीचं आहे. आणि तिसरा मुद्दा म्हणजे, देशावर जेव्हा जेव्हा संकटं आली तेव्हा तेव्हा स्त्रियांनी संकटनिवारणाला हातभार लावलेला आहे. त्यांना सामाजिक सुधारणा हवी होती, पण सुधारकांचे मार्ग त्यांना पसंत नव्हते. ते मनाने बंडखोर होते, पण आपल्या समाजाची मानसिक लायकी आणि पात्रता माहीत असतांना त्यांच्यावर सुधारणा लादणं त्यांना पसंत नव्हतं.आधी राजकीय की सामाजिक हा वादही त्यांच्या दृष्टीने निरर्थक होता. दोन्हीशिवाय काहीच शक्य नाही असं त्यांचं मत होतं.

२४ मार्च १९१८ या दिवशी मुंबईत अस्पृश्यता निवारण समितीच्या बैठकीत ठराव आणला की, काँग्रेसने अस्पृश्य वर्गाचे प्रतिनिधी घेऊन आपल्या कार्यास त्यांचा पाठिंबा मिळवावा. त्यावेळी ७००० लोकांचा जमाव भाषण ऐकायला उभा होता. लोकमान्यांचं भाषण सुरू झालं. त्यांना आवेश चढायला लागला. त्यांचा खणखणीत आवाज बाहेरच्या लोकांच्या कानावर स्वच्छ पडायला लागला.

" पेशव्यांच्या काळीही अस्पृश्यांच्या पखालीतलं पाणी ब्राह्मण पीत असत.  त्याकाळी जेव्हा युद्ध चालू असे, तेव्हा रणांगणावर तहानलेल्या सैनिकांना पाणी वाटण्यासाठी भिस्ती आपल्या पखाली घेऊन त्यांच्यामध्ये हिंडत आणि पाणी पाजत.

If God were to tolerate Untouchability, I will not recognise Him as God.

ही लोकमान्यांची घोषणा जमावाने ऐकली आणि मांडव कोसळून पडेल असा गजर तिथे झाला. मी जरी शरीराने इथे प्रथमच आलो असलो तरी मनाने ह्या चळवळीत नेहमीच आहे. जुन्या काळी काही ब्राह्मणांच्या जुलूमाने ही चाल पडली हे मी नाकारत नाही. पण ह्या रोगाचे आता निर्मूलन झालेच पाहिजे " अशा शब्दांनी त्यांनी सभा  गाजवली.  काँग्रेसचे अधिवेशन लखनौला पार पाडल्यानंतर, लोकमान्य कानपूरला गेले. तिथे त्यांना संस्कृत भाषेत लिहिललं मानपत्र देण्यात आलं. त्यावेळच्या भाषणात लोकमान्य म्हणाले, " हिंदु समाजाला शास्त्रातील चातुर्वर्ण्य मान्य आहे. पण ते अनुवंशिक नाही. गुण आणि कर्मांनेच वर्ण सिद्ध होतात. पण इंग्रजी राज्यामुळे चातुर्वर्ण्य नष्ट झालं आहे. कारण

देशात क्षत्रिय कर्मच उरलं नाही. ब्राह्मणांनीही आता बुद्धीचा अभिमान टाकला पाहिजे. "

लोकमान्य अस्पृश्यता मानत नसत. १९२० साली अस्पृश्यनिवारण परिषदेला ते मुंबईत हजर राहिले. पण विठ्ठलराव शिंद्यांनी तयार केलेल्या जाहीरनाम्यावर त्यांनी सही केली नाही म्हणून लोकमान्यांवर ढोंगीपणाचा आरोप करण्यात आला. विठ्ठलराव शिद्यांनी लोकमान्यांना पत्र लिहून सही करून पाठवावे अशी विनंती केली होती. त्यावर लोकमान्यांनी त्यांना पत्र लिहून स्पष्ट कळवलं की, " मॅनिफेस्टोच्या शेवटी काही कार्यक्रम शिरावर घेऊन तो प्रत्यक्षात आणण्याची व्यक्तिश: जबाबदारी माझ्यावर टाकलेली असल्यामुळे सध्याच्या कार्यव्याप्तीमुळे हे नवीन कार्य मला अंगावर घेता येईल असे वाटत नाही म्हणून तुमच्या जाहीरपत्रकावर मला सही करता येत नाही त्याबद्दल माफ करा. " लोकमान्य तेव्हा चिरोल केससाठी इंग्लंडला जायच्या गडबडीत होते..... मी इंग्लंडहून आल्यावर परत बोलू असं त्यांनी सांगितलं. लगेच ते इंग्लंडला गेले आणि आल्यावर सहभोजनाला येणार होते पण त्याआधीच काळाने त्यांच्यावर झडप घातली.

## संस्कृत साहित्य.

बालवयापासूनच संस्कृत भाषेवरचं त्यांचं प्रभुत्व असामान्यच होतं. वडिलांनी शिकवलेले श्लोक मुखोद्गत होते. रत्नागिरीला असतांना एकदा गंगाधरपंत बाणभट्टाच्या कादंबरी या संस्कृत नाटकातील एक समास सोडवत बसले होते. कारण तो कठीण होता. बाणभट्टाची भाषा तशी अवघडच होती. बाळ शेजारीच खेळत होता आणि नाना, मी तो समास सोडवून बघतो हट्ट धरून बसला होता. म्हणून गंगाधरपंतांनी त्याला एक कठीण गणित सोडायला बसवलं. बाळाने ते कठीण गणित 2 तास झटून सोडवलं आणि मग नानांकडे, तो समास सोडवून बघायला मागितला. गायत्री मंत्रावर त्यांची अढळ श्रद्धा होती. रोज अंघोळीनंतर या मंत्राचा जप केला तर बुद्धी तीक्ष्ण होते आणि आत्मसाक्षात्कार होतो असा त्यांचा अनुभव होता. संध्या करणं म्हणजे काही काल मन विचारशून्य करणं, मन रिकामं होण्याचे फायदे त्यांच्यासारख्या मनात कायम वादळांची गर्दी असलेल्या व्यक्तिशिवाय कोण जास्त सांगू शकलं असतं? ऋग्वेद, उपनिषद, पुराणं यांचा सखोल अभ्यास होता.

" आम्हाला खरं तर राजकारणापेक्षा शाळेत शिकवणंच जास्त आवडतं. पण परिस्थितीच्या ओघामुळे राजकारणात यावं लागलं. त्यातून स्वत:ची सुटका करून घेण्याची आमची धडपड चालूच असते. पण यश येत नाही. शेवटी सरकारच कृपा करून आमच्या मदतीला धावून येते आणि आम्हास येरवड्यात अथवा ब्रह्मदेशात नेऊन ठेवते. तेव्हा कुठे आम्हांस अध्ययनास मुबलक वेळ मिळतो." हे उद्गार आहेत लोकमान्यांचे. अभ्यासासाठी त्यांचं मन तळमळत होतं. परमेश्वराच्या अस्तित्वाबद्दल लोकमान्य म्हणत की जड सृष्टीतले सर्व गुणधर्म मनुष्याच्या बुध्दीला आकलन होतील पण परमेश्वरी गुणांचं आकलन मनुष्यास होणं शक्य नाही. म्हणून वेदांतशास्त्रात त्याला निर्गुण म्हणतात. प्रयत्नांती परमेश्वर हे जरी खरं असलं, आणि मी जरी प्रयत्नवादी असलो तरी अदृष्ट अशी एक शक्ती असते जी मनुष्याचं यशापयश ठरवत असते, त्यामुळे माणसाच्या मनात श्रध्दा निर्माण होते.

केसरीमध्ये एकदा ब्राहमणेतरांनी वेदपठण करू नये असा लेख आला तेव्हा प्रसिद्ध मजूर कार्यकर्ते सी. के. बोले त्यांच्याकडे गेले आणि त्यांचं स्पष्टीकरण मागितलं. तेव्हा लोकमान्यांनी, मी आता केसरीमधे क्वचित लिहितो. तो लेख आपण लिहिलेला नाही. आपण मॅक्स मुल्लर यांच्या सारख्या जर्मन लोकांनी छापलेले वेद जर वाचतो तर इतरांनी पठण करू नये असं म्हणण्यात काही

अर्थ नाही म्हणाले. इ. स. 1898 सालामधे ते तुरुंगात असतांना, त्यांचा विद्याव्यासंग माहीत असल्यामुळे मॅक्समुल्लर यांनी आपला ऋग्वेदावरचा ग्रंथ तुरुंगातल्या अधिकाऱ्यांबरोबर लोकमान्यांकडे पाठवला. तो वाचत असतांना आर्यांचं वसतीस्थान ज्या प्रदेशात रात्र आणि दिवस मोठे असतात तेथे असलं पाहिजे अशी कल्पना आली. " सूर्योदयात प्राक बहूनी अहानी आसज " ह्या श्लोकाने त्या शंकेला पुष्टी मिळाली. ज्या रात्री या ऋचेचा अर्थ बरोबर लागला, ती रात्र फार आनंदाची गेली असं ते बाहेर आल्यावर मित्राला म्हणाले. तुरुंगात कसला आला आहे आनंद असं तो मित्र म्हणाला तेव्हा ते म्हणाले, तुला तुरुंगात गेल्याशिवाय ते कळायचं नाही. नंतर 'आर्यांचे मूळ वसतीस्थान ' याची पूर्व तयारी करतांना त्यांनी भूगर्भशास्त्रावरचे १४ ग्रंथ वाचून काढले. येरवड्याला ही पुस्तकं आल्यावर भाग्य म्हणजे लोकमान्यांना तिथल्या जेलरने रात्री १० वाजेपर्यंत वाचण्याची परवानगी दिली होती. लोकमान्यांनी मॅक्स मुल्लर यांना आभाराचं पत्रही पाठवलं.

संस्कृत साहित्याचा लोकमान्यांचा अभ्यास दांडगा होता. ऋग्वेदाचा त्यांचा सखोल अभ्यास होता. ऋग्वेदातल्या अनेक कठीण प्रश्नांची उत्तरं त्यांनी शोधून दिली होती. लोकमान्यांनी अभ्यासकांना सांगितलं की हल्लीची ऋग्वेद संहिता अपूर्ण आहे.

कश्यप ऋषी आणि अंगिरस ऋषींनी पाहिलेली सहस्र सूत्रे गहाळ झाली असल्याचं लोकमान्यांनी सातव्या आणि तेराव्या खंडातून दाखवून दिलं होतं. क्षत्रियांनी पुरोहिताचं गोत्र लावण्याची रूढी होती. म्हणजे त्यांना स्वतंत्र गोत्र नसल्याचं समजलं जाई. पण लोकमान्यांनी संशोधनाने हा समज खोटा ठरवला. श्रौतसूत्राच्या बाराव्या अध्यायात पंधराव्या खंडाच्या आश्रयाने क्षत्रियांना पुरूरव हे गोत्र असून मान आणि अएल असे त्याचे प्रवर आहेत हे दाखवून दिलं. संहितेत काही सूक्तांच्या शेवटी कित्येक ऋचा आणि चरण परत परत येत असतात. त्याचं कारण काय असेल याची सर्व विद्वानांच्यात चर्चा चालू होती, तेव्हा लोकमान्यांनी त्याचा शोध लावला. ते म्हणाले. की जसं एखाद्या माणसाला बोलतांना मधे मधे " काय समजलं? " किंवा " बरोबर आहे ना? " असं म्हणायची सवय असते. तशी सवय वसिष्ठांना आणि विश्वामित्रांना असावी. त्याला अनुसरून या ऋचा परत परत आल्या आहेत, आणि त्यामुळे त्यावरून कोणाच्या कोणत्या ऋचा आहेत हेही कळतं."

भाद्रपद महिन्यात पुण्यात गणेशोत्सवात कार्यक्रमांची रेलचेल असे. गणेशोत्सवातील एका भाषणासाठी सदाशिवशास्त्री भिडे आले होते. त्यांच्याबरोबर " धर्म आणि व्यवहार " या विषयावर दोघांची चर्चा व्हायचं ठरलं. सकाळी ८ वाजता दोघे वाद

विवादाला बसले. मीमांसा, वेद आणि अलंकार यात लोकमान्यांचं प्राविण्य लोकोत्तर होतं. मधेच भिडे शास्त्रींनी " शारीर " शब्द कुठे आला आहे असं विचारल्याबरोबर लोकमान्यांनी तो " अंतराम्याधिकारणातील सूत्रामधे " आला आहे असं सांगितलं. भिडे यांना ते पटलं नाही तेव्हा लोकमान्य पटकन उठले. शारीरभाष्यावरचं पुस्तक त्यांनी काढलं आणि ते सूत्र वाचून दाखवलं. आणि वर " तुम्ही म्हणता ते सूत्र शांकरभाष्यामधे आहे असं सांगून तेही वाचून दाखवलं. भिडे शास्त्री थक्क झाले तेव्हा लोकमान्य त्यांना म्हणाले, की जी गोष्ट माणूस मनापासून करतो ती त्याला आठवत राहते. दोन तीन दिवस त्यांची चर्चा रंगली. सकाळी आठ ते दुपारी चारपर्यंत विषय घुसळला जाई. वाद विवाद म्हणजे एक प्रश्न घ्यायचा त्यावर आपली बाजू मांडायची, मग दुसऱ्याने ते मुद्दे आपल्या ज्ञानाने खोडून काढायचे. वादे वादे जायते तत्वबोध: हे त्यातून निघणारं सार असे.

महाभारतावर त्यांचं सतत चिंतन चालू असे. महाभारतातल्या प्रत्येक शब्दाचं ते अतिशय बारकाईने वाचन करत असत. इतकंच नव्हे तर ते एकदा वाचलं की कधीही विचारलं तरी कोणत्या ग्रंथात आहे, कुठल्या पानावर आहे हे ते लगेच सांगत. रा. चिंतामण विनायक वैद्य हे रामायण महाभारताचे गाढे अभ्यासक. कृष्णाच्या रथाला किती चाकं असतील, असा ते आणि

लोकमान्यांच्यात विषय निघाला तेव्हा भिडे चार चाकं म्हणाले आणि लोकमान्य म्हणाले दोन. लगेच त्यांनी श्लोक सांगितला आणि त्यातलं रथाच्या चाकांचं  द्विवचन दाखवून दिलं. संस्कृत भाषेत एकवचन, द्विवचन आणि बहुवचन असतं. पण लोकमान्यांनी प्रत्येक शब्द बारकाईने वाचला होता. नंतर एक दिवस लोकमान्य वैद्यांना म्हणाले,

" काय हो वैद्य, चीनच्या इतिहासाशी महाभारताचा संबंध आहे. तर त्यावरून महाभारताचा काळ निश्चित होण्याला हातभार लागेल का? " वैद्य अवाक झाले. चीनशी संबंध? असा कुठे आहे उल्लेख? वैद्यांनी विचारलं तेव्हा लोकमान्यांनी त्यांना भीम-कृष्ण संवाद सांगितला. कृष्ण शिष्टाईसाठी कौरवांकडे जाण्यास निघतो, तेव्हा भीम त्याला अठरा कुलांगार राजांची नावे सांगतो. आणि आता दुर्योधन त्याच माळेतला होईल असं म्हणतो. या अठरा राजांनी आपल्या सर्व ज्ञाती बांधवांना, मित्रांना, कुटुंबीयांना ठार करून आपापले वंश संपवले होते. त्यात " चीनानाम् धौतमूलक: " असा शब्द होता. त्या चीनच्या राजाचा उल्लेख वैद्यांनी काल्पनिक संदर्भ म्हणून दुर्लक्ष केलं होतं. पण लोकमान्यांनी तेही लक्षात ठेवलं होतं.   त्या अठरा कुलांगारांची नावे भीम सांगतो ती अशी- १. हैहयवंश - मुदावर्त. २ .निफल - जनमेजय. ३. तालजंघ - बहुल. ४. कृमिकुल - उद्दण्ड वसु. ५. .सुवीर- अजबिंदु. ६.. सुराष्ट्र -

ऋषध्दिक. ७. बलिह - अर्कज. ८. विदेह - हयग्रीव. ९. चीन - धौतमूलक. १०. महौज - वरयु. ११. सुंदर- बाहु. १२. दीप्ताक्ष - पुरुरवा. १३. चेदि, १४. मत्स्य - सहज. १५. प्रवीर - वृषध्वज. १६. चंद्रवत्स - धारण. १७. मुकुट.- विगाहन. १८ नंदिवेग - शम. ( लोकमान्यांच्या मते महाभारताचा युध्दकाळ मते इ.स.पूर्व १४०० होता. विकीपिडियावर महाभारत आणि चीन या विषयावर जी माहिती आहे त्यात धौतीमूलकाचा इतिहासही आहे. त्यात त्याचे नाव " त्से " आहे. त्या चिनी नावाचा अर्थही धूत ( क्लीन ) असाच दिलेला आहे. हा अर्थ चिनी भाषा जाणकाराने सांगितल्यामुळे सगळं कोडंच एकदम सुटलं. धौतीमूलक: म्हणजे ज्याची मुळे स्वच्छ आहेत असा. त्या राजाचा काळ इ. स. पूर्व १६०० च्या सुमारास ह्या राजाच्या सत्तेचा अंत झाला असा त्यात उल्लेख आहे. )

रँग्लर रघुनाथ पु. परांजपे इंग्लंडहून पदवी घेऊन आल्यावर त्याचे मुंबईत गणितावर व्याख्यान होते. लोकमान्य त्या सभेला हजर होते. त्या भाषणात परांजपे म्हणाले की आपल्याकडेही प्राचीन ग्रंथामधे गणितावर खूप शोध आहेत पण एका प्रकारच्या गणिताच्या सिध्दांतावर प्राचीन ग्रंथांवर काही उल्लेख सापडत नाही. र. पु. परांजप्यांचं भाषण झाल्यावर कुणाला काही सांगायचं आहे का असं विचारल्यावर लोकमान्य उठले. वेदातली

यज्ञविषयक ऋचा त्यांनी म्हणून दाखवली आणि परांजपे आमच्या लोकांना, माहीत नसल्याचा ज्या गणिती सिध्दांताचा उल्लेख करतात, तोच सिध्दांत त्यात आहे असं सिध्द करून दाखवलं. दुसरे दिवशी टाईम्सने लिहिलं...

Only Mr. Tilak responded and what he spoke on the subject was quite worthy as the author of " Orion".

पुण्यात ज्योतिष संमेलन भरलं तेव्हा लोकमान्यांची एकमताने अध्यक्षपदी निवड झाली कारण पाश्चिमात्य, व पौर्वात्य दोन्ही बाजूंची ज्योतिर्गणिताची माहिती असलेले लोकमान्य एकटेच होते. त्यांचं ह्या शास्त्रातलं ज्ञान प्रचंड होतं. वादग्रस्त मुद्दे ते सगळयांना नीट उलगडून दाखवत. शंकाही दूर करत. लोकमान्यांचा पराभव करायच्या तयारीने मुंबईहून काही पंडित आले होते, त्यांचाही त्यांना चुका दाखवून देऊन लोकमान्यांनी हिरमोड केला. रात्री १२-१२ वाजेपर्यंत लोक त्यांच्याशी चर्चा करत बसत आणि सकाळी साडेसहाला परत काम सुरू व्हायचं. या संमेलनात जे ठराव झाले त्यावर सगळयांच्या सह्या झाल्या. तो कागद लोकमान्यांनी

आठवणीने मागून घेतला. हा कागद नसला तर विरोधी पक्ष असा ठराव झालाच नाही म्हणतील म्हणून विरोधकांची शेंडी आपल्या हातात हवी असं म्हणत तो सह्यांचा कागद त्यांनी आपल्याजवळ जपून ठेवला.

ओरायन लिहिण्याची कल्पना कशी सुचली यावर बोलतांना ते म्हणाले, आपल्याकडे बारा राशी आहेत, पण वसू मात्र आठ आहेत. तेव्हा बारा वसू केव्हा होते आणि त्यांचे आठ केव्हा झाले यावर विचार करतांना लक्षात आलं की नॉर्वे देशात चार महिने रात्र आणि आठ महिने दिवस असतो, तेव्हापासून वसूही आठ झाले असले पाहिजेत. हीच कल्पना ओरायन लिहिण्याला उपयोगी पडली. ‘ मासानां मार्गशीर्षोहम् ’ या वचनाचं मूळ कोणत्या भौतिक परिस्थितीपर्यंत नेऊन भिडवता येईल यावरही त्यांचा सतत विचार चालू होता. मग ऋग्वेदाचा काळ ठरवण्यासाठी त्यांचं संशोधन सुरू झालं. आणि त्यातून ऋग्वेदाचा काळ ख्रिस्तपूर्व ६००० वर्षे असावा असं त्यांनी निश्चित करून त्यावर जो प्रबंध लिहिला तोच ओरायन. १८९३ सालच्या उन्हाळ्यात व्हिएन्ना इथे भरलेल्या प्राच्यविद्यापरिषदेत त्यांनी हा निबंध पाठवला. त्यामुळे जगभरच्या सर्व विद्वानांचं त्यांनी लक्ष वेधून घेतलं. जर्मनीला हा ग्रंथ पाठवायचा होता, आणि अवधी फार कमी होता, तेव्हा फक्त २ तास झोपून त्यांनी हा ग्रंथ पूर्ण केला. त्या जागरणाचा इतका परिणाम

झाला की उष्णतेने त्यांचं तोंड आलं ते पुढे महिनाभर पुरलं. या ओरायन पुस्तकाबद्दल वेदांच्या अभ्यासावरचे युरोपियन पंडित ब्लूमफील्ड यांनी आपला अनुभव लिहून ठेवला होता. त्यांनी लिहिलं होतं,

‘’ His book created a sensation. All the Sanskrit Pandits had to readjust their own conclusions. It stirred up the world of science. The author had controlled vedic literature and and the Occidentle world on the same…… And then my superficial study soon replaced with the absorbed study. दोन तीन आठवड्यांपूर्वी इंडियाहून माझ्याकडे एक पुस्तक आलं. त्या पुस्तकाची छपाई, कुठल्यातरी सुमार अँग्लो इंडियन छापखान्यात केलेली होती. लेखकाची प्रस्तावनाही फारशी आकर्षक नव्हती. हा भारतीय लेखकही मला माहीत नव्हता. तो प्रसिद्धही नव्हता. मी ते पुस्तक दुय्यम पातळीवरची वाचनीय पुस्तकं असतात त्या फळीवर ठेऊन दिलं. कधीतरी जेवण झाल्यावर झोप येण्यासाठी ते वाचायला ठीक आहे अशी कल्पना होती. एक दिवस ते पुस्तक गंमत म्हणून वाचायला लागलो आणि बघता बघता, सहज करमणूक म्हणून वाचायला घेतलेल्या पुस्तकातील मजकुराने मला गंभीर करून टाकलं. त्याने आमचे आजवरचे वेदांबद्दलचे

अनेक सिद्धान्त मोडून टाकले होते, आणि आपल्याच विधानांच्या पुष्टीसाठी अनेक सुंदर पुरावे दिले होते. आम्हाला त्यांचा सिद्धांत मान्य करावा लागला. ''

आणखी काय सन्मान व्हावा पाश्चिमात्य विद्वानांकडून या भारताच्या महामानवाचा.

मंडालेला लिहिलेलं " गीतारहस्य " इंग्रजांनी आपल्याजवळ ठेवलं. लोकमान्य पुण्यात आल्यावरही त्यांना परत करण्यात आलं नाही. कित्येक दिवस उलटले. बरोबरीचे लोक कासावीस होऊ लागले पण लोकमान्यांनी त्यांना धीर देत म्हटलं, इंग्रज कागद जप्त करतील तर करू देत. माझ्या डोक्यात सगळं आहे ते तर घेणार नाहीत ना ! मी पुन्हा सगळं लिहून काढीन.

प्रो. जिनसीवाले यांनी लोकमान्यांना, काही झाले तरी संध्या, त्रिसुपर्ण (मंत्र) केल्याशिवाय राहू नका असा उपदेश केला तेव्हा लोकमान्यांनी सांगितलं. मी सकाळी जागा झाल्यापासून रात्री झोपेपर्यंत मातृभूमीच्या चिंतनावाचून एक क्षणही रिकामा नसतो. तीच माझी संध्या आणि त्रिसुपर्ण. पंचांगातलं अवकहडाचक्र कसं आलं याचा खुलासा त्यांनीच केला. ए,बी,सी,डी, प्रमाणे तीही एक वर्णमाला आहे पण आपल्याकडे कशी पोचली त्याचा पुरावा त्यांना मिळाला नाही. शाळेत संस्कृत शिकवतांनाही त्यांचं शिकवणं

वेगळंच असायचं. मेघदूत शिकवतांना कालिदासाच्या एका श्लोकापुढचा श्लोक कसा आला आणि का लिहिला असेल, त्यातले शब्दही तेच का असतील त्याचीही व्युत्पत्ती ते सांगत. कलकत्ता कॉंग्रेसच्या अधिवेशनाहून परत येतांना ते विद्यार्थ्यांच्या आग्रहावरून, नागपूरला उतरले. त्याआधी ही मुले ते कलकत्याला जातांना त्यांना स्टेशनवर भेटली होती. तेव्हा आपले व्याख्यान कोणत्या विषयावर करावे हे त्या तरुणांशी बोलतांना त्यांनी जाणून घेतलं होतं. संस्कृत भाषा आणि पाश्चात्य तत्त्वज्ञान या विषयाचा अभ्यास करणारी मुलं तिथे जास्त आहेत हे लोकमान्यांना कळलं होतं. ठरल्याप्रमाणे राजाराम तुळसीराम नाट्यगृहात त्यांचा मानपत्र देऊन सन्मान झाला. अध्यक्ष होते महामहोपाध्याय केशव रावजी ताम्हन. या समारंभाला उत्तर म्हणून त्यांनी जे भाषण केलं त्या भाषणातच " गीतारहस्याचं " सूत्ररूपाने बीज होतं.

" ओरायन " वगैरे पुस्तकं मराठीत आपण का लिहीत नाही असं कुणीतरी लोकमान्यांना विचारलं तेव्हा, " परकी लोक ऊठसूट आपल्यावर जे आक्षेप करत असतात, त्यांना उत्तर देण्यासाठी मी इंग्रजीत ग्रंथ लिहीत असतो " हे त्यांचं उत्तर होतं. इंग्रज लोक त्यांना किती सलत होते आणि आपल्या संस्कृतीचा गाढा अभ्यास असल्यामुळे त्यात किती आणि काय काय चांगलं आहे हे त्यांनाच माहीत असल्यामुळे ते फार दक्ष असत.

लोकमान्यांचा जैन धर्माचा खूप अभ्यास होता. जैन संस्कृतीविषयी त्यांचं जैन परिषदेत जे व्याख्यान झालं त्यात अहिंसेबद्दल त्यांनी अभ्यासपूर्ण विचार मांडले होते. गुजरात पुरातत्त्व मंदिराचे आचार्य मुनि जिनविजय यांच्याबरोबर ते कधीकधी फर्ग्युसन रस्त्यावरून फिरायला जात आणि त्या धर्मावर, साहित्यावर, बोलत. जैन साहित्य विपुल आहे, पण ते परिपूर्ण अवस्थेत प्रकाशित झालेले नाही. त्यामुळे ते काम जैन साधूंनी केलं पाहिजे. जैनधर्म-बौध्दधर्म आणि सांख्यमत यांच्यातील संबंधांबद्दल चर्चा होत असे. अर्वाचीन सांख्य आणि प्राचीन सांख्य यातील भेद दाखवणारा लेख त्यांच्याजवळ आहे असं कळल्याबरोबर त्यांनी त्यादिवशीचं फिरणं रद्द करून मुनींच्या घरीच बैठक मारली आणि तो उल्लेख पाहिला. त्यांचा जैनधर्माचा गाढा अभ्यास होता, म्हणूनच महात्मा गांधींच्या अहिंसा, उपवास, या मार्गांमुळे लोकमान्यांची, गांधी जैन धर्माचे आहेत अशी समजूत होती.

सर रामकृष्ण भांडारकरांना ८० वर्षे पूर्ण झाली तेव्हा त्यांचा सत्कारप्रसंगी सर्वांच्या विनंतीवरून खाल्डीयन अँड इंडियन वेदाज् ' हा निबंध लोकमान्यांनी भांडारकरांसमोर मुद्दाम वाचला. तो पुढे खूप प्रसिध्द झाला. हा विषय का आणि कसा सुचला लोकमान्यांना? तर झालं असं की अथर्व वेदाचा अभ्यास करतांना

त्यांना संस्कृत भाषेत नसलेले अनेक शब्द आढळले. यावर त्यांचा विचार सुरू झाला तेव्हा त्यांनी असं अनुमान काढलं की कधीतरी पुरातन काली संस्कृत आणि खल्डियन वेद एकच किंवा एकत्र असले पाहिजेत. त्यातील दोन-तीन कल्पना पुराव्याअभावी त्यांनी त्यात मांडल्या नव्हत्या. वेदिक धर्मात विष्णू-लक्ष्मी हे पति-पत्नी मानले आहेत, पण खाल्डियन दैवत मर्दुक ह्याचे विष्णूशी खूप साम्य आहे. आणि लक्ष्मी ही स्वतंत्र देवता नव्हतीच पण जेव्हा मर्दुकला आर्य संस्कृतीत सामावून घेणं इष्ट वाटायला लागलं, तेव्हा मर्दुकला विष्णूची बायको म्हणून सामावून घेतलं असावं असा त्यांचा कयास होता पण त्याला पुरावा नव्हता. " शिखर " या संस्कृत शब्दाचा संबंध झिगुरात या ॲसिरियन शब्दाशी असावा आणि देवपूजनाला ऊंच देवालये बांधण्याची कल्पना खाल्डीयन संस्कृतीतून आली असली पाहिजे असा त्यांचा दावा होता. पंजाबातल्या उत्खननातून उंच इमारतींचे जे अवशेष मिळायला लागले आहेत त्यावरून आता हे स्पष्ट होऊ लागलं आहे. असे अनेक पुरावे देत लोकमान्यांनी हा प्रबंध वाचला. रत्नागिरीला शाळेच्या वेळेपासून लोकमान्य भांडारकरांना ओळखत होते. सर भांडारकर आणि गंगाधरपंत टिळक हे रत्नागिरीला एकाच शाळेत अध्यापनासाठी होते. त्यामुळे अति आदराने लोकमान्यांनी ही आदरांजली भांडारकरांना दिली.

ओरायन आणि आर्क्टिक होम इन वेदाज् हे त्यांचे दोन ग्रंथ म्हणजे लोकमान्यांच्या अभ्यासाचे, संशोधनाचे दोन एकमेकांना पुरक ग्रंथ. वेदकाल ठरवतांना युरोपियन पंडितांनी त्या वाङमयाचे निरनिराळे खंड पाडले. आणि प्रत्येक खंडाला एकेक काल निश्चित केला. मॅक्समुल्लर साहेबांनी त्याचे छंद:काल, मंत्रकाल, ब्राह्मणकाल, आणि सूत्रकाल असे चार भाग पाडले. तो काल इ.स. पूर्व ५००० वर्षे होता, पण भूगर्भशास्त्रावरच्या पुस्तकांचं अध्यन केल्यावर लोकमान्यांनी तो काळ कमीत कमी ८००० वर्षे मागे नेला. त्याचवेळी शास्त्रज्ञांनी उत्तर ध्रुवाजवळचा प्रदेश इ. स. पूर्व ८००० वर्षे वसती करून राहायला योग्य होता, हे सिध्द केलं होतं. पण स्पष्ट निर्णयाचा पुरावा हाती लागत नव्हता, तो लोकमान्यांना ऋग्वेदात सापडला. ऋग्वेदात उत्तर ध्रुवाजवळच्या निसर्गाचं वर्णन लिहिणारे लोक किंवा त्यांचे पूर्वज दृष्टीस पडणाऱ्या ठिकाणीच कोठेतरी राहात असावेत असा अंदाज लोकमान्यांनी काढला. त्यांच्या या एका विचाराने ओढल्या गेलेल्या रेखेतून आर्यांच्या मूळ वसतीस्थानावर जसा प्रकाश पडला तसाच काही ऋचांचा पूर्वी अर्थ लागत नव्हता, त्यांचाही अर्थ लागायला लागला.

मंडालेच्या मुक्कामातल्या रिकाम्या वेळात जे ग्रंथ लिहायचा लोकमान्यांचा मानस होता, त्या पुस्तकांची नावे :- १ हिंदु धर्माचा इतिहास - वैदिक श्रौत उपनिषदे इतिहास पुराणे दर्शन

भक्ती. ऐतिहासिक कालापूर्वीचे - इतर धर्म व उपसंहार. २. हिंदु राष्ट्रधर्म ( वृत्तांत व त्याच्या निरनिराळया अंगाचे वर्णन. ) ३. रामायण महाभारताच्या पूर्वीचा हिंदुस्थानचा काल. ४. शांकरदर्शन. ५. प्रांतिक राज्यव्यवस्था. ६. हिंदु लॉ किंवा हिंदु धर्मशास्त्र ७. इन्फिनिटेसिमल कॅलक्युलस. ८. भगवत्गीतारहस्य - नीतिशास्त्र 9. शिवाजीचे चरित्र 10. खाल्डिया व हिंदुस्थान. ११. बुद्ध युग-शक-राजे. १२.. मुसलमानांच्या आधीची राज्ये व मुसलमानी साम्राज्य. १३. मुसलमानी राज्याचा ऱ्हास - मराठे व शीख. १४. इंग्रजांची राज्यस्थापना १५. राज्यसत्तेचे एकीकरण १६. नोकरशाही आणि तिचे ध्येय. ( ऑस्ट्रिया, स्पेन, रशिया वगैरे देशातील नोकरशाहीशी तुलना.) ही यादी खूप मोठी  आहे.

शिवजन्माची तारीख शोधतांना वैशाख शुद्ध प्रतिपदा, गुरुवार, उत्तरारात्र, अश्विनी नक्षत्र, शके १५४९ ( इ.स. १६२७ ) ही शिवाजी महाराजांची जन्मतिथी लोकमान्यांनी अभ्यासाने निश्चित केली होती. त्यासाठी त्यांनी अनेक बखरी, शिवकाव्य, काव्येतिहास संग्रह, शिवदिग्विजय, असे अनेक लेख वाचून त्यात जे उल्लेख आले, त्यांची छाननी केली. त्यातून मिळालेल्या चार तिथ्यांमधून कोणती खरी हे गणिताने ठरवलं.. तिथीच्या बरोबरच्या तपशीलाचा मेळ बसत नव्हता, मग अभ्यासाने आधी जन्मवर्ष मिळवलं. मग वैशाख महिना निश्चित केला. वार आहे, तर तिथी

नाही, तिथी आहे तर नक्षत्र नाही असं होऊ लागलं. म्हणून लोकमान्यांनी शिवदिग्विजय जास्त विश्वसनीय धरलं, कारण काव्यात नेहमी सुटसुटीतपणा आणि नेमकेपणा असतो, शिवाय त्यातल्या तिथी, वार, नक्षत्र यांचा नीट मेळ बसत होता. आणि तिथी निश्चित केली. मग नक्षत्रेच तिथौ विधौ " या श्लोकातल्या विधी या अर्थाने विधौ या शब्दाला सप्तमी न मानता, चंद्र या शब्दाची सप्तमी मानली तर मेळ बसला. आणि अशा रितीने जन्मतिथी काढली. त्यावरून शिवजन्माची तारीख काढली. वि का. राजवाड्यांनाही ती मान्य होती. कारण त्यांनीही अभ्यासाने तीच तिथी निश्चित केली होती. पण १९०० साली जेधे शकावली हाती आल्यावर त्यांनी त्या आधारावर ती जन्मतारीख बदलली.

गीतारहस्य हे अपूर्व लेखन त्यांनी तुरुंगातच केलं. २० वर्षांपासून त्यांच्या डोक्यात हा विचार घोळत होता, त्याला मूर्त स्वरुप यायला मंडालेचा तुरुंग गाठावा लागला. तुरुंगात जन्मलेल्या योगेश्वराच्या गीतेवरचा भारतीय साहित्यातला अजोड ग्रंथ तुरूंगातच जन्मावा हा नियतीचा खेळ. गीतेतील निवृत्तीपर संदेश काढून त्याचा प्रवृत्तीपर उपदेश लोकांसमोर ठेवावा हा उद्देश " गीतारहस्य " लिहिण्यामागे होता असं ते म्हणत. ( ज्ञानोबा माऊलींनी तरी काय सांगितलं आहे ज्ञानेश्वरीत? ते म्हणतात, सीदन्ती मम गात्राणि म्हटल्यावर योगेश्वर अर्जुनाला म्हणाले, “

सांडी हे मूर्खपण, ऊठी घेई चापबाण, संग्रामि ते रुदन, कवण तुझे..हे प्रवृत्तीपरच नव्हे का? )

त्यासाठी त्यांना नवीन शब्द बनवायले लागले आणि दोनदोन, तीनतीन दिवस विचारमंथनात घालवावे लागले. गीता ही सर्व मानवजातीसाठी आहे. मानवाचे वर्तन हे अतिउच्च दर्जाचं असलं पाहिजे याचं तात्त्विक विवेचन गीतेत आहे म्हणून ती सर्वांसाठी आहे. श्रीकृष्णाच्या वेळी चातुर्वर्ण्याची पध्दत होती, म्हणून त्याने चातुर्वर्ण्याचा उल्लेख केला आहे. पण इतर देशांमधे ती पध्दत नसली तरी त्याच धर्तीवर समाजव्यवस्था असतेच. पण त्यांनाही उच्चनीती तत्वे लागतातच. त्यासाठीही गीता हवीच. गीतारहस्याच्या लेखनासाठी त्यांना खूप सहनशीलता दाखवावी लागली. एकदा उपनिषदावरची पुस्तकं मागवली, पण त्यावर इंग्लीशमधे नाव नव्हतं या कारणासाठी ती त्यांच्यापर्यंत पोचली नाहीत. सुरुवातीला चारच पुस्तकं जवळ बाळगण्याची परवानगी होती, ती पुढे रद्द होऊन हवी तेवढी पुस्तकं जवळ ठेवण्याची परवानगी मिळाली. लिहिण्यासाठी शाई न देता पेन्सिल दिली जाई. कागदही मोजून दिले जात आणि गोळा केले जात. मग चोपडीच देऊ लागले. या लेखनासाठी त्यांनी अनेक पाश्चात्य विद्वानांचे ग्रंथ वाचले. जर्मन भाषा मुळाक्षरांपासून शिकल्यावर वर्षभरातच त्यांनी वेबरचा जर्मन भाषेत लिहिलेला ग्रंथ वाचायला घेतला आणि एका

तासात त्यांची पाच पानं वाचून झाल्यावर त्यांना अत्यानंद झाल्याचं त्यांनी घरी कळवलं. त्यांनी लिहिलं,`` दर तासाला पाच पाने याप्रमाणे मला तो अर्थ लावून लावून वाचता आला त्याचा किती आनंद झाला हे काय सांगू? मला वाटते की माझ्या बंदिवासातला काही भाग खराच सत्कारणी लागला. '' पण वेबरचा ग्रंथ वाचण्याचा त्यांचा आनंदही ते त्या परिस्थितीतही उपभोगू शकतात हेही थक्क करणारेच. या आणि अशा पाश्चात्य विद्वानांच्या ग्रंथांचा त्यांनी गीतारहस्यात उपयोग करून घेतला. ऑक्टोबर १९१० मध्ये त्यांनी या लेखनाला प्रारंभ करून मार्च १९११ मधे गीतारहस्य हा ग्रंथ लिहून पूर्ण झाला.

लोकमान्यांचा A Missing Verse Of Sankhyakarika लेखसुद्धा असाच खूप गाजला. सांख्य योग ही एक अंकांवर आधारित तत्त्वज्ञान प्रणाली आहे. प्रकृती आणि पुरुष, ईश्वर, कला, स्वभाव, आणि निर्गुण अशा ६ प्रणालींच्या तत्त्वज्ञानाच्या ७० श्लोकांमधला एक श्लोक गहाळ झालेला होता. ही सांख्यकारिका कशी असेल यावर त्यांचा विचार चालू असतांना त्यांना जपानी लेखक टाकासाकू यांनी लिहिलेलं पुस्तक मिळालं. त्यांनी तोच श्लोक चीनी वेदांच्या अभ्यासातून घेतला होता आणि

फ्रेंच भाषेत ते पुस्तक लिहिलं होतं. लोकमान्यांनी फ्रेंच भाषेचा अभ्यास केल्यामुळे त्यांना ती सांख्यकारिका मिळाली.

## व्यक्तिमत्व आणि लोकसंग्रह.

**मी माणसांचा भुकेला आहे, मला तुमचा पैसा नको, तुमचं अंत:करण हवे आहे, या लोकप्रेमामुळेच त्यांना लोकमान्यता मिळाली**.

लोकमान्य ही पदवी त्यांना कधी कशी मिळाली ह्याचाही इतिहास वेगळाच आहे. पुण्यात दुर्गाबाई जोशी नावाच्या एक सुशिक्षित सुधारक बाई होत्या. त्याकाळी बायका चातुर्मासाचे नेम करत असत. दुर्गाबाईंनी चातुर्मासाचा नेम म्हणून चार महिने इंग्रजी सहावी आणि सातवीच्या मुलांना संस्कृत शिकवण्यासाठी मोफत क्लास चालू केला. त्या शाळेसाठी महादेवशास्त्री ओक यांना नियुक्त केलं. त्या चातुर्मास व्रताच्या उद्यापनाच्या वेळी, दसऱ्याच्या दिवशी लोकमान्यांना अध्यक्ष म्हणून बोलावण्यात आलं आणि सर्व विद्यार्थ्यांना गीतेची एकेक प्रत बक्षिस म्हणून लोकमान्यांच्या हस्ते वाटण्यात आली. त्या दिवशी महादेवशास्त्री ओकांनी आपल्या गौरवपर श्लोकात लोकमान्यांचा " **लोकमान्य** " असा पहिल्यांदा उल्लेख केला. त्यानंतर एका जाहीर सभेत अण्णासाहेब पटवर्धन यांनी आपल्या जाहीर भाषणातून तो शब्द लोकांपर्यंत पोचवला.

करारी, गंभीर चेहरा, पिंगट रंगांचे पाणीदार डोळे आणि मोठा आवाज ही लोकमान्यांची विशेषता. पण मनुष्यलोभासाठी मनाने अत्यंत कोमल. एकदा एकाला शब्द दिला की प्राण जाए, पर वचन न जाए हा स्वभाव. माणसांची उत्तम पारख आणि त्यांना न विसरणं ही खासियत. " ठकासी असावे ठक, वाचाळासी असावे वाचाळ " हा लढाईचा समर्थ रामदासी पाया. शत्रूने आपली शस्त्रे बदलली की आपणही आपली बदलली पाहिजेत हे धोरण. प्रत्येक माणसाशी हे बोलणारच, आणि तेही त्याचा वकूब ओळखून त्याला समजणाऱ्या भाषेत. म्हणूनच त्यांना अफाट लोकप्रियता मिळाली. त्यांच्या भाषणाला हजारो लोकांची गर्दी असे. त्यांच्या मिरवणूकीतही झुंडीच्या झुंडी लोटत. त्या भाषणामधे तेज, खरेपणा, शब्दांचा साधेपणा, विचारांचा पक्केपणा, देशभक्ती, मुद्देसूदपणा असे. त्यामुळे त्यांच्या भाषणाचा थेट लोकांच्या हृदयावर परिणाम होई, आणि भाषण कळण्यासही सोपे असे.

१९०० साली रायगडावर शिवाजीमहाराजांचा उत्सव करण्यात आला. लोकमान्यांना बघायला काही मुलं आली तेव्हा लोकमान्य गंगासागर तलावात पोहत होते, आणि तात्यासाहेब केळकर आंघोळ करून काठावर उभे होते. त्यांच्या डोक्यावर छत्री होती. लोकमान्यांनी त्या मुलांना सांगितलं की ही छत्री हातात धरायची आणि केवळ पायांनी पोहून तलाव पार करायचा. मुलं

पाण्यात उतरली पण अर्ध्या वाटेतून परतली. मग लोकमान्य उतरले, ते तलाव पार करून तर गेलेच पण पायांनी फक्त पोहत परत पण आले. लंडनला जातांना बोटीतून जातांना, बॉम्बहल्ला झाला तर लाईफ बोटीत उतरायचं आणि बोट  सोडून वल्हवत लांब जायचं असं सर्वांना सांगितलं गेलं, तेव्हा लगेच ते प्रात्यक्षिक करून बघण्यात पहिले पाण्यात उतरले ते लोकमान्य होते. वर आल्यावर इतरांनाही हे करायला लावलं. आयत्या  वेळी जमणार कसं? आधी शिकून अभ्यास झालाच पाहिजे ना?

एकदा त्यांच्या शाळेचे ड्रीलमास्तर गंगाधरराव दीक्षित यांच्याकडे आगरकर, टिळक, ही सगळी मंडळी जेवायला गेली. तिथे जेवतांना आग्रह सुरू झाला. त्यातच मग कोण लाडू जास्त खातो याच्यावर पैजही लागली. लोकमान्यांनी एकदा सगळयांना शाळेत अकरा वाजता पोचायची आठवण करून दिली पण कुणीच ऐकायला तयार नाही. झालं. मग लोकमान्यही त्या पैजेत उतरले. पैज त्यांनीच जिंकली. त्यांनी २१ लाडू खाल्ले आणि त्यांच्या प्रतिस्पर्ध्याने २० लाडू. अतिजेवणानंतर सगळे गारद झाले. जे मोजकं जेवले होते त्यांच्यातलेही काही ढेपाळले. काही तिथेच झोपले. शाळेत मात्र त्यादिवशी आपल्या मोठ्या आवाजात फक्त लोकमान्यच वर्गावर शिकवत होते. आणि जे शिक्षक आले नाहीत, त्यांचाही वर्ग घेत होते. विष्णूशास्त्री शाळेत आले आणि त्यांनी हे

दृष्य बघितलं. ते म्हणाले,`` चला ! जोपर्यंत टिळक आहेत तोवर शाळा बुडत नाही. " त्यादिवशी पैजेचे जे ५ रुपये लोकमान्यांना मिळाले त्यातून शाळेसाठी खेळाचं सामान आणलं गेलं. स्वत:चे पैसेही शाळेलाच.

त्यांच्या पुस्तकांची काळजी ते स्वत:च घेत. घरातली पुस्तकं म्हणजे केवळ त्यांचा प्राण होता. ती कुठे आणि कशी ठेवायची तेही तेच ठरवत. कुणाला पुस्तक लागलं तर स्वत:च उठून काढून देत. त्यांची झोप हीसुध्दा त्यांच्या ताब्यात असे ...आता मी झोपतो असं म्हणून ते जेव्हा झोपत त्यानंतरच्या दुसऱ्या मिनिटाला ते घोरायला लागलेले असत आणि ज्या वेळेला उठायचं असेल त्याच क्षणी उठत. लोकांचे चेहरे लक्षात ठेण्यात त्यांचा हात धरणारा कुणी नव्हता. त्याच्याभोवती नेहमी गुप्तहेरांचा सुळसुळाट असे. त्यांच्या जेवणाखाण्याची सोयही तेच करत. एकदा एक गुप्तहेर त्यांच्या पाठोपाठ सिंहगडावर पोचला तेव्हा त्याला पाहिल्याबरोबर, तू अमुक गावी, अमुक वेळेला मला नमस्कार करायला आला होतास ना? असं विचारल्याबरोबर तो परत निघून गेला. त्यांच्या मुलीच्या लग्नात आलेल्या पाहुण्यांना त्यांच्या दर्जाप्रमाणे पंक्तीत बसवण्याचं काम ते स्वत: करत होते.तेव्हा त्यांनी ज्या लोकांना वेगळे काढून त्यांची स्वतंत्र पंगत बसवली ते झाडून सारे गुप्तहेर होते. लोकमान्यांनी त्यांना खड्यासारखं वेचून काढलं

होतं. पोलिसांकडून सरकारला त्यांच्याबद्दल काय रिपोर्ट जातो याची त्यांना खडान् खडा माहिती असायची, नव्हे, कधीकधी त्याची अस्सल कॉपीही असायची. एवढं त्यांचं स्वत:चं हेरखातंही सशक्त होतं.

इ. स. १९१७-१८ मधे, राधाबाई आपटे नावाच्या बाई त्यांच्या " कीर्तनसुधा " नावाच्या पुस्तकावर अभिप्राय मागायला गेल्या. त्यांना पाहून लोकमान्य त्या बाईंना म्हणाले, मी तुम्हाला कुठे तरी पाहिलंय असं वाटतंय ! १९०६ साली बेळगावला पाहिलंय असं वाटतंय. भास्करराव ओंकार तुमचे कोण?..... बाई थक्क होत म्हणाल्या ... ते माझे वडील...मग लोकमान्यांनी त्यांचं पुस्तक ठेऊन घेतलं आणि उद्या अभिप्राय लिहून ठेवतो. उद्या या असं सांगितलं. लोकमान्य अत्यंत विनोदी होते. एकदा त्यांच्या मुलीने एक तसवीर तयार केली. त्यात मध्यभागी लोकमान्यांचा फोटो आणि बाजूने छोटे छोटे शंख-शिंपले लावले आणि ती वडिलांना दाखवायला आली. त्यावर लोकमान्य तिला म्हणाले, " मधे मोठा शंख आणि बाजूने छोटे शंख का? " सकाळी सगळी न्याहारीला बसली की मुलांना म्हणत, तुम्ही न्याहरीला हे खाता. मी रोज काय खातो सांगा बरं?.. मग पेपर वाचतांना म्हणत, मी रोज कुणाच्या ना कुणाच्या शिव्या खात असतो.

ते लंडनला असतांना, त्यांची मुलाखत ब्रिटन अँड इंडिया नावाच्या साप्ताहिकाच्या प्रतिनिधीने घेतली होती. तेव्हा त्यांनी सांगितलं,

" खरं तर मला ज्ञानदान फार आवडतं. तोच उद्योग म्हणून मला स्वीकारायचा होता. पण राजकारणात पडावं लागलं. त्यानंतर मी जेलमधे गेलो."

" का गेलात? "

" माझ्या वृत्तपत्रात मी कोल्हापूरच्या राजांना त्यांचे कारभारी वाईट रीतीने वागवतात असं लिहिलं. मग शाळा सुरू केली, पण सरकारी ग्रँट घेऊ नये या माझ्या मतामुळे मी शाळा सोडली. १८९०सालामधे मी केसरी जनजागृतीसाठी सुरू केला आणि त्याचा खप वाढल्यामुळे मला राजकारणात पडावं लागलं."

स्वराज्य मिळाल्यावर मुलांना गणित शिकवाचं आणि डिफरेंशियल कॅल्क्युलसचा अभ्यास करायचा हे त्यांचं स्वप्न होतं. अंगात ताकद भरपूर, चिवटपणे काम करण्याची क्षमता प्रचंड. एकदा एका विषयाच्या मागे लागले की बारातेरा तास त्यात घालवत असत. कहर झाला होता तो मुंबई काँग्रेसच्या परिषदेला. सलग ३६ तास त्यांनी काम करून स्वत:च एक विक्रम केला. अशावेळी त्यांना जेवणखाणही सुचत नसे आणि ते सुचवायचं

धाडसही कोणाला होत नसे. त्यांची लोकप्रियता वर्णनातीत होती, कारण प्रत्येकाला ते नि:स्सीम देशभक्त आहेत, आपल्यासाठी तुरुंग सोसतात, ते चारित्र्यवान आहेत, समाजासाठी कळकळीने काम करतात हे माहीत होतं. त्यामुळे विद्वानांपासून सामान्य अशिक्षितापर्यंत ते सर्वप्रिय होते. लोक झुंडी-झुंडीने त्यांच्या दर्शनासाठी खोळंबत, तेव्हा कितीही रात्र असली, जागरण झालेलं असली तरी लोकांसमोर जाऊन त्यांचं समाधान करीत असत. प्रवासाला निघाले की प्रत्येक स्टेशनवर लोक हजाराच्या संख्येने त्यांच्या दर्शनासाठी खोळंबलले असत, तेव्हा लोकमान्य डब्यातून खाली उतरत, त्यांच्यासमोर उपदेशाचे चार शब्द बोलत आणि मग परत गाडी सुटे. एकदा एका युरोपियन माणसाने त्यांच्या डब्यातून प्रवास करत असतांना त्यांच्या गळयातला हार वास घेण्याच्या निमित्ताने मागून घेतला आणि हळूच आपल्या खिशात ठेवला.

एकदा ते प्रवास करतील त्या गाडीच्या स्टेशनवर प्लॅटफॉर्म तिकीटं विकण्यात येऊ नयेत असा फतवा सरकारने काढला. कारण होतं. गाडीतल्या इतर युरोपियन प्रवाशांना त्यांचा त्रास होतो. त्या वेळच्या प्रवासात एका स्टेशन मास्तरने आपला राजीनामा लिहून ठेवून सगळयांना तिकीटं वाटली. लोकमान्यांच्या

गाडीने फलाटावर प्रवेश केला आणि... लोकमान्य महाराजकी जय ....या घोषणेने आसमंत दुमदुमला.

रॅण्डच्या खुनानंतर लोकमान्यांवर राजद्रोहाचा खटला भरण्यात आला, तेव्हा त्याच्या निकालाच्या दिवशी लोकांचे थवेच्या थवे मुंबई हायकोर्टाच्या दारात जमू लागले. संध्याकाळी ५ वाजेपर्यंत हजारो लोक लोकमान्यांचं दर्शन एक क्षण तरी व्हावं म्हणून न कंटाळता तिथे उभे राहिले. निकालही लागत नव्हता. पोलिसांनी कैद्यांना न्यायची काळी गाडी दुपारपासूनच मुख्य दारासमोर आणून ठेवली होती. अखेर वरच्या मजल्यावरून काही लोक खाली येऊ लागले आणि लोकमान्यांचं दर्शन घेण्यासाठी सगळे उतावीळ झाले. पण वस्ताद इंग्रजांनी लोकमान्यांना समुदायाचा रोष टाळण्यासाठी न्यायमूर्तींच्या मागच्या बाजूला वाटोळे छोटे जिने आहेत, त्या मार्गाने खाली नेऊन वेगळयाच गाडीतून तुरुंगात नेलं होतं. सरकार अशा वेळी मुद्दाम चार-पाच मार्गांच्या अफवा पसरून लोकांना गोंधळात टाकत असे.

विठ्ठल रामजी शिंदे जेव्हा तुलनात्मक अभ्यासासाठी ऑक्सफर्डच्या मँचेस्टर कॉलेजला जायचे होते तेव्हां लोकमान्यांना भेटायला गेले. खरं तर ते लोकमान्यांचे विरोधक. पण वैचारिक. लोकमान्यांनी त्यांना सांगितलं. " आमच्या हिंदू तत्त्वज्ञानात द्वैत-

अद्वैत असे आणि शैव- वैष्णव-शाक्त असे जे पंथ माजले आहेत, त्यांनी आपली दृष्टी विकृत होऊ न देता, त्यांचे ऐतिहासिक महत्वही कमी होऊ न देता, उपनिषद काळात हिंदूंची जी निर्भय, स्वतंत्र दृष्टी होती, तीच राखून पाश्चात्य आचार-विचारांशी त्याची तुलना करण्यास शिका.''

एकदा अमरावतीला गेले. मित्राच्या घरी उतरले होते. तिथे एक शेतकरी खूप दूरवरून त्यांचं दर्शन घ्यायला आला. बाहेरची माणसं त्याला आत सोडेनात. गलका ऐकून लोकमान्य बाहेर आले. त्या शेतकऱ्याची चौकशी केली. त्याचं पीक काय, शेती केवढी वगैरे प्रश्न विचारून समाधान करून पाठवलं. त्यांच्याशी बोलायला गावातली उच्चभ्रू माणसं खोळंबली होती, त्यांना म्हणाले, " शेतकरी हा आपल्या देशाचा आत्मा आहे....यांच्यावरचा मलीनपणा दूर केला तरच या राष्ट्राचा उध्दार आहे. यासाठी शेतकरी आपला आणि आपण शेतकऱ्याचे असं वाटलं पाहिजे." शेतकरी धन्य होऊन परत गेला.

स्वराज्याची चळवळ खेडोपाडी नेण्यासाठी ते भाषणं करीत हिंडत तेव्हा ऐकणारी माणसं कशी आहेत याचा आधी अंदाज घेत. एकदा चिकोडीला त्यांचं भाषण झालं. दुसरे दिवशी तात्यासाहेब केळकर, बाबुराव गोखले हे आंघोळीसाठी विहीरीवर

चाललेले असतांना त्यांना एक शेतकरी दिसला. तात्यासाहेबांनी त्याला भाषणाला काल आला होतात काय असं विचारल्यावर तो हो म्हणाला. तेव्हा कशावर होतं रे भाषण असं विचारल्यावर "स्वराज्यावर" म्हणाला. " म्हणजे काय रे " त्यावर उत्तरला, `` म्हणजे आपल्या गावचा मामलेदार नाहीतर कलेक्टर तुमच्यावर जुलूम करत असतील तर त्याच्या जागी आपल्याला हवा तो नेमता यावं, याचा अर्थ स्वराज्य. ''

एम.ए. करत असतांना लोकमान्य भाड्याच्या खोलीत मित्रांबरोबर राहात होते. लोकमान्यांचा एक मित्र शीतज्वराने खूप आजारी पडला. त्याची काळजीपूर्वक सेवा केली तरच तो वाचेल, अशी स्थिति होती. लोकमान्यांनी या मित्राची अहोरात्र जागून इतकी काळजी घेतली आणि शुश्रुषा केली की फुलाहून कोमल असं त्याचं मन होतं याचा प्रत्यय आला. पण त्यांच्या या प्रयत्नांना यश न येऊन तो मित्र वारला. अंत्यसंस्कार सुरू झाले तेव्हा अचानक त्या शवाचा पाय बाहेर आला. इतर सर्वांनी ते पाहिलं पण काय करावं ते सुचेना आणि कुणाला धाडसही होईना. पण त्याक्षणी लोकमान्य पुढे झाले, तो भाग तोडला आणि परत सरणात टाकून दिला. वज्रादपि कठोर म्हणजे काय याचंही उदाहरण त्यांनीच घालून दिलं. मनाची स्थितप्रज्ञता म्हणजे काय असं त्यांना

विचारल्यावर म्हणाले, आनंदाची गोष्ट घडली तर त्याने हुरळून न जाता किंवा दु:खाने गांगरून न जाता आपली अध्यात्मिक उन्नती करत राहणं. त्यामुळेच राजद्रोहाचा खटला त्यांच्यावर भरला गेला, तेव्हा दाजीसाहेब खरे त्यांच्यासाठी जामीन मिळवायच्या खटपटीत होते. ते जेव्हा जामीन मिळवून लोकमान्यांना भेटायला तुरुंगात आले तेव्हा लोकमान्यांना गाढ झोप लागली होती. अमूक गोष्टीचा अमूक परिणाम होणार आहे हे मनाने घेतलं की त्याचा त्यांच्यावर काहीही परिणाम होत नसे.

लोकमान्य विलायतेहून परतल्यावर पुणे शहरातर्फे त्यांना मानपत्र देण्याचा समारंभ करण्याचं ठरलं, पण रँग्लर परांजपे आणि इतर काही लोकांनी त्याला विरोध करायचं ठरवलं आहे हे लोकमान्यांच्या कानावर आलं तेव्हा त्यांनीच संयोजकांना बोलावलं आणि काय तयारी केली आहेत असं विचारलं. संयोजकांना काही सुचेना. परांजपे विलायतेहून आले तेव्हा त्यांच्यावर केसरीमधून लोकमान्यांनी टीका केली होती. त्यामुळे परांजप्यांचा विरोध होता. लोकमान्यांनी लगेच व्यूह रचना केली, विरोधकांना बोलू द्या म्हणून सांगितलं आणि लबाडीने त्यांना गोंधळ घालता येऊ नये म्हणून त्यांची बसायची व्यवस्थाही ठरवली. त्या अग्रलेखामुळे परांजपे अजून नाराज असतील त्याचं हे कोमल मन राजकारणात चालणार नाही म्हणाले. राजकारणात

दोन घ्यावेत आणि दोन द्यावेत या मताचा मी आहे असंही ठणकावून सांगितलं. ना. गोखले विलायतेहून आल्यावरही त्यांचाही मानपत्र समारंभ करण्यात आला त्यात लोकमान्यांनीच पुढाकार घेऊन समारंभ घडवला होता याचीही आठवण त्यांनी संयोजकांना करून दिली. आणि त्यानंतर त्या विरोधकांनाच पत्र लिहिलं की ..मानपत्र देणे हा एक शिष्टाचार आहे. तो शहरातर्फे दिला जातो. मी गेली चाळीस वर्षे या शहराची सेवा केली आहे... हिंमत असेल तर सभेला येऊन मला विरोध करून दाखवा. "

तुरुंगात राहात असतांना कैद्यांच्याही गळ्यातले ताईत झाले, कारण तिथेही ते त्यांच्या कल्याणाचा, हिताचाच उपदेश करीत असत. राजद्रोहाची शिक्षा झाली तेव्हा त्यांना कैद्याचा पोशाख दिला गेला. आणि जाड भाकरी. लोकमान्य म्हणाले, भारतातल्या अर्ध्या जनतेला ही भाकरीसुध्दा मिळत नाही. " ते दिसले की कैदी उठून उभे राहायचे. गुन्हे करून आलेले काही कैदी तिथेही जेलरचं ऐकायचे नाहीत. पण एकदा लोकमान्यांनी त्या कैद्यांना, 'आधीच गुन्हा करून आला आहात.. आता आणखी कशाला वाईटपणा घेता? नियमाप्रमाणे वागा ' असं म्हटल्यावर ते नीट वागायला लागले. अंतर्बाह्य सोज्वळ आणि निष्कलंक चारित्र्य ही लोकमान्यांची मोठी संपदा. त्यांच्याकडे एकदा एका मातब्बर माणसाच्या बाई खालच्या कोर्टातला निवाडा घेऊन आल्या.

लोकमान्यांचे चिरंजीव विश्वनाथ त्यांना घेऊन लोकमान्यांकडे आले. दीड तास लोकमान्य त्यांचे कागद चाळत होते, त्या बाईंना प्रश्न विचारत होते पण एकदाही त्यांनी बाईंकडे पाहिलं नाही.

पुण्यात असतांना गुप्त पोलीस खात्यातल्या एका अधिकाऱ्याने एका बाईला लोकमान्यांकडे पाठवलं. ती बाई एक विशिष्ट प्रकारची किल्ली घेऊन आली होती. ती लोकमान्यांना म्हणाली की, " माझ्या स्वप्नात अंबाबाई आली आणि मला म्हणाली की ही किल्ली ज्याच्याजवळ असेल, तो स्वराज्य मिळवेल. तेव्हा ती तुमच्याकडे असू द्या. " तेव्हा लोकमान्यांनी तिला म्हटलं की " तुम्ही मला बहिणीसारख्या आहात. ती किल्ली तुमच्याकडेच असू द्या. तुम्हास स्वराज्य मिळालं तर आम्हासही मिळाल्यासारखंच आहे. आम्ही तुम्हाला आमच्या राणीसरकार करू म्हणजे झालं.." त्या बाईची पापी नजर त्यांना सावध करून गेली. त्या किल्लीने आपल्या किल्ल्याला ती आग लावायला आलेली त्यांना लगेच उमजलं.

एकदा एका अडाण्याच्या इस्टेटीची व्यवस्था करायचं काम त्यांच्याकडे आलं. त्याच्या दागिन्यांची यादी करून त्याच्या सराफाला बोलावून किंमती करण्यात आल्या. यातील काही दागिने तुम्हाला हवे असतील तर किंमत करून ठेऊन घ्या असं सराफाने

त्यांना सुचवलं तेव्हा लोकमान्यांनी त्याचा निषेध केला आणि लवकरात लवकर हे विष बाहेर घेऊन जा असं बजावलं. त्याउलट कितीकांना आपल्या खिशातला पैसा देऊन मदत केली त्याला हिशेबच नाही.

सातारचे महाराज आबासाहेब पुण्यात वारले. त्यांचे ऑपरेशन झाल्यावर दोनतीन वर्षे ते आजारी होते. त्यांचा अंत झाला तेव्हा लोकमान्यांना त्यांची मिरवणूकीने अंतयात्रा काढावी असं मनात होतं. पण कुटुंबीयांना मात्र त्यांना माहुलीला अग्नी द्यावा असं वाटत होतं. महाराजांच्या निधनानंतर त्यांच्या जवळची मंडळी घाबरून गेली. या परक्या ठिकाणी कुणाची मदत घ्यायची म्हणून लोकमान्यांकडे आली. रात्री ९ वाजताची वेळ होती. लोकमान्य लगेच उठले. सातारकरांचे एजंट डि. जज्ज ल्यूकस नावाचे होते, त्यांच्याकडे गेले. यांनीच लोकमान्यांना ताईमहाराज खटल्यात शिक्षा सुनावली होती. त्यांची परवानगी घेऊन लोकमान्यांनी शवपेटीची सोय केली. एवढंच नाही तर स्पेशल डब्याची सोय ट्रॅफिक मॅनेजरकडून करून घेतली आणि त्या लोकांची सातारला रवानगी करून सकाळी ८ वाजता घरी परतले. जाग्रण, श्रम यांची तमा बाळगली नाही. प्रत्येकाला मदत करायची ती स्वत: उठून करायची, हाताखालच्यांना कामं सांगून नाही, हे त्यांचं विशेषपण.

त्यांचा भाचा एकदा आगरकरांच्या भावाबरोबर नाटकाला निघाला.केसरीसाठी नाटकाचे फुकट पास येत. पण लोकमान्यांनी त्याला निक्षून सांगितलं की कुणाचेही फुकट उपकार कधीही घेऊ नयेत. शिवाय आम्हाला नाटकावर परिक्षण लिहावं लागतं तेव्हा त्या उपकारामुळे खरं स्पष्ट लिहिता येत नाही. ही नीती त्यांनी ताई महाराज प्रकरणाच्या वेळीही पाळली होती. ट्रस्टी म्हणून कामानिमित्त बाबामहाराजांच्या घरी गेल्यावर त्यांनी कधीही सुपारीचं खांडही तोंडात टाकलं नाही.. महाराजांच्या मळयातून येणारा भाजीपालाही महाराजांच्या मृत्यूनंतर बंद करून टाकला.

इ. स. १९०७ सालची घटना होती ती. १८ वर्षांची एक वीरनवाली नावाची महिला रावळपिंडीला आपल्या भावाकडे निघाली होती. तिची गाडी मध्यरात्री स्टेशनवर पोचली. सकाळ झाल्यावर गावात जाऊ या विचाराने ती स्टेशनवरील बायकांच्या वेटिंग रूममध्ये बसली. त्या दिवशी रात्रपाळीला असलेल्या मूर या अँग्लोइंडियन अधिकाऱ्याने तिला आपल्या खोलीवर धमकावून नेऊन बलात्कार केला. त्याच्यानंतर फजलउद्दीन या त्याच्या नोकरानेही केला. तिच्या नवऱ्याने पोलिसांकडे तक्रार केल्यावर मूरला अटक झाली. त्या गुन्हेगारावर कोर्टात खटला भरला. मूरने ती बाईच वाईट चालीची होती असा बचाव केला. या खटल्यात ९ ज्यूरी होते ते सर्व युरोपियन होते. त्यांनी मूरच्याच जबानीला सत्य

मानून त्याला निर्दोष सोडलं. आठवडाभराने त्या मुलीने या लज्जास्पद आयुष्याचा आत्महत्या करून प्रवास संपवला. त्यावेळी लोकमान्य प्रवासात होते. ही बातमी कळल्यावर रात्रभर ते अखंड तळमळत होते. ही बातमी वाचल्यावर लोकमान्यांचे डोळे लाल झाले आणि त्वेषाने ते उसळले आणि मग अत्यंत खेदाने म्हणाले, " ज्या देशातला पुरुष आपल्या पत्नीवर झालेल्या अत्याचारावर खवळून न उठता, खटला भरतो, त्याअर्थी स्वराज्य मिळणं अजून खूप दूर आहे." पुरुषांनी रडणं त्यांना खपतच नसे.आपण मनाने खूप कठोर आहोत याची त्यांना पूर्ण जाणीव होती. म्हणूनच तरुण मुलगा विश्वनाथ प्लेगमध्ये गेला तेव्हा ते उद्गारले, गावात होली पेटलीच आहे. घराघरातून गोवऱ्या जात आहेत. आमच्याही घरातील गोवऱ्या गेल्या.

१८९६ साली पुण्यात प्लेगने कहर केला होता. लोकमान्यांच्या प्रयत्नाने एक हॉस्पिटल सुरू झालं. एक विधवा बाई त्या हॉस्पीटलमधे प्लेगवर उपचार घेऊन बऱ्या झाल्या. त्यांना घरी सोडतांना त्यांच्याकडे बिलाची रक्कम चालकांनी मागितली. बाईंना कुणीही नात्याचं नव्हतं आणि ३० रुपये बिल भरण्याइतके पैसेही नव्हते. त्यामुळे चालकही त्यांना सोडेनात. तेवढ्यात रोज सकाळी फेरी मारणारे लोकमान्य आणि बाळाजीपंत नातू तिथे आले. त्यांना बाईंची हकीकत कळली. लगेच लोकमान्यांनी

आपल्या खात्यावर त्या बाईंचं बिल घालायला सांगून मग, त्या अशक्त झाल्या आहेत.. त्यांना गाडी करून घरी पोचवा असं सांगितलं. माझ्यासारख्या द्रौपदीची सुटका करणारा एकच कृष्ण. तो म्हणजे लोकमान्य असं त्या बाई नंतर चालकांना म्हणाल्या.

न्यू इंग्लीश स्कूल स्थापनेच्या वेळचे त्याचे सहकारी माधवराव नामजोशी, शेवटच्च्या घटका मोजत असतांनाची गोष्ट ! त्यांचा प्राण जाईना. लोकमान्य आणि त्यांचे इतर सहकारी जवळच बसले होते. पण कशात जीव अडकला आहे हे कुणालाच कळेना. माधवरावांना बोलताही येत नव्हतं इतकी शेवटची घटिका होती. पण डोळ्यांमधून पाणी वाहात होतं. शेवटी लोकमान्यांनीच त्यांना असं का होतंय असं विचारलं तर माधवरावांनी खुणेनेच माझ्या कुटुंबाची काळजी लागली आहे असं सांगितलं. तेव्हा लोकमान्यांनी लगेच, तुमच्या कुटुंबाची काळजी मी घेतो, असा शब्द त्यांना दिला आणि लगेच माधवरावांचे प्राण पंचत्त्वात विलीन झाले. त्यानंतर दिला शब्द लोकमान्यांनी खरा करून दाखवला. माधवरावांच्या मुलाची मुंज, मुलींची लग्न सर्व त्यांनी केलं. इतकंच काय की मंडालेला जातांना, तुमच्या दृष्टीने मी लांब जातोय पण नामजोशींच्या घरातल्यांना मी वाड्यातच आहे असं वाटलं पाहिजे इतकी त्यांची काळजी घ्या अशा सूचना दिल्या.

लोकमान्य त्यांच्याच व्यापात इतके अडकलेले असतांनाही कृष्णाजी बल्लाळ देवल त्यांच्याकडे समस्या घेऊन गेले. ती अशी की गायनशास्त्राचे आद्याचार्य भरतमुनींचा काल त्यांना निश्चितपणे कळत नव्हता. देवलांनी आचार्य आणि त्यांचे शिष्य यांच्यातली ऋक प्रतिशाखेची संवादात्मक भाष्ये लोकमान्यांना दाखवली आणि त्यावरून लोकमान्यांनी भरतमुनींचा काळ ख्रिस्तपूर्व १५०० वर्षे पूर्वीचा असला पाहिजे असे सप्रमाण निश्चित केले. या त्यांच्या निर्णयामुळे प्राचीन संगीतकलेचा अभ्यास करणे सोपं झालं.

लोकमान्यांना कोणत्याही विषयाची माहिती नव्हती असं नव्हतं. रेल्वेत नोकरी करणारे एक जोशी नावाचे गृहस्थ त्यांच्याकडे गेले. त्यांना आपली नोकरी सोडायची होती, आणि रेल्वेच्या तक्रारी लोकांसमोर येण्यासाठी वर्तमानपत्र काढायची इच्छा होती. लोकमान्यांनी जोशांना थॉमस-कुक कंपनीची माहिती दिली आणि अशी कंपनी रेल्वेसाठी काढायचा सल्ला दिला. एवढं करून ते थांबले नाहीत. त्यासाठी लागेल ते भांडवल त्यांना द्यायची तयारीही दाखवली.

लोकमान्यांकडे कुणीही कोणत्याही बाबतीत सल्ला मागायला जायचं आणि समाधानाने परतायचं. मग ते पंचांगकर्ते

असोत, नाहीतर देवल सर्कसवाले. सर्कशीतले सल्लेही लोकमान्य त्यांना देत. त्या काळात, शक्तीचे अचाट प्रयोग करणारे प्रो. राममूर्ती नावाचे गृहस्थ पुण्यात आले. त्यांची आर्थिक स्थिती मात्र अत्यंत दयनीय होती. त्यांच्याजवळ कुणी चांगला मॅनेजरही नव्हता. लोकमान्यांनी देवलांच्या मॅनेजरना पटवर्धनांना बोलावलं. राममूर्तींना सबंध महाराष्ट्रभर फिरवून सर्व विद्यार्थ्यांसमोर त्यांचे प्रयोग करायचा सल्ला दिला आणि जागोजाग तालीमखाने उभे करायचा उद्योग करायला  सांगितलं.

शिवाजी फंडाचे, सार्वजनिक सभेचे, खजिनदार सरदार बाळासाहेब नातू मुंबईत अत्यंत आजारी पडले. ते त्या दुखण्यातून उठणार नाहीत हे लक्षात आल्याबरोबर लोकमान्य पुण्याहून तातडीने नातूंना बघायला आले. तोपर्यंत नातूंची शुध्द गेली होती. डॉ. शिखरे यांनी, आता उद्या सकाळी ते शुध्दीवर आल्यावर पाहू असं सांगितलं आणि ते निघून गेले. हिशेबांच्या कागदांवर सह्या करण्याइतपत चांगल्या अवस्थेत राहण्यासाठी लोकमान्यांनी लगेच केसरीचे उपसंपादक लिमये यांना सकाळी शिखरे येण्यापूर्वीच नातूंना हेमगर्भाची आणि सूतशेखराची मात्रा देऊन ठेवण्याचं बजावलं. दुसरे दिवशी सकाळी वेदशास्त्र संपन्न काशीनाथशास्त्री यांनी मात्रा उगाळून घातल्या. लोकमान्य आले, डॉ. शिखरेही आले. बाळासाहेब सह्या करण्याइतके पूर्ण शुध्दीवर आहेत असं

डॉ. शिखरेंनी सांगितलं. आणि नातूंनी सह्या केल्या. हेमगर्भ मात्रेचा उपयोग किती उत्तम होतो हे लोकमान्यांनी सर्वांना शिकवलं. लहानपणी त्या काळातले प्रथितयश वैद्य बापूसाहेब मेहेंदळ्याकडे जायचे तेव्हा त्यांच्या कानावर हे पडलं  होतं.

मंडालेहून आल्यावर प्रकृती सुधारण्यासाठी त्यांनी स्वत:च च्यवनप्राश घेण्याचं ठरवलं. ती कामगिरी वैद्य कृष्णशास्त्री कवड्यांवर सोपवली तरी स्वत: लक्ष घातलंच. च्यवनप्राश तयार होईपर्यंत त्यावर बारीक लक्ष ठेवलं. औषधंही स्वत: आपल्या डोळ्याखालून घालून निवडली. परत त्या वैद्यांना जीवक नावाच्या वैद्याची कथा सांगितली. तो जीवक, तक्षशिला नगरीत गुरूगृही राहून वैद्यकशास्त्र शिकत होता, त्याचं अध्ययन पूर्ण झाल्यावर त्याची परीक्षा घेण्यासाठी गुरुजींनी गावाबाहेर हिंडून माहीत नसलेली वनस्पती त्याला आणायला सांगितली. जीवक पाच कोसाच्या आत हिंडला आणि अशी वनस्पती सापडली नाही म्हणाला. तेव्हा त्याचं शिक्षण पूर्ण झालंय असा गुरूंनी त्याला सल्ला देऊन घरी जायची परवानगी दिली.

रॅन्ड खुनातला एक आरोपी बाळकृष्ण चाफेकर हा फरार होऊन मोगलाईतल्या एका अरण्यात लपून बसला होता. बरेच दिवस त्याने तिथे अज्ञातवासात काढले पण औषधं आणि अन्न-पाण्यावाचून

त्याची जगण्याची आशा मावळायला लागली. हे लोकमान्यांच्या कानावर आलं. त्यांनी हैदराबादचे दिवाण केशवराव यांना एक गुप्त चिठी पाठवली आणि त्यात बाळकृष्ण चाफेकरची काळजी घ्यायला सांगितलं. केशवरावांनीही धाडसाने लोकमान्यांची इच्छा म्हणून त्यांनी अन्नपाणी पुरवण्याचं काम बिनबोभाट केलं.

लोकमान्यांच्या लोकप्रियतेच्या आणि लोकसेवेच्या कितीतरी कहाण्या शिल्लक आहेत. सांगायच्या तरी किती !

## **गणपती उत्सव**.

लोकसंघटनेचं कसब त्यांच्यात विलक्षण होतं. प्रत्येक घटनेकडे राष्ट्रासाठी त्याचा कसा उपयोग करून घेता येईल यावरच त्यांचा विचार चालत असे. पुण्यात सुरू झालेला गणपती उत्सव आणि शिवाजी उत्सव हे त्याचंच प्रमाण आहे. मुंबई-पुण्यात हिंदू मुसलमानांचा दंगा झाला त्यानंतर लगेच सहा आठवड्यात गणपती उत्सवाची सुरुवात झाली. कारण या दंग्यामुळे समुदाय संघटनेची विलक्षण गरज आहे हे त्यांना प्रकर्षाने जाणवलं. गणपती उत्सव हा त्या आधीही पुण्यात साजरा होतच असे. पण लोकमान्यांची चतुराई ही की त्यांनी या सणाचा सामुदायिक रीतीने लोकांना एकत्र आणण्यासाठी केला. त्यातून मेळे, गाणी, समाज प्रबोधन यासाठी उघडपणे उपयोग केला. समाजाला नवीन वळण देण्याच्या या उत्सवाची बैठक बाबामहाराजांच्या वाड्यात प्रथम झाली त्यात दगडूशेठ हलवाई, तरवडे वकील, भाऊसाहेब रंगारी, गावडे पाटील हेही होते. मोठ्या धमाक्याने हा सण साजरा होऊ लागला. विसर्जनही मोठ्या रंगतदार पद्धतीने मिरवणूकीने होऊ लागलं.

साल १८९४ च्या या पहिल्या वहिल्या सार्वजनिक गणपति उत्सवात प्रत्येक आळीमध्ये गणपति बसवण्यात आला.

त्याची सजावट, थाटामाटाने झाली. '' सुवर्णाक्षराने नोंदण्यासारखे उत्सवाचे दिवस झाले '' असं केसरीमध्ये वर्णन छापून आलं. विसर्जनाच्या दिवशी दुपारी २ वाजल्यापासून एकेक गणपति ठरलेल्या ठिकाणी म्हणजे रे मार्केट ( आताची मंडई ) जवळ गोळा होऊ लागले. आसपासच्या खेड्यातील गणपतीही गोळा झाले. जिथे नजर टाकावी तिथे गणपतीच गणपती. गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या असा ध्वनि कर्ण पटलावर आदळून गगन मंडल भेदून जात आहे. लेजिम, टिपऱ्या, घुंगुर, सनया, चौघडे यांचे मिश्र आवाज, रे मार्केटपासून अप्पा बळवंत गेटापर्यंतची लोकांची गर्दी, रस्त्यावरील घरांच्या गच्चीतून दिसणारी गर्दी यामुळे वातावरण चैतन्यमय होऊन गेलं होतं. मिरवणुकीला सुरुवात झाली, तेव्हा कसबा गणपती अग्रभागी आणि बाबामहाराजांचा गणपती शेवटी अशी मिरवणूक संध्याकाळी ६ वाजता लकडी पुलावर पोचली. मग नदीच्या वळवंटात कीर्तन आणि आरती होऊन लोक घरी परतले..'' केसरीमध्ये आलेलं हे त्या पहिल्या गणपती मिरवणुकीचा वर्णन आजही तसंच चालू आहे. फक्त फरक आहे तो गर्दीचा, संख्येचा आणि वेळेचा. या सार्वजनिक गणपती उत्सवामुळे जनतेचं राष्ट्रीय प्रबोधन, वीरश्रीची भाषणं, पोवाडे गाऊन लोकांच्यात चैतन्य आणायचं मोठं काम नेत्यांना आणि विचारवंतांना करता आलं. पण सरकारला यात हात लावायला

संधी मिळाली नाही..या उत्सवानंतर मुसलमानांच्या हातून हिंदू मार खाणार नाहीत हा संदेशही पोचवता आला. गणपती उत्सवाचा प्रसार लगेच धुळे-नाशिक-नगर-कोल्हापूर-मुंबई पर्यन्त पसरला.

# शिवाजी उत्सव.

या उत्सवाला कारण अगदी बारीक पण विलक्षण प्रकारे झालं. १८८५ साली महाराष्ट्रातील सर्व किल्ले, डोंगर सरकारच्या अखत्यारीत येत असत. त्यामुळे रायगड आणि त्यावरची महाराजांची समाधीही मुंबई सरकारच्याच ताब्यात होती. तेव्हाचे मुंबईचे गव्हर्नर सर टेंपल हे एकदा रायगडावर गेले, तिथे त्यांनी महाराजांची भग्नावस्थेतली समाधी, इतर सुंदर वास्तू पाहिल्या आणि त्यांची पेन्सिलने चित्रं काढून घेतली. नंतर क्रॉफर्ड यांना समाधीची डागडुजी करायला सांगितली. पण त्यानंतर ७/८ वर्षे काहीही सरकारने केलं नाही. पुढे १० वर्षांनी १८९४ सालच्या २० एप्रिलला ककेरिया नावाच्या एका पारश्याने प्रतापगड या नावाचा एक निबंध रॉयल एशियाटिक सोसायटीत वाचला. त्यानंतर लगेच सर्व गड - किल्ले, आणि रायगड समाधी यावर केसरीतून लेखमाला येऊ लागली. रायगड लोकांच्या मनामनात रुजला. त्यातच शिवरायांच्या समाधीच्या डागडुजीसाठी फंड गोळा करण्याचं आवाहन केसरीतून करण्यात आलं. हिराबागेत लगेच ३० एप्रिलला मोठी टोलेजंग सभा झाली. फंड गोळा होऊ लागला. उत्सव साजरा करण्यासाठी सरकारची परवानगी घेण्यात आली.

१५ एप्रिल १८९६ हा रायगडाच्या उत्सवाचा दिवस निश्चित झाला. मोठ्या उत्साहाने लोकांच्या झुंडी रायगडावर येऊ लागल्या. पण लोकमान्यांसारख्या धडाडीच्या नेत्याला हे मुळीच पसंत पडलं नाही. थोडी विश्रांती घेऊन रात्रीच गडावर जायचं आणि तिथे झोपायचं असं लोकमान्यांनी ठरवलं. झालं. रात्रीच्या अंधारात रायगड चढून जाण्याचं धाडस करायला शेकडो लोक लोकमान्यांच्यामुळे तयार झाले. मजूरांनी लगेच चूडी पेटवल्या. चारपाच लोकांमागे एक चूडवाला अशी योजना झाली. चारपाचशे लोक एकेका मशालवाल्याबरोबर गड चढायला लागले ती एकेरी रांग आणि मशालीचा उजेड यांचं मनोहर दृष्य तळावरचे लोक पाहात बसले. शिवाजीमहाराजकी जय टिळकमहाराजकी जय या घोषणांनी आसमंत भारून गेला. स्वराज्याच्या या मावळयांनी आपल्या नेत्यासह केलेल्या रणगर्जनांनी रायगड परत एकदा महाराजांच्या काळातल्या मोहिमांसारखा उजळून गेला. ३०० वर्षांनंतर केरसुणीने गड झाडला जाऊ लागला. डबकी स्वच्छ झाली. वास्तू स्वच्छ झाल्या.

त्या दिवशीचा कार्यक्रमही ठरला. शिवरायांच्या स्मृतीचे कथा कीर्तन, पोवाडे, रंगणार होते. सर्वांचा नारळ देऊन सन्मान व्हायचा होता. सगळं ठरलं पण अडचणी आणायला सरकार दबा धरून बसलेलं होतं कारण ही लोकांची एकजूट सरकारला सहन न

होण्यासारखी होती. म्हणून सरकारने विघ्नं आणायला सुरुवात केली. पहिली चाल केली ती म्हणजे परवानगीच नाकारली. कलेक्टर साहेबांनी कारण काय दिलं तर उत्सव म्हणजे जत्रा आणि रायगड येतो तो जंगल हद्दीत.. तिथे जत्रा भरणार नाही. मग त्यावर मार्ग काढायला लोकमान्य पुढे सरसावले. त्यांनी कायदे कौन्सिलकडे रीतसर परवानगी मागितली. तीही मिळाली नाही तेव्हा लोकमान्य सरळ गव्हर्नर सॅंडहर्स्ट यांना भेटायला कलेक्टर लॅम्ब यांना डावलून गेले. गव्हर्नरसाहेबांना शिवाजीमहाराजांची माहिती सांगितली. त्यांनाही नकार देता येईना. शेवटी परवानगी मिळाली. केसरीमधून सर्वांना सावधपणे भाषण करण्याची सूचना करण्यात आली. स्त्रियांची गैरसोय होईल म्हणून त्यांना परवानगी नव्हती. लोकांच्या राहण्यासाठी तट्टांची घरं बांधण्यात आली. गंगासागर तलावाच्या काठावर स्वयंपाकाची सोय करण्यात आली. एकाने तिथे आपली खानावळही चालू केली आणि लोकांनी भेटही दिली. सकाळी विनायक शास्त्री यांच्या कीर्तनाने सुरुवात झाली. शिवरामपंत परांजपे आणि दापोलीचे गोगटे यांनी शिवरायांच्या ऐतिहासिक आठवणी जागवल्या. मग सर्वांनी किल्ला पहिला. सर्वांचे सन्मान झाले. तानाजी मालुसरे, येसाजी कंक यांचे वंशज आले होते. त्यांचेही सन्मान झाले. लोकमान्यांनी समारोपाचं भाषण केलं आणि कार्यक्रमाची सांगता झाली. पहिला शिवाजी उत्सव

असा उत्साहात पार पडला. पण महाड आणि बिरवाडीचे लोक त्यांच्या दर्शनाची वॅट पाहत होते. त्यांच्या अति लोभापाई लोकमान्यांनी बिरवाडीला जाणं मान्य केलं. बिरवाडीच्या लोकांना उत्साहाचं उधाण आलं. लगेच पंचवीस एक गाड्या बिरवाडीकडे सुटल्या. दीडदोन वाजता हाटे गावात पोचल्या. फटाके, सुरनळ्यांनी जंगी स्वागत झालं. रांगोळ्या-पाट-पक्वानांनी पंक्ती झाल्या आणि उजाडतांना परत आले.

अम्बाल्याहून आलेल्या एका वकिलाने लोकमान्यांच्या कार्यकर्त्याला एक प्रश्न विचारला होता. त्याने विचारलं.. फिरोजशहा मेहता, नामदार गोखले यांच्यापेक्षा टिळक एवढे लोकप्रिय का? तर तो म्हणाला, ...मेहता आणि गोखले बंगल्यांवर राहतात, गाद्यांवर झोपतात. आणि त्यांचे कार्यकर्ते तंबूत राहतात. पण हा एवढा मोठा माणूस आमच्याबरोबर राहतो आणि चटईवर आमच्याबरोबर झोपतो. हे त्यांच्या लोकप्रियतेचं आणि लोकसंघटनेचं रहस्य होतं.

चळवळ याचा खरा अर्थ त्यांच्या मते असा होता की लोकजागृती करणे, मृतवत झालेल्या देशात संजीवनी घालणे. हजारो लोक भाषणाला येतात, टाळ्या वाजवतात, म्हणून राष्ट्राच्या पुढच्या कठीण मार्गास तयार झाले असं नव्हे. लोकांची तयारी

मोजण्याचं माप गर्दी आणि कडकडाट नव्हे. ज्यादिवशी स्वराज्य मिळवल्याशिवाय तरणोपाय नाही असं प्रत्येकाच्या मनात शिरेल आणि कृतीत उतरेल तो दिवस महत्वाचा. सर्व लोक बेकीने बिघडलेले, बेशिस्तीने बेभान झालेले, आणि नि:शस्त्र केले गेलेले असतांना, हे दोष घालवणं आधी जरूरीचं आणि मग पूर्ण स्वातंत्र्याचा झगडा असं त्यांचं मत होतं.म्हणूनच त्यांच्या भाषणांना प्रचंड हजारोंनी लोक जमायचे त्याने ते कधी फसले नाहीत.

रॅन्ड खुनातला एक आरोपी बाळकृष्ण चाफेकर हा फरार होऊन मोगलाईतल्या एका अरण्यात लपून बसला होता. बरेच दिवस त्याने तिथे काढले पण औषधं आणि अन्न-पाण्यावाचून त्याची जगण्याची आशा मावळायला लागली. हे लोकमान्यांच्या कानावर आलं. त्यांनी हैदराबादचे दिवाण केशवराव यांना एक गुप्त चिठी पाठवली आणि त्यात बाळकृष्ण चाफेकरची काळजी घ्यायला सांगितलं. केशवरावांनीही धाडसाने लोकमान्यांची इच्छा म्हणून त्यांनी अन्नपाणी पुरवण्याचं काम बिनबोभाट केलं.

## राजकारण.

## मामलेदार खटला –

लोकमान्य राजकरणात खेचले गेले. त्यातच गुंतले. सरकारविरुद्ध लोकांच्या वतीने लढले. न्यू इंग्लिश स्कूल आणि फर्ग्युसन कॉलेजचे धागे तुटत चाललेले असतांनाच आयुष्याच्या नवीन वळणाची दिशा समोर आली. त्या घटनेमुळे लोकमान्य इंग्रजांच्या सार्वजनिक अन्याय्य निर्णयाच्या विरुद्ध आवाज उठवून जनतेच्या हितरक्षणासाठी लढणारे झुंजार नेते या नवीन प्रतिमेत लोकांसमोर आले. ती घटना साल १८८९ मधली. मुंबईचे रेव्हेन्यू कमिशनर क्रॉफर्ड यांचे मामलेदारांच्या बरोबर केलेले भ्रष्टाचाराचे प्रयोग आणि सरकारने या मंत्र्यांना अडकवण्यासाठी मामलेदारांना आपल्या बाजूला वळवून मग दूर लुटण्याचा केलेला अन्याय. हे क्रॉफर्ड महाशय अत्यंत भ्रष्ट बुद्धीचे. हात लावतील तिथे पैसा काढतील. त्यातून त्यांना मिळालं रेव्हेन्यू खातं. मग काय.

मामलेदारांना हाताशी धरून त्यांची आणि आपली चांदी करण्यात महाशय रंगून गेले. आपला माणूस म्हणून सरकारनेही त्यांना पाठीशी घातलं. या महाशयांच्या प्रतापांनी आधीच्या पिढीतील अनेकांचे हात पोळलेले होते. क्रॉफर्ड यांना कोकण

अतिशय प्रिय. रत्नागिरीला असतांना त्यांची अनेकांशी मैत्री होती. ते अस्खलित ब्राह्मणी मराठी बोलत. यांनी लोकांच्या भांडवलावर एक सॉ मिल काढली आणि मग ती बुडाली. यात अनेकांचे पैसे बुडले होते. गंगाधरपंत टिळकांचेही १००० रुपये बुडाले होते. पण लॉर्ड रे हे गव्हर्नर बनून आले आणि त्यांनी गुप्तपणे भ्रष्टाचार प्रकरणाची माहिती गोळा करायला सुरुवात केली. क्रॉफर्ड यांचाही पापाचा घडा भरत आलाच होता. त्यांची शेवटची काडी ठरली ती जेव्हा खानदेशातील भडगाव येथील सरकारी जमिनीची कल्याणच्या खेमजी जैवा नावच्या माणसाला स्वस्त किंमतीत विकण्यासाठी भरपूर लाच खाल्ली तेव्हा.

या रेव्हेन्यू मंत्र्यांना अटक करण्यासाठी लॉर्ड रे यांनी जाळं घातलं ते मामलेदारांचं.. जे मामलेदार निर्भयपणे पुढे येऊन सरकारला मंत्र्यांच्या भ्रष्टाचाराचे पुरावे देतील, त्यांना अभय मिळेल अशी ग्वाही सरकारकडून देण्यात आली. त्यानंतर अनेक मामलेदारांनी साक्षी दिल्या आणि क्रॉफर्ड यांच्याविरुद्ध भक्कम पुरावा गोळा झाला.त्या आधारे त्यांना सस्पेंड करण्यात आलं. पोलिस कमिशनर ओम्नी या प्रकरणाचा तपास करत होते.

तेवढ्यात या गृहस्थाने एक जबरदस्त नाटक केलं. सस्पेण्ड झाल्यावर त्यांनी पुण्याला मुक्काम हॉटेलमध्ये हलवला

आणि एक दिवस चिठ्ठी लिहिली की मी मुळा नदीत आत्महत्या करत आहे, होळकर पुलापाशी माझ्या शवाचा शोध घ्यावा. त्यामुळे एकाच खळबळ उडाली. सगळी नदी खळबळवून झाली पण त्यांचं प्रेत कुठेही सापडलं नाही. मग पोलिसांनी सावध होऊन बारीक लक्ष ठेवलं. तेव्हा पुण्याच्या स्टेशनवरच्या पोलिसाला एक अंगभर मळके कपडे घातलेला, डोक्याला रुमाल बांधलेला इसम पहाटे मुंबईकडे जाणाऱ्या गाडीत चढलेला दिसला. त्यांने मुंबईला हे कळवल्याबरोबर लगेच यंत्रणा पाळतीवर राहिली आणि भायखळा स्टेशनाच्या बाहेरच्या हॉटेलमध्ये ते सापडले. तिथे त्यांना अटक करण्यात आली. यात क्रॉफर्ड तर दोषी ठरलेच पण ज्या मामलेदारांनी सरकारच्या अभय वाचनांवर विश्वास ठेवून साक्षी दिल्या होत्या, त्यांनाही सरकारने शिक्षा सुनावल्या.

सरकारच्या या फसवणुकीने मामलेदार खवळले, तसंच जनमतही खवळलं. यात सारे वकील, व्यापारी, प्रतिष्ठित उतरले. पण या मामलेदारांची बाजू घेऊन लढणार तरी कोणता वकील? ती जबाबदारी लोकमान्यांनी स्वीकारली. या विषयाला वाचा फोडण्यासाठी लोकमान्यांची जाहीर सभा १ सप्टेंबर १८८९ या दिवशी पुण्यात कबुतरखान्याच्या मैदानावर भरली. सरकारच्या अन्याय्य वर्तनाचा निषेध त्यांनी जाहीरपणे या सभेत केला. अभयवचन न पाळणे हा सरकारचा विश्वासघात आहे याचा जाहीर

उच्चार या सभेत त्यांनी केला. या सभेला अनेक मोठे वकील, बॅरिस्टर गाडगीळ, नुलकर, न्या. रानडे, गोपाल कृष्ण गोखले, बाबामहाराज, अनेक पारसी हजर होते.

या जाहीर सभेनंतर ही चळवळ महाराष्ट्रपुरती राहिली नाही. लोकमान्यांनी सरळ लंडनला विलियम डिग्बी यांच्याशी पत्रव्यवहार करून त्यांच्या पार्लमेंटमध्ये बिल आणावं अशी मागणी केली. हा तर अति धाडसीपणा मुंबई सरकारसाठी होता. या चळवळीला पुढे न्यायची कोणतीही कसर त्यांनी सोडली नाही. पण सरकारही मागे हटलं नाही. दोषी मामलेदारांना शिक्षा झाल्याच, पण या चळवळीमुळे लोकमान्य लोकनायक या जाहीर रूपात भारतीयांच्या समोर आले आणि इंग्रजांच्या नजरेतून एक विरोधक म्हणून सलायला लागले. लोकन्यायासाठी केलेलं ते त्यांचं पहिलं भाषण, पहिला लढा आणि पहिली चळवळ ठरली. या दृष्टीने मामलेदार चळवळ महत्वाची होती.

## पंडिता रमाबाई –

पंडिता रमाबाई यांचं नाव कुणाला माहीत नाही असा मराठी माणूस नाही. अत्यंत विद्वान, संस्कृतवर प्रचंड हुकमत अशा या बाई १८८२ मध्ये पुण्यात आल्या. आपल्या विद्वत्तापूर्ण भाषणांनी विचारवंतांना आणि सुधारकांना दिपवून टाकू लागल्या. त्यांच्या या सर्व करिष्म्याकडे लोकमान्य सावध नजरेने लक्ष ठेवून होते. त्यांची संस्कृत भाषेतील विद्वत्ता खूप असली तरी खोल नाही हे चाणाक्ष नजरेने लोकमान्यांना कळून चुकलं होतं. यांच्याबद्दल भ्रमनिरास होण्याचा योग लवकरच अनेकांना आला. पुण्याहून त्या इंग्लंडला गेल्या आणि तिथे त्यांनी आपल्या मुलीसह – मनोरमासह ख्रिश्चन धर्म स्वीकारला. १८८९ साली त्या परत मुंबईत आल्या आणि त्यांनी मुंबईत अनाथ महिलांसाठी शारदाश्रम नावाची संस्था काढली. त्यानंतर मात्र त्या संस्थेतील मुलींना ख्रिश्चन धर्माबद्दल प्रेम वाटतं अशी बातमी इंग्रजी मासिक विकली मध्ये आली आणि मग लोकमान्यांनी केसरीतून त्याचा चांगलाच परामर्श घेतला. रमाबाईनी नंतर १०/१२ मुलींना बाटवल्यावर सुधारक मंडळींचं त्यांच्यावरील प्रेम आटलं. त्याचा खूप गवगवा झाल्यावर बाई केडगावाला गेल्या आणि मुक्तीसदन नावाची संस्था त्यांनी तिथे

सुरू केली. म्हणजे ख्रिस्तोदयाची मुक्ती. लोकमान्यांचं त्याकाळातील रमाबाई संदर्भातील धोरण बरोबर ठरलं. सुधारकांनाही आपला दृष्टीकोन बदलावा लागला.

## साल १८९० ते १९०० राजकारण –

लोकमान्यांचं १९९० सालानंतरचं सर्व आयुष्य राजकारणाच्या वादळी ढगांनी वेढून गेलं होतं. ते अगदी आयुष्याच्या अखेरपर्यंत. राजद्रोहाचा खटला, प्लेग, शिवाजी गणपति उत्सव, रँड यांचा खून, लखनौ कॉंग्रेस, सिलोन, ब्रह्मदेशाची सफर, आणि बाबामहाराज वारस प्रकरण यात हे शतकाचं शेवटचं दशक कापरासारखं लोकमान्यांची बोटं जाळत संपलं. नंतरची २० वर्षे, कलकत्ता-सुरत कॉंग्रेस सभा, स्वराज्याची घोषणा, राजद्रोहाचे २ खटले, मंडाले शिक्षा, लखनौ कॉंग्रेस, आणि बाबामहाराजांच्या वारसाचं अखेरच्या क्षणापर्यंत चाललेलं खटला प्रकरण, चिरोल केस, इंग्लंडचा त्यासाठी केलेला प्रवास, अशा अनेक महत्त्वाच्या, वादळी, घटनांनी त्यांची सत्त्व परिक्षाच घेणारी ठरली. त्यात भर पडली ती बेझंट बाईंबरोबर सुरू केलेल्या होमरुल – स्वराज्य संस्थेच्या मागणीची. आणि दुसरीकडे गीतारहस्य, आर्यांचे मूल वसतिस्थान अशा जागतिक साहित्यात भर घालणाऱ्या भारतीयांची शान उंचावणाऱ्या ग्रंथांची भर ही अमर कीर्ती देणारी ठरली. केसरीतून अग्रलेख लिहिणं चालूच होतं.

## पुण्यातील सार्वजनिक सभा –

पुण्यातील सार्वजनिक सभेची फूट आणि गोखल्यांनी आणि रानड्यांनी काढलेली दुसरी डेक्कन सभा, हा पुण्यातील सनातनी वि. सुधारक यांच्यातील चढाओढीचाच परिपाक होता. या सार्वजनिक सभेच्या लढतीत रानडे आणि लोकमान्य यात प्रत्यक्ष मात्र नव्हते.

१८५३ सालात दादाभाई नवरोजी यांनी मुंबईत लोक आणि सरकार यांच्यातील महत्त्वाचा धागा बनावं या विचाराने मुंबई असोसिएशन नावाची संस्था सुरू केली. तीच कल्पना न्या. रानडे यांनी सार्वजनिक सभा या नावाने पुण्यात २ एप्रिल १८७० सालात अंमलात आणली. सदाशिव पेठेतील औंधकर सरदारांच्या वाड्यात पर्वती संस्थानाने काही सुधारणा व्हाव्यात या विचाराने ही सभा सुरू केली. त्यामागे मुख्य होते ते गणेश वासुदेव जोशी म्हणजेच सार्वजनिक काका. तेव्हा यात बरेचसे संस्थानिकच होते आणि काही पुण्यातील प्रतिष्ठित लोकही होते. न्या. रानडे यांची वरचेवर बदली होत असे पण त्यांचं लक्ष या कामात सतत असे. या संस्थानिकांबरोबरच आणखीही काही मंडळी होती, ती म्हणजे महादेव कुंटे, कृष्णशास्त्री चिपळूणकर, वगैरे. सभेचा व्याप वाढत

गेला आणि लोकमान्यांच्या गटाचा त्यात प्रवेश झाला. ही सार्वजनिक सभा दाणेआळीतील जोशी हॉलमध्ये भरत असे. निवडणुकीने याचं कार्यकारी मंडळ तयार होत असे. न्या. रानडे यांनी तरुण गोपाळ कृष्ण गोखले यांच्यातील राजकीय आणि विद्वत्तेचे गुण हेरून आपल्या वर्तुळात सामावून घेतलं होतं. तेही या संस्थेत रानड्यांच्या सुधारक पक्षातर्फे चिटणीस म्हणून होतेच.. सन १८९१ पासून गोखले सार्वजनिक सभेचं काम पहायला लागले.

१८९५ सालच्या निवडणुकीत रानडे पक्षाच्या हातून सूत्रे जाऊन लोकमान्यांच्या पक्षातील गटाकडे सभेचं कामकाज आलं तेव्हा गोखल्यांना सार्वजनिक सभेत राहण्याची इच्छा उरली नाही कारण त्यांना हात न लावता आजूबाजूचे सगळे लोक लोकमान्यांच्या पक्षातले झाले होते. या वर्षीच्या १४ जुलैच्या वार्षिक सभेत तुंबळ वादावादी झाली आणि मुंबईच्या पत्रातून पोलिसांना बोलवावं लागलं अशी खोटीच बातमी आली. यात लोकमान्यांना **forward** आणि गोखल्यांना **moderate** अशी विशेषणं लावली गेली. न्यायमूर्ती पदामुळे रानडे सतत बदलीच्या ठिकाणी असत. वक्तृत्त्वोत्तेजक सभेसारख्या अनेक संस्था त्यांच्यामुळे सुरू झाल्या असल्या तरी त्यांच्या सरकारी नोकरीमुळे ते पडद्यामागून सूत्रे हलवत असत.

शेवटी रानडे जेव्हा परत पुण्यात आले तेव्हा कीर्तने यांच्या मुंढव्याच्या घरी सुधारकांची विशेष सभा भरली आणि नवीन पिढी आणि जुने वकील-पेन्शनर ( **यांच्याकडे पैसा होता** ) यांनी रानडे यांना नवीन सभा स्थापन करण्याची गळ घातली.. न्यायमूर्तींच्या मनात नसतांनाही त्यांना होकार द्यावा लागल्यामुळे सुधारकांची डेक्कन सभा नावाची नवीन सभा स्थापन झाली. ही बातमी जाहीर झाल्याबरोबर केसरीमधून लोकमान्यांनी चवताळून अत्यंत कडक भाषेत अग्रलेख लिहिला,

‘ हा म्हातारचळ की पोरखेळ .’ नेमस्तांतर्फे जे पत्रक काढलं गेलं त्यात **moderate** आणि **liberal** हे दोन शब्द वापरले गेले जे भारतीय राजकारणात कायम झाले. लोकमान्य चवताळले कारण त्यांनी स्वत: जेव्हा डेक्कन एज्युकेशन सोसायटी सोडली तेव्हा नवीन आपली दुसरी संस्था काढली नव्हती. आज एक तर उद्या दुसरा पक्ष हे होणारच हे मत त्यांचं होतं. म्हणून दुसरीच संस्था काढणं त्यांच्या तत्त्वात बसलं नाही.

राष्ट्रीय सभेच्या परिषदा दरवर्षी भरू लागल्या आणि पुण्याच्या सामाजिक जीवनाच्या वर्तुळातून बाहेर पडून लोकमान्य भारतीय लोकमान्य भारतीय राजकारणाच्या क्षितिजावर चमकू लागले होते. मुंबई – महाराष्ट्र - पुण्याच्या आपल्या प्रतिमेतून बाहेर

पडून ते आपल्या राष्ट्रीय प्रतिमेच्या परिघात शिरले. देशभरच्या चळवळींचे, निर्णयांचे प्रमुख व्हायला लागले.

१८८० ते १८९० सालापर्यंत न्यू इंग्लीश स्कूल, फर्ग्युसन कॉलेज, डेक्कन एज्युकेशन सोसायटीची स्थापना, केसरी-मराठा वर्तमान पत्रे चालवणे, सार्वजनिक सभेचं काम, डे. ए. सोसायटीतून मुक्तता, चरितार्थासाठी लॉ क्लासेस, यात त्यांची दहा वर्षे गेली. पण १८९१ सालामधे केसरी मराठाची पूर्ण मालकी त्यांच्याकडे आल्यावर मात्र त्यात उमटणाऱ्या त्यांच्या मतांमुळे ते सरकारच्या नजरेत सलू लागले. १८९२ साली अस्तित्वात आलेल्या कायद्याने सहा जिल्ह्यात निवडणुक होऊन कायदेमंडळ अस्तित्वात आलं. लोकमान्य त्यात निवडून आले.

## हिंदू मुसलमान दंगा –

१८९० पासून सुरू झालेलं शतकाचं अखेरचं दशक लोकमान्यांसाठी अत्यंत वादळी, महत्वाच्या घटनांनी वेढलेलं ठरलं. या दशकाची सुरुवातच झाली ती सन १९०१ सालच्या हिंदू मुसलमान दंग्यांनी. पुण्यातील हिंदू-मुसलमान दंगे हे भारतीयांना नवीन होते. तोपर्यंत पुण्यातील हिंदू-मुसलमान एकत्र सण साजरे करत असत. मुसलमानांच्या ताबुतात हिंदू लोक भाग घेत आणि हिंदूंच्या गणपतीत मुसलमानांचा सहभाग असे. हिंदू मल्ल मुसलमान मुलांना कुस्ती शिकवत असत आणि मुसलमान गायक हिंदू मुलांना संगीताचे गंडा बंधन करून धडे देत असत.

या हिंदू मुसलमान दंग्यांची सुरुवात मुंबईमध्ये सन १८५० साली झाली. मुंबईमध्ये बैरामजी गांधी नावाच्या एका पारशाने पैगंबराचं काल्पनिक चित्र काढलं आणि वर्तमानपत्रात छापलं. त्यावरून मुंबईतले मुसलमान खवळले.. त्यांनी पारशांना चोपून मार दिला. परत एका रुस्तुमजी जालभाई नावच्या पारशानेच १८७४ सालामध्ये आयर्व्हिंग नावाच्या लेखकाच्या ग्रंथातील मुसलमानांच्याबद्दलचा मजकूर भाषांतरित केला तो मुसलमानांना अपमानास्पद वाटला. त्यावरून परत दंगल माजली. पण यावेळी इंग्रजांची मुसलमानांना फूस देण्याची कुटिल नीती लोकांच्या

लक्षात आली. ही फूट पाडणं धोक्याचं होतं. हे लोण पुण्यात शिरलं ते १८९३ मध्ये. त्याला कारण पुण्यातील घटना नव्हतीच.. गुजरातमधील जुनागढ राज्यातील प्रभासपट्टणात ताबूतावरून दंगा सुरू झाला. जुनागड संस्थानचा राजा मुसलमान होता. मग दंग्यात होतात त्या सर्व गोष्टी जाळपोळ, दगड फेक, मंदिरे फोडणे सगळं घडलं. मग धरपकड झाली. जुनागढचा राजा नाममात्र होता. कारभार सगळा इंग्रजांच्या हातात होता. मग आरोपी पकडले गेले, गुन्हे दाखल झाले, त्यांच्या सुटकेसाठी चांगला बॅरिस्टर नेमण्याची गरज निर्माण झाली, तर त्यासाठी मोठा पैसा लागणार होता. त्यासाठी गुजराती हिंदूंची मोठी जाहीर सभा लक्ष्मीदास खिमजी यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईत भरली. लगेच जुनागडच्या मुसलमानांसाठीची सभा तय्यबजींच्या हाताखाली मुसलमानांची सभा भरली आणि परत मोठा दंगा उसळला. यावेळी मोठी जीवित हानी झाली, गोळीबार झाला. यावेळी इंग्रजांची दोन धर्मात दुफळी मजवण्याची नीती उघड झाली. या दंगलखोरांवर कडाडून टीका करण्याचं कुणीतरी करायला हवं होतं, ते केसरीने केलं.

त्यासालच्या १५ ऑगस्टच्या केसरीमध्ये लोकमान्यांनी सरकारवर सरळ आरोप केला की, हे मुंबईतले मुसलमान शेफारले आहेत कारण त्यांना सरकारची फूस आहे. आमच्यामुळे तुमचं संरक्षण होतं हे वाक्यच मुसलमानांना उत्तेजन देतं. लोकांना दाबात

ठेवायचं असेल तर एकाला जवळ आणि दुसऱ्याला दूर करून चालणार नाही. त्यानंतर महिनभरांनी मुंबई शांत झाली, पण पुण्यात तिला निमित्त मिळालं ते नागपंचमीच्या सणाला. या दिवशी वाजत गाजत नागोबाची मिरवणूक काढायची ही आजवरची प्रथा. पण यावेळी मोठा फौज फाटा तयार ठेवला गेला आणि उगीचच तणाव निर्माण झाला. शेवटचा प्रसंग घडला तो येवल्यात. येवल्यात नागपुरी कोष्टयांच्या मारुतीच्या देवळातील मारुती कुणीतरी फोडला आणि देवळासमोरील पालं जाळली. शिवाय मशिदीत डुक्कर मारून पडल्याही अफवा उठली..त्यामुळे दंगा सुरू झाला. दोन्हीकडची मंदिरं फुटली. मोठी धरपकड झाली, त्यात हिंदूच जास्त होते. दंगल खूपच मोठी घडली. मशिदीवरून जाताना वाद्ये वाजवणे म्हणजे हिंदूंचा एक मोठा अपराधच ठरू लागला. यावेळी तर सरकारचा पक्षपातीपणा सपशेल उघड झाला. लोकमान्य स्वत: येवल्याला जाऊन दंगलीची पाहणी करून आले.

पाठोपाठ आला पुण्यातील गणपति उत्सव. पण यावेळी प्रत्येकाच्या मनात तणाव होता. गणेश चतुर्थी ते त्रयोदशीपर्यंत गावातील वातावरण आनंदाचं होतं, पण अचानक मुसलमानांच्या गोटात हालचाली दिसायला लागल्या. तो बुधवार असूनही कुराण वाचण्यासाठी मशिदी उघड्या ठेवण्यात आल्या.. यातील एक मशीद दारूवाला पुलाजवळ होती. तिथून काही मेळेवाले रात्री १०

वाजता वाद्ये वाजवत गेले. पण त्यानंतर सरदार बाळासाहेब नातू यांचा मेळा मशिदीवरून जात होता तेव्हा त्यांच्यावर अचानक तुफानी हल्ला झाला. काठ्या घेतलेले मुसलमान अचानक मशिदीतून बाहेर पडले. हा मेळा तर वाद्यही वाजवत नव्हता. तबला बंदच होता. फक्त बाजा वाजत होता. पण हल्लेखोरांनी बाजाही फोडला. स्वत: सरदार बाळासाहेब नातू गंभीरपणे जखमी झाले. त्यांना उचलून गुजराती देवळात नेण्यात आलं. ही बातमी वणव्यासारखी गावात पसरली. मग मशिदीवर हल्ला झाला, हंड्या फुटल्या, मुसलमानांना चोप दिला गेला. त्याबरोबर पोलिस कमिशनर मॅकफर्सन आले, त्यांनाही दंगलखोरांनी सोडलं नाही.

या दंग्यात इंग्रज सरकारला लोकमान्यांना अडकवता आलं नाही कारण माधवराव नामजोशींनी आपल्या गिरणीत लोकमान्यांना बंद करून ठेवलं होतं, त्यामुळे सकाळपर्यंत ते कुणाला सापडलेच नाहीत. नातू यांच्या मिरवणुकीच्या आधीच काही वेळ लोकमान्य, बाबामहाराज आणि नामजोशी एकत्र एका गाडीतून तिथून गेले होते, त्यावेळी टिळक महाराजकी जय अशा घोषणाही झाल्या होत्या. दुसरे दिवशी आणखीन कहर झाला तो म्हणजे गणपती मिरवणुकीतील गणपतीच कुणीतरी फोडला. त्यावेळी जखमी सरदार नातू यांना अटक झाली आणि एकही मुसलमान पकडला गेला नाही. पण जेकब न्यायमूर्तींनी त्या

पकडल्या गेलेल्या सर्व आरोपींना सोडून दिलं. न्या. जेकब यांच्या या न्याय्य वागण्याची परतफेड पुणेकरांनी लगेच केली. पुणे म्युनिसिपलिटिकडून त्यांना बक्षिस समारंभाचे अध्यक्ष म्हणून बोलावून यांच्यावर पुष्पवृष्टी करण्यात आली.

सदासावधान लोकमान्यांनी या काळात त्यांना आलेलं एकही पत्र फोडलं नाही आणि एकाचीही भेट घेतली नाही.

एकदा एक विषय हाती घेतला की त्यात ते स्वत:ल तनमनाने झोकून देत. १९०५ सालानंतर, पुण्याच्या म्युनिसिपालिटीची निवडणूक राष्ट्रीय पक्षाने लढण्याचं ठरवल्याबरोबर लोकमान्य त्याच्या मागे लागले. सार्वजनिक सभेच्या जोशी हॉल मध्ये अनेक लोक संध्याकाळी रिकाम्या गप्पा मारत बसत.. लोकमान्य तिथे संध्याकाळी यायला लागले आणि कुटाळक्या करणाऱ्यांचं बौद्धिक घ्यायला लागले. निवडणुकीत जास्तीत जास्त मते मिळवण्याचा त्यांचा उद्योग सुरू झाला. त्यांनी म्युनिसिपलिटीच्या कामाची आणि ते व्यवस्थिपणे कसं करावं याची माहिती त्यांना द्यायला सुरुवात केली. ते सांगत की शहराचा नकाशा तयार करावा. दरवर्षी दुरुस्त करण्याचे रस्ते लाल रंगाच्या शाईने, एक वर्षाआड दुरुस्त करण्याचे पिवळया शाईने, नवीन रस्ते आणखीन एका रंगाने आखावेत.. ५० ग्रंथ वाचल्यावरही मिळणार नाही इतकी माहिती लोकांना मिळाली.

## राष्ट्रीय मंडपाचा वाद.

इ. स. १८९५ सालची कॉँग्रेसची राष्ट्रीय सभा पुण्यात घ्यायची असं ठरलं. यावेळी घडलेला, राष्ट्रीय सभेच्या मंडपात सामाजिक परिषद घ्यायची की नाही हा पुण्याच्या सभामंडपाचा वाद प्रचंड गाजला. नेमस्तांची आणि जहालांची या निमित्ताने झालेली कुरघोडीची रस्सीखेच, लोकमान्यांच्या राजकीय खेळीचा आणि कल्पकतेचा वरचढ ठरण्यातला उत्कृष्ट नमुना होता. आजवर भारतभर झालेल्या, मद्रास-मुंबईच्या सर्व परिषदांमध्ये सामाजिक परिषद भरतच असे. आधी राष्ट्रीय परिषद आणि मग तिथेच सामाजिक परिषद हाही नित्यक्रमच होता. पुण्याच्या सभेत मात्र नवीनच वाद निघाला. एकतर राष्ट्रीय पातळीवरचे सुधारक विचारांचे न्या. महादेव गोविंद रानडे, गोपाळ कृष्ण आगरकर, परंपरा प्रेमी, पुराणमतवादी सरदार बाळासाहेब नातू, आणि जुनं-नवं या दोन्ही पक्षांचा तोल, प्रसंग आणि काळवेळ पाहून सांभाळणारे लोकमान्य अशा राष्ट्रीय पातळीवरील सर्व विचारांच्या बुद्धिमान आणि तिखट विचारवंतांची पुण्यात भरपूर गर्दी होती. सगळे हट्टी, आक्रमक, आणि वाद घालणारे. त्यामुळे सुधारक गट आणि नातूंचा पुराणमतवादी गट यात परिषदेवर हुकमत ठेवण्याची एक

सुप्त स्पर्धा होती. राष्ट्रीय परिषदेवर सुधारक गोपाळ कृष्ण गोखले, न्यायमूर्ति रानडे आणि पुण्यातील त्याकाळचे मोठे वकील, पेन्शनर, यांचाही मोठा दबाव होता.

इ. स. १८९५ सालापर्यंत लोकमान्य राष्ट्रीय क्षितिजावर झळकू लागले होते. त्यांचा इतर प्रांतातील राजकारण्यांशी, ओरायनमुळे विद्वानांशी, देशभरच्या गणितज्ञांशी परिचय झाला होता. केसरी, मराठा पत्रांमुळे आणि त्यांच्या सडेतोड, निर्भय लेखणीमुळे त्यांचं नाव सर्वतोमुखी झालं होतं. शिवाय मुंबईच्या कायदे कौन्सिलातील त्यांचा सहभाग, कोल्हापुर प्रकरणाने त्यांची १०१ दिवसांची कैद, गणपति उत्सव, शिवाजी उत्सव या चेतनामय नवीन उपक्रमांमुळे जंनसामान्यांमध्येही ते लोकप्रिय होऊ लागले होते. या दोन उत्सवांमुळे महाराष्ट्रातील राजे, राजवाडे, संस्थानिकांशी त्यांचा घनिष्ठ संबंध येऊ लागला होता. हा त्यांच्या कारकीर्दीचा उंचवणारा आलेख सुधारक पक्षाला जड जाणारा होता. ज्या सरदार विंचुरकर वाड्यात १८९९ सालापर्यंत लोकमान्यांचं वास्तव्य होतं तो वाडाही या प्रतिष्ठित लोकांनी गजबजायला लागला होता. त्यामुळे लोकमान्य हे आता पुण्यापुरते नेते राहिलेले नव्हते.

राष्ट्रीय परिषद पुण्यात होणार हे निश्चित झाल्यावर ती उत्तम आणि यशस्वीपणे संपन्न व्हावी यासाठी सगळेच उत्साही एकत्र आले. आणि त्यात कारण नसताना एक वादाचा किडा शिरला. याच मंडपात सामाजिक परिषद असूच नये, ती बाहेरच व्हावी, किंवा ती राष्ट्रीय सभा झाल्यावर व्हावी या वादाने मूळ धरलं आणि बघता बघता पराचा कावळा झालाच. त्यातून वाद टोकाला पोचले. मग मुंबईची कमिटी वाद मिटवण्यासाठी त्यात शिरली आणि लोकमान्यांना सेक्रेटरी पदाचा राजीनामाही द्यावा लागला, इतक्या थराला तो वाद जाऊन पोचला. लोकमान्यांनी वाद मिटवण्यासाठी आणि सभा सुखरूपपणे पार पडावी म्हणून आपल्या सेक्रेटरी पदाचा राजीनामा देऊन सर्व अधिकार आणि खजिनाही समितीकडे देऊन टाकला.

आता लोकमान्यांचा गट मागे पडून सुधारक आणि रानडे यांचा पक्ष समर्थ झाला. स्वागत कमिटी त्यांच्याचकडे राहिली, आणि त्यात लोकमान्य चिटणीस म्हणून राहिले. या दोन्ही टोकांच्या पक्षांना आवरण्याचे मध्यस्थांचे काम केसरीमधून लोकमान्य करतच होते. पण सेक्रेटरी पदाचा राजीनामा दिल्यावर त्यांनी सरळ सुधारणावाद्यांना न मिळता परंपरावाद्यांचा पक्ष घेतला. आता सुधारकांना भीती होती ती, लोकमान्यांच्या मागे उभा

असलेला व्यापारी, तेली तांबोळी वगैरे सामाजिक परिषदेला विरोध करणारांचा पाठिंबा मिळाला की बहुमत आपल्या हातून जाईल याची. शेवटी मुंबईहून दिनशा वाच्छा, दाजी खरे, आणि सेटलवाड आले आणि त्यांनी दोन्ही पक्षांना जोडणारा एक मार्ग काढला. दोन्ही पक्षांचे दोन दोन उमेदवार समितीत घेतले. पण लोकमान्य बाहेर पडल्यामुळे सभा यशस्वी करण्यापेक्षा गावातले विरोधक कसे आवरायचे हा मोठी अवघड जबाबदारी सुधारकांवर येऊन पडली. त्यातच दोन्ही गटांवर आणखी एक आव्हान आलं ते हे की राष्ट्रीय परिषद पार पाडण्यासाठी ज्यांना व्यवस्था आपल्या हाती घ्यायची असेल, त्यांनी जामीनकीबद्दल कमीत कमी १०,००० रुपये भरणे आवश्यक होतं. आणि तोच कळीचा मुद्दा ठरला. पुण्यात वकील श्रीमंत पेन्शनर सुधारकांच्या बाजूने असल्यामुळे त्यांना ही भली मोठी दहा हजार रुपये रक्कम भरणं सहज शक्य होतं तर लोकमान्यांचा पक्ष त्याबाबतीत कच्चा होता. सरदार नातूंकडे पैसा खूप होता पण ते त्यासाठी तारण मागू लागले. बाकी कुणाकडेच नव्हता. हे पैसे उभे न राहिले तर गोखले वगैरेंचा सुधारक पक्ष वरचढ ठरणार होता.

या सामन्यातील जीत लोकमान्यांच्या कल्पकतेमुळे आणि चतुराईमुळे त्यांच्या पक्षाकडे त्यांनीच खेचून आणली आणि सामाजिक परिषद त्याच मंडपात न होता फर्ग्युसन कॉलेजच्या

खेळाच्या मैदानावर परिषद संपल्यावर पार पडली. शत्रूची शस्त्रे पाहून आपली शस्त्रे बदलावीत हा लोकमान्यांचा सर्वांना जाहीर सल्ला होता.. तेच धोरण त्यांनी या रस्सीखेच खेळातही वापरलं. आपल्या गटाकडे पैसा नाही ही आपली लंगडी बाजू त्यांनी एका भरभक्कम व्यक्तीला पकडून भरून काढली.

त्या व्यक्तीचं नाव होतं श्रीधर विठ्ठल दाते. हे दाते अंगापेराने मजबूत आणि त्यांची तिजोरीही मजबूत होती. सहा फुटापेक्षा जास्त उंची, त्यावर मोठं पागोटं, खांद्यांची रुंदीही तेवढीच, हसणं गडगडाटी, तोंडाचा अखंड पट्टा चालू, मग त्यात ज्याला आडवा घ्यायचा असेल त्याच्यावर शिव्यांची माळ फुटायची. यांची इंग्रजी भाषेवर प्रचंड हुकमत. मराठी भाषाही लेचीपेची नव्हती. लोकमान्य त्यावेळी विंचूरकर वाड्यात राहत असत. या श्रीधर दात्यांनी वाड्याबाहेर उभे राहून टिळक अशी हाक मारली की वाडाही गदागदा हलत असे. यांना सर्व लोक वकील दाते म्हणत. कारण तरुणपणाचा काळ यांनी सरकारी नोकरीत मामलेदार म्हणून घालवला आणि निवृत्तीनंतर मग सरकारी अर्ज लिहून देण्याचं काम सुरू केलं. त्यात त्यांचा जहागीरदार, वतनदार, संस्थानिक यांच्याशी वरचेवर संबंध यायला लागला कारण या सर्वांच्या जप्त झालेल्या जमिनी सोडवायची कामं हे करायला लागले आणि बक्कळ पैका कमवायला लागले. सरकारी

कचेरीतील काम कोणत्या आणि कशा किल्लीने उघडतात हे त्यांना पक्कं माहीत होतं. आपलं काम फत्ते होण्यासाठी वाट्टेल त्या थराला जाण्याची त्यांची तयारी असे, त्यामुळे लोकही त्यांना वचकून असत. वकिलीतून मिळालेल्या पैशाने त्यांच्या तळघराची कपाटं सोन्याच्या दागिन्यांनी, मोत्यांच्या सरांनी खच्चून भरली होती, आणि लोकमान्यांना एकदा आपल्या तळघरात नेऊन तो सारा खजिना त्यांनी दाखवलाही होता.

लोकमान्यांनी आता या दात्यांचा उपयोग हुकूमी अस्त्र म्हणून करायचं ठरवलं. श्रीधर दात्यांचीही परीक्षा होणार होती. एका रात्री अवेळी ते आपले मित्र वासुदेवराव केळकर यांना घेऊन या श्रीधर विठ्ठल दात्यांकडे गेले. लोकमान्यांच्या अशावेळी येण्याने दात्यांना खूप आश्चर्य वाटलं. त्यांनी कारण विचारल्यावर राष्ट्रीय पक्षाच्या जामीनकीसाठी १०००० रुपये ठेवावे लागणार असल्याची अडचण सांगितली. त्यावर सरदार नातू पैसे का देत नाहीत असं त्यांनी विचारल्यावर, ते काहीतरी तारण मागतात असं लोकमान्यांनी त्यांना सांगितलं. त्याबरोबर दाते उठले, तळघरात गेले आणि त्यांनी गच्च भरलेला दागिन्यांचा डबा लोकमान्यांकडून एक चिठोराही लेखी न मागता त्यांना दिला. तो डबा उपरण्याखाली ठेवून तिथून परस्पर लोकमान्य सरदार नातूंकडे गेले आणि तारण म्हणून दागिने मिळाल्यावर १०,००० रुपये उभे राहिले. सुधारकांना

दाते यांच्याविरुद्ध जाण्याची हिंमतच नव्हती. दाते स्वत: परंपरावादी नातू पक्षाचे असल्यामुळे सामाजिक परिषद अजिबात होऊ नये याच ठाम विचारांचे होते. त्यातही कमाल म्हणजे रे मार्केटच्या ( आताची फुले मंडई ) पटांगणावर जाहीर सभेत बोलतांना त्यांनी सुधारक पक्षाला आपल्या एका वाक्याने घाबरवून सोडलं होतं. ते म्हणाले, मी आणि टिळकही सुधारकच आहोत. पण राष्ट्रीय परिषदेत सामाजिक सुधारणांचं कामचं काय? सामाजिक परिषद हट्टाने सुधारकांनी भरवली आणि विरोधकांनी हल्ला करून जाळपोळ केली तर त्याला जबाबदार कोण? या सुप्त घोषित धमकीनंतर मग हजारो लोकांच्या उपस्थितीत दोन ठराव मंजूर झाले. त्यात मंडपात सामाजिक परिषद न होण्याचा ठराव होता. लगेच दाते यांनी आपल्याबरोबर कर्णे आणि शिंगे वाजवणारे आणले होते, त्यांना वाजवा रे असा हुकूम दिला. एवढंच करून ते थांबले नाहीत तर परिषदेसाठी मंडपाचं बांधकाम चालू असताना ते आपल्या गाडीतून जात आणि मंडपाजवळ उभे राहून त्या बाजूने आग लागली की कशी दिसेल असं जोरजोरात विचारत..अशा रीतीने लोकमान्यांनी परिषदेच्या व्यवस्थेचं काम आपल्या लोकांकडे खेचून आणलं.

आता दुसरी कुरघोडी करायची होती ती गोखले यांच्या स्वागत समितीने आपल्याच लोकांचा भरणा करून टिळक पक्षाला

डावललं होतं, त्याचा वचपा काढायचा होता. राष्ट्रीय परिषदेला अध्यक्ष म्हणून कलकत्त्याहून सुरेन्द्रनाथ बॅनर्जी येणार होते. लोकमान्यांनी त्यांना आधीच वाहवत जाणाऱ्या सामाजिक परिषद आणि मंडपवादाबद्दल सूचित करून ठेवलं होतं. सुरेन्द्रनाथ बॅनर्जी हे मनमाडपर्यंत येऊन तिथून दौंड मार्गाने पुण्यात यायचे होते. पुणे स्टेशनवर त्यांचा भव्य स्वागत समारंभ गोखले करणार होते. सुरेन्द्रनाथ बॅनर्जी मनमाडला पोचले तेव्हा गोपाळ कृष्ण गोखले तिथे त्यांच्या स्वागताला गेले त्यावेळी सुरेन्द्रनाथ झोपले होते म्हणून ते स्टेशनवर जाऊन बसले. त्याचवेळी लोकमान्यांचे भाचे धोंडोपंत विद्वांस हेही लोकमान्यांचे पत्र घेऊन मनमाडला पोचले आणि डब्याजवळच थांबले. सुरेन्द्रनाथ जागे झाल्याबरोबर त्यांनी लोकमान्यांचं पत्र बॅनर्जींना दिलं आणि ते पुण्याला परतले. बॅनर्जी यांची गाडी हडपसरला पोचली तेव्हा बाबा महाराज, वगैरे नातू पक्षाचे सर्व लोक बॅनर्जी यांच्या स्वागतासाठी स्टेशनवर आलेले होते. तिथेच बॅनर्जी यांना हार तुरे, पान सुपारी असं भव्य स्वागत झालं. स्वागत समारंभाचे चिटणीस म्हणून लोकमान्यांनी धोंडोपंतांनी दिलेल्या पत्रातून मनमाडलाच बॅनर्जी यांना कळवलं होतं. एकूण गोखले पक्षाच्या आधीच स्वागत करण्याचं श्रेय लोकमान्यांमुळे सरदार नातू पक्षाला मिळालं. राष्ट्रीय परिषद यशस्वीपणे पार पडली. दुसरे दिवशीही लोकमान्यांनी एक मोठी

जाहीर सभा भरवून सुरेन्द्रनाथ, मदन मोहन मालविय यांची भाषणे घडवून आणली आणि भाषणे संपल्यावर बाबा महाराजांच्या ईगल नेस्ट बंगल्यावर कॉंग्रेसच्या मोठ्या लोकांना गार्डन पार्टीचा खाना ठेवला. मिळून नंतरही लोकमान्यांचा पक्ष वरचढ ठरला.

फर्ग्युसन मैदानावर नंतर सामाजिक परिषद झाली तेव्हा त्या सभेत अध्यक्ष म्हणून बोलतांना न्या. रानडे यांनी घडलेल्या वादावर मार्मिक विश्लेषण केलं. ते म्हणाले, ‘‘ प्रत्येक राष्ट्रीय परिषदेत सामाजिक परिषद भरत आली आहे. मग पुण्यातच एवढा का वाद झाला? पुण्यातले लोक वेडे म्हणून की काय? तर त्यामागचं मुख्य कारण म्हणजे बंगालमधील सुधारकांनी ब्राहमो समाज हा वेगळाच पंथ काढला, पंजाबात सुधारकांचा आर्य समाज निघाला. पण महाराष्ट्रात मात्र सुधारक आणि परंपरावादी एकत्र राहूनच कार्य करतात.. त्यांनी वेगळे पंथ काढले नाहीत.. तीच आमची बळकटी आहे. एकाच छावणीत राहून आम्ही कार्य करतो. वाद घालतो पण एक राहून..‘’

एवढं सगळं महाकाव्य घडलं तरी कवित्व शिल्लकच होतं आणि ते एक नाटकच घडलं. त्याचा शेवटचा अंक हा उत्कंठावर्धक रहस्यमय नाटकासारखा झाला. परिषद पार पडली, पाहुणे निघून गेले. तरी आता पुण्याचा प्रतिनिधी निवडण्याचं

महत्वाचं काम शिल्लक राहिलं होतं. त्यात गोखले गटाचा की टिळक गटाचा यात अंतिम शेवट रंगायचा होता. दोन्ही पक्ष आपआपल्या चाली ठरवून दबा धरून बसले होते. लोकमान्यांकडे गुप्त हेरांची फौज होती. त्यांच्या विरुद्ध सरकारी काहीही गुप्त आदेश निघाला, धाड पडणार असेल, की त्यांच्याकडे लगेच वर्दी पोचत असे. मग या स्पर्धेत तर दोन्ही पक्ष गुप्त कारवाया करणारच आणि तसंच झालं. सुधारकांनी 20 डिसेंबरला सकाळी अचानक घोषित केलं की प्रतिनिधी निवडणूक त्याच दिवशी संध्याकाळी रविवारातील फडके वाड्यात संध्याकाळी ६ वाजता होईल.. तो वाडा लहान होता आणि सर्व सभासदांना बसण्याची क्षमता त्या वाड्याची नव्हतीच. सुधारकांची ही चलाखी टिळक पक्षाला लगेच कळली. आता हाताशी काही करण्यासाठी अवघे काही तासच शिल्लक होते. मग लोकमान्यांची सगळी बुद्धी गनिमी काव्याची धार परजून तयार झाली. सभेच्या वेळेच्या एक तास आधीच लोकमान्यांनी आपले लॉ क्लासचे विद्यार्थी फडके वाड्यात बाकं पकडून बसायला पाठवून दिले. सभेच्या वेळेत सुधारकांचे गोखले-नगरकर वगैरे लोक आले तर त्यांनाच बसायला जागा शोधावी लागली. ते बसायला जागा शोधत असतांनाच, सभेची बरोब्बर वेळ झाली म्हणून आधीच ठरल्याप्रमाणे लोकमान्य पक्षाचे वासुदेवराव जोशी उठले आणि त्यांनी श्रीमंत जोगांचं नाव अध्यक्ष

म्हणून घोषित करून टाकलं. लगेच जोग उठले आणि त्यांनी अनुमोदनाची वाट न पाहता अध्यक्ष पद स्वीकारल्याचं जाहीर करून टाकलं. आणि अध्यक्ष झाल्याबरोबर आजची सभा विसर्जित झाल्याचीही घोषणा त्यांनी करून टाकली. गोखले पक्ष अजून जागा शोधून सावरतच असेपर्यंत सभा त्यांच्या हातची गेलीसुद्धा. एकदा दाते, एकदा विद्यार्थी आणून लोकमान्यांनी गनिमी काव्याने आपल्याच पक्षाच्या हाती सूत्रं ठेवली आणि साऱ्या भारतीयांचं लक्ष लागलेल्या या परिषदेच्या निमित्ताने आपली राजकारणाची कुवत दाखवून दिली.. राष्ट्रीय परिषद ही अशी चित्त थरारक बनली.

गोखले वि. टिळक, दोघांचं आयुष्यभर कधीही जमलंचं नाही. तसंच र. पु. परांजपे यांच्याशीही कधी पटलं नाही. य दोघांना ते कोमल मनाचे आहेत असं उल्लेखायचे.

त्यानंतर १८९५- ९६ चा दुष्काळ, प्लेगचं संकट, त्यातून झालेला रॅन्डचा खून, बाबा महाराज वारस प्रकरण, त्यांनी लिहिलेले ' सरकारचे डोके ठिकाणावर आहे का ' अशा जहाल शब्दांच्या मथळ्यांचे अग्रलेख, त्यांनी काढलेले दौरे, त्यातून केलेली जनजागृती, यामुळे ते आपोआप राजकारणात खोल खेचले गेले. त्यांना मिळणाऱ्या लोकप्रियतेमुळे, लोकमान्यांचा आवाज

बंद करणं हा इंग्रजांचा मुख्य चिंतेचा विषय होऊन बसला. चापेकर बंधूंनी केलेला खून, आणि त्यातून घडलं राजद्रोहाच्या पहिल्या शिक्षेचं १८९७ सालचं संकट.. त्यात झालेली अडीच वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा, येरवड्याचा तुरुंगवास, यात शतकाची शेवटची दहा वर्षे कापरासारखी उडाली आणि त्याच्या चटके देणाऱ्या ज्वाळेसारखी ठरली.

# साल १९०१ ते १९१० दशकातील राजकारण.

लोकमान्यांचं भारतीय राजकारणात जेवढं लक्ष होतं, तेवढंच जगाच्याही राजकारणात होतं. जपान आणि चीन या देशांच्या प्रगतीकडे त्यांचं लक्ष होतं म्हणून त्यांनी लिहिलं, " आपण तिघे एकाच पंख्याचे अवयव आहोत. हिंदुस्थान हा या पंख्याच्या कड्या, तर त्यावरून पसरलेला कागद म्हणजे चीन, आणि जपान हा पंख्याच्या काड्या सांभाळणारा खिळा आहे. २०-७-१९०५ ला कर्झनने बंगालची फाळणी करून हिंदुस्थानात संतापाचा, उद्रेकाचा वणवा पेटवला. चीनने बहिष्कार करून अमेरिकेला जसे वठणीवर आणले त्याचा लोकमान्यांनी केसरीतून पुरस्कार केला. आणि स्वदेशीचा संकल्प सोडला. त्यातूनच राष्ट्रीय शिक्षणाची कल्पना मूळ धरू लागली. बहिष्कार आणि स्वदेशी या संबंधाने त्यांचे विचार होते , 'बहिष्कार हे नैमित्यिक कर्म आहे आणि स्वदेशी हे नित्यकर्म आहे. बहिष्काराचं तत्व पाच वर्षे इमाने इतबारे पाळलं तर युरोपात लढाईची परिस्थिती उत्पन्न झाल्याशिवाय राहणार नाही. कारण आजचं सारं राजकारण हे व्यापाराच्या खुंट्याभोवती घुटमळत आहे. जगातील व्यापारपेठ काबीज करायला युरोपातील प्रत्येक बलाढ्य देश रात्रंदिवस

धडपडत आहे. हिंदुस्थानची व्यापारपेठ इंग्रजांनी व्यापून टाकल्यामुळे युरोपातल्या प्रत्येक राष्ट्राला ती शल्यासारखी बोचते आहे. आपल्याला इंग्रजांशी लढायचं सामर्थ्य नाही. म्हणून इंग्रजांशी लढण्यासाठी जे समर्थ आहेत, त्यांना आपण चिथवूया. बाजारपेठ इंग्रजांच्या हातून काढून ती अमेरिका किंवा जर्मनीच्या हातात काही काळ दिली तर इंग्रज त्यांच्यावर वर्दळीवर आल्याशिवाय राहायचे नाहीत. आणि इंग्रज कुठेतरी भांडणात गुंतल्याशिवाय आपल्याला आपले हातपाय पसरायला अवकाश मिळणार नाही. इंग्रजांना घालवून जर्मनीला आत घेतले तरी बहिष्काराला स्वदेशीची जी जोड दिली आहे ती यासाठीच आहे. तोपर्यंत आपण आपलं घर दुरुस्त करून घेऊया. स्वदेशीच्या सहाय्याने परदेशी व्यापाऱ्यांच्या दाढेतून जेवढा प्रांत सोडवता येईल, तेवढा सोडवून घेऊया. " ( हीच रणनीती माधवराव पेशव्यांनी इंग्रजांना घालवण्यासाठी आखली. फ्रेंचाच्या सहाय्याने इंग्रजांना बाहेर घालवायची त्यांची योजना होती. ती पूर्ण करण्यासाठी माधवराव वासुदेव नावाचे एक गुहस्थ गुप्तपणे फ्रेंचांशी वाटाघाटीही करत होते. पण तेव्हाच्या फ्रेंच राजाने लक्ष न दिल्यामुळे, माधवरावही पेशवे लवकर कालवश झाल्यामुळे यश आलं नाही. मैसूरचा राजा टिपू सुलतान यानेही फ्रेंचांची याच कारणाने मदत घेतली. ) एकीकडे अग्रलेखांच्या आधारे जनजागृती

आणि सरकारला धारेवर धरणे ही दुधारी तलवार चालवत असतांना राष्ट्रीय सभेच्या कामातही ते तेवढेच व्यग्र होते. इंग्रज-नेमस्तांशी वाद चालूच होते. शह-काटशहाचा, कुरघोडींचा खेळ दोन्ही बाजूंनी खेळला जात होता. त्यासाठी सामाजिक, राजकीय, विषयांची लयलूट होती. एकीकडे सुधारकांशी दोन हात, आणि दुसरीकडे नेमस्तांबरोबर वादविवाद अशा कामात व्यग्र होते. कॉंग्रेसच्या प्रांतिक परिषदांना हजेरी लावत होते. ताईमहाराज प्रकरण, राजद्रोहाचा खटला, पंचांग संशोधन, अशा वैयक्तिक व्यापात लोकमान्य अत्यंत गुंतलेले असताना कॉँग्रेसच्या कामकाजातही त्यांचा सहभाग होताच.

## After all I am a compromisewalla.

स्वत:च्या राजकारणी धोरणाबद्दल, लोकमान्यांनी स्वत:च केलेलं स्वत:चं हे वर्णन. सुरतेच्या वादळी कॉँग्रेसमधे फूट पडू नये म्हणून नेमस्तांशी जुळवून घ्यायला दुसरे दिवशी लोकमान्य नेमस्तांच्या छावणीत फिरले, आणि त्यांच्याकडून अपमानास्पद वागणूक मिळाल्यावर आपल्या नाराज कार्यकर्त्यांना त्यांनी हे वाक्य सुनावलं.

सर ह्यूम नावाचे एक सनदी अधिकारी होते. सन १८८५ मधे त्यांच्या प्रेरणेने त्यांनी हिंदुस्थानातल्या सगळ्या राजकीय

कार्यकर्त्यांना एकत्र करून एक संस्था काढावी आणि त्याद्वारे नेटिव्ह सरकारं चालवावी, अशी कल्पना प्रत्यक्षात आणली. त्या पक्षाचं नाव होतं इंडियन नॅशनल काँग्रेस. या राष्ट्रीय पक्षाची स्थापना झाल्यावर पहिल्या तीन वर्षातल्या कॉन्फरन्सना तीन अध्यक्ष जे मिळाले ते पाहून चाणाक्ष सरकार सावध झालं. भारतीयांची ही एकजूट आपल्याला महागात पडणार हे पाहिल्याबरोबर त्यांनी एक खेळी केली. ती म्हणजे, आधी राजकीय सुधारणा की, आधी सामाजिक सुधारणा हा प्रश्न लोकांमधे टाकला आणि त्याप्रमाणे त्यांना अपेक्षेप्रमाणे यशही आलं.

सुरूवातीला सर्वच नेमस्त म्हणून ओळखले जात. पण नंतर त्यात दोन तट पडले. मग नेमस्त आणि जहाल असे दोन पक्ष झाले. नेमस्त म्हणत सरकार जे देईल ते पुरे. जहाल म्हणत जे देतील ते तर हवंच, पण आणखीही हवं. या सगळ्या पायावर हिंदुस्थानातलं राजकारण खेळलं गेलं. त्याला कारण ठरलं ते कर्झन यांनी केलेली बंगालची फाळणी. या फाळणीमुळे बंगालची जनता चवताळली आणि जहाल झाली. नेमस्तांच्या पत्रक काढून निषेध करणे, सभा भरवणे असल्या मुळमुळीत गोष्टी त्यांना असह्य होऊ लागल्या. जहालांचे नेते अर्थातच लोकमान्य, लाला लजपतराय, घोष, बिपिनचंद्र पाल, मोतीलाल घोष, अरविंदबाबू हे सर्व होते.

आणि नेमस्तांमधे फिरोजशहा मेथा, गोपाळ कृष्ण गोखले, अशी नेते मंडळी होती.

१८८५ सालात स्थापन झालेल्या राष्ट्रीय सभेला घटना हवी असं काहींना वाटू लागलं होतं, पण मेहनतीने पक्षासाठी काम करणारे कार्यकर्ते पक्षाकडे नव्हते. वर्षातून एकदा परिषद भरवायची एवढीच प्रगति झाली होती. हे पाहून १९०४ सालामध्ये वेडरबर्न यांनी सरळ परखड उपदेश करत लिहिलं की राष्ट्रीय सभेने कामाची दिशा शोधायला हवी. विलायतेत एक राजकारणी मिशन कायम ठेवलं पाहिजे. तोपर्यंत सगळेच हिंदी नेते नेमस्तच होते. अजून जहाल आणि नेमस्त अशी फूट पडली नव्हती.. सगळ्या गोष्टी सनदशीर मार्गाने म्हणजे परिपत्रक काढणे, परिषदा घेणे त्यात सरकारला सूचना करणे याच मार्गाने कामकाज चालत होतं. त्यावर लोकमान्यांनी ‘’ हीच तर वेळ आहे ‘’ असा अग्रलेख लिहून, त्यात योग्य पुढारी हुडकून त्याला विलायतेत पाठवा, जा, आणि पार्लमेंट मध्ये निवडणूक जिंकून त्या पक्षाबरोबर आपलंही घोडं दामटवा अशा सूचना केल्या.

सन १९०५ च्या काशीच्या राष्ट्रीय परिषदेच्या वेळी एका महत्वाच्या प्रश्नाचा विचार करण्यात आला. तो म्हणजे सबंध देशाला एक भाषा हवी. यावर चर्चा झाली. पण लोकमान्यांनी या

सभेच्या वेळी सूचना केली की देशाची भाषा एक व्हायला कितीही वेळ लागो, पण सर्व भाषांमधील लिखाण देवनागरीत झालं तर ते साहित्य इतर भाषांमध्ये प्रसारित होणं सोपं जाईल. यात सरकारकडून काही होणं अपेक्षित नाही पण प्रत्येक राज्यातील सुशिक्षितांनी यावर एकत्र येऊन विचार करावा लागेल. वेळ मापन आणि वजन मापन जर सबंध भारतात एक आहे तर देवनागरी लिपीही सबंध भारतभर चालेल अशी करावी. हा अत्यंत महत्वाचा विचार आजही लागू करण्यासारखा आहे..

बंगालची फाळणी ही भारतीयांच्या अस्मितेवरची जखम ठरली. त्यातून सुरू झाली ती वंगभंगाची चळवळ. या चळवळीने सारा भारत व्यापला. विद्यार्थ्यापासून महाराजापर्यन्त आणि हिंदुस्थानातील एसआरव्ही प्रांत यात सामील झाले होते. लॉर्ड कर्झन यांनी २० जुलै १९०५ या दिवशी बंगालची फाळणी जाहीर केली. या अचानक निर्णयाने लोक अचंबित झाले. महाराजा ज्योतींद्रमोहन टागोर यांनी लगेच एक सभा घेऊन निषेधाचा खलिता सरकारकडे पाठवला. राज्य कारभारच्या सोयीसाठी ही फाळणी केली असेल तर राज्य कसं करायचं ते आम्हाला विचारा असं लोक म्हणू लागले. आपल्याला दुर्बल करण्याचा डाव आहे असं बंगाली जनतेला वाटू लागलं. या चळवळीनेच स्वदेशी आणि बहिष्कार कल्पनांना जन्म दिला. वंदे मातरम या कवितेला

भारतीयांच्या मनात अमर पद मिळवून दिलं. बंगालची फाळणी झाली आणि कर्झनही राजीनामा देऊन निघून गेले. या काळात लोकमान्यांच्या अग्रलेखांना विलक्षण धार चढली. बहिष्कार टाकायचा तर कपड्यांवर आणि साखरेवर. कारण त्या काळात परदेशी साखरही मिळत असे. लोकमान्यांनी पुण्यातील पुरोहितांना साखरेवर बहिष्कार घालण्यासाठी मार्ग सुचवला. ज्या ज्या घरी धार्मिक कार्याला जातील तिथे स्वदेशी साखरेची मागणी करायला सांगितलं.

**यानंतर झाली आणि गाजली ती १९०७ सालची कलकत्ताची राष्ट्रीय सभा. ह्याच सभेत दादाभाई नवरोजी यांनी स्वराज्य हा शब्द उच्चारला आणि स्वदेशी, स्वराज्य, बहिष्कार आणि राष्ट्रीय शिक्षण ह्या चार सूत्रांचा जन्म झाला.** स्वदेशी आणि बहिष्कार या दोन अडवणुकीच्या शस्त्राला राष्ट्रीय सभेत मान्यता द्यावी की नाही हा प्रश्न येणार होता. टिळक-लाला लजपतराय हे जहाल आणि दुसरे नेमस्त असे जे दोन पक्ष होते, त्यांना टिळक-लजपतराय अध्यक्ष म्हणून नको होते. म्हणून त्यांनी त्यावर मात करण्यासाठी विलायतेतून दादाभाई नवरोजी यांना अध्यक्ष म्हणून येण्याचं आमंत्रण दिलं पण तेच त्यांना भारी पडलं. कारण ही सभा जी गाजली त्यात दादाभाई नवरोजींनी जहालांचाच विचार उचलून धरला. पत्रक-परिसंवाद यांनी सरकारकडून काहीही

मिळणार नाही, हेच त्यांनी सांगितलं. आपण आपले हक्क मागतो आहोत, ही भिक्षा नाही हे सभेत स्पष्टपणे सांगितल्यामुळे स्वदेश-बहिष्कार याला विरोध करणारे नेमस्त पराभूत झाले. ज्यामुळे राष्ट्रीय मनोवृत्ती तयार होईल ते राष्ट्रीय शिक्षण अशी लोकमान्यांनी व्यापक व्याख्या राष्ट्रीय शिक्षणाची केली होती. या सभेमुळे नेमस्त, अंग्लोइंडियन वृत्तपत्रे आणि सरकार नाराज झालं. जहाल पक्ष त्यांचा प्रतिस्पर्धी ठरला.

या पुढचं अस्मानी संकट देशावर आलं. सार्वजनिक शांततेचा भंग या गुन्ह्याखाली लाला लाजपतराय यांना सरकारने सरळ हद्दपार करण्याचा निर्णय जाहीर केला..ही बातमी कळल्याबरोबर सबंध भारतात हाहा:कार माजला. प्रचंड संताप सुरू झाला. सरकारने त्याला कारण दाखवलं की अफगाणिस्तानचे अमीर आले असतांना लालाजींनी राज्यक्रांतीचा कट त्यांच्याशी केला. केसरीने या निर्णयाविरुद्ध आपली लेखणी तिखटपणे परजली. हा आरोप सिद्ध करून दाखवा नाहीतर आरोप मागे घ्या. ‘ हा सूर्य हा जयद्रथ ‘’ करण्यास सरकारने सिद्ध व्हावे. भारतभर शेकडो सभा भरवण्यात आल्या. दुकाने बंद झाली. दंगा उसळेल की काय म्हणून सरकारने गस्त वाढवली. सरकारी दडपशाहीला सुरुवात झाली. याच काळात पुण्यात शिवाजी उत्सव झाला त्यावेळी समारोपाच्या भाषणात लोकमान्य म्हणाले की एक लाला

हद्दपार झाले तर त्या ठिकाणी ५० लाला तयार होतील. नंतरच्या गायकवाड वाड्यातील गणपति उत्सवातही त्यांनी परत हाच विषय मांडला.

सन १९०६ च्या फेब्रुवारीत लंडनमध्ये पार्लमेंटच्या निवडणूका होऊन मोर्ले यांचा लिबरल पक्ष निवडून आला पण मोर्ले यांनी भारतीयांची निराशाच केली. त्यांनी आपल्या भाषणात म्हटलं की भारतातील सुशिक्षित वर्ग हा अधिकारास नालायक असून साम्राज्याचा शत्रू आहे. याकरता भाषण स्वातंत्र्यास आणि सभा भरवण्याच्या हक्कास आळा घालणेच इष्ट आहे. बड्या लोकांचे एक कौन्सिल नेमावे पण त्यातही अधिकाऱ्यांचेच बहुमत ठेवावे. '' त्यांचे हे विचार ऐकल्यावर केसरीतील पुढचा अग्रलेख होता त्यात त्यांनी लिहिलं होतं, भरवशाच्या म्हशीला टोणगा. त्याच्या आचळातून दूध निघणार कसे?

सुरतची ऐतिहासिक कहाणी म्हणजे जहाल आणि नेमस्तांची लढाईच होती. कलकत्ता कॉँग्रेसच्या ठरावातील स्वदेशी-स्वराज्य-बहिष्कार-राष्ट्रीय शिक्षण ह्यांना कडाडून विरोध असणाऱ्या मेथा, गोखले इत्यादि नेमस्तांचा टिळकांना विरोध करण्याचा डाव म्हणजे सुरतची सभा. लोकमान्यांना याचा पूर्ण अंदाज असल्यामुळे त्यांनीही लढण्याची जय्यत तयारी केली.

नेमस्तांच्या या हालचालींवर त्यांचं बारकाईने लक्ष होतं. यावेळी सर्व सूत्रे गोखल्यांच्या हाती होती. त्यांनी सभेचे विषय ठरवतांना त्यात स्वदेश-स्वराज्य या चार ठरावांना वगळून टाकलं. सरकारने हद्दपारीची शिक्षा केलेले लाला लाजपतराय यांना सुरतेच्या सभेचे अध्यक्ष करावं हे साफ नाकारलं गेलं. लोकमान्यांचं काहीही चालणार नाही अशी सुरतची जागा मुद्दाम अधिवेशनासाठी निवडण्यात आली. तो मेथांचा बालेकिल्ला होता. जहाल पक्षाला राहण्याचीही पंचाईत व्हावी अशीही खास '' सोय '' करण्याचा डाव योजला गेला. स्वागत समितीतही नेमस्तांचाच भरणा होता. सभेचे अध्यक्ष म्हणून आपल्या पक्षाचे रासबिहारी घोष यांची निवडणूक करवली. आवेशपूर्ण बोलणारे अंबालाल सकरलाल देसाई आणि अली महंमद खीमजी यांना व्याख्यानासाठी निवडण्यात आलं. अली खीमजी हे सभा गाजवण्यात वाकबगार आणि देसाई हे गुजराथेतील वजनदार प्रस्थ. एवढी सर्व बाजूंनी जहाल पक्षाची कोंडी करण्याची तयारी गोखल्यांनी केली.

आता जहाल पक्षानेही तेवढीच पूर्व तयारी करणं प्राप्तच होतं. त्यात त्यांचा सेनापति लोकमान्यच. त्यांनी दादासाहेब खापर्डे यांची व्याख्यानासाठी निवड केली कारण गुजराती समाजाचं मन आपल्याकडे खेचून घेण्यासाठी, ते उत्तम गुजराती बोलत हा त्यांचा मोठा गुण शिवाय हजरजबाबीपणा, विनोद, रसाळ वक्तृत्व हे

त्यांच्याकडे खीमजी यांच्या पेक्षाही जास्त होतं. ते एक आठवडा आधीच सुरतेस गेले. आणि रोज सभा भरवून त्यातील भाषणांनी गुजराती लोकांचं मन जिंकलं. लोकमान्य २३ तारखेला सुरतेस पोचले तेव्हा त्यांच्या स्वागतासाठी सभेकडून कोणतीही व्यवस्था केलेली नव्हती मात्र एका लहानशा संस्थेने त्यांची सजवलेल्या रस्त्यावरून जंगी मिरवणूक काढली. त्याच दिवशी संध्याकाळच्या प्रचंड मोठ्या जाहीर सभेतील भाषणात लोकमान्यांनी रोखठोकपणे सांगितलं की मला फूट पाडून दुसरी सभा स्थापायची नाही. ही विचारांची फूट सरकरविरुद्ध चालणाऱ्या चळवळीला खंबीरपणा आणण्यासाठी आहे हे त्यांनी स्पष्ट केलं.

आदल्या दिवशी लोकमान्यांच्या विरुद्ध द्वेष निर्माण करायला गुजरातीतून एक निनावी पत्रक रात्रीत वाटलं गेलं. त्यात गुजराती नागरिकांनो उठा, जागे व्हा, आजच्या सभेत तुफान न होईल हे करा. शिवाजी दोनदा सुरत लुटून गेला, आज तो येऊ शकला नाही पण टिळक आले आहेत. ते तुमचं नाक कापायला आले आहेत असा विखारी प्रचार झाला. नेमस्तांनी काही मुसलमान आणि हिंदू गुंड उद्याच्या सभेत नेमले आहेत ही बातमी जहाल पक्षाला मिळाली.

दुसरे दिवशी सभा २.३० वाजता सुरू झाली. व्यासपीठावर लोकमान्यांसाठी खुर्चीही ठेवण्यात आली नव्हती. स्वागत समितीचे अध्यक्ष माळवी मंडपात शिरतांना लोकमान्यांनी त्यांच्या हातात एक चिठ्ठी सरकवली. आपण सभा तहकुबीचा प्रस्ताव मांडणार आहोत असं त्यात लिहिलं होतं. नेमस्तांना नेमकं तेच नको होतं कारण त्यानंतर मतमोजणी करायची वेळ येणार होती. म्हणून माळवी यांनी लोकमान्यांची चिठ्ठी वाचलीच नाही..हा कुटिल डाव हाणून पाडायला सुरेन्द्रनाथांच्या भाषणानंतर उपसूचना सभेपुढे मांडण्यासाठी टिळक व्यासपीठावर चढायला लागले, तेव्हा स्वयंसेवकांनी त्यांना अडवलं. तरीही लोकमान्य वर चढून गेले आणि त्यांनी सभेकडे तोंड करून भाषणाला सुरुवात केली. त्यांना न जुमानता घोष यांनी मी अध्यक्ष आहे असं म्हणून भाषण वाचायला सुरुवात केली तेव्हा तुमची निवड झालेली नाही, मी उपसूचना आणायलाच वर आलो आहे, असं टिळकांनी म्हणताच मंडपात आवाजांचा कल्लोळ झाला. टिळक तुम्ही खाली उतरा अशा घोषणा काहींनी सुरू केल्या. तेव्हा, ‘मी खाली तर उतरणारच नाही, मी या कामी अध्यक्षांचेही ऐकणार नाही, हिंमत असेल तर मला उचलून खाली ठेवा. ’ असा जोरदार प्रतिकार केला. तेव्हा अंबालाल देसाई यांचे चिरंजीव, वैकुंठलाल देसाई, यांनी एक खुर्ची उचलून लोकमान्यांच्या अंगावर फेकली. काही त्यांच्या अंगावर

हात टाकायला निघाले, तेव्हा टिळक पक्षातील काहीजण लोकमान्यांच्या संरक्षणासाठी धावले. एकाने एक जोडा त्यांच्यावर फेकला तो मेथा, सुरेन्द्रनाथ, लोकमान्यांच्या जवळच्या टेबलावर पडला. मग व्यासपीठांच्या पायऱ्यांवर आणि मंडपात मारामारीच सुरू झाली. खुर्च्याही फेकण्यात आल्या. नेमस्त मंडळी मंडपातून निघून गेल्यावर त्यांनी आणवलेले गुंड आणि जहाल पक्षाचे लोक तेवढे उरले. गुंड मग पुढे घुसले तेवढ्यात पोलिस आले. काही धरपकड झाली. लोकमान्यांनाच बाहेर न्यावं लागलं कारण त्यांना दूषणे देणारी भडक पत्रकं वाटली जात होती. नेमस्तांना जहाल मंडळी नकोच होती. या निमित्ताने पक्ष फुटला तर त्यांना आनंदच होता. पण टिळक पक्ष बाहेर पडला तर राष्ट्रीय पक्ष हा शब्द हातचा जाणार होता. दुसरे दिवशी दोन्ही पक्षांच्या सभा भरल्या. नेमस्तांनी त्याला कन्वेंशन नाव दिलं. सुरतेला राष्ट्रीय सभा फुटली याचा सर्वात मोठा आनंद विलायतेत झाला.

Divide and Rule हाच तर त्यांचा पाया होता.

या सर्व हाणामारीत लोकमान्य आपल्या छातीवर हात दुमडून ठामपणे उभे होते..त्यांनी बाहेर जायचं नाकारलं . मी इथून हलणार नाही. कुणाची हिंमत असेल तर मला हलवा असं म्हणून खुर्चीवर बसले आणि सुपारीचं खांड तोंडात टाकलं . अंगावर

एवढ्या खुर्च्या आणि वस्तु येत होत्या पण जराही हलले नाहीत.. त्या क्षणी ते त्यांच्या फौजेचे सेनानी होते, असे तिथे आलेल्या इंग्लिश पत्रकाराने दुसरे दिवशी लिहिलं.

सगळाच विचका झाला. सगळ्यांनाच जे झालं ते योग्य झालं नाही हे जाणवलं, अगदी गोखल्यांनासुद्धा. हे सगळं का घडलं तर बहिष्कार आणि स्वदेशीला नेमस्त द्वेषमूलक समजत होते म्हणून. सरकारला अडचणीत आणणारा हा मार्ग त्यांना पसंत नव्हता. त्यादिवशी रात्री कुणालाच नीट झोप आली नाही. दुसरे दिवशी सकाळी आपल्या पक्षातील तरुण अनुयायी नको नको म्हणत असतांना लोकमान्य विरोधकांच्या छावणीत समेटाची बोलणी करायला गेले. पण कुणीही त्यांना भेटलं नाही. तेव्हा लोकमान्य म्हणाले, मी देशासाठी गाठीभेटी घेतोय, समेट करतोय. माझा वैयक्तिक अपमान मी समजत नाही. **Afterall I am a compromisevallah.** टिळक पक्षाचे लोक इतर मध्यस्थांना मध्ये घालून समेटाचा प्रयत्न करत होते. स्वत: लोकमान्य गुरुवारी 2.30 वाजेपर्यंत माळवी यांची भेट घेण्यासाठी प्रयत्न करत होते पण आपण संध्येत गुंतलो आहोत असं सांगत त्यांनी भेट नाकारली. लाला लजपतराय यांनीही नेमस्तांची भेट घेण्याचा प्रयत्न केला पण सर्वांनी भेट घेणं टाळलं. तिसरे दिवशी लोकमान्यांचं अतिशय

विचारपूर्ण, उत्स्फूर्त भाषण झालं. जसं काही घडलंच नव्हतं असं ते भाषण सर्वांनी शांतपणे ऐकलं.

नेव्हीनसन नावाच्या पत्रकाराने त्यांच्याबद्दल एक वाक्य लिहून ठेवलं आहे, ' समरांगण हे त्यांना आनंद भुवन वाटतं. ही इज द मॅन असे उद्गार त्यांनी लोकमान्यांबद्दल काढले.

अशा रीतीने जहाल आणि नेमस्तांमधे मोठी फूट पडून सुरत सभा गाजली.

लोकमान्यांचा त्यानंतर धुळे अकोला दौरा झाला. अकोला दौऱ्यात शेगावचे गजानन महाराज आपणहून सभेला आले. गजानन महाराज समोरच्या माणसाचं अंतर्मन ओळखून त्याला घालवून देत किंवा आशीर्वाद देत.. लोकमान्य अकोल्याला आले हे कळल्यावर तो कसला माझ्याकडे येतोय असं म्हणत तेच सभेला गेले. गजानन महाराजांना पाहून सभेच्या ठिकाणी दोघांचा जयजयकार झाला. सर्वांना तो आशीर्वादच वाटला.

परदेशी साखरेवर बहिष्कार टाकायची चळवळ सुरू करायचं त्यांच्या मनाने घेतलं आणि त्याचा वेगाने घराघरात प्रसार व्हावा म्हणून पुणे शहरातल्या प्रमुख पुरोहित आणि भिक्षुकांना बोलावून त्यांना परदेशी साखर न खाण्याची शपथ घेण्यास सांगावं असं त्यांनी ठरवलं. ते जिथे पौरोहित्य करायला जातील तिथल्या

यजमानांना साखर न वापरायचं बंधन आपोआप पडेल आणि बहिष्कार घडून येईल. आणि गुळाचा वापर सुरू होईल. पण धर्माच्या नावाखाली राजकारण सुरू करणं त्यांना पसंत नव्हतं. कारण धर्माचं पांघरूण चढवलं की धर्मभोळे लोक त्या भोवती जमा होतात आणि राजकारण बाजूला राहून धर्माच्याच भानगडींना महत्व येते. त्यापेक्षा राजकारण हे राजकारणाच्या नावानेच झाले पाहिजे.

यानंतर १९०७ साल उजाडलं तेच राजद्रोहाच्या दुसऱ्या पर्वाने! १९०८ ते १९१४ अशी सहा वर्षं लोकमान्यांचा मंडालेत तुरुंगात कठोर काळ गेला. त्यांच्या या गैरहजेरीत विस्कळीत झालेल्या आणि निष्क्रिय बनलेल्या राष्ट्रीय पक्षाला परत उभारी देण्यासाठी लोकमान्य सज्ज झाले. त्याचवेळी ॲनी बेझंट ह्या भारतीय राजकारणात लक्ष घालायला लागल्या होत्या. त्यांचा वकुब, त्यांच्यामुळे होणारा फायदा, यांचा विचार करून लोकमान्यांनी त्यांच्याशी पत्रव्यवहार चालू केला. १९१४ सालची काँग्रेस मद्रासमधे भरायची होती. सुरतेला बाहेर पडल्यामुळे आता समेट करून काँग्रेसमधे प्रवेश करायचा लोकमान्यांनी निश्चय केला.

थोडी विश्रांति झाल्यावर लोकमान्य सार्वजनिक आयुष्यात शिरले. लोकमान्य बेझंट बाईंना भेटायला सर्व्हंट्स ऑफ

इंडियाच्या इमारतीत गेले असतांना गोखले तिथेच होते. म्हणून लोकमान्या त्यांनाही जाऊन भेटले. यावेळी गोखल्यांची प्रकृती आजारपणामुळे नाजुक झालेली होती. त्या भेटीत गोखले लोकमान्यांना म्हणाले की आता तुम्ही कॉंग्रेस मध्ये येऊ नका. तुमचे आणि त्यांचे पटणार नाही. त्यावर लोकमान्यांनी स्वच्छ शब्दात ते नाकारलं आणि त्यांना म्हणाले की कॉंग्रेस सर्वांची आहे, ती कुणा एकास आंदण दिलेली नाही. मी आधी देश तयार करणार, कॉंग्रेसमध्ये येणार आणि कॉंग्रेस काबीज करणार. तेव्हा असा तुमचा बेत जाहीर का केलात असं विचारल्यावर ते म्हणाले की पूर्ण विचारांती माझी मते ठाम झालेली असतात, ती प्रतिपक्षाला उघडी करून आधी बजावत असतो,. आपले धोरण प्रतिपक्षाला उघड करून त्याच्याशी दोन हात करण्यातच पुरुषार्थ आहे. पण लवकरच फेब्रुवारी १९१५ ला गोपाळ कृष्ण गोखले यांचं निधन झालं. लोकमान्य तेव्हा सिंहगडावर होते. त्यांच्या लोकांनी गाडी पाठवून त्यांना पुण्यात बोलावून घेतलं. पाठोपाठ फिरोजशहा मेथाही वारले. इंडियन कॉंग्रेसचं मोठं नुकसान झालं.

## होमरूल – स्वराज्य संस्था चळवळ.

आता लोकमान्यांनी वाहून घेतलं ते होमरूल चळवळीला. १ मे १९१६ ला बेळगावला याची स्थापना झाली आणि लोकमान्यांनी याच्या प्रचारासाठी स्वत:ला वाहून घेतलं. स्वराज्य संस्थेची स्थापना बेळगावातच का झाली यामागेही लोकमान्यांचं राजकारणच होतं. हाती घेतलेली कोणतीही चाल खेळायची तिचा आधी पाया भक्कम करणे हेच त्यांच्या कार्याचं यश होतं. स्वराज्य संस्था- होमरूल चळवळीला प्रारंभ करायचं ठरलं. त्या आधी पुढची कॉन्फरन्स कुठे भरवायची यावर विचार सुरू झाला होता. काही ठिकाणाहून आमंत्रणे येऊ लागली पण त्यांना त्याच कॉन्फरन्स मध्ये होमरूल लीग स्थापन करायची होती. म्हणून त्यांनी बेळगावचे नेते गंगाधरपंत देशपांडे यांना बोलावून सांगितलं की मला पुढची कॉंग्रेस कॉन्फरन्स अशा ठिकाणी हवी जिथे होमरूलला खात्रीने लोकमत अनुकूल असेल. मला पुणे आणि बेळगाव या दोनच जागा अशा दिसत आहेत, म्हणून पुढच्या कॉंग्रेस कॉन्फरन्सचं बेळगावचं आमंत्रण द्या. गंगाधररावांनी तसंच केलं आणि होमरूल लीग-स्वराज्य संस्थेची स्थापना बेळगावात होण्याचा ऐतिहासिक योग घडला.

त्यानंतर लोकमान्यांनी गदग, धारवाड हुबळी असा भाषणांचा दौरा आणि होमरूलचा प्रसार केला. हजारोंच्या संखेने श्रोते या सभांना उपस्थित होते. त्यांना लोकमान्यांनी स्वराज्य या शब्दाचा अर्थ समजावून सांगितला. जिथे जात तिथे मराठीत भाषण देत पण कानडी लोकांना मराठी कळत नाही हे त्यांच्या लक्षात आल्यावर त्यांनी गुर्ल होसूरच्या भाषणानंतर तिथल्याच मुलांना कानडीत अनुवाद करून आपला मजकूर सांगण्यास सांगितलं. मग सभेला लिंगायत लोक जास्त होते हे कळल्यावर जिथे भाषण करायचंय तिथल्या लोकांच्या धर्माची आधी माहिती असायला पाहिजे आणि त्यांची भाषा आलीच पाहिजे हे दोन गुरुमंत्र चळवळीत भाग घेऊ इच्छिणाऱ्या मुलांना दिले. गुर्लहोसुर हे पुण्यक्षेत्र. याच गावात नदी आहे हे कळल्यावर त्यांना नदीत पोहण्याची अनिवार इच्छा झाली. ते पाण्यात उतरल्यावर गावातील सगळे पोहणारे तरुण त्यात मिसळले. लोकमान्यांच्या अंगावरून गेलेलं पाणी अंगावर घेताना गंगेच्या पाण्याच्या पावन स्पर्शाचा अनुभव त्यांनी लुटला.

दुसरे दिवशी सकाळी सरदार बापू गोखले यांचा वाडाही पाहून आले. सरदार बापू गोखले यांचे गुरु त्या गावात राहत म्हणून गोखले त्यांच्या दर्शनासाठी गुर्ल होसूरला येत. लोकमान्य एवढही करून थांबले नाहीत ते जवळच्या बडली गावात दीक्षितांचा एक

वंशज राहत होता. त्याच्या जवळ गोखल्यांनी लिहिलेली पत्रे आहेत असं कळल्यावर बैलगाडीने तिथे पोचले, ती पत्रे पाहून अस्सल आहेत की नक्कल हे तपासलं आणि परत आले. राजकारण आणि व्यासंग हे दोन प्रवाह हातात हात घालून कायमच त्यांच्या देहात नांदत होते. स्वराज्य संस्थेच्या प्रसारासाठी आणि प्रचारासाठी त्यांनी सारा भारत पिंजून काढला. लोकमान्यांच्या या सभांना प्रचंड गर्दी होत असे. खरं तर त्यांच्या भाषणांना गर्दी खेचण्याची वक्तृत्त्वकला नव्हती पण भाषण कसं करावं याचा वस्तूपाठ त्यांनी मोतीराम वेलकरांना सांगितला होता. ते सांगत, भाषणाच्या आधी जमलेल्या श्रोतृवर्गाचा अंदाज घ्यायचा. प्रतिपक्षाचे गचाळ मुद्दे घेऊन आपण अगदी निरुत्तर आहोत असं भासवायचं. मग मुद्देसूदपणे त्या गचाळ मुद्द्यांचा धुव्वा उडवायचा. म्हणजे मग ती भाषणं प्रभावी होतात. आपल्या मुद्द्यांचा बचाव करत बसण्यापेक्षा प्रतिपक्षाच्या मुद्द्यांवर हल्ला केला की तो चीत होतो.. शत्रूवर त्याच्या कमकुवत ठिकाणीच हल्ला करायचा असतो तरच विजय मिळतो.. गोखले म्हणत की ते कायम वकिली थाटाने भाषण करतात. त्यावर लोकमान्यांचं उत्तर असे, की होय, मी वकिली बाणाच वापरतो. ते भाषालंकाराकडे लक्ष न देता सोपे आणि सरळ शब्द वापरत जे सामन्यांच्या मनात सहज उतरत. आपला उत्तम गोळीबार भाषणाच्या अगदी शेवटी काढायचा

म्हणजे तो ऐकणाराच्या मनात कायम घर करतो. Defensive न करता offensive भाषण करत.

पण या गर्दीचं मर्मही त्यांनीच सांगितलं होतं. मी आज लोकजागृती करत आहे. मृतवत झालेल्या देहात संजीवनी घालत आहे. हजारो लोक व्याख्यानास येतात, टाळया वाजवतात म्हणून राष्ट्र पुढच्या कठीण मार्गावर चालण्यास तयार झालं आहे असं जो समजेल तर फसेल. फुटीने बिघडलेले, बेशिस्तीने बेभान झालेले आणि नि:शस्त्र केले गेलेले लोक असतांना संपूर्ण झगडा करणं अशक्य आहे याची मला पूर्ण जाण होती. माझा सगळा भर हे तीन दोष काढण्यावर होता. म्हणून स्वराज्याची कल्पना समाजात रुतवणे आणि रुजवणे हाच भाषणे करत दौरे काढण्यामागे माझा उद्देश आहे हे त्यांचे शब्द होते. म्हणून लोकमान्यांचे मग होमरूल चळवळीसाठी दौरेच सुरू झाले. बेझंटबाईंवरही सरकारने मुंबई-मध्यप्रदेशात प्रवेश बंदी घातली.

## लखनौ कॉंग्रेस २९ डिसेंबर १९१६.

**होमरूलनंतर झाली ती लखनौची ऐतिहासिक सभा. लखनौच्या काँग्रस अधिवेशनात लोकमान्यांनी "स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवीनच " हा महामंत्र भारतवासीयांच्या हृदयापर्यंत पोचवला.** तिथेच झाला मुस्लीम लीगशी करार. करारामुळे मुसलमानांचे समाधान होऊन ते काँग्रेसमधे येत असतील, आणि त्यामुळे मुसलमानांच्या देशभक्तीचा भारतबाह्य देशांकडील ओढा नाहीसा होऊन ते भारतनिष्ठ होत असतील तर हा करार करावा असा त्यांचा विचार होता. इंग्रजांशी लढायला प्रत्येक घटक सामील करून घेण्याची त्यांची धडपड होती.दुसरं कारण ज्या आगगाडीने सगळे परिषदेला निघाले त्या गाडीला होमरूल स्पेशल ट्रेन असंच नाव देण्यात आलं आणि संपूर्ण गाडी या स्वयंसेवकांनी भरून गेली होती. या परिषदेचं दुसरं महत्व होतं की सुरतची सभा दंग्याने मोडल्यानंतर लोकमान्यांना ६ वर्षांची शिक्षा झाली, राष्ट्रीय पक्षाचे मोठे नेतेही कमजोर झाले, आणि सभेचा उत्साह वाढवणारा कुणी नेताही नव्हता. पण आता लोकमान्यांच्या चेतनायुक्त उपस्थितीमुळे सभेला परत उत्साह आला. या स्पेशल ट्रेनमुळे प्रत्येक स्टेशनवर गाडी

थांबली की गर्दी उसळे, हारतुरे, पान सुपारी होई आणि लोकमान्य परत डब्यात चढून बसले की गाडी सुरू होई. खांडव्याला न्याहारी, हरद्याला १२ वाजता तर सर्व प्रवाशांना तोंडली भात, जिलबीचं जेवण देण्यात आलं. सर्वांनी घाईघाईत आंघोळी उरकल्या. मग भाषण पानसुपारी होऊन गाडी सुटली. लोकमान्यांचा सतत जयजयकार चालूच होता. ४ वाजता होशंगाबादला केशरी दुधाचे हंडे तयार होते, रात्री भोपाळ आलं.. हा मुसलमानी राजाचा देश.. पण इथेही गावातल्या लोकांनी फळं, दूध, चहा तयार ठेवला होता. सकाळी ७ वाजता कानपूरला पोचणारी गाडी १० वाजता पोचली. तिथे स्पेशल ट्रेन होती. त्यातून सर्व लखनौला ११.३० ला पोचले. लोकमान्य कारमध्ये बसले तेव्हा आता ते पटकन निघून जाणार असंच स्वयंसेवकांना वाटलं. ज्यांना मिरवणुकीने त्यांना न्यायचं होतं, त्यांनी मग गाडीला गराडा घातला. त्याबरोबर गाडीचा वेग मंदावला. एकाने उत्साहाने गाडीचं टायर कापल्यामुळे गाडी थांबलीच. या कल्पकतेचा जमावाने जयजयकार केला. शेवटी घोडा गाडी आणवून त्यातून लोकमान्यांची थाटाने मिरवणूक निघाली. अमिन बाग, चार बागवरुन छेदीलाल धर्मशाळेत पोचली. लोकमान्यांच्या दर्शनासाठी लोकांची रीघ लागली होती. पंडित मदनमोहन मालवीय लोकमान्यांच्या स्वागताला आले होते. तेव्हा मात्र जागा मिळवतांना बऱ्याच लोकांचे हाल झाले.

त्यानंतर भरली ती लखनौमधली कॉंग्रेस सभा जी परत लोकमान्यांच्या उपस्थितीने ऐतिहासिक ठरली आणि पावन झाली. लखनौचा राष्ट्रीय सभेचा मंडप छान सजवला होता. खूप वर्षांनी, नेमस्त आणि जहाल सर्वच एकत्र आले होते..मुस्लिम लीगही होती. सभेत ठराव झाले. कॉंग्रेसने स्वराज्याचं निशाण रोवलं असंच सर्वांनी म्हटलं. लखनौ संमेलनाचं महत्व हे की यावेळी स्वराज्याची मागणी हिंदू-मुसलमान, सर्वांनी एकत्र येऊन केली. या सभेत मुसलमानांना जास्त सवलती मिळाल्या. लोकमान्यांनी नंतरच्या भाषणात सांगितलं की तिरंगी सामन्यात दोघांनी एकत्र येण्याने तिसऱ्याचा पराभव निश्चित असतो. आपल्याच घरात मीच कारभार करणार असं सांगण्यात घाबरण्याचं कारण नाही. यावेळी मुस्लिम लीग आणि कॉंग्रेस एक झाले ही मोठी गोष्ट झाली.

लखनौहून सभा संपल्यावर लोकमान्य कानपूरला गेले. तिथून कलकत्त्याला मोतीलाल घोष यांना भेटायला गेले. मग नागपूर, यवतमाळ, कारंजा, बोरी, दारव्हा मार्गाने अकोला, किंखेड करत मूर्तजापूरला पोचले. तिथे उत्साही लोकांनी पालखीची व्यवस्था केली होती, ती नाकारून गाडीतून मिरवणूक निघाली. या प्रवासावरून त्याचीच उपमा देत लोकमान्य म्हणाले की ज्याप्रमाणे मुंबईचं तिकीट काढलं की वाटेतील सर्व स्टेशनांचं तिकीट

काढल्यासारखं होतं, त्याप्रमाणे स्वराज्याचं तिकीट काढलं की सर्व राजकीय मागण्यांची स्टेशने गाठण्यासारखं आहे..

लखनौ कॉंग्रेसच्या या सभेनंतर लॉर्ड सिडनेहॅम यांनी इशाराच दिला, '' हिंदुस्थानात धोका आहे. सांभाळा. ''

स्वराज्य मिळवणं हाच ध्यास. हीच तळमळ. रात्रंदिवस हाच विचार. हीच आयुष्याची इतिकर्तव्यता. त्यासाठी लोकमान्यांनी आयुष्य झोकून दिलं. माझं राजकारण म्हणजे " सुळावरची पोळी " असं ते स्वत:च आपल्या राजनीतीचं वर्णन करीत असत. त्यामुळे असल्या राजकारणात आपल्याला शिष्य मिळणार नाही हेही ते पूर्णपणे जाणून होते. इंग्रज त्यांचे शत्रू नंबर एक. षठं प्रति षाठ्यम् हेच धोरण. त्यांना कसं हैराण करून सोडायचं यासाठीच सतत बुध्दीचा वापर. इंग्रजांना घालवायचं म्हणजे आधी त्यासाठी आपल्या लोकांना हलवायचं, जागृत करायचं, त्यांना आपण पारतंत्र्यात आहोत, त्यांच्यापासून सुटका करून घ्यायची आहे याची त्यांना जाणीव करून द्यायची. मग दिसेल ती वस्तू, दिसेल तो माणूस, सुचेल तो विचार स्वराज्यासाठी कसा उपयोगात आणायचा याचीच अहर्निश चिंता.

त्यांची ही तळमळ इतकी पराकोटीची होती, की एक दिवस आपल्या आरामखुर्चीत विचारात गढलेले असे बसलेले

होते. त्यांचे भाचे धोंडोपंत विद्वांस, त्यांच्यासमोरून कामं करत सारखी ये-जा करत होते, पण तिकडे लोकमान्यांचं लक्षच नव्हतं. अचानक लोकमान्य खुर्चीवरून उठले आणि जोरात म्हणाले,

" धोंडोपंत, क्षणभर परमेश्वराने, मला साक्षात मोक्ष देतो म्हणून म्हटले ना ती तो मी झिडकारून त्यास म्हणेन की, प्रथम पारतंत्र्यातून मुक्त झालेला माझा देश मला पाहायचा आहे. कारण वैयक्तिक मोक्ष झाला तरी तो उच्च कोटीचा पण पराकाष्ठेचा स्वार्थसाधूपणाच आहे."

त्यांच्या मनातलं स्वराज्याचं चित्र वेगळं होतं. स्वराज्याची व्याख्याही वेगळी होती. आपली परंपरा, आपली संस्कृती, आपले रक्तसंबंध ज्यात जोपासले जातील, संवर्धित केले जातील ते स्वराज्य! १९१६ साली होमरूल स्थापण्यापूर्वी त्यांनी व्याख्यानांची झोड उठवली तेव्हा सरकारने लोकमान्यांना बोलावून समज दिली की त्यांनी होमरूल हा शब्द वापरू नये. तेव्हा ताडकन् लोकमान्यांनी त्यांना जबाब दिला की हा शब्द मी वापरणारच, आणि होमरूलही स्थापणार.

## माँटेग्यू यांची भारत भेट.

भारत मंत्री माँटेग्यु आणि चेम्सफर्ड यांचा भारताबद्दलचा जाहीरनामा प्रसिद्ध झाला. त्यात भारताला जबाबदारीचं स्वराज्य देऊन साम्राज्यातील एक भाग बनवण्याचं धोरण आहे हे त्यांनी घोषित केलं. ती बोलणी करण्यास ते स्वत: भारतात येणार असं ठरलं. त्याप्रमाणे १९१७ साली ते भारतात आले. त्याप्रमाणे ते आल्यावर सर्व शिष्टमंडळांच्या त्यांनी भेटी घेतल्या. मात्र लोकमान्यांशी स्वतंत्रपणे एकटयांची भेट घेतली. त्यानंतर लोकमान्यांचे कलकत्ता राष्ट्रीय परिषद, वऱ्हाड प्रांताचा दौरा, पंचांग अधिवेशन यात दिवस भराभर संपले. होमरूललीगच्या डेप्युटेशन मध्ये कुणाला पाठवावं यावर कलकत्ता कॉन्फरन्सच्या वेळी विचार झाला. त्यात म. गांधी यांना निवडावं हा विचार शास्त्री आणि मालवीय यांचा होता. कारण त्यांना टिळक नको होते. पण गांधींनी त्याला नकार दिला तेव्हा लोकमान्य मालवीयांना म्हणाले, ‘‘ तुम्ही अजून गांधींना ओळखलेलं दिसत नाही आहे. गांधींना आपल्या हातात खेळवण्याचा तुम्ही प्रयत्न केलात पण तो फसला म्हणायचा. त्यांची एक मेथड आहे. ती ज्यांना पटेल त्यांचीच ते. त्याशिवाय ते कोणाच्या हाती खेळायला लागायचे नाहीत आणि

कुणाला खेळवण्याच्या उद्योगाला लागायचे नाहीत..'' हे त्यांचं मत झालं होतं, तेव्हा गांधीजी नुकतेच राजकारणात शिरले होते. जागतिक युद्धाला सुरुवात झाल्यावर, भारतीयांना सैनिकी शिक्षण देण्याचा विचार सरकार करू लागलं, तेव्हा आपल्या मुलांनी लष्करी शिक्षण घेण्याच्या विचारामागे लोकमान्य ठाम होते. जेव्हा वॉरकॉन्फरन्स भरणार होती, त्यात रिक्रूटसाठी स्वराज्याला पाठिंबा मिळवण्याचा डाव लोकमान्यांचा होता.

लॉर्ड विलिंगडन यांनी सर्वांना चर्चेला बोलावलं होतं. त्यात काय बोलायचं हे ठरवण्यासाठी सभेच्या आदल्या दिवशी सर्वांची सभा झाली त्यावेळी लोकमान्यांनी सुचवलेल्या उपायांबद्दल गांधीजी लोकमान्यांना म्हणाले की तुमचे हे devilish – कठोर मार्ग मला पसंत नाहीत.. त्या चर्चेच्या वेळी लोकमान्य या नवतरुणाला म्हणाले,

'' My good friend, you have not burnt your fingers as yet while playing with this government. During the laast forty years I have burnt my fingers more than once.'' गांधीजी नुसते हसले. मोठी झेप असलेल्या या नवतरुणाला लोकमान्यांनी गुरु म्हणून जो धडा दिला, त्याचाच परिणाम म्हणजे लोकमान्यांच्या अंत्ययात्रेत गांधीजींनी थोडा वेळ

खांदा दिला, शौकतअली यांनीही दिला. किती तरुणांना ते दीपस्तंभ होते.. तोच त्याग, चळवळ, तुरुंगवास, लोकनायकत्व गांधीजींनी आपल्या आयुष्याचा आदर्श बनवलं. टिळकांनी जो सत्याचा मार्ग धरला होता, तोच मार्ग सत्याग्रह नावाने गांधीजींनी स्वीकारला. तसाच तुरुंगवास भोगला, लोकसंघटना केली, लोकनायकत्व घेतलं.

सर्व नेत्यांशी बोलणी करायला माँटेग्यू यांना स्वत:ला भारतात यावं लागलं तेव्हा ॲनी बेझंट लोकमान्य वगैरे त्यांना दिल्लीला भेटायला गेले. लोकमान्य बाईंबरोबर न जाता एकटे माँटेग्यूंना भेटले.

४० मिनिटं दोघं बोलले. शेवटी माँटेग्यूंनी लोकमान्यांना विचारलं की तुम्ही माझ्या सुधारणा स्वीकारणार की नाही? तेव्हा लोकमान्यांन उत्तरले," स्वीकारणार तर! शिवाय आणखीही मागणार."

माँटेग्यू यांनी काही जातींना विशेष अधिकार दिले. तेव्हा लोकमान्य म्हणाले,`` आम्ही राजसत्ताक स्वभावाची माणसं आहोत. आम्हाला ॲरिस्टोक्रसी ऑफ विज्डम पाहिजे. घर भेदणारी ही पैशावर चालणारी डेमॉाक्रसी नको आहे. " लोकमान्य आणि माँटेग्यू यांची भेट झाल्यावर माँटेग्यू म्हणाले,``

**There is one Indian whom we can not win over by any sort of influence or inducement and that is Mr. Tilak. All others we can influence more or less. "**

या भेटीनंतर स्वराज्य संस्थेच्या बोलण्यासाठी इंग्लंडला डेप्युटेशनवर जाण्यासाठी ते कोलंबोला पोचले पण सरकारच्या हीनतम वर्तनामुळे त्यांना पुढे जाता आला नाही कारण त्यांना पासपोर्टच दिला नाही. त्यांनी कोलंबोच्या लोकांना आधी करून ठेवलेल्या सर्व ताराही दडपून ठेवण्यात आल्या होत्या. शिष्ट मंडळ परत आलं तरी चिरोल केससाठी लंडनला जाण्याची तयारी लोकमान्य करतच होते. त्यात त्यांना यश मिळालं, पासपोर्ट मिळाला आणि लंडनला जायची तयारी सुरू झाली.

1907 साली त्यांना शिक्षा झाली. सरदारगृहातून पोलिसांच्या गाडीत बसत असतांना आजूबाजूचे लोक रडतांना पाहून ते रागावले आणि कडवटपणे म्हणाले, " तुम्ही जोपर्यंत असे बायकांसारखे रडत राहाल तोवर आम्हास असेच निमूटपणे तुरुंगात राहिले पाहिजे. " कोर्टामधे जेवढ्या म्हणून कठोर शिक्षा झाल्या तेव्हा तेव्हा त्यांचा चेहरा निश्चल असे आणि असामान्य धैर्य त्यांच्या चेहऱ्यावर विलसत असे. कुणी रडलेलं मात्र त्यांना खपत नसे.

नोकरी जाईल म्हणून सरकारी  नोकरीतले लोक त्यांच्या व्याख्यानाला जायला घाबरत. तेव्हा त्यांच्यासाठी लोकमान्य रात्री व्याख्याने देत. कुणाचीही चिठी आपल्याजवळ ठेवत नसत. लगेच फाडून टाकत, किंवा त्यांना परत करून टाकत. कारण एकच.... आपल्यावर सरकारची धाड आली तर तो निष्पाप माणूस अडकायला नको. सरकारलाही त्यांच्या लोकप्रियतेची चांगलीच जाणीव होती. लोकमान्यांना काही झालं तर लोकक्षोभ किती उसळेल ते इंग्रजही पूर्ण जाणून होते. चिरोल केससाठी लंडनला असतांना त्यांनी मजूरपक्षाच्या नेत्यांच्या खूप भेटीगाठी घेतल्या. त्याचं कारण एकच होतं, '' जो पक्ष सरकारच्या विरूध्द असतो, त्याच्या कच्छपी लागण्यामागे काही फायदा असतो. मजूरपक्षाचे मंत्रीमंडळ बनले तर निदान त्यांच्या वचनाला जागून ते पीछेहाटीचं धोरण तरी स्वीकारणार नाहीत. '' लोकांची निरपेक्षपणे सेवा केली तर पैशाला काही कमी पडत नाही असं त्यांचं ठाम मत होतं. **Father of unrest.** हा त्यांना स्वराज्याच्या चळवळीचा, इंग्रजांकडून मिळालेला सर्वोच्च किताब होता.

**Take away Tilak, and Poona is nothing.** हा रिपोर्ट आहे १९०९ सालचा, एका पोलिस सुपरिटेंडेंटचा. यातच लोकमान्यांचं सगळं राजकीय वर्णन आलं. इंग्रजांवर त्यांचा कधीही

विश्वास बसला नाही. आपल्याला सतत गुलामगिरीत ठेवण्याचीच इंग्रजांची इच्छा आहे हे त्यांना ठामपणे माहीत होतं. इंग्रजांनी काहीही द्यायचं म्हटलं तरी मला त्यात काहीतरी वास येतो असं ते म्हणत.

राजकारण्याने हृदयात आग आणि डोक्यावर बर्फ ठेवला पाहिजे ही लोकमान्यांची राजकीय नेत्याबद्दलची व्याख्या होती. राजकारण हा विकारांनी मनाला भ्रष्ट करणारा विषय, म्हणून मनाला अलिप्त, एकाग्र, शांत करणारा मार्ग राजकारण्याला शोधायलाच हवा असं ते म्हणत. राजकारणावर विस्तृत ग्रंथ लिहिण्याची त्यांची फार इच्छा होती आणि त्या दृष्टीने मनू, ॲरिस्टॉटल, प्लेटो, फ्रिमन यांचा अभ्यासही त्यांनी करून ठेवला होता. पण त्याच काळात मंडालेला जाण्याची शिक्षा त्यांना झाली. त्यामुळे तो ग्रंथ प्रत्यक्षात साकारला नाही.

राजकारणात पडण्याची त्यांची इच्छा नव्हती पण आपल्या लोकांचं कष्टमय जीवन, इंग्रज सरकाराचा जुलूम, मनमानी, आणि देशाला लुटणं पाहून त्यांनी जनजागृतीचा संकल्प सोडला आणि ते खडतर असिधारा व्रत जन्मभर उराशी बाळगलं. चाळीस वर्ष त्यांनी हे कार्य अव्याहतपणे चालू ठेवलं. बहुजन समाजाच्या कलाने थोडं घ्यावं लागतं. तरच लोकांमधे प्रीती उत्पन्न

होते. त्यांचा पाठिंबा असल्याशिवाय परकीयांशी लढणं सामर्थ्य नेत्याला येत नाही हे त्यांनी ओळखलं होतं. म्हणूनच " सामर्थ्य आहे चळवळीचे " या त्यांच्या उद्योगाला यश मिळालं. परत " तेथे भगवंताचे अनुष्ठान पाहिजे " असं लोकांना सांगतांना म्हणायचे की याचा अर्थ भगवंताची मूर्ती आणून त्याच्याभोवती उदबत्ती ओवाळणं नव्हे तर भगवंत, जे साधूंचा उध्दार आणि दुष्टांचं निर्मूलन या दोन गोष्टी करतो त्या आपणच करायच्या. त्याचं कार्य आपण करायचं.

काँग्रेसने लोकमान्यांना बाहेर ठेवलं. लोकमान्य मंडालेला गेल्यावर राष्ट्रीय सभेच्या तरुणांना, त्यांच्या योजना चालवण्यासाठी कुणीतरी नेता हवा होता. म्हणून नागपूरमधले बाबासाहेब परांजपे, रामभाऊ सप्रे, नारायण बामणगावकर, वीर वामनराव जोशी, बेळगावचे बाबासाहेब सोमण, असे चारपाच तरूण मुंबईला फिरोजशहा मेहतांना भेटायला गेले. त्यावेळी त्यांच्या चेंबरमधे दिनशा वाच्छा, हार्निमन बसले होते. या तरुणांनी आपला भेटीला येण्याचा हेतू सांगितला आणि आमचं पुढारीपण स्वीकारता का? असं विचारल्याबरोबर ते एकदम म्हणाले,

‘‘ चूप. इथे भिंतीलाही कान असतात.’’ तरी त्या मुलांनी तोच प्रश्न परत रेटला तेव्हा दिनशा वाच्छा हार्निमन यांच्याकडे

वळून ते त्यांना म्हणाले, ‘ हे पहा, महाराष्ट्राचं रक्त. यांच्या बुद्धी आणि धाडसाचं तरी कौतुक कराल की नाही? शिवाजी आणि टिळक जोपर्यंत यांच्या रक्तात आहेत तोवर महाराष्ट्रच स्वराज्याचा प्रश्न सोडवेल. नंतर त्या तरुणांना तुमचा नेता व्हायला लोकमान्यच लायक आहेत, मी नाही असं म्हणाले. तेव्हा त्या तरुणांनी मग कॉंग्रेस लोकमान्यांना बाहेर का ठेवते असा सरळ प्रश्न विचारला तेव्हा त्यांचं उत्तर विलक्षण होतं. ते म्हणाले, आम्ही टिळकांना बाहेर ठेवतो म्हणून सरकार त्यांच्यावर हत्यार उपसते हे म्हणणं बरोबर नाही. सरकार जेव्हा त्यांच्याविरुद्ध दडपशाही करते तेव्हा आम्ही त्याचे संभाव्य परिणाम सरकारच्या कानावर घालून त्यांना सावध करत असतो. राजनिष्ठा व्यक्त करणे, टिळकांपासून दूर राहाणे, त्यांचे आमचे पटत नाही असं सरकारला भासवत राहणं, आणि आमचं म्हणणं सरकार मान्य करत नाही म्हणून टिळकांचं विनाशक असं राजकारणाचं धोरण लोकप्रिय होतंय, असं कानीकपाळी ओरडत राहणं, हे आमचं धोरण आहे. अशारितीने एकाने परिस्थिती निर्माण करायची आणि दुसऱ्याने तिच्यापासून निघेल तेवढा फायदा करून घ्यायचा असं झालं तरी देशाचं हितच आहे. "

मेहता एकदा हार्निमन यांच्याशी बोलतांना त्यांना म्हणाले, " मी आणि टिळक एकांतात पाच मिनिटं जरी एकत्र बसलो तरी

आम्ही एक होऊ." पुण्यात फिरोजशहा मेहता खूप आजारी असतांना, त्यांना आवाजाचा त्रासही सहन होत नव्हता. त्यांचा बंगला रहदारीपासून खूप आत होता. लोकमान्य त्यांना भेटायला गेले. गाडी कुठे आहे असं मेहतांनी विचारलं तेव्हा तुम्हाला त्रास नको म्हणून लांब उभी केली असं म्हणाले. विरोधक असले तरी राजकारण सोडलं की दोघे एकमेकांबद्दल आदर करत होते. तोच आदर लोकमान्यांना, ना. गोखले, ॲनी बेझंट, यांच्याबद्दलही होता. म्हणूनच कुणी त्यांना नावं ठेवायला लागलं तर, आधी तुम्ही त्यांच्याएवढे व्हा आणि मग त्यांना नावं ठेवा असं म्हणून त्यांना गप्प  करत.

सरकारचा सगळा कारभार सिव्हील सर्व्हंटसच्या अधिकारात चालतो. हे कारभारी टांकसाळीत तयार झालेल्या रुपयांसारखे असतात. आपण म्हणू ती पूर्वदिशा असं त्यांना वाटत असतं. अशा घमेंडी अधिकाऱ्यांना, तू म्हणतोस ते चूक आहे, जनतेच्या हिताची काळजी कळकळ मला तुझ्यापेक्षा जास्त माहीत आहे, म्हणून मी सांगतो तसं तू वागलं पाहिजेस असं ठणकावून सांगणारा निर्भय पुढारी तयार झाला पाहिजे असं ते विद्यार्थ्यांना सांगायचे. ज्या प्रदेशात, प्रांतात, स्वराज्याची चळवळ करायची असेल त्या प्रांतातल्या लोकांचा आधी धर्म जाणून घ्या. त्या

धर्मग्रथांतल्या उदार भावनांचा आदरपूर्वक अभ्यास करा म्हणजे लोकांची तुम्हाला सहानभूती मिळेल. दुसरं म्हणजे त्या भागातली भाषा तुम्हाला बोलता आलीच पाहिजे असा त्यांचा तरुण कार्यकर्त्यांना उपदेश असे. स्वराज्याची धडपड ही ब्राह्मण लोकांनी कौन्सिलात जाऊन आपल्यावर पगडा बसावा म्हणून चालवली आहे असं ब्राह्मणेतरांना वाटतंय त्याचं काय असं कुणी त्यांना विचारलं तेव्हा ते म्हणाले, " खरंय ! वरवर पाहता ते खरं वाटतं. म्हणूनच मी माझ्या सहकाऱ्यांना सांगत असतो की तुम्ही मागे राहा आणि राष्ट्रीय पक्षाची तत्वं मान्य असणाऱ्यांना सुशिक्षित अन्यजातीय लोकांना हाती धरून कौन्सिल काबीज करा. म्हणजे कौन्सिले स्वराज्याच्या चळवळीला उपयोगी पडतील, असं होईल. असं नाही झालं तर अन्यजातीयांना कौन्सिलांचा कंटाळा यायला लागेल. म्हणून सगळयांनी मिळूनच कौन्सिलं ताब्यात घेतली पाहिजेत. "

त्यांनी त्यासाठी एक उदाहरण दिलं. सॅनिटरी खातं आपल्या ताब्यात आलं की ते चालवण्यासाठी आपल्या आयुर्वेदाचा उपयोग करायचा. ठिकठिकाणच्या वैद्यांना उत्तेजन देऊन स्वस्त, फार काय फुकट औषधं द्यायची ! समाजाला आपली उपयुक्तता जसजशी पटत जाईल तसतशी त्यांची मनं काबीज

होतील. याप्रमाणे लोक आपल्या पाठीशी आले की सरकार आपल्या चळवळीला वचकू लागेल. आणि आपल्याला जास्त हक्क मिळवता येतील. सत्ताधारी आपल्या आयुर्वेदाला दडपून टाकून त्यांची औषधं खपवण्याचा जो उद्योग करत आहेत त्याला आळा घालायचा. त्यासाठी चळवळीने काहीही करून लोकांच्यात घुसा आणि त्यांची मनं आणि मतं काबीज करा.

राजद्रोहाच्या खटल्यात लोकमान्यांनी सरकारची माफी मागावी आणि मोकळं व्हावं असं त्यांच्या अवतीभोवती असणाऱ्यांचं मत होतं. पण लोकमान्यांनी त्याला स्पष्ट नकार दिला. आपले परम मित्र बाबू मोतीलाल घोष यांना पाठवलेल्या पत्रात त्यांनी त्यांची बाजू स्पष्ट केली.

"मी गुन्हा केलेला नसतांना, मी दोषी आहे हे माझ्यासारख्या माणसानं कबूल करणं योग्य आहे का? मला शिक्षा झाली तर लोकांची सहानभूतीच मला धैर्य देईल अशी माझी समजूत आहे. सरकारचा मुख्य उद्देश पुण्यातील पुढाऱ्यांना माना खाली घालायला लावणे हा आहे. आपण लोकांचे, जनतेचे नोकर असतो. अशा आणिबाणीच्या प्रसंगी आपल्यात धैर्य नाही असे दाखवले तर आपण लोकांचा विश्वासघात केल्यासारखं होऊन त्यांची निराशा केल्यासारखं होईल. म्हणून ही गोष्ट करायला मी

बिलकूल तयार नाही. समाजातला माझा दर्जा सर्वस्वी माझ्या शीलावरच अवलंबून आहे. माझ्याविरुध्दचा पुरावा अगदी पोकळ आहे. मला न्यायाची भीती वाटत नाही तर ज्यांना मराठी येत नाही अशा ज्युरींची वाटते. आपल्याला राजकारणात राहायचे असेल तर या गोष्टींना आपण कायम तयार राहिले पाहिजे. "

१९०४ साली जेव्हा लोकमान्य शंकराचार्यांना भेटायला गेले तेव्हा त्यांच्या बोलण्यात थोडीशी भारताच्या भावी पिढीबद्दल निराशा डोकावली. " अलिकडे इंग्रजी शिकलेल्या आपल्या सर्व सुशिक्षितांना आपल्या संस्कृतीची फारशी किंमत वाटत नाही. धर्माबद्दल त्यांना आस्थाही नाही. फार काय संस्कृती आणि धर्म विसरण्यास ते अगदी तयार आहेत. त्यांना ते नकोच आहे. म्हणून क्वचित मनात येतं की स्वराज्य आलं काय किंवा परस्थ ख्रिस्ती राज्य कायम टिकलं काय सारखंच आहे यांना. संस्कृती, रक्तसंबंध, परंपरा, धर्म यासाठी तर स्वराज्य हवं. या साऱ्यांच्या अभावी, नुसतं स्वराज्य आाहार-निद्रा-भय एवढ्यापुरतंच यांना स्वराज्य हवं आहे."

## लोकमान्यांच्या आयुष्यातील वादळे.

लोकमान्यांच्या आयुष्यात अनेक वादळं आली. त्यांचं राजकीय जीवन जितकं कष्टदायक तितकंच वैयक्तिक आयुष्यही मानसिक त्रासांचं होतं. त्यांना आणि देशवासीयांना चटका लावून जाणाऱ्या घटना होत्या त्यात एक होती टिळक आगरकर वाद. हे दोघं कॉलेजच्या दिवसांपासूनचे मित्र. दोघांचेही ध्येय एकच. सार्वजनिक कार्य आणि जनहिताची तळमळ. एकमेकांशी केवळ ध्येयाने एकजीव... मनाने एकजीव.. मैत्रीने एकजीव...अंतिम उद्दिष्टांच्या दृष्टीनेही एकजीव.. पण ध्येयमार्गाच्या बाबतीत मात्र कायम दुरावा ठेवून धावले. लोकमान्य बी.ए. एल.एल. बी झाले आणि आगरकर एम.ए. झाले. दोघांनीही आपापल्या घरच्यांना खूप पगाराच्या नोकऱ्या करून घरी बक्कळ पैसा येणार नसल्याची कल्पना दिलेली होती.

हलाहलाचे अनेक प्याले पचवलेले, स्वत:ला कठोर मनाचा ही उपाधी स्वत:च लावून, प्रत्येक घटनेकडे अलिप्तपणे पाहणारे लोकमान्य, आणि भावनिक मनाचे आगरकर. आपले परम मित्र आगरकर गेले तेव्हा दोन दिवस त्यांच्या डोळ्यातलं पाणी खळलं नव्हतं. एवढंच नव्हे तर आगरकरांचं निधन झाल्यावर पुढे

कधीतरी त्यांच्या वाड्यात जायची वेळ आली तेव्हा त्यांनी आगरकरांच्या आठवणी आपल्याला वेदना देतात, या सबबीवर आपल्या भाच्याला पाठवलं. डोंगरीच्या तुरुंगात १०१ दिवसांची शिक्षा भोगत असतांना त्याच परम प्रेमापायी लोकमान्यांनी आपल्या जेवणातील अर्धा भाग आगरकरांना देण्याची परवानगी जेलरकडून घेतली होती. कारण आगरकरांना दम्याचा त्रास असल्यामुळे त्यांना जेवण जायचं नाही. ते अर्धपोटी राहात. आगरकरांचं चरित्र लिहिण्याची त्यांना कुणीतरी विनंती केली तेव्हा म्हणाले, " हो! खरं तर आगरकरांचं अंतरंग, त्याच्या सगळ्या छटा जेवढ्या मी जाणतो, तेवढं आगरकरांना कुणीच ओळखत नाही.” पण लोकमान्यांच्या मंडाले शिक्षेमुळे ते  राहून गेलं खरं. रणांगणात आपला लंगडा पाय कसा नाचवायचा या विद्येत आगरकरांसारखं दुसरं कुणीही नाही. " असं लोकमान्यांचं आगरकरांबद्दल मत होतं. दोघांचे वाद हे कॉलेजपासून चालू होते. सोवळं नेसून जेवणाऱ्यांचा एक  क्लब होता, त्यात लोकमान्य जेवायला जायचे आणि आगरकर या सर्व  रूढींच्या टोकाच्या विरोधात होते.  लोकमान्य जेवायला निघाले की आगरकर त्यांची टिंगल करत. ते धुतलंय का असं विचारत. सोवळं हेसुध्दा धुवून स्वच्छ  ठेवलेलं असावं याबाबतीत ते आगरकरांशी सहमत होते. पण रेशीम कापसापेक्षा उष्ण असतं, त्यामुळे त्यावर जंतू, कचरा राहात नाही. पण ते महाग

असल्यामुळे रोज रोज धुवून फाडणं ही सामान्यांना परवडत नाही असं उत्तर लोकमान्यांकडून येई आणि तुमचे ब्रिटीश लोक जेवतांना कपडे बदलतात त्याचं काय, असा प्रतिप्रश्न आगरकरांना विचारीत असत.

लोकमान्याचं मत जुन्या रूढींच्या मुळाशी जाऊन त्यातलं चांगलं उद्दिष्ट शोधण्याकडे असे. वर्गावर शिकवून शिक्षकांच्या खोलीत आलं की त्यांचे वाद सुरू होत. लोकमान्यांचा आवाज दणदणीत, त्यामुळे त्या साध्या वादालाही रणांगणाचं स्वरूप येत असे. दोघेही आपला मुद्दा सोडत नसत. आणि एकमेकांना हट्टी म्हणायची संधी हातची जाऊ देत नसत. शिक्षण संपल्यावर शेवटी दोघंजण एक दिवस निवांत बसले. आगरकरांनी जाहीर केलं .... आधी आपलं घर स्वच्छ करायचं. मग दार. लोकमान्य म्हणाले.... आधी दार दिसतं. इंग्रज आले आहेत ते घर करायला. आपण त्यांना बाहेर काढू आणि मग घर स्वच्छ करू. आगरकर म्हणाले... आपापलं घर स्वच्छ केलं की आपोआप देश स्वच्छ होईल. लोकमान्यांनी विचारलं... एखादा घर नसलेला माणूस तुमच्याकडे आला आणि मला घरच नाही तर मी काय करू असं म्हणाला तर?....आगरकर म्हणाले ...तो अंधविश्वास, ती प्रेतांची विटंबना, ते आगगाडीसमोर नारळ फोडणं हे सगळं आधी घालवायला पाहिजे.... लोकमान्य म्हणाले...हे सगळं करा पण सबूरीने !

धर्मभोळा समाज एकदम बदलत नाही. अशा वादावादीनंतर शेवटी शिक्षणाच्या पवित्र कार्यावर दोघांनीही एकत्र यायचं ठरवून समेट झाला आणि त्यातूनच शाळा काढण्याचं ठरलं.

न्यू इंग्लीश स्कूलची स्थापना हा त्याचाच परिपाक. निबंधमालाकार विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या मनात खूप काळापासून शाळा काढायचा विचार घोळत होता. पण त्यांना तसे समचिचारी कुणी भेटत नव्हते. लोकमान्य आणि आगरकरांना जेव्हा शास्त्रीबुवांचे विचार कळले तेव्हा ते दोघे त्यांना जाऊन भेटले. शास्त्रीबुवांना मोठा आनंद झाला आणि १ जानेवारी, १८८० या दिवशी शाळा चालू करण्याचा संकल्प त्यांनी जाहीर केला. त्याप्रमाणे या दिवशी समारंभपूर्वक यथाविधी शाळा सुरू झाली पण प्रत्यक्ष कामकाज २ तारखेपासून सुरू झालं. शाळेच्या आदल्या दिवशी लोकमान्य आणि माधवराव नामजोशी यांनी रात्री शाळेचा वर्ग सारवला आणि तिथेच शाळेसाठी आणलेल्या फळयावर दोघे झोपले. सकाळी घरी जाऊन आंघोळ वगैरे आटोपून ११ वाजता शाळेत दोघे हजार झाले. पहिले दिवशी पटावरची संख्या १५० होती पण त्यादिवशी १९ विद्यार्थी हजर राहिले. हे सर्व १९ -२० वर्षांचे होते. पण बघ्यांची संख्या दांडगी होती.

शाळेच्या सुरुवातीला शिक्षकांमध्ये वासुदेवशास्त्री खरे, नंदर्गीकर शास्त्री, वामनराव आपटे, माधवराव नामजोशी, कृष्णराव मांडे, मुळे आणि हरी कृष्ण दामले होते. सर्वांनाच सार्वजनिक कार्याची आवड होती. शाळा सुरुवातीला बुधवारपेठेत मोरोबादादा फडणीसांच्या वाड्यात भरली. पण लवकरच विद्यार्थ्यांची संख्या खूप वाढल्याने दोन वर्षात तिथून हलली आणि गद्रे वाड्यात गेली. लवकरच स्वतंत्र इमारतीची गरज भासू लागली. पहिल्या पाच वर्षात विद्यार्थ्यांची संख्या २ हजारावर गेली. पाचच वर्षात फर्ग्युसन कॉलज सुरू करावं लागलं. इतकी शाळा लोकप्रिय झाली. शंकरशेट स्कॉलरशिप ह्याच शाळेतल्या मुलांना मिळायला लागली.

या शाळेचं नाव न्यू इंग्लिश स्कूल ठेवलं कारण इंग्रजी ७ इयत्तांचीच ती शाळा होती. लोकमान्य आणि वामनराव आपटे गणित आणि संस्कृत शिकवत, आगरकर इतिहास आणि अर्थशास्त्र शिकवत, गोळे विज्ञानशास्त्र, तर केळकर इंग्रजी शिकवत. विष्णुशास्त्री चिपळूणकर संस्कृत, इंग्लिश दोन्ही शिकवायला तयार होते. शाळेचा कोणताही तास कुणीही घेई. लवकरच या शाळेची कीर्ती पुण्याबाहेरही पसरली आणि २ वर्षात विद्यार्थ्यांची संख्या १३०० झाली. या शाळेचं वेगळेपण असं की सुशिक्षित लोकांनी

सरकारी नोकरीची अपेक्षा न ठेवता सर्व धंद्यात स्वावलंबनाने वरिष्ठ स्थान आणि कीर्ती मिळवावी असं राष्ट्रीय शिक्षण इथे दिलं जाई. राष्ट्रीय शिक्षण याचा अर्थ होता की देशी भाषेत शिक्षण देणं, स्वस्त शिक्षण देणं, वरिष्ठ अधिकारी हिन्दी असणं, शिक्षणाचे नमुने इंग्लंडहून न आणता इथेच तयार करणे, शिक्षणात सुधारणा करणे, आणि शाळोपयोगी पुस्तके इथेच तयार करणे. शाळेला भेट दिल्यावर तिचं कौतुक अनेकांनी केलं, त्यात दापोलीचे प्रसिद्ध वकील रावसाहेब मंडलिक, मिशनरी मरेमिचेल, प्रो. वर्डस्वर्थ ( कवि वर्डस्वर्थ यांचे नातू ) एज्युकेशन कमिटीचे हंटर असे अनेक होते. या शाळेचं मुख्य भूषण हे होतं की सर्व चालक स्वार्थात्यागाने आणि तळमळीने या क्षेत्रात उतरले होते. हायकोर्टात वकिली करून भरपूर पैसा मिळाला असता तो नाकारून शिक्षक झालेले लोकमान्य जसे होते, तसेच एम. ए. झाल्यावर आपल्या आईला पत्र लिहून, मुलाच्या मोठ्या नोकरीची आणि मोठ्या पगाराची अपेक्षा यांची स्वप्ने पाहू नकोस असे सांगणारे आगरकरही होते..

एकीकडे शाळा सुरू केली आणि पुढल्याच वर्षी वर्तमानपत्र काढण्यासाठी या चळवळया सभासदांचे हात शिवशिवायला लागले. विष्णूशास्त्री, आगरकर यांना लेखणी चालवण्याचं कसब होतंच. त्यामुळे केसरी आणि मराठा ही दोन वृत्तपत्रे निघाली. त्यांचा जन्म १ जानेवारी १८८१ चा. त्यासाठी

छापखान्याची जरूर होती. एक छापखाना केशव बल्लाळ साठे यांच्याकडे गहाण पडला होता. तेच सामान यांनी विकत घेतलं. २४०० रुपयात हप्तेबंदीने तो छापखाना ताब्यात आला. सौदा ठरल्याबरोबर सर्व मंडळींनी आपल्या खांद्यांवरून सर्व सामान एका रात्रीत गद्रे वाड्यावर आणून टाकलं. त्याचं नामकरण आर्यभूषण असं करण्यात आलं. अशातऱ्हेने पुढील काळात वादळं निर्माण करणारा ' केसरी ' सुरू झाला. केसरीवरचा प्रसिध्द श्लोक वासुदेवशास्त्री खरे यांनी सुचवला. केसरी नाव विष्णुशास्त्री यांच्या कल्पनेतून साकारलं.

**गजालिश्रेष्ठा या निबिडतर कांतार जठरी। मदांधाक्षा मित्रा क्षणभरिही वास्तव्य न करी**

**नखाग्रांनी जेथे गुरुतर शिला भेदुनी करी। भ्रमाने आहे रे गिरिकुहरि हा निद्रित हरी।**

लोकमान्यांच्या निधनानंतर खालील श्लोकही घालण्यात आला :-

**तव स्मरण संतत स्फुरणदायी आम्हा घडो त्वदीय गुणकीर्तनध्वनी सुरम्य कर्णी पडो**

**स्वदेशहित चिंतनाविण दुजी कथा नावडो तुझ्यासमचि आमुची तनुही देशकार्यी पडो.**

वृत्तपत्रे चालू केल्यावर लोकमान्यांना त्यातील मजकूरासाठी नवीन वृत्तपत्रीय भाषा तयार करावी लागली कारण त्याआधी मराठी भाषेत संतवाङमय आणि नंतर पोवाडे वगैरेसारखे साहित्य निर्माण झालं होतं. नोकरशाही, सनदशीर मार्ग इत्यादि शब्द लोकमान्यांनी स्वत: निर्माण केले. इंग्रजांनी संस्थाने खालसा करून आपल्या ताब्यात घेतलेला तो काळ होता. इंग्रजांचे एजंट होतेच पण कारभार देशी लोकांकडे होता. हे देशी दिवाण राजवाड्यापासून खाजगीपर्यंत मुक्तपणे ढवळाढवळ करत. हाती सत्ताही भरपूर. त्यामुळे केसरीने ह्या लोकांचे कारनामे उघडकीस आणायला सुरुवात केली. यातूनच पुढच्याच वर्षी उपजलं... कोल्हापूर प्रकरण. हा त्यांच्या वृत्तपत्रीय अनुभवाचा पहिला धडा होता.

## कोल्हापूर प्रकरण.

कोल्हापूरचे महाराज आणि त्यांचे दिवाण माधवराव बर्वे. हे महाराज वेडे होते असा प्रवाद होता. लोक म्हणत की बर्व्यांच्या वागणुकीमुळे ते वेडे झाले. काही म्हणत की ते मुळीच वेडे नाहीत. पण केसरी जेव्हा या संस्थानांच्या कारभाराबद्दल लिहायला लागला तेव्हा कोल्हापूरहून राजपक्षाचे अनेक लोक महाराजांबद्दल काही ना काही माहिती पुरवू लागले. तेव्हा केसरीने त्यात लक्ष घातले. सर्व घटना घडली ती अशी :- दिवाण माधवराव बर्व्यांचे खासगी कचेरीत एक रामभाऊ ऐनापूरकर नावाचे बर्व्यांचे अतिशय विश्वासू नोकर होते. महाराज जिथे जिथे जातील, तिथे तिथे हे रामभाऊ हटकून असायचेच. म्हणून लोक त्यांना माधवरावांचे हेर असेही कुजबुजत. एकदा २७ नोव्हेंबर १८८१ या दिवशी रामभाऊंकडे रामचंद्र शेगुणीकर नावाचे त्यांचे मित्र आले. रामभाऊ घरात नव्हते, म्हणून ते रामभाऊंची वाट पाहात बसले. तोपर्यंत त्यांना काही लिहायचे होते, ते लिहिण्यासाठी एक कोरा कागद शोधू लागले. तेव्हा त्यांना एक गुंडाळी दिसली. ती कशाची आहे म्हणून त्यांनी ती उलगडली तर त्यात माधवराव बर्व्यांच्या सहीनिशी

महाराजांबद्दलचा काही मजकूर आणि काही कागद आणि बर्व्यांनी ऐनापुरकरांना लिहिलेली पत्रे होती.

आपल्या हाती मोठे घबाड लागले हे जाणून शेगुणीकर ते भेंडोळे खिशात घालून निघून गेले, आणि त्यांनी ती पत्रे ज्ञानप्रकाशचे वामनराव रानडे यांना दाखवली. त्यांनी ते सर्व कागद लोकमान्य, आगरकर, महाराजांची पहिली आई राधाबाई यांचे वकील नाना भिडे, यांना दाखवली. कायद्याच्या अनेक बाजूंनी तपासल्यावर रानड्यांनी ते कागद ' ज्ञानप्रकाश ' मधे छापले. त्याचवेळी महाराजांच्या पहिल्या आईचे मुखत्यारपत्र घेतलेले कोल्हापूरातले प्रसिध्द वकील नाना भिडे हे पुण्यात आले होते. त्यांनी पुण्याच्या सभेत महाराज वेडे नाहीत, त्यांना तसं ठरवलं जातंय असं रसभरित वर्णन करून लोकांना हेलावून सोडलं. ते राजघराण्यापैकी वकील असल्यामुळे लोकांनी त्यावर विश्वास ठेवला.

सभेचा वृत्तांत देण्यासाठी ह्याचा परामर्ष केसरीला घ्यावाच लागला. मग केसरीने बर्वे, सगळा कारभार ह्यावर झोड उठवली. भिड्यांनी ही पत्रे लोकमान्यांना दाखवली. लोकमान्यांनी कायद्याच्या नजरेतून त्यांची छाननी केली, बर्व्यांच्या सहीचे कागद तपासले आणि ज्या अर्थी भिड्यांसारखा वकील त्यावर विश्वास

ठेवतो आहे त्या अर्थी ती खरीच असली पाहिजेत असं मानून १८८१ च्या नोव्हेंबरमधे केसरीत छापली. एवढा सगळा बोभाटा झाल्यावर अँग्लो इंडियन वृत्तपत्रांनी सरकारची बाजू घेऊन विषयाला धार चढवली. एवढी नाचक्की झाल्यामुळे दिवाण बर्वे यांनी केसरी विरुध्द अब्रुनुकसानीची फिर्याद ठोकली. केसरीनेही ते आव्हान स्वीकारले.

७ फेब्रुवारीला मुंबईच्या कोर्टात केस उभी राहिली तेव्हा बर्व्यांनी आपल्यावरचे आरोप नाकारले आणि ही पत्रे मी लिहिलेली नाहीतच असं सांगितलं. नाना भिडे, टिळक, आगरकर, रानडे, आणि बखले एवढे आरोपी ठरले. आरोपींच्या वतीने फिरोजशहा मेहता यांनी केस लढवली. अनेक दिवस केस चालली. शेवटी अक्षरतज्ज्ञाने हे हस्ताक्षर बर्वे यांचं नाही आणि ती सही कुणीतरी ट्रेसपेपरवरून उतरवल्याचं सांगितलं. लोकमान्यांनी स्वहस्ते एक माफीपत्र दिवाण बर्वे यांना लिहून पाठवलं. १८८२ सालच्या ७ जुलैला खटल्याचा निकाल लागला. त्यात लोकमान्य आणि आगरकर यांना चार महिन्यांची साधी कैद अशी शिक्षा झाली आणि त्यांची रवानगी डोंगरीच्या तुरुंगात झाली. चांगल्या वागणुकीबद्दल त्यांना १९ दिवसांची सूट मिळाली आणि १०१ दिवसांची सजा भोगून दोघे बाहेर आले. या दिवसांमधे

लोकमान्यांचे वजन २४ पौंडांनी आणि आगरकरांचे १६ पौंडांनी कमी झालं होतं.

पुण्यात हा खटला चालला असता, ज्युरी नेटिव्ह असते तर या दोघांना एवढी शिक्षा झाली नसती असा लोकांचा ग्रह होता म्हणून ते सुटून आल्यावर त्यांचा दोघांचा मोठा सत्कार झाला. लोकमान्यांचा तुरुंगवासाचा हा श्रीगणेशा होता. आणि आगरकरांची ही एकमेव कैद होती. आपल्या १०१ दिवसांच्या अनुभवाने तावून सुलाखून नुघालेल्या आगरकरांनी त्या १०१ दिवसांवर जे पुस्तक लिहिलं त्यात नव्या राजकीय तंट्यात पडणाऱ्या लोकांना एक महत्वाचा सल्ला दिला.

" प्रेम, विश्वास वगैरे एकीकडे ठेवून पक्के नास्तिक बनावे. जगातला हरएक माणूस जब्रा लफंगा आहे असे मानून उपयोगाचे जे काही असेल, त्याचे टाचण बनवावे. त्यावर सह्या घ्याव्यात आणि ते ऐवज वेळ येईपर्यंत एका मोठ्या मजबूत लोखंडी पेटीत बंदोबस्तात ठेवावेत. " कोल्हापूर प्रकरणातील पुराव्याला उपयोगी पडणारी बड्या बड्या लोकांची सहीसकट पत्रं होती, पण घाबरटपणामुळे या लोकांनी माघार घेतल्यामुळे या लोकांना वाचवण्यासाठी आपण ती हजर न करता शिक्षा सोसायला तयार झालो असं ते सांगत.

१०१ दिवस डोंगरीच्या तुरुंगात असतांनाही टिळक आणि आगरकर यांचे वादविवाद चालूच असत. पांघरायला दिलेल्या कांबळ्यात सुरवंट, कोठडीतली ढेकणांची रांग मारत असतांना एवढ्या मोठ्या आवाजात वाद चालत की अधिकारी येऊन त्यांना हळू आवाजात बोलायची तंबी देऊन जात. आणि विषय तरी कोणते. स्वार्थसाध्य करण्याचे नसत तर, राष्ट्र कसं पुढे नेता येईल याच विचारांमधे दोघे असत.

## फर्ग्युसन कॉलेजची स्थापना.

न्यू इंग्लिश स्कूलची भरभराट जोरात सुरू झाली. १८८१ सालात केसरी मराठाही निघाले. टिळक-आगरकर-चिपळूणकर-माधवराव नामजोशी-वामनराव आपटे यांना लोक पंचायतन या नावाने ओळखू लागले. या पंचायतनच्या महत्वाकांक्षेला आणखीन धुमारे फुटू लागले. आणि कॉलेज काढायची कल्पना डोक्यात घोळू लागली. त्याचा परिपाक म्हणजे २४ ऑक्टोबर १८८४ या दिवशी गद्रे वाड्यात सर वेडरबर्न यांच्या अध्यक्षतेखाली रीतसरपणे डेक्कन एज्युकेशन सोसायटीची स्थापना करण्यात आली. १८८२ साली चिपळूणकर यांचं निधन झालं. त्यामुळे मूळचे बाकी चौघे, काशीनाथ त्रिंबक तेलंग, वर्डस्वर्थ, वेडरबर्न, आणि रावसाहेब मंडलिक यांची तहहयात सभासद म्हणून नियुक्ती झाली. नंतर त्यात गोळे, केळकर, धारप यांचीही नावे जोडली गेली. अशातऱ्हेने २ जानेवारी, १८८५ या दिवशी, मुंबईचे गव्हर्नर सर जेम्स फर्ग्युसन यांच्या नावाने फर्ग्युसन कॉलेजची स्थापना झाली. विद्यार्थ्यांची संख्या कमी होती म्हणून गद्रे वाड्यातच कॉलेज सुरू झालं. नंतर मोठ्या थाटामाटाने शाळेच्या इमारतीचा कोनशिला समारंभ ५ मार्च १८८५ या दिवशी करण्यात आला पण तो वाया

गेला आणि चतुर्श्रुंगीच्या मैदानावर परत ११ जानेवारी, १८९१ या दिवशी मुंबईचे गव्हर्नर लॉर्ड हॅरिस यांच्या हस्ते नवीन कोनशीला समारंभ पार पडला. पण तोपर्यंत कॉलेजचे वर्ग गद्रे वाडा आणि जवळचा होळकर वाडा या वास्तूंमध्येच भरत असत. शिक्षक वर्ग तोच होता. ते कॉलेजही नावारूपाला आलं. ते यश पाहून लॉर्ड रे यांनी डेक्कन कॉलेजसुद्धा फर्ग्युसन कॉलेजमध्ये सामावून घेण्याची सूचना चालकांना केली पण मंडळाने ती नामंजूर केली. तेव्हा संतापलेल्या लॉर्ड रे यांनी डेक्कन कॉलेजला मिळणारी सरकारी ग्रँट बंद करून टाकली.

टिळक-आगरकर यांनी सुरू केलेले हे शाळा-कॉलेज-केसरी मराठा हे ज्ञानाचे झरे अव्याहतपाने भरभरून वाहायला लागले. पण केसरी-मराठा मध्ये या पाण्याला फाटे फुटायला लागले. त्याचं मूळ कारण होतं ते सुधारक विचारांचे आगरकर, आणि बाकी परंपरावादी लेखक. वर्तमान पत्रासाठी लेखकांची उणीव नव्हती पण वेगवेगळया विचारांचे अग्रलेख प्रसिद्ध होऊ लागले. त्यातच रखमाबाई विवाह खटला, बालविवाहाचा वयाचा कायदा यावरून सगळीकडेच वादांचं मोहोळ उठलं आणि चालक मंडळातील मतभेद आणखीनच तीक्ष्ण झाले. इंग्रजी सरकारने आपल्या चालीरीतीत कायद्यांची ढवळाढवळ करायला आगरकर सोडून इतरांचा विरोध होता. आमचे कायदे आम्ही बघू हा त्यांचा

दृष्टकोन तर आगरकरांना सरकारचा कायदा महत्त्वाचा वाटत होता. शेवटी ऑक्टोबर इ. स. १८८७ मध्ये केसरीमध्ये त्याचा परिणाम पाहायला मिळाला. त्यादिवशीची जाहिरात होती –

आजपासून रा. बाळ गंगाधर टिळक बी. ए. एल. एल. बी. हे केसरीचे प्रकाशक झाल्यामुळे प्रकाशकत्वाची जबाबदारी त्यांच्यावर आहे. रा. गोपाळ गणेश आगरकर यांच्यावर ती जबाबदारी राहिलेली नाही.

अशारीतीने आगरकरांचा केसरीशी संबंध संपला. मग गोपाळ कृष्ण गोखले यांच्या बरोबर त्यांनी सुधारक सुरू केला. समाजात होणाऱ्या नवनवीन सामाजिक प्रश्नांनी टिळक-आगरकर यांच्यातील दोन विरुद्ध प्रवाहांची दरी वाढत गेली. दोघेही बुद्धीमानी आणि मताभिमानी यामुळे दोघेही दूर जाऊ लागले. त्यांच्यातच नव्हे तर त्यांच्यामुळे साऱ्या पुण्यातच दोन विचारांचे दोन तट पडले. सर्वांनाच या दोघांबद्दल सारखाच आदर होता. दोघेही तांब्यांच्या वाड्यात शेजारी शेजारी म्हणून एकत्रच राहत होते, व्यवसायातही एकत्र होते. पण होळकरांच्या एका निरोपामुळे दोघेही कायमचे दुरावले.

घडलं ते असं!

इंदूरचे महाराज श्रीमंत शिवाजीमहाराज होळकर हे लोकहितासाठी, मराठीच्या उन्नतीसाठी झटणाऱ्या संस्थांना आणि व्यक्तींना वेळोवेळी सहाय्य करत असत. इ. स. १८८८च्या डिसेंबरमधे त्यांनी स्थानिक वृत्तपत्रांचे संपादक आणि सार्वजनिक कार्यकर्ते यांचा दरबारी प्रथेनुसार शेला- पागोटे देऊन सत्कार समारंभ घडवून आणला. त्यात टिळक-आगरकरांनाही आमंत्रण होतं. त्या दिवशी दोघे गेले नाहीत म्हणून दुसरे दिवशी आपल्या ए.डी.सी. ला पाठवून त्या दोघांना बंगल्यावर बोलावलं. त्याप्रमाणे हे दोघे गेले. महाराजांनी शेला-पागोटे देऊन सत्कार केला आणि ७०० रुपये दिले. लोकमान्यांना ते पैसे दोघांच्यातच वाटून घेणे प्रशस्त वाटलं नाही, म्हणून ते पैसे डेक्कन एज्युकेशनच्या सर्व सभासदांमधे वाटण्याची महाराजांची अनुमती मागितली. महाराजांनी त्यांस संमतीही दिली. पण दुसरे दिवशी सकाळीच, त्यांनी आपला विचार बदलला. आगरकरांना त्या रकमेपैकी ४०० रू. द्यावेत आणि बाकी 300 रू. सर्व सभासदांमधे वाटून घ्यावेत असा निरोप पाठवला. टिळक आगरकर वादाचं हे मूळ बीज.

हा निरोप गेल्याबरोबर लोकमान्यांनी ए.डी.सी. गुप्ते यांना पत्र लिहिलं आणि विचारलं की, तुम्ही ७०० रू. शैक्षणिक कार्यासाठी आणि सभासदांनी त्यासाठी केलेल्या त्यागासाठी दिले

आहेत असे म्हटले होते. म्हणून मी ते आमच्या सर्व सभासदांमधे वाटून घेतले. त्यासाठी आता पुढे काय करावं ते आम्हाला कळवा. त्या पत्राची दुसरी कॉपी त्यांनी आगरकरांना लिहिली आणि त्यांची त्यावर अनुमती मागितली. त्यावर आगरकरांनी लोकमान्यांना खरमरीत पत्र लिहिलं आणि त्यात आणखी ज्या घटना घडल्या होत्या त्याचा त्यात उल्लेख केला. ती घटना म्हणजे....होळकर महाराजांच्या बंगल्यावर सकाळी जाऊन आल्यावर आगरकरांना कळलं की, महाराजांकडून एक माणूस घरी आला होता आणि पुण्यातल्या_सर्व लेखकांची नावं त्याने मागितली. विद्यार्थ्यांमधे चांगल्या लेखकांची पुस्तकं वाटावीत असा महाराजांचा मानस होता. मग आगरकरांनी गुप्त्यांना एक चिठ्ठी पाठवून स्वत: ' वाक्यमिमांसा आणि विकारविलसित ' लिहिलेली दोन पुस्तके आगरकरांनी महाराजांकडे पाठवली. त्या दोन्ही पुस्तकांचं बिल ४०० रू. झालं होतं. म्हणून महाराजांनी टिळकांना ४०० रू. आगरकरांना द्यावेत असं कळवलं होतं. हा व्यवहार लोकमान्यांना माहीत नसल्यामुळे नेहमीच्या शिरस्त्याप्रमाणे लोकमान्यांनी ७०० रू. सर्वांमधे वाटून घेण्याचं ठरवलं आणि महाराजांचा त्याबाबत सल्ला मागितला.

आगरकर त्यामुळे खवळले आणि त्यांनी अत्यंत बोचरं पत्र लोकमान्यांना लिहिलं. त्यात,

" तुम्हीच महाराजांना ४०० रू. वेगळे द्यायची चिठ्ठी लिहायला हवी होतीत, मला हे ४०० रुपये जन्मभर पुरणार नाहीत हे चांगलं माहीत आहे पण, मी तुमच्यासारखा श्रीमंत नाही, मला त्या पैशातून माझ्या आईवडिलांना काशीयात्रा घडवायची होती, तुम्हाला उत्तम आरोग्य लाभलंय पण मला नाही, मला पैसे मिळू नयेत अशीच तुमची इच्छा असलेली मला दिसते आहे, अशा कडवट मजकूराचं पत्र लिहिलं आणि हे माझं तुम्हाला लिहिलेलं शेवटचं पत्र असेल हेही जाहीर करून पत्र संपवलं.

या भांडणातही त्यांचे तरुणपणीचे दिवस आणि त्याच्या आठवणी सुप्तपणे दडलेल्या होत्या. या दोघांची शाळेत शिकवण्याची पध्दत अगदी वेगळी होती. आगरकरांनी लिहिलं.. शाळेतसुध्दा तुम्ही वर्गावर वेळेवर जात नव्हतात.. लोकमान्यांनी पुढच्या पत्रात उत्तर दिलं... तुम्ही शिकवतांना इकडतिकडच्या भाकडकथा रंगवून सांगत बसता. माझा पाऊण तास काय आणि तुमचा एक तास काय, शिकवणीच्या दृष्टीने दोन्ही सारखंच. ही भांडणं आगरकरांच्या शेवटापर्यंत चालूच राहिली. आगरकरांनी मतभेदांमुळे शाळा सोडली आणि ते केसरीतूनही बाहेर पडले. एक वर्षानंतर त्यांनी

आपला स्वत:चा 'सुधारक' चालू केला. सडेतोड लेखनासाठी ' सुधारक ' प्रसिध्द झाला. त्यातून आता वास्तव वाटणाऱ्या सुधारणांचा पाया घातला गेला. लोकमान्यांनीही डे. ए. सोसायटी मतभेदांमुळे पुढे सोडली. पैशाच्या दृष्टीने, धोरण ठरवण्याच्या दृष्टीने, १८९१ साली केसरी आणि मराठाची मालकी लोकमान्यांकडे आली आणि त्यांच्या मृत्यूपर्यंत त्यांच्याकडेच राहिली. दोघांच्यात जिव्हाळा आणि मित्रप्रेमही खूप होतं, म्हणूनच आपल्या अंत्यसमयी आगरकरांनी लोकमान्यांना आपल्या भेटीला बोलावून घेतलं. एरवी पाऊण तासात अग्रलेख संपवणारेलोकमान्य, पण आगरकरांच्या निधनानंतर त्यांच्यावरच्या अग्रलेखाला त्यांना ४ तास लागले, तेव्हा लोकमान्य घळाघळा रडत होते. आगरकरांच्या सामाजिक विचारांपेक्षा त्यांच्या राजकीय आणि औद्योगिक विचारांकडे कुणी लक्ष दिलं नाही हे त्यांना दु:ख जास्त होतं.

आज १२५ वर्षांच्यानंतर दोघांच्या वादात कोण खरं हे जर ठरवायचं झालं तर त्यांचे ‘’ सुधारका ‘’ मधले लेख आठवायले हवेत. त्यांना अंत्यसंस्कार अजिबात आवडायचे नाहीत.. तो अश्म, ते मडकं फोडणं, त्यांना बघावत नसे. त्यांच्या आईच्या तेराव्याला कोणतेही विधी न करता, त्यांनी १०० माधुकरी विद्यार्थ्यांना बोलावून एक मूद भात आणि १ पैसा दानधर्म केला होता. आज

किती लोक विद्युतवाहिनीमध्ये विनासंस्कार अंत्यविधी करतात? उलट माणूस जितका प्रसिद्ध, तितका त्याच्या अंत्यसंस्कार विधीचा सोहळा मोठा असतो. त्यांचा दुसरा लेख होता, '' स्त्रियांचा पेहेराव. '' त्यात ते लिहितात की व्यवसायाप्रमाणे पेहेराव असावा, चलनवलनास सोपा असावा. म्हणून ते एकसारखा पदर सांभाळत बसणाऱ्या स्त्रियांना, स्त्रियांनी कमीजसारखा पेहेराव लुगड्यावर घालावा म्हणजे त्यांचे दागिनेही दिसतील..असा आज १०० वर्षांच्यानंतर भारतातील मोठ्या शहरातील अनेक स्त्रिया पंजाबी ड्रेस घालायला लागल्या आहेत.. ते पुरूषांना सांगत की सोन्यात गुंतवणूक करण्यापेक्षा उद्योगात सल्लापैसा गुंतवा. उत्तम कपडे घाला म्हणजे तुमचा आत्मविश्वास वाढेल.. आज त्या वाक्याचा परामर्श घेतला तर किती पुरुष सोन्यात किती पैसा गुंतवतात, ते अभ्यासाचं ठरेल. समाज सुधारणा करणाऱ्यांना लोकांनी दूर ठेवलं, महर्षि कर्व्यांना अनाथ बालिकांसाठी हिंगण्याला दूर जाऊन आश्रम उघडावा लागला आणि महात्मा फुल्यांना दगड खावे लागले.

आगरकरांच्या पाठोपाठ २ वर्षांमध्ये लोकमान्यांनाही डेक्कन एज्युकेशन सोसायटीचा राजीनामा देऊन बाहेर पडावं लागलं. त्यांनी आपला राजीनामा पाठवून दिला.

आपल्या राजीनाम्यात त्यांनी सर्व कारणं स्पष्ट लिहिली. सोसायटी स्थापनेच्या वेळी मिशनरी पद्धतीने शाळा चालवण्याच्या सुरुवातीच्या ध्येयाला तडे जाऊ लागले. सर्वांनी सारखा पगार घ्यायचा हे तत्त्वही मागे पडायला लागलं. नवीन आलेल्या लोकांमुळे बहुमत मागे पडायला लागलं. सुधारक, सनातनी यांच्या मतभेदांमुळे वाद सुरू झाले. छापखाना आणि वर्तमान पत्र यांच्यातही वाद होऊ लागले. त्यावर मार्ग म्हणून दोन्ही वेगळी केली गेली. याशिवाय पगार, युरोपियन प्रोफेसर घ्यावा की न घ्यावा, बोर्डिंग काढावे की न काढावे, अशा वादांची त्यात भर पडली. लोकमान्यांच्या सडेतोड बोलण्यावरही टीका झाली. शेवटी लोकमान्यांनी राजीनामा दिला. त्यात ते लिहितात,

'' माझ्यात दोष नाहीत असं नाही. मी टाकून, तोडून पुष्कळांना दुखावलं आहे. पण ते प्रतिक्रियेपुरतं. मी जे जे बोललो ते संस्थेच्या हितासाठी. मी तुमच्यात राहण्याने निरंतर भांडणे होण्यापेक्षा मी सोडून जावं हे बरं. त्यामुळे मूळ तत्त्वे बुडतील पण भांडणे तरी वाचतील. मी आज शाळा सोडण्याने साऱ्या जन्माचे ध्येय सोडले असं वाटत राहील पण इलाज नाही. '' सरकारने मदत देऊन शाळेच्या कारभारात हात घालण्याचा प्रयत्न केला, सरकारने हवं तर मदत द्यावी पण संस्थेच्या कामात ढवळाढवळ करू नये असं त्यांचं मत होतं. म्हणूनच सरकारी ग्रँट घेऊ नये या विचाराचे

होते, आणि त्यामुळेच त्यांना विरोध झाला असं त्यांनी इंग्लंडच्या भेटीत इंग्लंड अँड इंडियाच्या बातमीदारला सांगितलं.

अशा तऱ्हेने १४ ऑक्टोबर १८९० या दिवशी लोकमान्यांचा डेक्कन एज्युकेशन सोसायटी बरोबरचा संबंध संपला.

एक दशक ज्ञानमार्गावर चालून हा मार्तंड आता पुढचं दशक लोकहितासाठी तळपणार होता. इंग्रजांच्या काहिलीला कारण ठरणार होता आणि त्यांच्या रोषाचा बळी ठरून अंधाराच्या कोठडीत जाऊन ग्रहणासारखा काही काल भारतीयांच्या नेत्र पटला आड जाणार होता. लोकमान्यांसाठी १८९० ते १९०० हे दशक वादळी वाऱ्यांचं ठरणार होतं आणि कितीही सूर्याबिंब झाकायचा प्रयत्न झाला तरी कृष्ण मेघांच्या आडून तो आपली प्रभावळ चमकावत राहतो तसे ते आणखीनच तेजाने झळाळून उठले. या शेवटच्या दशकात क्रॉफर्ड प्रकरण, प्लेगचं थैमान, राजद्रोहाचा खटला, बाबामहाराज वारस प्रकरण, Rand यांचा खून, चाफेकर खून खटला, हे खडतर दिवस आणि दुसरीकडे ओरायन या अमोल खगोलशास्त्रीय साहित्याची निर्मिती यांनी व्यापून गेलं.

## ग्रामण्य प्रकरण – ( प्रायश्चित्त प्रकरण )

या प्रकरणाला मूळ कारण पंचहौद मिशन चहापान. सन १८९१ मधली ही गोष्ट. याला कारण एकच व्यक्ती होती. ती म्हणजे गोपाळराव जोशी. ही एक विक्षिप्त वल्ली होती. शिक्षण बेताचं पण सामाजिक प्रगतीच्या बाबतीत सुधारकांच्याही पुढे. आपल्या बायकोला, आनंदीबाईला अमेरिकेला डॉक्टर व्हायला पाठवल्यामुळे ते प्रसिध्दीला आले. धर्म ही एक थट्टा आहे, केव्हाही धर्म घेतला-सोडला तरी त्यामुळे माणसामधे काहीही फरक पडत नाही, धर्मांतर हीसुध्दा थट्टा आहे असं मत त्यांनी जाहीर तर केलंच, वर, पुण्यात संगमावर बाप्तिस्मा घेतला, तो घेतल्यावर यात काहीही अर्थ नाही, असं म्हणून परत गंध लावलं आणि पाद्री-भटांवर तुटून पडले. त्यामुळे ख्रिस्ती आणि हिंदू दोन्ही धर्माच्या लोकांची ह्यांना कुठल्या धर्मातलं मानायचं यावरून पंचाईत झाली. अशा या माणसाच्या डोक्यात एक कल्पना आली. सुशिक्षित आणि सुधारक म्हणवून घेणाऱ्या लोकांची फजिती करण्याचं त्यांनी ठरवलं. गोपाळरावांची मिशनरी लोकांबरोबर मैत्री होती, म्हणून त्यांनी वेताळपेठेतल्या पंचहौद मिशन शाळेत, तिथले शिक्षक रे. रेव्हिंग्टन यांच्यामार्फत पुण्यातल्या पन्नास सुशिक्षितांना व्याख्यानाचं

आमंत्रण पाठवलं. त्यावेळी सुधारणेचा वाद जोरात चालू होता. या व्याख्यानाला रानडे आणि लोकमान्य गेले. व्याख्यान सुमारच होते, पण नंतर टेबलावर चहा आणि बिस्कीटं आली. जमलेल्यांची अर्थातच पंचाईत झाली. चहा न प्यावा तर सुधारक नाहीत, प्यावा तर आपले लोक वाईट म्हणणार. परत मिशनरीही हसणार. पण या चहाच्या पेल्यात मोठं वादळ धुमसत होतं याची गोपाळरावांव्यतिरिक्त कुणालाच कल्पना आली नाही. गोपाळरावांना बोभाटा करण्याची जास्त खुमखुमी होती म्हणून त्यांनी लगेच पुणे वैभव या वृत्तपत्राकडे धाव घेतली आणि जे आले नव्हते त्यांचीही नावे वृत्तपत्रात घातली. पुणेवैभवमधे चहा घेतलेल्यांची नावं आल्यावर या पुरातून वाहून जातांना रानड्यांनाही आपल्या पाठीवर घेणं लोकमान्यांना प्राप्त झालं. ही नावं वाचून सनातनी पक्षाला दखल घेणं भागच पडलं. गोपाळराव मजा बघत बसले पण जी खोटी नावं त्यात घातली गेली त्यासाठी पुणेवैभवला २०० रुपये दंड  झाला.

सरदार बाळासाहेब नातू पुराणमतवादी पक्षाचे. यांनी शंकराचार्यांकडे फिर्याद नोंदवली. शंकराचार्यांतर्फे व्यंकटशास्त्री निपाणीकर आणि न्यायगुरू बिंदुमाधवशास्त्री धर्माधिकारी यांना निवाडा करण्यासाठी पाठवलं. या कमिशनमुळे गावात जोरात चर्चा सुरू झाली. कुणीही त्यांना किंमत देत नव्हतं. कुणी काहीच वाईट

बोलत नव्हतं. ५० लोकांपैकी ४२ लोकांनी  जात मोडण्यासाठी चहा घेतला याला पुरावा मिळेना. रेव्हिंग्टन साक्षीला येईनात आणि गोपाळरावांना बोलावण्याची कुणाला छाती होईना. त्यातून लोकमान्य जेव्हा धर्मग्रंथांचा भारा बांधून या फिर्यादींविरूध्द दंड थोपटून उभे राहिले तेव्हा तर त्यांना शास्त्राधारही सापडेना. लोकमान्य म्हणाले चहाला विरोध करणाऱ्यांनी बर्फ आणि सोडावॉटर पिणारांवरही गुन्हा दाखला करावा. हे पदार्थ आपल्या संस्कृतीत नसल्यामुळे त्यांना धर्मबाह्य समजण्याला आधारच नाही. कमिशनच्या दोघांना बाजूला सारून शेवटी शंकराचार्यांकडे, आमच्या म्हणण्याप्रमाणे निकाल द्या, असं सांगायचं ठरलं.

शेवटी लोकमान्यांनी केसरीमधून प्रायश्चित्त प्रकरण नीट समजावून सांगून सर्व शास्त्राधार मूळ वचनांसह विशद करून सांगितला. कमिशनने निकाल दिला. मिशनमधे जाऊन चहा प्यालेले चारच होते. लोकमान्य, वासुदेवराव जोशी, रामभाऊ साने, आणि परांजपे यापैकी, जनमताची नाडी ओळखणाऱ्या लोकमान्यांनी चहा घेतल्यावर काशीस जाऊन सर्व प्रायश्चित्त घेतल्याचा दाखला दिला म्हणून ते सुटले.  बाकी तिघांना प्रायश्चित्त घ्यावे लागले.   पण एवढ्यावर हे प्रकरण संपलं नाही. सुधारक म्हणवणाऱ्या ज्यांनी कमिशनला जुमानलं नाही ते लोकांकडून वीर समजले गेले. पण रानड्यांसारखे सुधारक म्हणवणारे पण

कमिशनला मानणारे होते त्यांना लोकांनी धिक्कारलं. त्यामुळे बखेडा चालूच राहिला. गोपाळरावांच्या या उपद्व्यापाचा चहाला गेलेल्या सर्वांनाच कौटुंबिक त्रासही झाला. त्यांना वाळीत पडावं लागलं. लोकमान्यांच्या थोरल्या मुलीचं लग्न आणि थोरल्या मुलाच्या मुंजीच्या वेळी विधी करण्यासाठी ब्राह्मण मिळेनात, स्वयंपाकी मिळेनात. इतर दोषी लोकांच्या घरी जेवायला लोक येईनात. मुलीबाळींना सासरची माणसं माहेरी पाठवेनात. श्रावणीला लोकमान्यांनीच सगळे विधी केले. एक मोठं वादळ शेवटी विरून गेलं तरी उध्वस्त मनांची पडझड करून गेलं. सगळं एका गोपाळरावांमुळे !

( ग्रामण्याच्या ) प्रायश्चित्ताप्रमाणेच लोकमान्य जेव्हा चिरोल केस संपवून भारतात आले, तेव्हा पुराणमतवादी लोकांनी ते विलायतेला जाऊन आल्याबद्दल प्रायश्चित्त कधी घेतील याकडे लक्ष ठेवलं होतं. शेवटी सिद्धेश्वर शास्त्री चित्राव हे सरळच त्यांना प्रायश्चित्त घ्या असं सांगायला त्यांच्या घरी गेले. तेव्हा ते सुपारी कातरत आराम खुर्चीत बसले होते. त्यांनी शास्त्रीजींना सरळच विचारलं की मी तुमच्याकडे जेवायला येत नाही तर प्रायश्चित्त घ्यायला कशाला सांगता? माझा घरातही कुणाशी संबंध नाही आहे. मी माझा आचारीही वेगळा ठेवला आहे. त्यावर आपली संस्कृती जपली जाते असा शास्त्रीजींनी म्हटल्यावर ते म्हणाले की

मी प्रायश्चित्त घेईन पण मला वेळ झाल्यावर.तुम्हीही उगीचच त्याचं स्तोम माजवू नका. शेवटपर्यंत त्यांनी ते घेतलंच नाही. पण खाडकन स्पष्ट बोलून त्यांना दुखावलंही नाही.. हाच फरक सुधारक आणि त्यांच्यात होता.

## पुण्यातील प्लेग.

साल १८९६ हे अस्मानी संकटाचंच ठरलं. आधीच दुष्काळ, त्यात प्लेगची साथ अशा दुहेरी जीवघेण्या संकटात महाराष्ट्र भाजून निघाला. ही ब्युबोनिक प्लेगची साथ मुंबईतील मांडवी भागात ऑक्टोबरमध्ये सुरू झाली आणि बघता बघता मुंबई भर पसरली. ४०० लोक एक महिन्यात मृत्यूमुखी पडले. त्या भीतीने गाव सोडून बाकी लोक गुजराथकडे जायला लागले. ३ महिन्यात मुंबईतील कचेऱ्याही बंद पडल्या. मुंबई सरकार रोग आटोक्यात आणण्यासाठी सक्तीचे उपाय योजायला लागलं. गावाची स्वच्छता सुरू झाली. ही साथ जवळच्या पुण्यात पोचायला वेळ लागला नाही. सरकारने आधी बेफिकिरी आणि मग लोकांवर जुलूम सुरू केले. लष्करी शिस्तीचा धाक सुरू झाला. अधिकाऱ्यांना प्रश्न विचारण्याचा अधिकार लोकांकडे ठेवलाच नाही. लष्करी अधिकारीही उर्मटपणे वागू लागले. दहशतीची आवड असलेले अधिकारी मुद्दाम निवडण्यात आले. रोग्याला सरकारी हॉस्पिटलमध्ये नेऊन टाकणं हे जुलूमाची छावणी बनली. त्यातच रँड नावाचा अधिकारी कर्नल फिलिप्स आणि कॅप्टन बेव्हरीज यांना मदतीला घेऊन पुण्यात अवतरला आणि लोकांच्या त्रासाला सीमा राहिली नाही.

केसरीने लगेच सरकारचे दोष आणि जनतेमध्ये जागरूकता आणण्यासाठी लेख सुरू केले. कोणत्याही घरात हिन्दी शिपायांबरोबर हे सोल्जर्स शिरायला लागले, वस्तूंची उलथापालथ करणं, वस्तू खिशात घालणं, देवघरात शिरून देव भ्रष्ट करणं, बूट घालून घरभर फिरणं आणि कुणी विरोध दाखवला तर त्याला मारणं सुरू केलं..त्यामुळे लोक या जुलूमाला त्रासले. केसरीमधून या लोकव्यथा छापून यायला लागल्या.

लोकमान्यांनी स्वत: हिंदूसाठी खासगी हॉस्पिटल काढायचा प्रयत्न सुरू केला. गावातील डॉक्टरांना बोलावून या साथीसाठी काय उपाय करावेत याची माहिती घेऊन ती सरकारकडे दिली. लोकमान्यांच्या या प्रयत्नांना यश येऊन फर्ग्युसन कॉलेज जवळ एक खासगी हॉस्पिटल जरा वरच्या आर्थिक स्तरातील लोकांसाठी सुरू झालं. त्याची व्यवस्था काळुराम भाऊ मनसाराम, परशुराम खूपचंद अशा पुढाऱ्यांकडे देण्यात आली. डॉक्टर गर्दे, त्यांचे भाचे विष्णु वामन भागवत, सहस्त्रबुद्धे, जोग हे रोग्यांचा इलाज करायला लागले. इथे १० रुपये प्रवेश फी आणि १ रुपया रोजचा औषध खर्च एवढी फी आकारायला सुरुवात केली. याशिवाय ज्यांना आपली औषधं घ्यायची असतील त्यांना तीही परवानगी देण्यात आली. त्यामुळे रोगी आणि त्याचे नातेवाईक खूष झाले. बघता बघता तो एक नातेवाईक लोकांचा गप्पांचा अड्डाच

बनला. लोकमान्य रोज तिथे एक फेरी मारत आणि एक फेरी प्लेग कचेरीत करत असत. याशिवाय पुण्यातील धुमाकूळावर अग्रलेखातून समाचार घेतच असत. ज्या घरात रोगी सापडे, त्या लोकांसाठी विलगीकरण वसती स्वारगेटाजवळ उघडण्यात आली.. त्यांच्या जेवणाखाण्यासाठी कपडे धुण्यासाठी वेगळा रिलीफ फंड गोळा करण्यात आला. एवढ्या प्रयत्नांनी २ महिन्यात रोग आटोक्यात आला. मे महिन्यांनंतर लोकजीवन सुरळीत सुरू झालं. रँड च्या जुलूमांचा कहरही कमी झाला पण लोक त्याला विसरले नव्हते. साथीच्या वेळी गावी निघून गेलेले लोकही परत आले.

१२ जूनला लोकमान्यांनी शिवजन्माचा आणखी एक उपक्रम पुण्यातील लकडीपुलाजवळच्या विठ्ठल मंदिरात उत्सव सुरू केला. याआधी शिवराज्याभिषेक उत्सव रायगडावर झाला होता. या नवीन कार्यक्रमात पोवाडे कीर्तन तर झालंच पण प्रो. भानू यांनी अफजलखानाचा शिवरायांनी खून केला हा त्याकाळचा प्रचलित समज कसा चुकीचा आहे यावर भाषण केलं. नंतर लोकमान्यांचंही भाषण झालं. या कार्यक्रमावर मुंबईच्या पत्रामध्ये जस्टीस या टोपण नावाने कुणीतरी, वाक्यांची तोडमोड करून हा राजद्रोह आहे असा लेख लिहिला होता. त्याच वेळी लोकमान्यांना आपल्यावर काहीतरी संकट येणार याचा अंदाज लागला होता.

याला कारणंही तशीच होती. मराठा केसरीचा ताबा आल्यापासून अग्रलेखांची धारदार भाषा सूरीप्रमाणे सरकारच्या चुकीच्या धोरणांवर फिरायला लागली होती. लोकमान्यांची वाढती लोकप्रियता, त्यांनी सुरू केलेले उत्सव, त्यातून होणारी जनजागृती यामुळे लोकनायकत्व त्यांच्याकडे वळायला लागलं होतं. कॉंग्रेसमधेही त्यांचं वजन वाढायला लागलं होतं..हे सगळं सरकारला सलायला लागलं होतं. कुठेतरी कसंतरी त्यांना अडकवायची संधी सरकार शोधायला लागलं होतं आणि ती मिळाली पुण्यातच नव्हे तर साऱ्या महाराष्ट्रात खळबळ उडवून टाकणाऱ्या एका वेगळ्याच घटनेमुळे.

जून महिना सुरू झाला आणि लोकमान्यांवर आणि पुण्यावर कोसळलं ते सुलतानी संकट. ते वर्ष आणि तो महिना व्हिक्टोरिया राणीच्या ज्युबिली समारंभाचा होता. जूनच्या केसरीच्या अग्रलेखातून व्हिक्टोरिया राणीवर लोकमान्यांनी कौतुकाचे लेख लिहिले. २२ जून उजाडला. त्या रात्री गणेशखिंडीजवळच्या गव्हर्नर बंगल्यात राणीच्या समारंभानिमित्त खाना होता. त्याला मोठे मोठे प्रतिष्ठित लोक जमले होते. समारंभ संपल्यावर Rand आणि त्याचे स्नेही आयर्स्ट दाम्पत्य मध्यरात्री बग्गीतून परत जायला निघाले तेव्हा गणेश खिंडीतील झाडीतून अचानक एक मुलगा आला, गाडीच्या मागच्या बाजूने चढला

आणि त्याने रँड यांच्यावर गोळी झाडली, पण ती गोळी त्यांच्या खांद्याला लागली म्हणून ते जखमी होऊन गाडीत पडले, त्याचवेळी दुसऱ्या मुलाने आयर्स्ट याच्यावर हल्ला केला. त्यात मि. आयर्स्ट ठार झाले आणि बाई वाचल्या. त्या ओरडायला लागल्या, तेव्हा गोळीबार करून ती मुलं नाहीशी झाली. गोळीबाराचा आवाज ऐकून पोलिस, लोक धावले आणि रँड यांना हॉस्पिटल मध्ये घेऊन गेले. ११ दिवसांनी त्यांचा मृत्यू झाला, पण त्यांनी आपल्या जबानीत मुलाचं वर्णन केलं त्या आधारे सकाळपासून खुन्यांचा शोध सुरू झाला.

दुसरे दिवशी दोन तलवारी, दगड आणि एक बाटली अशा वस्तू घटनास्थळी मिळाल्या. पुण्याला पोलिसांची छावणीच तयार व्हावी इतके पोलिस तैनात केले गेले. नेमक्या त्याच वेळी रायगडाची शिवाजी उत्सवाची परवानगी नाकारणारे लॅम्ब कलेक्टर म्हणून पुण्यात आले आणि त्यावेळी गव्हर्नरकडून परवानगी आणवणाऱ्या लोकमान्यांचा सूड उगवायंला त्यांना निमित्त मिळालं. लोकमान्यांनी सरकारचे डोके ठिकाणावर आहे काय असा सणसणीत प्रश्न केसरीतून विचारत आपला निषेध जाहीर केला. खुन्याला पकडून देणाऱ्याला सरकारकडून २०,००० रुपयांचं बक्षीस जाहीर करण्यात आलं. ( या घटनेमधला एक महत्त्वाचा मुद्दा सरोजिनी नायडू यांनी मांडला होता. एवढा मोठा अधिकारी,

एवढ्या अपरात्री कार मधून न जाता, तो बग्गितून का गेला? त्याच्याबरोबर पोलिस सुरक्षा का नव्हती? )

त्या आधीच लोकमान्यांनी राज्य करणे म्हणजे सूड उगवणे नव्हे असा लेख १३ तारखेच्या केसरीतून लिहिला. त्याच सुमारास पार्लमेंटमध्ये लोकमान्यांचं भाषण राजद्रोह आहे काय असा प्रश्न विचारला आणि स्टेट सेक्रेटरीने, तो मुंबई सरकारचा निर्णय आहे असं उत्तर दिलं तेव्हाच लोकमान्यांना भविष्यातील खटल्याचा अंदाज आला होता..म्हणूनच त्यांनी मराठा पत्रात ‘ वादळ येऊ घातलंय, धोक्याचा बावटा लवकरच उभारला जाईल असं सांकेतिक भाषेत लिहिलं. त्यात भर पडली ती लंडनमध्ये असलेल्या गोपाळ कृष्ण गोखल्यांनी मॅंचेस्टर गार्डियनच्या बातमीदाराला दिलेल्या मुलाखतीत ते म्हणाले, ‘’ प्लेग कमिटीने अतिशय जुलूम केले म्हणून हे खून झाले असावेत. त्यांनी असंही सांगितलं की सोल्जर्स आणि प्लेग अधिकारी बायकांना रस्त्यावर आणून तपासत असत. एकदोन बायकांवर जुलूम होऊन त्यांनी जीवही दिला. या विधानाचा भडका उडाला आणि विलायतेत बसलेल्या गोखल्यांना कुणीतरी चुकीची माहिती पुरवली होती हेही बाहेर आलं. गोखल्यांना त्याबद्दल माफी मागायची वेळ आली.

त्यातच सरकारने प्लेग काळात जराही जुलूम झाला नाही हे विधान केल्याबरोबर लोकमान्यांनी जनतेला केसरीमधून

आवाहन करत आपल्या तक्रारी आपल्या पत्त्यांसकट लिहून पाठवा असं २० जुलैच्या पत्रात सांगितलं. सरकारला खोटं पाडण्यासाठी कचेरीकडे आलेले सर्व पुरावे गोळा करून मुंबईच्या चॅम्पियन पत्रात सोलजर्सच्या जुलूमांचा भडका उडवावा म्हणून ते २७ जुलैला मुंबईत आले. तोपर्यंत मुंबईत पहिलं राजद्रोहाचं चक्रीवादळ घुमायला लागलं होतं, अंगावर येऊन आदळायचं होतं, आणि ते आलंच. या वादळात देवदारासारखे ताठ कण्याने, लोकमान्य उभे राहिले. आकाश कोसळलं तर त्याच्या छातीवर पाय देऊन त्याच्यावर उभा राहीन म्हणणारे लोकमान्य, खरंच त्या वादळाला पायदळी तुडवून उभे राहिले आणि एका परीने त्यांनी इंग्रजांच्या कपट नीतीचाच निर्भयपणे चुराडा केला. आपलं मनोबल, आपली राष्ट्रभक्ती, आपली सहनशक्ति, दुर्दम्य विरोधशक्ति, कायद्याचं ज्ञान आणि लढण्याची दुर्धर हिंमत या सर्वांचा तो एक अग्निपरीक्षेसारखा उत्तुंग आविष्कार ठरला. त्याच दिवशी २७ जुलैला सरकारी सॉलिसिटर निकलसन यांनी ओरिएंटल ट्रांसलेटर मिर्झा अब्बास अली बेग यांच्या सहीने १२४ अ कलमाखाली मुंबईचे चीफ माजिस्ट्रेट स्लेटर यांच्यासमोर फिर्याद दाखल केली. आणि टिळक, आर्यभूषण छापखान्याचे मॅनेजर बाळ, आणि हरिभाऊ गोखले यांच्याविरुद्ध पकड वॉरेंट आणि झडती वॉरेंट घेतलं.

लोकमान्य स्वत:च या चक्रीवादळाच्या तडाख्यात अडकायला त्याच दिवशी आपलाही सरकारविरुद्धचा दारूगोळा घेऊन मुंबईत पोचले होते आणि नेहमीप्रमाणे आपले मित्र दाजी आबाजी खरे, हायकोर्ट वकील, यांच्या आंग्रेवाडीतील घरी उतरले होते. रात्रीचं जेवण उरकून दोघे बाहेर येऊन बसले इतक्यात गोरा सार्जंट आला, त्याने वॉरंट दाखवलं. खरे-टिळक दोघांनाही लगेच त्याचा अर्थही कळला. घरच्या गड्याला आपला बिछाना बांधायला सांगून लोकमान्य पोलीसाबरोबर त्याच्या गाडीत बसले आणि खरे जामीन मिळतो का ते विचारायला माजिस्ट्रेटकडे गेले. लोकमान्यांना घेऊन गाडी तडक पोलिस कमिशनरांच्या ऑफिसमध्ये आली. लोकमान्यांना एका खोलीत बंद करून कुलूप लावण्यात आलं. दाजीसाहेब खरे माजिस्ट्रेट स्लेटरकडे गेले पण काहीही होऊ शकणार नाही असं त्यांनी सांगितल्यावर खरे पोलिस कचेरीत आले, आणि लोकमान्यांच्या बंद खोलीचं दार ठोठावू लागले. पण तोपर्यंत लोकमान्यांना गाढ झोप लागली होती आणि ते घोरत होते. दुसऱ्या दिवशी धर्मज्ञ रामदासांच्या भूमिकेतून योद्धा शिवरायांच्या भूमिकेत जाणार होते. एक ज्ञानमार्तंड झोपी गेला होता आणि एक विधिज्ञ, राजनीतिज्ञ, स्वातंत्र्य सेनानी आरोपीच्या पिंजऱ्यात उभा राहणार होता. सत्ताधीश औरंगजेब सगळे सारखेच.. कुटिल, पाताळयंत्री, क्रूर.

आर्यभूषण छापखान्याचे मालक हरिभाऊ गोखले, तेव्हा कोकणात गेले होते, टिळकांच्या अटकेची तार मिळताच, वाटेत केळशीला धोंडोपंत विद्वांस यांच्या घरी जाऊन त्यांना घेऊन मुंबईला यायला निघाले. २८ जुलैला पुण्यात मोठी धरपकड झाली. जप्ती झाली. पुणे शहर हादरलं. त्याच दिवशी मुंबईत जामीनासाठी केलेल्या अर्जावर स्लेटर यांच्यापुढे सुनावणी झाली. लोकमान्यांना जामीन नामंजूर झाला. या निर्णयाविरुद्ध परत हायकोर्टात अर्ज खरे आणि सेटलवाड यांनी दाखल केला. न्या. रानडे आणि पार्सन्स यांनी निकाल दिला की दोनच दिवसात पोलिस खटला चालू होणार आहे म्हणून जामीन नामंजूर. बॅरिस्टर दावर यांनी कोर्टाला सांगितलं की वर्तमानपत्राचे जप्त केलेले कागद परत करा नाहीतर लोक खुनशीपणाचा आरोप करतील तेव्हा कागदपत्र लगेच मिळाली. त्याचवेळी पुण्यात सरदार बाळासाहेब नातू आणि त्यांचे बंधू तात्यासाहेब यांनाही अटक झाली. तात्यासाहेब नातू यांना पुण्याहून आगगाडीने नेताना वाटेत ठाण्याच्या तुरुंगात टाकलं आणि सरदार बाळासाहेबांना साबरमतीच्या तुरुंगात नेलं.

२ ऑगस्टला खटला सेशन कमिट होऊन न्या. बदरुद्दीन तय्यबजी यांच्यासमोर जामीनासाठी सुनावणी झाली. खटला चालवण्यास कागदपत्रांची गरज लागेल त्यासाठी लोकमान्यांना मोकळं करणं जरुरीचं आहे असं दावर यांनी सांगितल्यावर कोर्टाने

किती जामीन देणार विचारलं, तेव्हा कितीचाही देऊ असं दावर यांनी म्हटल्यावर २५,००० हजारांचे दोन आणि ५०,००० रु. टिळकांचा जात मुचलका घेऊन लोकमान्यांना मोकळं करण्याचा निकाल कोर्टाने दिला. हे दोन २५००० रुपयांचे जामीन द्यायला तयार असणारे दोन देवदूत तयारच होते. त्यांची नावं होती, यशवंत विष्णु नेने आणि द्वारकादास धरमसी. न्या. रानडे यांनी लोकमान्यांना जामीन दिला नाही आणि तो तय्यबजींनी दिला यावरून मुसलमानांनी तुम्ही कसले ब्राह्मण.आमच्या मुसलमानानेच त्यांना जामीन दिला असं म्हणायला मागेपुढे पाहिलं नाही. नेने यांचं ऋणही लोकमान्य आजन्म विसरले नाहीत. खटल्याच्या वेळी कोर्टाबाहेर २/३ हजार लोक गोळा झालेले होते.

लोकमान्यांच्यावरील अढळ प्रेमाची एक गोष्ट सर्व पुणेकरांनी केली ती म्हणजे एकजुटीने केलेली डिफेन्स फंडाची निर्मिती. प्लेगच्या काळात आपल्यावरील परिणामांची भीती न बाळगता, आपल्या बांधवांच्या अन्यायाला निर्भीडपणे वाचा फोडणाऱ्या लोकमान्यांना पैशाची गरज लागणार होती तरच त्यांना आपल्याविरुद्धचा खटला चालवता येणार होता. म्हणून या फंडाची घोषणा करण्यात आली आणि लोकांनी भरभरून त्याला प्रतिसाद दिला. बंगालच्या लोकांनीही रक्कम पाठवली. अमृत बझारचे संपादक, शिशिरकुमार, मोतीलाल घोष, सुरेन्द्रनाथ बॅनर्जी या

सर्वांनी मदत केली. मुंबईला जातांना आपल्याजवळचे ३ हजार रुपये लोकमान्यांनी बरोबर घेतलेच होते, तेही मागून आणलेलेच होते. शिवाय आता कठोर शिक्षा होणार याची खात्री असल्यामुळेच जातांना आधी आपलं मृत्यूपत्र तयार करायला भाचे धोंडोपंताना घेऊन बसले... होती कुठे मोठी इस्टेट? त्या सांपत्तिक स्थितीचं भान येऊन दोघांच्याही डोळ्यात पाणी आलं पण क्षणभरच..

जामीन मिळाल्याबरोबर खटल्याच्या प्रतिवादाच्या तयारीसाठी लोकमान्य पुण्यात आले आणि चक्रीवादळाच्या भोवऱ्यातच अडकले. आगगाडीच्या प्रवासात गाडीने एका बोगद्यातून दुसऱ्या दीर्घ बोगद्याच्या अंधारात शिरून भविष्य अंधारात बुडावं तशी अवस्था करणारी घटना त्यांची वाट पाहत बसली होती. इंग्रजांचा लादलेला खटला हा एक बलाढ्य सत्ताधीश शत्रूशी लढ्याचा प्रकार होता. सेनानी वृत्तीच्या लोकमान्यांना त्याची भीती कदापिही नव्हती. पण पुण्यात येणारं संकट हे नियतीने केवळ त्यांच्या सत्व परीक्षेसाठी निर्मिलेलं होतं असं वाटावं अशाप्रकारचं होतं, आणि त्याला कारणही इंग्रज नावाचा शत्रूच होता.

पुण्यात लोकमान्य आले तेव्हाच त्यांचे परमस्नेही बाबामहाराज प्लेगने आजारी पडले. त्यांची तरुण पत्नी गर्भवती होती. आपल्या कामातून सवड काढून लोकमान्य त्यांना पाहायला

गेले. बाबामहाराजांची संपत्ति, त्यांची तरुण पत्नी, दुसरा वारस नसणे, या परिस्थितीचं गांभीर्य ओळखून लगेच लोकमान्यांनी हुशारीने तीन डॉक्टर बाबामहाराजांसाठी नेमले. एक मोदी हे पारसी, दुसरे विश्राम हे ब्राह्मणेतर, आणि तिसरे सिव्हिल सर्जन मेकोनकी. ही योजना सरकारच्या भावी संकटाच्या दृष्टीने महत्वाची होती. या तिघांची औषध योजना सुरू झाल्यावर बाबा महाराजांना आपल्या भविष्याचा अंदाज येऊन त्यांनी मृत्युपत्र बनवायचं ठरवलं. त्यावर पहिले दादासाहेब खापर्डे जे त्यांचे व्याही आणि स्वत: मोठे वकील होते, दुसरे त्यांच्या इस्टेटीची देखभाल करणारे नागपूरकर, आणि इतर चार लोक ट्रस्टी आणि एक्झिक्युटर म्हणून आणली आणि मृत्युपत्र पार पडलं. बाबामहाराज हे कोल्हापूरचे सरदार. औरंगाबाद जवळच्या बाबरे गावचं मूळ घराणं. दौलत मोठी पण कर्जाच्या ओझ्याखाली दबलेली. त्यामुळे मृत्यूपत्र काळजीपूर्वक करायला हवं होतं ते कायद्याच्या दृष्टीतून लोकमान्यांनी पार पाडलं. राजद्रोहाच्या खटल्याचं ओझं डोक्यावर असतांनाही बाबामहाराजांच्या केवळ अति आग्रहामुळे लोकमान्यांना ट्रस्टी म्हणून त्या मृत्युपत्रावर सही करावी लागली.

## राजद्रोहाचा पहिला खटला –

मुंबईत ८ सप्टेंबरला. न्या. स्ट्राची यांच्या हाताखाली राजद्रोहाचा खटला सुरू झाला. ज्युरींमध्ये ५ इंग्रज, एक ज्यू, एक पारसी, आणि दोन दक्षिणी लोकांची नियुक्ती करून सरकारने आपला काळा मतलब उघड केला. कारण या कुणालाही मराठीचा काहीही गंधही नव्हता मग अग्रलेखांच्या भाषेवरून हे काय निर्णय घेणार होते? मग राजद्रोही अग्रलेखांच्या शब्दांची चिरफाड सुरू झाली.. शेवटी ज्यूरीनी पाऊण तास विचार विनिमय करून सहा विरुद्ध तीन मतांनी लोकमान्यांना दोषी ठरवलं. न्यायमूर्तींनी सहा महिन्यांची सक्त मजुरीची शिक्षा सुनावली. सरकारने आपली सूडबुद्धी वापरुन एक अंगार झाकायचा प्रयत्न केला पण त्याच्या झळा त्यांनाच लागल्या. कारण हिंदुस्थानभरच्या वर्तमानपत्रांनी, या अन्यायाविरुद्ध आपला निषेध व्यक्त केला. शिवाय ज्या १२४ अ कलमाखाली हा आरोप लावण्यात आला तेही कलम जुनं अडगळीत पडलेलं होतं.

लोकमान्यांना मुंबईला आधी डोंगरीला आणि मग भायखळ्याच्या तुरुंगात ठेवलं गेलं. तुरुंगात रोज त्यांना कोरडी भाकरी आणि कोरडी चटणी मिळे. कांदा लसूणाच्या भाजीला ते हात लावत

नसत. भाकरीचे पातळ पापुद्रे पाण्यात भिजवून खात.. एवढं तरी जेवण भारतातील अनेक गरीबांना कुठे मिळतं, असं वर म्हणत. पण शरीरावर व्हायचा तो परिणाम झालाच. वजन झपाट्याने कमी होऊ लागलं.. त्यांचे ओठ काळे पडले आणि आवाज बंद झाला. त्यातच मुंबईत प्लेगने परत आपला अवतार धारण केला होता. शेवटी त्यांना काही बरंवाईट झालं तर लोकक्षोभ वाढेल म्हणून त्यांची रवानगी येरवड्याला पुण्यात करण्यात आली. ती बातमी इतकी गुप्त ठेवली गेली की फक्त एक पोलिस अधिकारी आणि मुंबईचे स्टेशनमास्तर यांनाच पूर्व कल्पना दिली होती. लोकमान्यांना पुण्याला हलवताना फर्स्ट क्लास बोगीत त्यांना बसवण्यात आलं आणि डब्याचे सर्व दरवाजे खिडक्या बंद करण्यात आले. पण कल्याण स्टेशनवर डबा उघडावाच लागला आणि सबंध एका डब्यात प्लेगच्या झडतीसाठी असलेल्या एकच प्रवासी लोकमान्यांचं नाव जाहीर करावंच लागलं. त्यामुळे एकदम स्टेशनवरच्या सर्व लोकांना ही बातमी कळली आणि टिळक टिळक या घोषणांनी प्लॅटफॉर्म भरून गेला. तेवढ्यात गाडी सुटली. लोकमान्य मुंबईहून पुण्याला तुरुंगात आले. येरवड्याला त्यांना आणल्यावर दूध भात मिळायला लागला. कुणी सदय शिपाई कधीतरी त्यांची आवडती सुपारी त्यांना देऊ लागला आणि तेही तोंड बाजूला करून ती चिमुट तोंडात टाकू लागले. काही दिवसांनी रंग तयार करण्याचं काम त्यांना दिलं. दुसरीकडे पुण्यात रँड यांचे खूनी दामोदर हरी चापेकर आणि त्यांचे दोन बंधु यांना अटक होऊन लोकमान्यांचा या खुनात काहीही

सहभाग नव्हता हे उघड झालं होतं, तरी लोकमान्यांना का शिक्षा होते आहे यावर सर्व पत्रांनी भडिमार चालू केला. मुंबईच्या टाइम्स मधेही लोकांकडून याच मजकूराची पत्रं यायला लागली. खरं तर शिक्षा होऊन सहा महिने झाले होते. दामोदर हरी चाफेकर याला फाशीची शिक्षाही झाली होती. त्यांचा भाऊ बाळकृष्ण हा फरार झाला होता. लोकमान्यांवरचा राजद्रोहाचा खटलाच मुळी तकलादू पायावर रचला होता. त्यामुळे इंग्लंड सरकारला लोकमान्यांना सोडायला काहीतरी कारण हवं होतं म्हणून काहीतरी सूचना मुंबईला त्यांनी पाठवल्या होत्या. त्यात लोकमान्यांनी यापुढे राजकारणात भाग घेऊ नये आणि जाहीर सभांना होणाऱ्या सत्कार समारंभात भाग घेऊ नये अशा दोन सूचना सरकारने त्यांच्यापुढे ठेवल्या. त्या लोकमान्यांनी कबूल करणं शक्यच नव्हतं. त्यातच ऋग्वेदावरचे पंडित मॅक्समुल्लर यांना लोकमान्यांना तुरुंगात ठेवल्याची बातमी कुणीतरी सांगितली. १८९३ साली ओरायनच्या निमित्ताने त्यांचा पत्रव्यवहार झाला होता. मॅक्समुलर यांनी आपल्या पुस्तकाची प्रत येरवडा तुरुंगात लोकमान्यांना पाठवली.

मुंबईच्या चॅम्पियन पत्राच्या चेंबर्स यांना ही प्रत चटोपाध्याय यांनी पाठवली आणि एक पत्र त्याबरोबर जोडून त्यात म्हटलं की लोकमान्यांना सौम्यपणे वागवावं असं त्यांना वाटतं आणि जर कुणी लोकमान्यांच्या सुटकेसाठी अर्ज केला तर सरकारचे मन वळवण्यास मीही शक्य तितकी

मदत करीन. त्याचा उपयोग झाला. लगेच असा अर्ज स्टेट सेक्रेटरीकडे करण्यात आला आणि त्यावर दादाभाई नवरोजी, मॅक्समुलर, सर रिचर्ड गार्थ, हंटर आणि अनेक मोठे लोक यांच्या सह्या त्यावर होत्या. त्यात त्यांनी सर्वांनी जी कलमे लिहिली होती, ती सरकारला सणासणीत चपराक देणारी होती. १. टिळक हे राजनिष्ठ प्रजाजन असून त्यांनी वेळोवेळी सरकारला मदत केली आहे आणि कायदे कौन्सिलात त्यांची निवडणूक सरकारने मंजूर केली होती. २. प्लेगमुळे जे प्रक्षोभक लेख प्रसिद्ध झाले तेव्हाच त्यांच्यावर राजद्रोहाचा खटला भरायला हवा होता. ३. इंग्लंडप्रमाणेच हिंदुस्तान सरकारवर टीका केली तर चालावी. पण ज्यातऱ्हेने पहिलाच जबरदस्त घाला टिळकांवर झाला तो मात्र योग्य नव्हता. ४. ओरायनवरुन ते विद्वान पंडित आहेत असे वाटते आणि हिंदुस्तानविषयक गोष्टीत त्यांचे मन विशेष रमत असते. ५. तुरुंगातील सक्त मजुरीसारखी कामे यांना करण्याची सवय असणे शक्य नाही, आणि तिथल्या कडक शिस्तीचा त्यांच्या प्रकृतीवर वाईट परिणाम झाला आहे. ६. रँड साहेबांचा खूनी सापडला आहे, केसरीमधील लेखांवरून त्याला प्रेरणा झालेली नाही. ७. टिळकांना शिक्षा झाल्याने कायद्याची इभ्रत राखली जाऊन न्यायाचे कार्य होऊन गेले आहे.१२४ अ या कलमाखालचा हा त्यांच्यावरचा हा पाहिलाच अपराध असल्याने एवढी दहशत पुरे आहे आणि शिक्षा कमी केल्याने सरकाराबद्दल लोकांच्या मनात चांगली भावना येईल. मॅक्समुल्लर यांना

लोकमान्यांनी आभाराचं पत्र पाठवलं. आपल्या सुटकेच्या अर्जावरती त्यांच्या सहीचा आवर्जून उल्लेख केला. या तुरुंगातील सुपरिटेण्डन्ट चांगले होते. आपल्या तुरुंगात एक विद्वान कैदी आहे हे कळल्यावर विद्याप्रेमी सोलोमान यांनी मॅक्समुल्लर यांनी पाठवलेली ४ पुस्तके वाचायला १० वाजेपर्यंतची परवानगी दिली. शिवाय कमी कष्टाचं रंगाचं काम दिलं, आणि तुरुंगातील हॉस्पिटलच्या जेवणाची सोय केली. त्यानंतर लोकमान्यांची तब्येत सुधारायला लागली. ऋग्वेदसंहितेवरची पुस्तकं वाचताना त्यावरच्या चिंतनाने रात्री झोप येईनाशी झाली. आणि एका रात्री आर्यांचे वसतिस्थान पुस्तकाला लागणारा दुवा त्यांना सापडला. संकटांचं चक्रीवादळ आलं की प्रचंड पडझड तर होणारच.

या खटल्यानंतर हरिभाऊ गोखल्यांनी केसरी छापून देणं नाकारलं तेव्हा धोंडोपंत आणि बाकीच्या सहाय्यकांनी त्यावर मार्ग काढून केसरी दुसरीकडे छापून घेण्याची तयारी चालवली. लोकमान्यांचे सहाय्यक म्हणून न. चिं. केळकर आणि कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर हे नुकतेच कामाला लागले होते आणि समर्थपणे केसरी चालवत होते. सर्वांनी मिळून मग भिडे यांच्या रविवार पेठेतील फडके वाड्यातील भिडे यांच्या विठ्ठल छापखान्यात केसरीची छापण्याची सोय केली. त्यानंतर केसरीमध्ये संपादक म्हणून केळकरांचं नाव घालण्यात आलं. आणि बाकीच्या कामासाठी लोकमान्यांच्या राहत्या घरी विंचुरकर वाड्यात कचेरी

उघडली. पण हात धुवून लोकमान्यांच्या मागे लागलेल्या संकटाला ते कसं पाहवावं. त्या विठ्ठल छापखान्याच्या फडके वाड्यालाच सोमवारी १४ मार्चला दुपारी भीषण आग लागली आणि ती रात्री ९ वाजेपर्यंत चालू होती. विठ्ठल छापखान्याचा एक टाइप आणि एक कागदाचा तुकडाही शिल्लक राहिला नाही. सर्व मजकूर हातचा गेल्याने उरलेला केसरी जगतेद्धिच्छु या छापखान्यात अर्धाच छापला गेला. १५ मार्चचा केसरी दहा कॉलमचा म्हणजे अर्धाच रातोरात काढून सकाळी वाटला गेला. केसरीच्या इतिहासात अर्धा निघालेला हा एकमेव अंक भूषणच ठरला आणि वाचकांनाही आगीचं कारण कळल्यावर त्या बहाद्दर चालकांचं आणि अंकाचं कौतुक वाटलं.

यातून काय मार्ग काढायचा ते विचारण्यासाठी धोंडोपंत येरवड्याला तुरुंगात गेले. धोंडोपंत तुरुंगात पोचेपर्यंत जेलरने आधी आगीची बातमी लोकमान्यांच्या कानावर घातली होती. आणि त्यांनी त्यावर विचारही करून ठेवला होता. आर्यभूषण छापखाण्याचे मालक एक गोखले होते आणि दुसरे वासुदेवराव केळकर होते. वासुदेवरावांच्या निधनांनातर तो छापखाना त्यांच्या मुलाच्या नावाने झाला होता. आणि मुलगा लहान असल्यामुळे केळकरांचे मामेभाऊ फाटक हे व्यवस्था पाहत होते. लोकमान्यांनी त्या फाटकांना, मी परत येईपर्यंत केसरी आणि मराठा

छापून द्या, असं पत्र लिहून दिलं आणि फाटकांनीही ते काबुल केलं. अशाप्रकारे आर्यभूषणाचा खंडित झालेला व्यवहार परत सुरू झाला.

सेनाधुरंधराची सत्व परीक्षा अचानक येणाऱ्या संकट काळात यशस्वीपणे मार्ग काढण्यामध्येच असते. बुद्धीचं चापल्य आणि प्रचंड मनोबलमुळेच तो यशस्वी होतो.. ‘’ सीदन्ती मम गात्राणि ‘’ ही वेळ या हिमालयाएवढ्या उत्तुंग माणसावर कधीही आली नाही. येरवड्याचे सोलोमान बदलले आणि त्यांच्या जागी जॅकसन आले. तोपर्यंत लोकमान्यांना आजवर नाकारलेली पायात जोडे घालण्याची परवानगी देण्यात आली होती. त्यामुळे लोकमान्यांनी घरून त्यांचे जोडे मागवले, ते लाल रंगांचे होते. म्हणून या जॅकसन याने तुरुंगात ते फारच भडक दिसतात म्हणून काळा रंग फासून त्यांना वापरायला दिले. कानापर्यंत पोचलेला मुंगळाही हत्तीच्या कानाला डसण्याचा क्षुद्र आनंद मिळवू शकतो आणि सत्तेपुढे शहाणपण टिकत नाही. चाफेकरला पकडल्यावर आता लोकमान्यांनी माझ्या लेखांचा खुनाशी काहीही संबंध नाही हे स्पष्ट झालंय म्हणून माझी मुक्तता करावी असा अर्ज सरकारकडे केला. पण राजकारणात पडणार नाही ही अट त्यांनी सपशेल नाकारली. तोपर्यंत सरकारच्या प्लेग हाताळण्यावरून, मुंबईतील प्लेगच्या जुलूमांविरुद्ध, पुण्यात ज्यादा पोलिस ठेवण्यावरून आणि इतर अनेक कारणांवरून सरकारवर प्रश्नांचा भडिमार होऊ लागला होता. इंग्लंडमधेही पार्लमेंटमध्ये प्रश्न विचारले जाऊ लागले

होते. त्यातून सुटका करून घेण्याचा एकच मार्ग म्हणजे लोकमान्यांची सुटका करणे हा एवढाच होता. मुंबई सरकारकडून वुईन हे येरवड्याला जाऊन लोकमण्यांकडून हवा तसा जबाब मिळवून घेण्याची धडपड करत होते आणि त्यांना शेराला सव्वाशेर भेटलेले लोकमान्यही अडकत नव्हते तिकडे दाजीसाहेब सुटकेसाठी फेऱ्या मारत होते. अशातच लोकमान्यांना तुरुंगातून सोडत असल्याची सांकेतिक तार पोलिस कमिशनर व्हिंसेंट यांना मुंबईला पाठवली. त्याच मध्यरात्री गिरगावातील आङ्ग्रेवाडीतील खऱ्यांच्या घरी जाऊन, त्यांना उठवून पुण्याला जायला सांगितलं. दाजीसाहेबही सोमवारी दुपारपर्यंत पुण्यात पोचले. स्टेशनावरच वुईन हजर होते. ते सरळ येरवड्याला गेले. परत लोकमान्यांशी अटी कबूल करण्यावर घासाघास झाली पण राजकारण सोडण्याची अट मान्य होणं शक्यच नव्हतं, शेवटी उरलेली सहा महिन्यांची शिक्षा परत कधी राजद्रोहाचा खटला झाला तर तेव्हा भोगायची कल्पना खऱ्यानी वुईन यांच्यासमोर मांडली आणि मग मुंबईहून त्याला मान्यता मिळाल्यावर मंगळवार ६ सप्टेंबरला रात्री साडेआठ वाजता लोकमान्यांची येरवडा तुरुंगातून सुटका झाली.

रात्री १०.३० वाजता लोकमान्य विंचुरकर वाड्यात आपल्या घरी पोचले . २७ जुलै १८९७ ते ६ सप्टेंबर १८९८, एवढे ६ आठवडे सक्त मजुरीची शिक्षा भोगून लोकमान्य परतले. कशासाठी? Rand च्या

खुनासाठी? नाही.. तो तर चाफेकर बंधूनी केला होता. मग? प्लेगच्च्या जुलमी अत्याचारांबद्दल शिक्षा? नाही, तो ज्याने केला तो यमसदनाला पोचला होता.. मग लोकांचे हाल सरकारपुढे मांडण्याच्या अग्रलेखांमुळे? नाही.. ते तर मे महिन्याच्या आधीच लिहिले गेले होते. मे महिन्यात प्लेग नाहीसा झाला होता. मग राजद्रोह कोणता घडला? जा ज्या मोठ्या लोकांनी लोकमान्यांच्या सुटकेच्या अर्जावर सह्या केल्या होत्या, त्यांनीच सरकारच्या द्वेषाचं वस्त्रहरण केलं होतं. इंग्रज सरकार लोकमान्यांच्या तेजाला चक्क घाबरलं होतं.

लोकमान्य घरी पोचल्याची बातमी सर्व हिंदुस्थानात पसरली. दुसरे दिवशी १०,००० लोक दर्शनाला विंचुरकर वाड्यावर येऊन गेले असं मुंबईच्या टाइम्सने लिहिलं. त्यांचं अभिनंदन करणाऱ्या तारांचा ढीग घरात येऊन पडला. आता काही दिवस विश्रांतीची त्यांना सक्त गरज होती. घरच्या अन्नाची गरज होती, उतरलेले वजन परत वाढवण्याची गरज होती. मात्र देशातलं त्यांचं वजन प्रचंड वाढल होतं. ते एक राष्ट्रीय नेते बनले होते. सरकारविरुद्ध लढण्याचं धाडस करणारे क्रांतीवीर ठरले होते. काही देवळांमधून दीपोत्सव साजरा झाला. सरदार खासगीवाले यांनी आपल्या गणपतीचं विसर्जन लोकमान्यांची सुटका झाल्यावरच करायचं ठरवलं होतं, ते ४ दिवसांनी मोठ्या थाटात पार पडलं. निरनिराळ्या पत्रांचे बातमीदार येऊन गेले आणि चटकदार बातम्या बनवून छापू लागले. शेवटी

लोकमान्यांना केसरीमधून कोणत्याही बातमीवर विश्वास ठेऊ नका असा जाहीर करावं लागलं. पुण्यात विश्रांति मिळणं अशक्य आहे हे लक्षात आल्यावर लोकमान्य एक महिनाभर, आपल्या आवडत्या ठिकाणी, सिंहगडावर जाऊन राहिले. ते त्यांचं अत्यंत आवडतं ठिकाण. दाजीसाहेब खरे आणि लोकमान्यांनी मिळून एक छोटीशी जागा घेऊन त्यावर बंगली बांधली होती आणि अर्ध्या अर्ध्या भागात विश्रांतीसाठी राहत, मावळ्यांशी बोलत, वाचन करत वेळ घालवत. मुलंही बरोबर असत. एकदा दोघांची मुलं बुद्धिबळ खेळत बसली होती, तिथे लोकमान्य आले आणि दाजीही आले. बघता बघता मुलांना बाजूला सारून दोघांनी त्या पटाचा ताबा कधी घेतला ते त्यांना कळलंही नाही. तिथेही काळे आणि गोरे भेद होतेच. जगाचं वास्तव राजकारण करणारे दोघे त्याही खोट्या वजीर राणीत तेवढेच रमले.

विश्रांति आणि प्रकृती सुधारून महिनाभराने पुण्याला आल्यावर राष्ट्रीय सभेच्या मद्रास सभेला प्रतिनिधी म्हणून गेले पण त्यांनी सभेत भाषण केलं नाही त्यावरून विरोधकांचे अनेक तर्क-कुतर्क झाले. लोकमान्यांच्या कानावर ते सगळं आलं होतं पण त्याचं उत्तर त्यांनी पुढे दिलं. मद्रासची सभा संपल्यावर त्यांनी तंजावर, पोंडीचारी, कुंभकोणाम, मदुरा, तिथून बैलगाडीने रामेश्वर, तुतिकोरिनचा गाडीप्रवास, मग बोटीचा प्रवास, असा ४० तासांचा प्रवास करून जवळच असलेलं सिलोन करून

ते फेब्रुवारीत पुण्यात परतले. त्यावेळी वाटेत एका पत्रकाराने भाषण न करण्याबाबत त्यांना विचारलं असतांना, अजून आपली तब्येत पूर्ण सुधारलेली नाही, त्यामुळे ते श्रम मी केले नाहीत कारण एकदा एक भाषण केलं की सगळीकडेच ते सुरू होईल म्हणून कुठेच केलं नाही असं त्यांनी उत्तर दिलं.

सन १८९९ ला लखनौला कॉंग्रेस परिषद भरली, तेव्हा तिथून कलकत्ता आणि मग ब्रह्मदेश हिंडून आले. सर्कसवाले छत्रे ब्रह्मदेशात सर्कस घेऊन जायचे होते, त्यांच्या आग्रहावरून ते तिथे गेले, तेव्हा भविष्यात परत या देशात आपण येणार आहोत हे नियतीने त्यांना कळू दिलं नव्हतं. पुण्याला परत आल्यावर त्यांचे नेहमीचे केसरीत लिहिण्याचे उद्योग सुरू झाले. आणि त्यातून उद्भवलं ते ग्लोब प्रकरण. पण यावेळी त्यांच्या करारीपणाचा झटका ग्लोबला दणकून सोसावा लागला आणि इतर इंग्रज धार्जिणी पत्रे ते पाहत बसली. लोकमान्यांची सुटका सहन न झालेल्या पत्रांमधे ग्लोब हे पत्र होतं. त्यांनी आपल्या पत्रात लिहिलं की, '' ज्या राष्ट्रीय सभेला टिळक आणि गोखले उपस्थित राहू शकतात, ती सभा कशी असेल ते आम्हाला कळून चुकलं आहे. या सभेला चापेकर बंधू उपस्थित राहू शकले नाहीत हे केवढं दुर्दैव. पण त्यांच्या गैरहजेरीचं दु:ख टिळक आणि गोखले यांच्या हजेरीने सभेने कसं तरी भागवून घेतलं.'' हे लिहून आल्यानंतर पाठोपाठच, २०,००० रुपयांच्या

बक्षिसाच्या लोभाने चाफेकरांचा ठिकाणा सांगणाऱ्या द्रविडचाही पुण्यात खून झाला. परत पुण्यात गदारोळ उठला. इंग्रजी पत्रांना निमित्त मिळालं.

त्याच वेळी मुंबईचे गव्हर्नर सॅंडहर्स्ट यांच्या जागी लंडनहून नॉर्थकॉट यांना मुंबईला पाठवण्यात आलं, तेव्हा लंडनच्या ग्लोब पेपरमधून जो मजकूर छापून आला, त्यावर लोकमान्यांनी ग्लोबला चांगलाच दणका दिला. भारतातल्या सरकार धार्जिण्या पत्रांना एक वाईट खोड होती. ती म्हणजे काहीही मजकूर लिहायचा आणि आरडाओरडा झाला तर माफी मागून मोकळं व्हायचं. १८९९ सालच्या डिसेंबरात लंडनहून नॉर्थकोट जेव्हा नवीन गव्हर्नर म्हणून मुंबईला यायला निघाले, तेव्हा तिथल्या ग्लोब नावाच्या वृत्तपत्राने खालील मजकूर लिहिला :-

---

*" मुंबईत राजद्रोही लोकांच्या जाळ्या माजून राहिल्या आहेत. त्यांचा पुढारी टिळक हा कैदेत असल्यामुळे चळवळ दबून आहे. कदाचित टिळक यांनी सुरू केली नसली तरी त्यांच्या तंत्राने चालू झालेली ही खुनाची मोहीम आता नजरेस आल्यामुळे गोडबोल्या ब्राह्मणांवर, मराठे राज्य पुन: स्थापण्याची आशा वाटणाऱ्या ब्राह्मणांवर गव्हर्नरने चांगली नजर ठेवावी.''*

विलायतेतील लोकमत म्हणून हा मजकूर मुंबई टाइम्सने १८ नोव्हेंबर १८९९ च्या पत्रात छापला.. त्याबरोबर एकदम खळबळ उडाली. लोकमान्यांनी बेधडकपणे सरळ या वृत्तपत्रावर बेअब्रू नुकसानीचा दावा ठोकला. मेथा यांनी वकील पत्र घेतलं. लगेच टाइम्सने समन्सची वाट न बघता, माफीचा मजकूर छापून टाकला आणि ग्लोब आणि आमच्यात एकमत नाही हेही कबूल करून टाकलं. खटला सुनावणीस निघाला तेव्हा मेथा यांनी सांगितलं की टिळकांविरुद्ध अशी सतत विषारी मोहीम चालू असते ती धसास लावणं प्राप्त आहे म्हणून हा खटला आहे. मग न्या. स्लेटर यांनी मुंबई टाइम्स विरूद्धचा खटला त्यांच्या माफीनाम्यानंतर काढून घेतला. पण अजून ग्लोबला दणका द्यायचा विचार लोकमान्यांचा होताच, पण ते वृत्तपत्र इंग्लंडमध्ये होतं. तिथे कायदेशीर भांडणाला खर्च फार लागणार होता. म्हणून सुरूवातीला ग्लोबला नोटिस पाठवण्यात आली, ती ग्लोबने साफ धुडकावून लावली. पण नंतर त्यांच्या वकिलांच्या सल्ल्यानुसार माफी मागण्याचं कबूल केलं. पण तेवढ्यानेही लोकमान्य थांबले नाहीत. मग दंड देतो, माफी नाही, मग माफी मागतो-दंडही देतो- आणि शेवटी खटल्याचा खर्च देतो, दंडही देतो, माफीही मागतो, पण खटला काढून घ्या या क्रमाने ५० पाऊंड दंड भारत ग्लोब सुतासारखा सरळ झाला. ग्लोबची ही माफी २४ नोव्हेंबर, १९०० च्या अंकात अग्रलेखाच्या शेजारी ठळक अक्षरात छापली गेली. हे कळल्यावर न्या. रानडे आपल्या सहकाऱ्यांना म्हणाले की पहा, एरवी त्यांचा स्वभाव कसाही असू दे, पण हे काम फक्त टिळकच करू शकतात.

लोकमान्यांच्या शिक्षेच्या गैरहजेरीत कुणी ना कुणी अग्रलेख लिहित होतं, केळकरांनीही केसरीची प्रतिष्ठा चांगली जपली होती, १८९७ सालापासून बंद पडलेलं अग्रलेख लिहिण्याचं काम लोकमान्यांनी परत सुरू केलं हे लोकांना ४ जुलै १८९९ या दिवशीच्या अग्रलेखाच्या मथळ्यावरूनच लगेच कळलं. त्या मथळ्याचं नाव होतं,

## पुन:श्च हरि: ॐ.

या वर्षी लोकमान्यांनी आपला लॉ क्लास कायमचा बंद करून टाकला. लखनौ कोंग्रेस, साताऱ्याची प्रांतिक परिषद आणि परत प्लेगचा उद्रेक, पंडिता रमाबाई प्रकरण, लस प्रकरण यात नंतरची २ वर्षे संपली. या काळात आणखी दोन महत्त्वाच्या घटना घडल्या. त्यातील पहिली ही पंचांग संशोधन. भारतीय संस्कृतीत पंचांगाला धार्मिक अधिष्ठान आहे. भास्कराचार्य आदि गणितज्ञांच्या प्राचीन काळापासून ते चालत आलेलं आहे. पण युरोपियन समाजाशी संबंध आल्यावर त्यातील उणीवा काढून टाकायची चळवळ पुण्यात सुरू झाली. केरूनाना छत्रे आणि सरदार पटवर्धन यांनी नवीन पंचांग सुरू केलं. १९०० सालच्या एप्रिल महिन्यात पंचांग संशोधनावर एक निबंध प्रसिद्ध झाला. त्यामुळे त्यावर चर्चा सुरू झाली. मग २९ मेच्या केसरीमध्ये लोकमान्यांनी त्यावर अग्रलेखच लिहिला. पंचांग गणनेत सुधारणा हवी यावर सर्वांचं एकमत होतं पण पाश्चात्य आणि भारतीय ज्योतिर्गणित जाणणारे थोडेच होते, त्यात लोकमान्यही होते. जुन्या नव्याचा मेळ घालून नवीन वाट शोधायची हा लोकमान्यांचा नेहमीचाच आग्रही मार्ग होता. पंचांग पद्धतीत सुधारणा हवी असं त्यांचं ठाम मत होतं पण लोकमत एकदम नव्याचा

स्वीकार करत नाही, हे पूर्णपणे माहीत असलेल्या लोकमान्यांनी ही चळवळ तशीच चालू ठेवली.

आणखी एक वाद त्याच सुमारास निघाला. तो म्हणजे आळंदीचे आणि आपेगावचे ज्ञानेश्वर वेगवेगळे होते.. हा तर सर्वसामान्यांच्या श्रद्धेवर हातोडाच होता. हा मुद्दा प्रथम लोकांसमोर मांडला तो, भिंगारकर यांनी. त्यांनी एक लेखमालाच लिहिली. याची सुरुवात सुधारक पत्रात नगरच्या भारदे यांनी भारद्वाज या नावाने एक सिद्धान्त मांडून केली. हे भारदेही अतिशय विद्वान, अभ्यासक होते. त्यात त्यांचा नामदेव आणि ज्ञानदेव समकालीन होते का हा एक प्रश्न होता आणि ज्ञानेश्वरी लिहिणारे आळंदीचे ज्ञानेश्वर नव्हेतच हा एक सिद्धान्त मांडला गेला होता. या निमित्ताने केसरीमध्ये भिंगारकरांनी त्यावर उत्तर देणारे लेख लिहिले त्यातील बरेचसे लोकमान्यांचे होते. भिंगारकर हे रानडे यांचेही मित्र होते त्यामुळे, लोकमान्य, न्यायमूर्ती आणि भिंगारकर अशा तीन लोकांनी मिळून दोन ज्ञानेश्वर नव्हेतच हा निर्वाळा लोकांना दिल्यानंतर प्रकरण संपलं.

असाच ऐतिहासिक काळाचा आणखी एक निर्णय त्याच एप्रिल महिन्यात लोकमान्यांनी स्वतंत्र अभ्यासाने दिला. हाती जी काही कागदपत्रे असतील त्यावरून इतिहासाचा शोध घेण्याचं अखंड काम वि. का. राजवाडे करत होते. त्यांनी शिवरायांची, मिळालेल्या कागदपत्रांवरून जन्मतारीख निश्चित केली.

लोकमान्यांनी ती वाचली आणि स्वत: अभ्यास केला आणि तारीख निश्चित केली ती राजवाडे यांनीही मान्य केली.

## वेदोक्त प्रकरण

लोकमान्यांच्या ज्ञानाची ओळख सांगणारी तिसरी घटना म्हणजे वेदोक्त प्रकरण.. महाराष्ट्रात आपल्या बुद्धीच्या तेजाने समाजाला प्रकाशाचा मार्ग दाखवणारे दोन पंथ एकाच वेळी प्रवाही होते. एक सुधारकांचा आणि दुसरा राजकीय स्वातंत्र्याचा मंत्र म्हणणाऱ्यांचा. यातील सर्वांनीच '' सामाजिक तळमळ '' या एका अधिष्ठांनावर हा वसा घेतलेला होता. कर्वे-फुले-आगरकर-रानडे यांच्यात आणखीही महान व्यक्ति होत्या. त्या म्हणजे बडोद्याचे सयाजी महाराज आणि कोल्हापूरचे महाराज. वेदोक्त घटना घडली ती आधी बडोद्याला. बडोद्याच्या महाराजांनी ब्राहमणेतरांनी वेदोक्त संस्कार का करून घेऊ नयेत हा प्रश्न उपस्थित केला. तो धागा कोल्हापूरच्या महाराजांनी पकडला. राजवाड्यात धार्मिक कृत्ये वेदोक्त पद्धतीने केली पाहिजेत असं त्यांनी आपले पुरोहित राजोपाध्ये यांना बजावलं. राजोपाध्ये यांनी महाराजांच्या हुकूमास नकार दिला. जे शास्त्राने संगितले तसेच आपण करू ही भूमिका घेतली. त्यावर महाराजांनी राजोपाध्ये यांचं २५/३० हजारांचे इनामी उत्पन्न जप्त केलं. तरीही राजोपाध्ये परंपरा मोडण्यासाठी बधले नाहीत. या प्रकरणावर लोकमान्यांनी केसरीमधून २२ ऑक्टोबर

१९०१ च्या केसरीमधून अग्रलेख लिहून त्यात ऐतिहासिक आणि धार्मिक दोन्ही दृष्टीकोनातून विस्तृत लिहिलं. त्यात लिहिलं,

' जातिभेद हा हिंदूंच्या अंगी अगदी खिळलेला आहे. ती आसक्ती इतकी दृढ आहे की जळलेल्या दोरीतील पिळासारखी ती शिल्लक राहते. हिंदुस्थानातील जातींचा सबगोलांकार करणे इष्ट असले तरी शेकडो वर्षे ते शक्य होणार नाही. शिवाजीमहाराजांच्या राज्याभिषेक काळातच त्याचा निकाल झालेला आहे. महाराजांवर निरतिशय प्रेम आणि आदर असलेल्या महाराष्ट्राने, महाराजांनी ते मान्य केल्यामुळे तो कांकणभर मराठ्यांच्याच बाजूने झाला. महाराजांनी आणि तेव्हाच्या मराठ्यांनी जे स्वीकारलं ते आताच्या त्यांच्या वंशजांनी का स्वीकारू नये? ' ते पुढे लिहितात की वेदोक्त मंत्र म्हटल्याने कोणत्या जातीस श्रेष्ठपणा येतो ही समजूत अगदी चुकीची आहे. स्त्रियांची व्रतवैकल्य-संस्कार-पूजा ही पुराणोक्त असतात म्हणून त्या कमी श्रेष्ठ होत नाहीत. ब्राह्मण जातीत वेदोक्त संस्कार करतांना जे उच्चार होतात त्याचाही विनियोग अर्थावरून न करता शब्दसादृश्यावरून केलेला असतो आणि त्याला लैंगिक विनियोग म्हणतात. अशा तऱ्हेच्या विनियोगामुळे आपल्या वेदांचे हजारो वर्षे रक्षण झाले आहे असा आमच्या आणि पाश्चात्य विद्वानांचा सिद्धान्त झालेला आहे.''

लोकमान्यांचा हा लेख मोठा आहे आणि विशेष म्हणजे चिरोल खटल्याच्या वेळी लोकमान्यांनी कोल्हापूरच्या महाराजांविरुद्ध व्यक्तिविषयक काहीही लिहिले नाही अशी साक्ष खुद्द कोल्हापूरच्या डोंगऱ्यांनी दिली.

नवीन शतक नवीन वादळं घेऊन त्यांची वाट पाहातच होतं. १९०१ साल उजाडलं ते ताई महाराज प्रकरण घेऊन. त्यात त्यांची उरलेली हयात गेली. मनस्ताप झाला. पैसाही खर्च झाला. मृत्यूपूर्वी १० दिवस त्यांच्या मनाला शांती लाभेल असा त्यांच्या बाजूने निकाल लागला. आणि सगळं भरून पावलं. माणसाला मोठा करायचं म्हणजे त्याला जास्तीत जास्त संकटात घालायचं ही तर नियतीची नियतच! मग ते शिवराय असोत वा लोकमान्य! पण ती कठोर मनाची एक परीक्षाच असते.

## ताईमहाराज प्रकरण

एकदा कुणाला आपलं म्हटलं आणि आणि कुणाला एकदा शब्द दिला की, वाटेल ती झीज सोसून निरपेक्ष बुध्दीने त्याचा शेवटपर्यंत पिच्छा पुरवायचा हा लोकमान्यांचा स्वभाव पुराव्याने शाबीत करायला ताई महाराज प्रकरण पुरेसं आहे. न्याय्य गोष्टीसाठी लढतांना या केसमधे प्रतिपक्षाबरोबर किती खालच्या पातळीवर जावं लागलं त्याला काही सुमारच नाही, पण त्यांचं विशेष हे की ते त्याही पातळीला उतरले. या सगळ्यात त्यांनी मधेच ही केस सोडली असती तरी चाललं असतं, पण लोक दोन्ही बाजूंनी बोलणारे असतात, म्हणून सत्याचा विजय होईपर्यत लढले. एकदा लढायचं ठरवलं की मग ते स्वकीय असोत वा परकीय. न. चिं. केळकरांनी म्हटल्याप्रमाणे दत्तक प्रकरणे कोर्टात अनेक असतात, पण या प्रकरणाला गोऱ्या अधिकाऱ्यांच्या लोकमान्य द्वेषाचा रंग असल्यामुळेच हे प्रकरण एवढं गाजलं. ताईमहाराज प्रकरण निकाली लागल्यावर लोकमान्यांनी केसरीतून 'अखेर खरे ते टिकले' हा अग्रलेख लिहून, बैलाला जशी तांबडी चिंधी तसे आपण सरकारला असा उल्लेख केला. न्यायमूर्तींच्या न्याय्य वर्तनाचं कौतुक आणि अभिनंदनही केलं. चार शब्द सरकारलाही

सुनावले. यासाठी जो ६० हजार रु. खर्च झाला तो केवळ लोकमान्यांना बदनाम करण्याचा केविलवाणा प्रयत्न करण्यासाठीच होता हेही दाखवून दिलं.

बाबामहाराजांना पहिली पत्नी आणि एक मुलगी शांताक्का होती पण वारस नाही म्हणून त्यांनी दुसरं लग्न ताई महाराजांशी केलं. या ताईमहाराज सामान्य घरातल्या. बाबांचा मृत्यू झाला तेव्हा त्या गरोदर होत्या. बाबांच्या मृत्यूनंतर त्यांना मुलगा झाला पण तो दोन महिन्याने वारला. त्यातून हे नसतं लचांड लोकमान्यांच्या मागे लागलं. आता दत्तक घेणं भाग होतं. त्यातच बाईंना क्षयाची लागण झाली असल्याची शक्यता निर्माण झाली त्यामुळे वारस घेण्याचं काम तातडीने हाती घ्यावं लागलं.

बाबामहारांजाच्या घराण्याच्या दोन शाखा कोल्हापुरात होत्या आणि एक औरंगाबादेत. कोल्हापूरच्या शाखेतील मुलांनी आधीच गुण उधळले होते म्हणून बाबांची इस्टेट सांभाळणारा आणि ताईमहाराजांची काळजी घेणारा वारस शोधण्याचं काम लोकमान्यांनी सुरू केलं. तेव्हा कोल्हापूर घराण्याकडून ताईंवर दबाव यायला लागला आणि एक ट्रस्टी नागपूरकरांनाही आमिषं दाखवण्यात आली. कोल्हापूरच्या बाळामहाराजांनी बाबामहाराज

गेल्याच्या दुसऱ्याच दिवशीपासून आपले प्रयत्न सुरू केले होते. पण नागपूरकरांना लोकमान्यांच्या विरुध्द जाता येईना. कुंभोजकरांनी कोल्हापूरकरांना सरळ नाकारलं आणि खापर्डे लोकमान्यांच्या मताविरुद्ध नव्हते. लोकमान्यांनी आपली विश्वासू माणसं पाठवून गुप्तपणे औरंगाबाद जवळच्या निघोनेच्या शाखेच्या मुलांची चौकशी केली आणि ती लहान मुलं त्यांना वारस म्हणून योग्य वाटली म्हणून नागपूरकरांना पुण्यात ठेवून ताई आणि इतर ट्रस्टींना घेऊन लोकमान्य औरंगाबादला पोचले. एका शीख मंदिरात त्यांची सगळयांची उतरण्याची सोय केली होती. तिथे दुसरे दिवशी त्या घराण्यातली पाच मुलं बोलावण्यात आली. त्यातल्या जगन्नाथला सर्वांनी निवडलं. सभा बोलावली, कागदपत्रांवर सह्या करून, साक्षी पुरावे, कागदपत्रांची पूर्णता करून सगळे परत आले. खापर्डे नागपूरला कामानिमित्त निघून गेले.

याआधी एक ट्रस्टी, नागपूरकर यांनी आपला मुलगा ताईमहाराजांच्या ओटीत घालण्याचा प्रयत्न केला पण त्याचं एक बोट अपूर्ण म्हणून तो नाकारला गेला. त्यांना दुसरा मुलगा झाला तेव्हा नाळ कापायच्या आधी वारस म्हणून ताईंच्या ओटीत तो टाकला तर दत्तकविधान करावं लागत नाही. म्हणून नाळ कापायच्या आधी ताईंना निरोप पाठवला. तोही वाया गेला तेव्हा नागपूरकरांनी कोल्हापूरच्या बाळामहाराजांचा पक्ष घेऊन मोठं

राजकारण केलं. बाळामहाराजांनीही दत्तक जाण्यासाठी खूप युक्त्या लढवल्या. त्यांचं लग्न पुण्यात ताईंच्या वाड्यात करायचं ठरवलं पण ट्रस्टी लोकांनी त्याला परवानगी दिली नाही. कारण लग्नाच्या आदल्या दिवशी दत्तकविधान गुपचुप पार पाडायचा त्यांचा बेत होता. त्यासाठी त्यांनी लोकमान्यांचे स्नेही भिंगारकरांना ५०० रुपयांचं आमिष दाखवून लग्न वाड्यात करण्याची परवानगी आणायला सांगितलं. दुसरे दिवशी सकाळी सकाळी भिंगारकरांना आपल्या वाड्यात आलेलं पाहून लोकमान्यांनी सरळ टाचणी लावून फुगा फोडूनच टाकला. ५०० रुपयाचं कसं काय जमतंय तुमचं असं सरळच विचारलं त्यामुळे तोही बार वाया गेला. मग नागपूरकरांनी आणखी एक युक्ती योजली. ताई अत्यवस्थ झाल्या तर घाईघाईने त्या मरणासन्न आहेत हे दाखवून लोकमान्यांच्या गैरहजेरीत आपल्या मुलाला आधीच दत्तक देण्याचा डाव साधायचा. त्यासाठी एक सिव्हिल सर्जन आणि एक युरोपियन डॉक्टर वश करण्यात आला. वाड्यातल्या वैद्यांनीच ती कामगिरी केली. पण वैद्यबुवांच्या फेऱ्या वाढल्या तेव्हा वाड्यातल्या ट्रस्टींच्या एका कारकुनाला संशय आला.

लोकमान्य तेव्हा बाहेरगावी गेले होते. ते येईपर्यंत त्याने किल्ला लढवला. वैद्यबुवांकडून सगळं सत्य आणि त्यावर त्यांना मिळणारी ५०० रुपयांची कमाई त्याला कळल्यावर त्याने

वैद्यबुवांना सावध करत, आधी पैसे मोजून घ्या...नाहीतर तुम्हाला छदाम मिळणार नाही असं बजावलं. कारण इस्टेट मोठी असली तरी नगद काहीच नाही हे त्याला माहीत होतं. मध्यरात्री ताईंना जोरात कळा येणार, मग हे डॉक्टर्स येणार आणि त्यांच्या खोट्या सर्टिफिकेटवर लागलीच दत्तकविधान पार पडणार असा सगळा कट तयार झाला. पण या सगळ्यांना द्यायला पैसाही खूप लागणार होता. नागपूरकर त्याच्या तजवीजीला बाहेर पडले आणि ते आता येणारच या कल्पनेने ताई विव्हळायला लागल्या, त्याबरोबर हा कारकून ' अजून पैशाची तजवीज झाली नाही, आताच कशाला विव्हळता.. असं म्हणाला. त्यामुळे आपलं हेही कारस्थान वाया गेलं हे ताईंना कळलं आणि तोही प्रयत्न वाया गेला. तरी प्रतिपक्षाने चिवटपणा सोडला नाही. आता परत नवीन बेत झाला.

तो म्हणजे लोकमान्यांच्या नकळत १२ जुलैला मध्यरात्री दत्तकविधान पार पाडायचं. त्याआधी बाळमहाराज, त्यांचे बंधू पंडितमहाराज आणि त्यांच्याबरोबर पैलवान, हत्यारे घेतलेले लोक कोल्हापूरहून वाड्यात साळसूदपणे राहायला आले. काही मोजक्या लोकांना रात्री १२ वाजता वाड्यावर येण्याचं आमंत्रण दिलेलं होतं. वाड्यावरचा कारकून आणि उपाध्या पाळतीवर होतेच. काहीतरी शिजतंय एवढंच जाणवत होतं. मग पुढचं नाटक सुरू झालं. ११ वाजता रात्री बाहेरचा दरवाजा बंद झाला. कारकून बाहेर पडायला

आणि उपाध्या वरच्या माडीच्या खिडकीत यायला एकच गाठ पडली. त्याने कारकूनाला घरी जा.. .. पण जागत बसा.. असं हळूच सांगितलं. घरच्यांनी उपाध्यांना दत्तकविधानाची तयारी करायला अचानक सांगितलं. पण उपाध्या मोठा हिकमती. त्याने दत्तकविधानाची पोथी घरून आणावी लागेल असं सांगून बाहेर जाण्याची परवानगी मिळवली. आणि तो कारकुनाकडे सगळं सांगायला आला. कारकून लोकमान्यांकडे धावला. लोकमान्य तेव्हा सांगलीकरांकडे होते. ते लागलीच बाळासाहेब नातूंना पाठोपाठ यायला सांगून कारकुनाबरोबर वाड्यावर आले. बाहेरून कारकूनाने पहारेकऱ्याला सामान घेऊन आलोय असं सांगून दार उघडायला सांगितलं. आणि त्याने दार उघडल्याबरोबर टाळी वाजवली. एक पाय आत आणि एक पाय बाहेर ठेऊन तो उभा राहिला. त्याबरोबर लोकमान्यांनी आत प्रवेश केला. पहारेकऱ्याचं लोकमान्यांसमोर काहीच चाललं नाही. कारकून बाकीच्या लोकांना बोलवायला पळाला. लोकमान्य वाड्याच्या चौकात आले आणि त्यांनी नागपूरकर अशी जोरात हाक मारली. नागपूरकर बाहेर आले आणि लोकमान्यांना पाहून इतके दचकले की त्यांच्या हातून तांब्या-भांडंच गळून पडलं. तोपर्यंत लोकमान्यांची माणसं आली. सगळा विचका झालेला प्रतिपक्षाला कळला..या तासाभरच्या नाट्यानंतर सगळी माणसं बाहेर पडायला लागली

आणि आमंत्रित येऊ लागले. त्यांना बाहेरच्या बाहेर, चार दिवसांनी या, असं म्हणून परत जायला सांगितलं.

त्यावर नाराज झालेल्या कोल्हापूरकर पंडित महाराजांनी बाईंना वाड्यात बंदी करून ठेवलंय अशी पोलिसात तक्रार केली, पण लोकमान्य ट्रस्टी असल्यामुळे पोलिसांनी तक्रार घेतलीच नाही. मग पंडित महाराज ॲस्टन यांच्याकडे गेले आणि लोकमान्यांविरुद्ध तक्रार केल्यावर लगेच डिस्ट्रिक्ट कोर्टात प्रोबेट रद्द करायचा, नवीन वारस घ्यायचा, सल्ला दिला. त्याप्रमाणे अर्ज केला गेला आणि नवीन वारस कोल्हापूरचा घेण्यासाठी ताईमहाराज, नागपूरकर, वगैरे कोल्हापूरला गेले. हे कळल्याबरोबर लोकमान्यही कोल्हापूरला गेले आणि त्यांनी कोल्हापूर महाराजांची भेट घेऊन नवीन दत्तक विधानाला परवानगी देऊ नये अशी विनंती केली. पण ते घडलं नाही. ताईमहाराज यांनी छत्रपतींच्या उपस्थितीत बाळामहाराज यांना दत्तक घेतलं. परिणामी दोन दत्तकविधानं आणि दोन वारस ही कठीण परिस्थिति लोकमान्यांना लगेच कळली कारण त्यामुळे सर्व इस्टेटीलाच कुलूप लागणार होतं. त्यामुळे त्यांनी दुसरं दत्तक विधान रद्द करण्यासाठी दिवाणी कोर्टात अर्ज केला.

लोकमान्यांचा दिवाणी अर्ज निकालात निघावा म्हणून खोट्या साक्षी, बनावट कागद, खोटे हिशेब, यांच्या सहाय्याने

लोकमान्यांवर फौजदारी खटल्यात लोकमान्यांना शिक्षा करावी इतक्या खालच्या पातळीवरचं कारस्थान ऑस्टिनकडून केलं गेलं. खटला सुरू झाल्यावर २ दिवसातच ऑस्टिनचा कावा सर्वांच्या लक्षात आला. लोकमान्यांना अत्यंत अपमानास्पद रीतीने या ऑस्टिनने वागवलं. त्यांच्या निकालाविरुद्ध लगेच लोकमान्यांनी हायकोर्टात अर्ज दाखल केला. हायकोर्टात न्यायमूर्ती क्रो यांनी ऑस्टिन यांचा निकाल फिरवला आणि लोकमान्यांना निर्दोष केलं. मध्यंतरीच्या काळात सरकारने गुप्तपणे लोकमान्यांना दोषी ठरवता येईल का याची तपासणी केली, पण त्यांच्या वकिलांनी सरकारच खुनशी म्हणून बदनाम होईल असा सल्ला दिला. तरी सरकारने फौजदारी खटला चालू ठेवायचा निर्णय घेतला.

मग न्या. क्लेमंट याच्याखाली नवीन फौजदारी खटला सरू झाला. आणि खूप मनस्ताप सोसावा लागला. क्लेमंट यांनी लोकमान्यांना दोषी धरून दीड वर्षाची सक्तमजुरी आणि १००० रु. दंड तो दंड न भरल्यास दोन महिने साधी कैद अशी शिक्षा सुनावली. परत त्यावर हायकोर्टाकडे प्रकरण गेलं. दाजीसाहेब खरे त्यांचे वकील होते. न्या. जेकिंस आणि बाटी या दोघांनी लोकमान्यांची निर्दोष मुक्तता केली. तो दिवस होता ३ मार्च १९०४..हायकोर्टाचा निकाल साऱ्या भारताला कळला. सर्व प्रांतांमधून लोकमान्यांना अभिनंदनाच्या तारा आल्या. लगेच रे मार्केटमध्ये जाहीर सभा

भरली. ८/१० हजार लोक सभेला आले. सभेची जागा तोरणे पताकानी सजवली होती. अध्यक्ष स्थानी अण्णासाहेब पटवर्धन होते. सत्काराला उत्तर देताना लोकमान्य म्हणाले की लोकमत माझ्या बाजूला आहे हे माहीत असल्यानेच मी या संकटात टिकून राहिलो.

अशारीतीने ३ वर्षे चाललेला हा रक्त आटवणारा खटला संपला आणि लोकमान्यांची लोकप्रियता आणखीनच वाढली. या खटल्याने मानहानी, वित्तहानी, एवढी झाली तरी बाबामहाराजांच्या मुलींना माहेर म्हणजे केसरीवाडाच होता. त्या पुण्यात आल्या की माहेरपण आणि साडी चोळी झाल्याशिवाय परत जात नसत. त्यांची मुलं लोकमान्यांना मामाच म्हणत. ताईमहाराजांचे वकील बळवंतराव नागपूरकर यांचे पुतणे श्रीपाद हे नेहमी ताईमहाराजांच्या वाड्यावर खेळायला जात. तेव्हा एकदा_धिटाईने त्यांनी ताईमहाराजांना विचारलं.....आपण टिळकांशी का हो भांडता?.. ..तर ताईमहाराज उत्तरल्या.." खरं तर टिळकांनी माझं काहीच वाकडं तर केलं नाहीच पण वाड्यातून सुतळीचा तोडाही नेला नाही. पण एक गोष्ट मात्र आड आली. ते अत्यंत हट्टी आहेत. मी पडले अभिमानी! ते माझ्यापुढे येऊन उभे राहतील आणि मला, " काय महाराज, काय चालले आहे असे म्हणतील तर मी पुढे होऊन त्यांचे पाय धरीन आणि ते सांगतील त्यास रुकार देईन. पण मी

होऊन प्राण गेला तरी माघार घेणार नाही." अशा रीतीने हे प्रकरण संपलं. त्याचा दुसरा भाग म्हणजे जगन्नाथमहाराजांचे सर्व उत्पन्न हे मूळ आपल्या देणगीचे आहे असं म्हणून १८७६ सालच्या एका कायद्याच्या आधाराने बाळामहाराज आणि कोल्हापूरकर छत्रपती यांनी मिळून मुंबई सरकारला आपल्यात सामील करून मुंबई हायकोर्टाकडे एक अर्ज दाखल केला होता. हायकोर्टाकडल्या या अर्जाच्या बाबतीत लोकमान्यांनी एक कैफियत तयार केली. १५ दिवस खपून उत्कृष्ट कायदेपंडिताप्रमाणे त्यांनी ही कैफियत स्वत:च तयार केली होती. आणि जगन्नाथ महाराजांच्या वकिलांनी तो दावा जिंकला. १९२० साली २१ जुलैला हायकोर्टाने लोकमान्यांच्या बाजूने निकाल दिला त्यानंतर दहा  दिवसांनीच ३१ जुलईच्या मध्यरात्री लोकमान्यांचा कैलासवास झाला.

लोकमान्यांच्या एका स्नेह्याने या खटल्याच्या वेळी ताईमहाराजांच्या संदर्भातील एका फोटोचा एक विलक्षण पुरावा मिळवला आणि लोकमान्यांना त्याचा उपयोग करून घेण्यास सुचवलं. तेव्हा लोकमान्यांनी ते सपशेल नाकारलं आणि असा पुरावा दाखल करून  खटला जिंकण्यापेक्षा हरलो तरी परमेश्वरी इच्छा समजून शिक्षा भोगेन. पण मृताचा आत्मा दु:खी होईल, एखाद्या घराण्याची अब्रू जाईल असं काही करणार नाही असं म्हणून तो फोटो फाडून टाकला. लोकमान्य विलायतेला चिरोल

केससाठी निघाले तेव्हा आपल्या स्थावरजंगमाची सगळी व्यवस्था करून निघाले. त्यावेळी जगन्नाथमहाराज एक दिवस त्यांच्याजवळ आले आणि म्हणाले की, दादा तुम्ही सगळयांची व्यवस्था पाहिलीत, पण माझं काय? तेव्हा लोकमान्यांनी त्यांना म्हटलं, झाली की तुमची सगळी इस्टेटीची व्यवस्था ! तुमचा सगळा सरंजाम मिळाला, आता काय राहिलं? तेव्हा जगन्नाथ महाराजांनी त्या खटल्यामुळे लोकमान्यांना जो ६० हजार रुपयांचा खर्च झाला होता तो आपल्या मिळकतीतून द्यायची इच्छा बोलून दाखवली. तेव्हा लोकमान्यांनी त्यांना विचारलं की तुम्हाला मी आपला समजतो. जसे माझे मुलगे तसे तुम्हीही. तेव्हा जगन्नाथमहाराजांनी पितृऋण म्हणून ते ६० हजार देण्याचा आग्रह कायम ठेवला. तेव्हा लोकमान्यांनी बंगल्याजवळची जमीन न्यू पूना कॉलेज या एका शिक्षण संस्थेसाठी भाड्याने देण्याची सोय केली. ( आताची स.प. कॉलेजची जमीन ) ती जमीन ३० हजार रुपयांची होती. आणि ३० हजार तुम्हाला बक्षीस माझ्यातर्फे असं म्हणून प्रकरण मिटवून टाकलं. पण जगन्नाथ महाराजांचाही थोरपणा की लोकमान्यांच्या कैलासवासानंतर त्यांनी ते पैसे मुलांना दिले.

## राजद्रोहाचा दुसरा खटला - मंडाले -

त्यानंतर वादळी वर्ष आलं ते राजद्रोहाचा खटला आणि मंडालेची शिक्षा. स्टेट सेक्रेटरी मोर्ले आणि मुंबईचे गव्हर्नर क्लार्क यांच्या काळात लोकमान्यांवर राजद्रोहाचा खटला भरण्याची परवानगी २३ जून १९०८ ला सरकारला मिळाली. लोकमान्यांच्या प्रभावाला दडपणे हाच यामागे मुख्य उद्देश होता.

लोकमान्यांवर राजद्रोहाचा परत एकदा दुसरा खटला भरला गेला, त्याला कारण काहीच नव्हतं. झोप उडाली होती इंग्रजांची. काय करावं आणि या माणसाला आत घालून त्याची लेखणी बंद करावी हे सरकारला कळेनासं झालं होतं. या माणसाला काही भीती म्हणून नव्हतीच. निद्रिस्त जनतेला जसा हा वीरपुरुष जागं करत होता, तसाच सरकारच्या गुहेत शिरून त्याचा जबडा उघडायचा प्रयत्न करत होता. सरकार इतर वृत्तपत्रांना इशारा वगैरे देत असे पण केसरीला नाही. कारण त्यावर ते टपूनच बसले होते. तेव्हा लॉर्ड सिडनेहॅमनी आपल्या जबाबदारीवर लोकमान्यांना अटक करायचं ठरवलं. लोकमान्यांची क्रांतिकारक चळवळ थांबवणं जरूर आहे असं त्यांना  वाटलं. भारतात त्यावेळी एवढ्या चळवळी आणि दंगे चालू होते, लाला लजपतराय, अरबिंदबाबू

अशी अनेक जहाल पक्षाची आणि नेमस्तांकडची अनेक मंडळी सरकारला धारेवर धरत होती. त्याचवेळी मुझफ्फरपूरला बॉम्बस्फोट झाले. त्याचे पडसाद केसरीत उठले आणि त्या अग्रलेखावरून सरकारला निमित्त मिळालं.

मुख्य प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेट ॲस्टन यांच्यासमोर फिर्याद दाखल झाली. फिर्यादीत म्हटलं होतं, '१० मेच्या अंकात टिळकांनी " देशाचे दुर्दैव " या लेखामधे लोकांमधे सरकारबद्दल द्वेष आणि अवमानबुध्दी जागृत केली. हा राजद्रोह झाला. तरी १२४अ आणि १५३अ या कलमांखाली इन्साफ होऊन टिळकांना योग्य ती शिक्षा व्हावी.' त्याबरोबर वेगाने सरकारी यंत्रणेची चाकं फिरली. लोकमान्यांना याचा सुगावा लागलेला होता, म्हणून आपणच मुंबईला जाऊन राहावं असं त्यांनी ठरवलं आणि एक आठवडा आधी ते मुंबईला आले. मुंबई स्टेशनवरच एक गुप्त पोलीस त्यांच्या कानाशी लागला आणि त्याने तुम्हाला अटक होणार आहे असं सांगितलं. सरदारगृहात ते उतरले तिथे वॉरंटवर सही झाल्याची बातमी येऊन पोचली. " ज्या राष्ट्राला प्रतिकार करण्याचं सामर्थ्य नाही, त्या दुर्बल राष्ट्राच्या पुढाऱ्याला असली बातमी कळून तरी उपयोग काय? " असं लोकमान्य म्हणाले. जेव्हा पोलीस आले तेव्हा पोलिसांनाच त्यांनी एवढा ५ तास उशीर का झाला? मला जामीन तरी मिळवता आला असता असं म्हणून

सरकारचा विचार तो वेळ त्यांना मिळू नये असाच होता हे त्यांच्याच लक्षात आणून दिलं. लगेच सांकेतिक भाषेत ही अटकेची बातमी तारेने पुण्याला घरीही कळली आणि उद्या सकाळी वाड्यावर झडती होणार आहे हेही त्यांना कळलं. सकाळी झडती सुरू झाली. खूप शोधून हत्यारं, बॉम्बस्फोटाचं सामान असं काहीच मिळालं नाही, पण शेवटी एका शिपायाला एका शिपायाला उघडे ड्रॉवर शोधत असतांना सटरफटर कागदांमधे बॉम्ब बनवायचं कार्ड सापडलं आणि त्याची अगदी " युरेका " ची अशी अवस्था झाली. कारण तो कागद लोकमान्यांच्या हस्ताक्षरात होता. सिंहगडावरही छापा पडला, पण हाती काही लागलं नाही. शेवटी १३ जुलैला खटला सुरू झाला. खूप जबान्या, उलटतपासण्या, बचाव-फिर्यादी पक्षाकडून आरोप-प्रत्यारोप होऊन काम संपलं.

लोकमान्यांनी ८ दिवस स्वत:चा बचाव स्वत:च केला. ( तो बचाव, मुद्देसूद बोलणं, सगळं वाचत राहावं असंच आहे.) मी जेव्हा अग्रलेख लिहितो, तेव्हा त्या विषयावरचा अभ्यास करून लिहितो. बॉम्बस्फोटावर लिहायचं तर त्याचं पुस्तक मी मागवलं. ते पोलिसांना नक्कीच तिथेच मिळालं असणार. शिवाय असं मी काही विघातक कृत्य केलं असतं तर ते बॉम्ब बनवायचे कागद असे उघड्यावर, खुल्या ड्रॉवरमधे ठेवले असते का असंच न्यायालयात विचारलं. शेवटी जुलैच्या २२ तारखेला रात्री १० वाजता ६ वर्षांची

काळ्या पाण्याची शिक्षा सुनावली  गेली. कारण सरकारचं आधीच त्यांना शिक्षा करायचं ठरलेलं होतं असंच दिसून आलं. न्यायमूर्तींनी तुम्हाला काही सांगायचं आहे का असं विचारल्यावर लोकमान्य म्हणाले, **" ज्यूरीने मला दोषी ठरवले तर खुशाल ठरवो. पण मी गुन्हेगार नाही. लौकिक गोष्टींचे नियंत्रण करणारी अशीही एक शक्ती न्यायपीठाहूनही वरिष्ठ आहे. कदाचित ईश्वरी इच्छाच अशी असेल की मला शिक्षा व्हावी. आणि मी शिक्षा भोगल्याच्या कारणानेच मी अंगीकारलेल्या कार्याला उर्जितवस्था यावी. "**

शिक्षा झाली त्या दिवशी, इकडे मुंबईत, हजारो लोक रात्रीच्या भुरूभुरू पावसात कोर्टाचा निकाल ऐकायला सकाळपर्यन्त रस्त्यावर उभे होते. त्यांना  शेवटपर्यंत लोकमान्यांचं दर्शन झालंच नाही. शेवटी सजाही कळली आणि त्यांना नेलेलंही कळलं. दुसरे दिवशीपासून मुंबईत शिक्षेच्या निषेधार्थ दंगा झाला. हरताळ झाला, दुकानं बंद राहिली. सरकारचा धि:कारही झाला. पण तोपर्यंत लोकमान्य लांब निघून गेले होते. लोकमान्यांनी आपला खटला ८ दिवस आपणच चालवला.

लोकमान्यांनी आपला बचाव आपणच केला कारण बॅरिस्टर नेमला असता तर पैसा खूप लागला असता आणि शिक्षा

अटळ आहे याची त्यांना खात्री होती. मग कशाला पैसा व्यर्थ घालवायचा असा त्यांचा हिशोब होता. सुनावणी संपल्यावर न्यायमूर्ती डावर यांनी ज्युरींना उद्देशून भाषण केलं आणि निर्भयतेने आपला विचार मांडण्याचं आवाहन केलं. लोकमान्यांनीही आपल्या समारोपात म्हटलं की माझं आयुष्य संपत आलं आहे, पण देशाचं नाही. ज्यूरीतील एकाने जरी माझे विचार बरोबर आहेत असं म्हटलं तरी मला समाधान होईल. एखादी गोष्ट मनाला पटली तरी ती बोलून दाखवायला धैर्य लागतं ते ईश्वराने तुम्हाला द्यावे अशी मी प्रार्थना करतो.. एवढं बोलून त्यांनी भाषण संपवलं. नंतर ॲडव्होकेट जनरल यांचं भाषण, मग न्यायमूर्तींचं ज्युरींना उद्देशून भाषण झाल्यावर ज्यूरी आत गेले आणि दीड तासाने परत बाहेर आले. ७ विरुद्ध २ अशा मतांनी त्यांनी आपला निकाल सांगितला. त्यावर दावर यांनी निकाल जाहीर करायचं ठरवून, मला तुम्हाला शिक्षा सुनावतांना अतिशय दु:ख होत आहे असा सांगून ६ वर्षांची काळया पाण्याची शिक्षा देतो आहे आणि १००० रुपये दंड सांगतो आहे असा निकाल दिला.

रस्त्यावरील हजारो लोकांचा त्रास वाचवण्यासाठी लोकमान्यांना मागच्या जिन्याने खाली उतरवलं. खाली उभ्या असलेल्या मोटारीत चढवलं आणि कुलाबा स्टेशनात आडबाजूला सायडिंगवर स्पेशल ट्रेन उभी होती त्यात चढवलं. तिथून सरळ

अहमदाबादला नेलं. १० सप्टेंबरला अहमदाबादहून पहाटे मुंबईत आणलं. लगेच मुंबई बंदरात हार्डिंग्ज बोट उभी होती. त्यात त्यांना बसवण्यात आलं. सरकारने इतकी गुप्तता पाळली होती की बोटीच्या कप्तानाला बंदराच्या बाहेर पडल्यावर बंद पाकीट उघडून कुठे जायचं ते लिहिलेलं वाचावं लागलं. बोट रंगूनला पोचली. सरकारने तोपर्यंत त्यांचा १००० रु. दंड माफ केला होता, आणि काळ्या पाण्याची शिक्षा रद्द करून साध्या कैदेची शिक्षा बदलून केलेली होती. रंगूनहून ट्रेनने मंडालेला नेलं. आणि सहा वर्षे लोकमान्य तिथेच राहिले. मध्यंतरी मंडालेत पटकीची साथ सुरू झाल्यामुळे काही दिवस त्यांना मंडालेहून हलवून मेक्टिल्ला इथे हलवलं होतं. लोकमान्य तिथून पाठवलेल्या पत्रात लिहितात, "मी आता मेक्टिल्ला येथे आलो आहे. मेक्टिल्ला हा ब्रह्मी भाषेतला मिथिला शब्दाचा अपभ्रंश आहे असं मानतात. तेव्हा मी आता जनकाच्या नगरीला आलो आहे. पण मला माझी सीता, म्हणजे माझी स्वतंत्रता मिळते की नाही तेवढेच पाहायचे.' पण लोकमान्यांनी ईश्वरी इच्छा म्हटलं तेच खरं झालं.

लोकमान्य मंडालेला राहिले. तिथून त्यांना महिन्यातून एक पत्र पाठवायला परवानी होती. ती सगळी पत्रं फार हृद्य आहेत. या पत्रांमधून दिसतो तो एक, पत्नीला, मुलांना धीर देणारा, मुलांच्या शाळेच्या प्रगतीपुस्तकाची चौकशी, पत्नीच्या मधुमेहाची चौकशी,

मुलींच्या घरची चौकशी आणि त्यांना हवी असलेली कुठल्या फळीवर ठेवलेली कुठली पुस्तकं, यांची यादी, स्वत:ची तब्येत, मधुमेह आणि वजन यांची माहिती देणारा एक कुटुंब वत्सल पती आणि पिता. त्यांचे भाचे धोंडोपंत पत्रातून मजकूर लिहीत, कागद कापल्यावरून त्यातला मजकूर फाडला आहे हे लोकमान्यांच्या लक्षात येई. सरकारची मजकूरावर करडी नजर असे म्हणून त्यांनी सूचना केल्या होत्या... प्रत्येक पुस्तकावर इंग्रजीत नावं लिहा. मजकूर पाठपोट न लिहिता स्वतंत्र कागदावर लिहा म्हणजे मागचा मजकूरही गहाळ व्हायचा नाही. राजकारणावर काहीही लिहू नका. दर महिन्यात एकच पत्र त्यांना मिळणार होतं. तरीही तीही वाचली जात, फोडली जात.

सत्यभामाबाई ७ जून १९१२ साली गेल्या. ती बातमी तारेने त्यांना कळली. त्यांनी पत्रात लिहिलं, “ **मनाला फार मोठा धक्का बसला. संकटे आली तर मी ती शांतपणे सोसत असतो. पण खरे सांगतो की या बातमीने मी हादरून गेलो. आपण हिंदू लोक! तेव्हा नवऱ्याच्या आधी बायको गेली हे व्हायचे तसेच झाले असे लोक म्हणणार. पण तिच्या मरणकाळी मी जवळ नाही. इतकेच नव्हे तर बंदिवासात असावे याचेच दु:ख वाटते. हीच भीती मला राहून राहून वाटे आणि तसेच शेवटी घडलेही. माझ्या जीविताचा एक भाग**

**समाप्त झाला. तिच्या तोंडून अखेरच्या इच्छा प्रगट झाल्या, त्या अक्षरश: पाळाव्यात. मी नसल्यामुळे मुलांना तिच्या मरणाचे दु:ख अधिकच झाले असेल. पण माझा म्हणून निरोप सांगा की, त्यांच्याहून मी लहान होतो तेव्हा माझे आईवडील निवर्तले होते. असल्या संकटाने मनुष्याने स्वावलंबन शिकले पाहिजे. दु:ख करीत बसून कालाचा दुरुपयोग करू नये. तिची काय चीजवस्तू असेल त्यांची यादी करा आणि नीट कुलुपात ठेऊन द्या. ईश्वराने तुम्हाला अधिक बळ द्यावे, याहून इतक्या दुरून मी तरी अधिक काय विनवणार?**

मंडालेला एका दुमजली घरात लोकमान्यांना ठेवलं होतं. वरची माडी २० फूट लांब आणि १२ फूट रुंद होती. जरा पहाटेच लोकमान्य उठत. गादीवर बसून काहीतरी मंत्र म्हणून उठत आणि चूळ भरत. मग गादीवर दीड तास ध्यानस्थ बसत. मग प्रातर्विधी, तोंड धुवून चहा घेत. चहा झाल्यावर लिहिण्यात दंग होऊन जात. ९ वाजता परत खाली येत. भरपूर पाण्याने आंघोळ करत. आंघोळ झाल्यावर गोपिचंदन बाळगायला परवानगी नसल्यामुळे कपाळाला चुलीतली राखच लावत. आणि गायत्रीमंत्र म्हणत. जेवण लवकरच करावे लागे. जेवण अगदी कमी जेवायचे. कारण जे उरेल ते आचारी वासुदेवरावांना खायला मिळावं. वासुदेवराव सक्तमजुरीचे कैदी

असल्यामुळे त्यांना जेवायला रोज किडलेली डाळ आणि भिकार तांदूळ मिळत. ती वासुदेवरावानी खाऊ नये आणि तुरुंगाच्या अधिकाऱ्यांना ते कळू नये म्हणून लोकमान्यांनी रोज ती डाळ-तांदूळ चिमण्यांना घालायला सुरुवात केली. त्यामुळे लोकमान्य जेवायला बसले की चिमण्या त्यांच्या अवतीभोवती बिनदिक्कत येत आणि तांदूळ संपवत. पुढे पुढे तर त्या इतक्या धीट झाल्या की लोकमान्यांच्या खांद्यांवर बसायला लागल्या. एकदा एक अधिकारी आला आणि ते दृष्य पाहून चकित झाला. ( चिवचिवाट करत लोकमान्यांच्या खांद्यावर, टेबलवर नाचणाऱ्या चिमण्या टिपायला त्यावेळी कॅमेरा नव्हता आणि लोकमान्य तुरूंगात होते म्हणून. नाहीतर ते दृष्य भारताच्या इतिहासात अमर झालं असतं. बाहेरच्या जगात इंग्रजांच्या नजरेत एवढा धगधगता निखारा आणि हृदयात एवढा ममतेचा झरा. ) जेवण झालं की शतपावली करत आणि जे लिहायला बसत ते संध्याकाळी उठत. दोघांना पाच वाजता जेवून घ्यावे लागे. कारण त्यानंतर संध्याकाळी सहा ते सकाळी सहा वाजेपर्यंत त्यांच्या खोल्यांना कुलुपे लागत. रोज कोणीही माणूस त्यांना दिसत नसे. तरीही एक दिवस ते वासुदेवरावांना म्हणाले की आज एक कैदी पळून जायचा प्रयत्न करणार आहे, पण तो पकडला जाणार. आणि त्या रात्री तसंच घडलं. लोकमान्यांना हे आधीच कसं कळलं ते मात्र

वासुदेवरावांना कधीच कळलं नाही. मध्यरात्री अचानक सायरनचा आवाज सगळीकडे घणघणायाला लागला. वीजेरीचा प्रकाश पसरला आणि थोड्याच वेळात बंदुकींचे बार ऐकायला आले. या ६ वर्षांमध्ये धोंडोपंत, खापर्डे त्यांना भेटायला आले. जर्मन फ्रेंच भाषांचा अभ्यास करायला लोकमान्यांना फुरसत मिळाली. गीतारहस्याच्या लेखनामुळे काळया पाण्याची शिक्षा हा शब्द आणि तुरुंग गंगेसारखा पावन झाला.

लोकमान्यांनी जिथे गीतारहस्य लिहिलं त्याच मंडालेच्या कैदेत बादशहा बहादूरशहा जाफरने “ लगता नाहीं हई दिल मेरा उजाडे दयारमे हे निराश काव्य लिहिलं..केवढा विरोधाभास..

## मंडालेहून सुटका –

६ वर्षे संपली. सोमवार ८ जून, १९१४, या दिवशी सकाळी ८ वाजता जेलचे सुपरिटेंडट, लोकमान्यांच्या खोलीत आले आणि त्यांनी सामानाची आवराआवर करण्यास सांगितलं. लगेच १ वाजता स्टेशनवर नेऊन गाडीत बसवण्यात आलं. त्यांची लाल पगडी काढून घेऊन टोपी घालण्यास सांगितलं. लोकांनी ओळखू नये हाच त्यामागे उद्देश होता. स्टेशन आलं की डब्याची दारं बंद केली जात. रंगूनच्या अलीकडील स्टेशनवर उतरवून बंदरावर नेण्यात आलं. तिथे आधीच मेयो नावाची बोट तयार ठेवण्यात आली होती. बोटीत चढल्यावर पुण्याच्या पोलिसांचे चेहरे दिसले तेव्हा त्यांना सुटका झाल्याचा अंदाज आला. त्यात सी. आय. डी. सदावर्ते, कॉन्स्टेबल दाते आणि जमादार मारुतराव ह्यांना लोकमान्यांनी पाहिलं. साधारणपणे रंगूनहून बोट ४/५ दिवसात मद्रासला पोचते, पण मुद्दाम बोट अर्ध्या गतीने चालवत मद्रासला ८ दिवसांनी संध्याकाळी ६ वाजता आली. बोटीतून मचव्यावर उतरवून लोकमान्यांना मद्रास स्टेशनवर नेलं आणि मेल गाडीचा मागचा डबा रिझर्व केला होता, त्यात पोलिसांसकट सर्वांना बसवलं. आगगाडी पुण्यात पोचल्यावरही तिथे त्यांना न उतरवता

हडपसरला सर्वांना उतरवलं. तिथे गाडी एकच मिनिट थांबली. बाहेर पडतांना स्टेशन मास्तरने लोकमान्यांजवळ तिकीट मागितलं, त्यांनी अधिकाऱ्यांकडे बोट दाखवलं. त्याला बिचाऱ्याला काय माहीत हा प्रवासी कोण आहे ते ! बाहेर दोन गाड्या उभ्या होत्या. त्यात त्यांना बसवलं. सदावर्तेही बरोबर होते. पुढे पायलट कार होती, ती अर्ध्या वाटेतून परत गेली. आणि मध्यरात्री लोकमान्य घरी पोचले. पोलिसांबरोबर आलेल्या आपल्या मालकास आत घ्यावं की नाही याचा दरवाजावरील भैय्यास प्रश्न पडला म्हणून त्याने धोंडोपंतांना बोलावून घेतलं आणि मग लोकमान्यांनी आपल्या सत्तेच्या घरात प्रवेश केला..

केसरीवाडा आश्चर्याच्या धक्क्यातून सावरत परत एकदा प्रचंड गजबजला. दर्शनासाठी लोकांची नुसती रांग लागली.. शेवटी पहाटे ४ वाजता लोकमान्यांनीच सर्वांना विनंती केली आणि विश्रांति घेतली. पण सरकारने आपली हीन मानसिकता दाखवत त्यांना नजरकैदेत ठेवलं, त्यांना कोणत्याही सभेला, भाषणाला परवानगी नाकारली. कहर म्हणजे त्यांच्या मुलांचे सत्कार करून लोकमान्यांचा सत्कार करण्याची आपली इच्छा पूर्ण करतील म्हणून मुलांचे सत्कारही करायचे नाहीत असा फतवा काढला.

थोडी विश्रांति झाल्यावर लोकमान्य राजकीय आणि सार्वजनिक आयुष्यात शिरले. लोकमान्य अॅनी बेझंटबाईंना भेटायला सर्व्हंट्स ऑफ इंडियाच्या इमारतीत गेले असतांना गोपाळ कृष्ण गोखले तिथेच होते. म्हणून लोकमान्य त्यांनाही जाऊन भेटले. यावेळी गोखल्यांची प्रकृती आजारपणामुळे नाजुक झालेली होती. त्या भेटीत गोखले लोकमान्यांना म्हणाले की आता तुम्ही कॉंग्रेसमध्ये येऊ नका. तुमचे आणि त्यांचे पटणार नाही. त्यावर लोकमान्यांनी स्वच्छ शब्दात ते नाकारलं आणि त्यांना म्हणाले की कॉंग्रेस सर्वांची आहे, ती कुणा एकास आंदण दिलेली नाही. मी आधी देश तयार करणार, कॉंग्रेसमध्ये येणार आणि कॉंग्रेस काबीज करणार. तेव्हा असा तुमचा बेत जाहीर का केलात असं लोकमान्यांच्या सहकाऱ्यांनी विचारल्यावर ते म्हणाले की पूर्ण विचारांती माझी मते ठाम झालेली असतात, ती प्रतिपक्षाला उघडा करून आधी बजावत असतो, आपले धोरण प्रतिपक्षाला उघड करून त्याच्याशी दोन हात करण्यातच पुरुषार्थ आहे. पण लवकरच गोपाल कृष्ण गोखले यांचं निधन झालं. लोकमान्य तेव्हा सिंहगडावर होते. त्यांना गाडी पाठवून पुण्यात बोलावून घेतलं. पाठोपाठ फिरोजशाहा मेथाही वारले. कॉंग्रेसचं मोठं नुकसान झालं.

सन १९१४ हे साल हे जागतिक वणवा पेटवणारं ठरलं. युरोपात महायुद्धाला सुरुवात झाली. त्यात इंग्लंड पुरतं अडकलं.

आणि दुसरीकडे ॲनी बेझंट यांच्या होमरूल चळवळीने हातपाय पसरायला सुरुवात केली. इंग्लंड हा शत्रू संकटात सापडल्यावर त्याच्यासारखी सुसंधी राष्ट्रीय पक्षाला परत मिळणार नव्हती. होमरूल मोहीम स्वराज्य संस्था या नावाने सुरू झाली.

## तिसरा राजद्रोहाचा खटला -

त्यातच १९१६ साल उजाडलं. हे वर्ष लोकमान्यांच्या ६० वर्षे पूर्ण होण्याचं. अर्थात सर्वांनी त्यांचा षष्ठयब्दी समारंभ थाटात करायचं ठरवलं. त्यांचा सत्कार करून त्यांना थैली अर्पण करण्याचा योग सर्वांनी आखला. वाढदिवस तिथीप्रमाणे आषाढ वद्य षष्ठी २० जुलैला आणि इंग्रजी तारखेप्रमाणे २३ जुलै होता. मग २३ जुलै दिवस निश्चित केला. होम, हवन, कीर्तन, वेदपठण झालं. सध्याकाळी जाहीर सभा भरली हजारो लोक जमले. अण्णासाहेब पटवर्धन मुख्य पाहुणे होते. एक लाखांचा आहेर जमला. लोकमान्यांना आहेर आणि मानपत्र देण्यात आलं आणि आहेरही दिला. मग समारोपाचं भाषण लोकमान्यांनी केलं. एक लाखात स्वत:ची काही रक्कम घालून ती राष्ट्रीय कार्यासाठी देण्याचं त्यांनी जाहीर केला. ही रक्कम इतक्या गुप्तपणे जमा झाली की कुठेही वाच्यता झाली नाही आणि ३० जूनपासून २३ जुलै पर्यन्त अवघ्या २३ दिवसांमध्ये ती जमली.

त्या हृद्य सोहळ्यात विष कालवण्याचा हीन उद्योग सरकारने केला. . समारंभाच्या दिवशी सकाळी बेळगाव आणि नगर मधील भाषणावर राजद्रोहाचा खटला भरून जामीन मागितल्याची

नोटिस बजावण्यात आली. आपल्या भाषणांची भाषांतरे होत आहेत ही कुणकुण लोकमान्यांच्या कानावर गेलीच होती. पण त्यावर खटला भरला जाईल याची कल्पना त्यांना नव्हती. आनंदात चाललेल्या समारंभात पोलिस सुपरीटेंडंट पोलिसांना दिसले आणि लोक धास्तावले. खरंतर माजिस्ट्रेटने २८ जुलैला कोर्टात हजर होण्यास सांगितलं होतं. त्यामुळे २३ तारीख सोडून कोणत्याही दिवशी पोलिस केसरीवाड्यावर आले असते तरी चालण्यासारखं होता. पण खुनशी सरकारने आपली मानसिकता दाखवून अवलक्षण करून घेतलं. शेवटी ऑगस्ट ८ तारखेस खटला सुरू झाला, महंमद अली जिना हे लोकमान्यांचे वकील होते. १२ ऑगस्टला निकाल लागला. यावेळी जामीनावर त्यांची सुटका केली. मग या निर्णयाविरुद्ध हायकोर्टात अपील झाल्यावर न्या. शहा आणि न्या. बॅचलर यांनी त्यांना दोषमुक्त करून सोडून टाकलं. यामुळे लोकमान्यच परत महानायक झाले.

# चिरोल खटला.

सिंहाच्या गुहेत शिरून त्याच्या आयाळीला हात घालण्याचं धाडस म्हणजे चिरोल खटला.

चिरोल खटला हा लोकमान्यांच्या आयुष्यातला एक मोठा अध्याय होता. यात त्यांच्या धाडसीपणाचं, इंग्रजांशी दोन हात करण्याच्या राजकीय खेळीचं आणि स्वाभिमानासाठी वाटेल ते दिव्य करायला तयार असण्याची पावती फाडणारं प्रकरण होतं. त्यासाठी त्यांनी घर गहाण ठेवण्यालाही मागेपुढे पाहिलं नाही. ताईमहाराज प्रकरणाएवढंच लोकमान्यांचं रक्त आटवणारं खटला प्रकरण म्हणजे चिरोल खटला.

या खटल्याचा खलनायक सर व्हॅलेंटाईन चिरोल हा लंडनच्या प्रतिष्ठित, उच्चभ्रू समाजात वावरणारा, लंडन टाईम्सच्या परराष्ट्र विभागाचा मुख्य होता. हे वृत्तपत्र साम्राज्यवादी होतं. इंग्लंडची सत्ता साऱ्या जगभर असावी हे या वृत्तपत्राचं धोरण होतं. चिरोलचं मुख्य काम परराष्ट्रीय राजकारणाबद्दल लेख लिहिणं हे होतं. परदेशातल्या बातम्या गोळा करण्यासाठी तो जगभर हिंडत असे. लोकांच्यात फिरून, माहिती काढून मग बातम्या तयार करण्यापेक्षा सरकारी रिपोर्ट वाचून त्यात मसाले घालून तो आपला

लेख लिहीत असे. चिरोलने जुलै २० ते १७ ऑगस्ट,१९१० मधे " इंडियन अनरेस्ट नावाची टाईम्समधे एक लेखमालिका लिहिली. त्यात लोकमान्यांचा फादर ऑफ अनरेस्ट असा उल्लेख करून त्यावर लोकमान्यांची बदनामी करणारे अनेक आरोप त्यात होते. लोकमान्य तेव्हा मंडालेला शिक्षा भोगत असल्यामुळे, ते लेख लोकमान्यांना वाचायला मिळाले नाहीत.

चिरोलला बंगालच्या फाळणीवर लेख लिहायला चिरोलला भारतात पाठवण्यात आलं. ते समालोचन लिहिण्यासाठी तो भारतात फिरला. या प्रवासात सहारनपूरला त्याची आगगाडी अडवण्यात आली. कारण सहारनपूर हे प्लेगचं ठाणं होतं आणि आगगाडीत कुणी प्लेगचा पेशंट नाही ना याची तपासणी सुरू झाली. तो डॉक्टर चिरोलच्या डब्यात आला आणि त्याची नाडी तपासायला लागला तेव्हा काळ्या माणसाने हात लावला म्हणून संतापलेल्या चिरोलने त्याला जोराचे ठोसे लगावले. डॉक्टराबरोबरचा पोलीस मधे पडला आणि त्याने डॉक्टरला वाचवलं. त्या डॉक्टरने मग फिर्याद नोंदवली. चिरोलने लगेच लॉर्ड कर्झनची मदत मागितली, पण काही उपयोग झाला नाही. तेव्हा चिरोलला सपशेल लेखी माफी मागावी लागली. असा हा चिरोल भारतीयांना  तुच्छ लेखणारा होता. भारतात आल्यावर तो पार्टी-

खाना-नाच समारंभ, बड्या इंग्रजांच्या ओळखी यात रमला.

मुंबईला आल्यावर चिरोलला मोठंच घबाड मिळालं. मुंबई सरकार आणि कोल्हापूर सरकार यांचं लोकमान्यांशी अतिशय वाकडं होतं. कोल्हापूरकरांचे सहायक डोंगरे, सबनीस आणि भास्कर जाधव यांची चिरोलला खूप मदत झाली. त्यांच्याकडून मसाला घेऊन केसरी-मराठाच्या फायलीतून निवडक शब्द आणि उतारे यांचं भाषांतर करून, वाक्यांची मोडतोड आणि फेरजुळणी करून लंडन टाईम्सचा लेख तयार झाला.

याचवेळी युरोपियन जगतावर युध्दाचे ढग जमायला लागले होते. १ ऑगस्टला जर्मनीने रशियावर आक्रमण केलं. यात इंग्लंडही आपोआप ओढलं गेलं. इंग्लंडमुळे भारत सरकारवरही त्याचा परिणाम झाला. जेमतेम महिन्यापूर्वी सुटून आलेल्या लोकमान्यांनी त्याचवेळी चिरोलविरुध्द खटला भरण्याचे बेतही सुरू केले. यात त्यांचे दुहेरी हेतू होते. १. चिरोलच्या खटल्याच्या निमित्ताने लंडनला जायचं. २. तेथील लोकांमधे भारताच्या स्वराज्याच्या कल्पनेचा प्रसार करायचा. लोकमान्यांची आणखी एक खेळी अशी होती की भारतात भरपूर असलेलं इंग्रजांना लागणारं मनुष्यबळ द्यायचं आणि त्याबदल्यात स्वराज्य मागायचं.

पण त्यासाठी ब्रिटीश पार्लमेंटमधील सभासदांशी प्रत्यक्ष भेटून संवाद साधायचा.

पण यासाठी लागणारा पासपोर्ट मिळणं कठीण होतं. कारण लोकमान्य इंग्लंडमधे येणार म्हणजे त्यांच्या दृष्टीने वादळ येऊन थडकणार. स्वराज्य संस्थेच्या डेप्युटेशनचा लोकमान्यांचा आधीचा प्रवास कोलंबोपर्यंत होऊन थांबला होता. पण चिरोल केससाठी मात्र ते लंडनला पोचले. एकीकडे हे सगळं चालू असतांना लोकमान्यांनी स्वराज्याची संकल्पना ब्रिटीश पार्लमेंटमधे रुजवण्यासाठी त्यांचे मित्र बाप्टीस्टा यांना वर्षभर आधी इंग्लंडला पुढे पाठवलं. होमरूलच्या स्थापनेनंतर एक मंडळ इंग्लंडला पाठवायचा निर्णय घेण्यात आला.

दाजी खरे या लोकमान्यांच्या मित्राने विलायतेला न जाण्याबद्दल सुचवलं. पण लोकमान्यांचा अंत:स्थ हेतू सर्वांना नंतरच कळला. या केससाठी लोकमान्य लंडनला गेले. चिरोलच्या पुस्तकातून लोकमान्यांनी ३० वाक्यं निवडून काढली. त्यातील काही त्यांच्या खाजगी आयुष्यावर शिंतोडे उडवणारी होती, तर काही अत्याचाराशी जोडलेली होती. लोकमान्यांचे सॉलिसिटर जॉन्सन यांनी चिरोलविरुद्ध ऑक्टोबर १९१५ मधे नोटीस बजावली. पण त्या नोटीसीला उत्तर न आल्यामुळे बेअब्रूची फिर्याद

दाखल झाली. डोंगरे, सबनीसांच्या साक्षीसाठी कमिशन मुंबईत आलं. डोंगरे यांनी साक्षीत सांगितलं की त्यांनीच चिरोलच्या पुस्तकाचं भाषांतर केलं. त्यात स्वत:चा उल्लेख बहुवचनात आणि लोकमान्यांचा उल्लेख एकवचनात केला होता. त्यात चिरोलला महात्मा म्हटलं होतं. त्या पुस्तकाच्या २०००प्रती काढण्यात आल्या. त्यातल्या कोल्हापूरकरांनी ४०० घेतल्या. उरलेल्या पडून होत्या.

चिरोलच्या सहा मुद्यांवर लोकमान्यांनी बेअब्रूची फिर्याद केली.

१. हिंदू-मुस्लीम दंग्यांचा फायदा घेऊन टिळकांनी गोरक्षसभा काढली आणि या चळवळीसाठी मोठ्या दंगली घडवून आणल्या. .......लोकमान्यांनी हा आरोप नाकारला.

२. इंग्रजी सरकार उलथून टाकायला टिळकांनी आखाडे काढले...लोकमान्यांनी सांगितलं की मराठी माणसाला तालमीची आवड असतेच. तालमीला आखाडा लागतो....हा आरोप म्हणजे त्यांची बेअब्रू.

३. .गणपती आणि शिवाजी उत्सव ह्या दोन निमित्ताने धमकीने, धाकदपटशाने टिळकांनी वर्गणी गोळा केली. ...लोकमान्यांनी ते

सपशेल नाकारलं. उत्सव करणं म्हणजे दंगे आणि राजद्रोह होत नाही.

४. टिळकांनी दरोडेखोरांकडून पैसा गोळा केला....ही बेअब्रू झाली.

५ ताईमहाराज प्रकरण....यात प्रिव्ही कौन्सिलने आपल्या बाजूने निकाल दिला आहे असं ते म्हणाले.

6. रँडच्या खुनासाठी चाफेकरांना फाशी तर टिळकांना का नाही....पण टिळकांचा त्यांच्याशी संबंध नाही असं सरकारी वकिलानेच सांगितलं आहे हे लोकमान्यांनी कोर्टाला दाखवून दिलं.

चिरोल केसची सुनावणी भारतात झाली आणि विलायतेत २९ जानेवारी १९१९ ला सुनावणी सुरू झाली. ती न्यायाधिकारी डार्लिंग यांच्यासमोर लोकमान्यांच्या बाजूने सायमन, स्पेन्स हे बॅरिस्टर आणि चिरोलच्या बाजूने कार्सन केस लढवत होते. या प्रश्नोत्तराच्या वेळी वकिलाने विचारलं की तुम्ही ही फिर्याद हिंदुस्थानात का केली नाहीत? लोकमान्य म्हणाले, " चिरोलचं हे पुस्तक तुमच्या सगळ्या साम्राज्यात वाचलं जाईल. म्हणून इंग्लंडच्या कोर्टात लागलेला निकालही साम्राज्यभर होईल. म्हणून मी इथे आलो. " त्याच्या बदनामीचा सूड घेण्यासाठी आणि चिरोलचे दात त्याच्याच घशात घालण्यासाठी लोकमान्यांनी आपलं घरही गहाण टाकलं होतं. भारतात हा खटला चालला

असता तर चिरोलच्या उचापती जगाला कळल्या नसत्या. कोणत्याही भारतीयाविरूद्ध  लिहिण्यापूर्वी आता इंग्रजांना विचार करावा लागणार होता.

पूर्वतयारीसाठी जोसेफ बाप्टीस्टा एक वर्षभर लंडनला पुढे गेलेले होते. त्यांनी लेबरपार्टीच्या सर्व सभासदांची भेट घेऊन त्यांच्याशी संवाद साधलेला होता. हा पक्ष आला तर भारतातल्या होमरूलला त्यांचा पाठिंबा राहील असं लेबर पक्षाने कबूल केलं होतं. या लेबर पक्षाच्या निवडणुकीसाठी लोकमान्यांनी २००० पौंडाची देणगीही त्या पक्षाला दिली. खूप भाषणं दिली. ग्लासगोच्या अधिवेशनासाठी ते लेबर पक्षाबरोबर गेले आणि तिथेही आपली बाजू मांडली.

या निवडणुकीच्या धामधुमीचा फायदा लोकमान्यांनीही घेतला अनेक पत्रिका छापून त्यांनी भारतातील परिस्थितीबद्दल जनमत तयार करण्यासाठी त्या सर्वत्र वाटल्या. आपल्या विरुद्ध निकाल लागणार हे लोकमान्यांना माहीतच होतं. कारण कार्सनने उघडपणे म्हटलं की टिळकांनी हा खटला जिंकला तर आपल्याला भारतात राज्य करणं कठीण होईल. अनर्थ होईल. खटल्याचा निकाल २१ फेब्रुवारीला संध्याकाळी ६ वाजून १७ मिनिटांनी

लोकमान्यांच्या विरुद्ध लागला. चिरोल केसचं लोकमान्यांच्या मनातलं गणित असं होतं,

" चिरोलवर मी खटला केला ते महायुद्ध सुरू झालं म्हणून ! तिथे न्याय मिळेल म्हणून नव्हे. हिंदुस्थानातले जज्ज सरकारच्या मुठीतले. त्यापेक्षा विलायतेतील जज्ज अधिक स्वतंत्र. हा खटला उघडपणे चिरोलविरूद्ध असला तरी खरा तो सरकारविरुध्दच होता. कारण चिरोलने पुस्तक लिहिलं ते सरकारी गोऱ्या कामदारांनी दिलेल्या माहितीवरूनच लिहिलं. तेव्हा चिरोल हरला तर सरकारची फटफजिती होणार. महायुध्द चालू आहे तोपर्यंत सरकारला हिंदुस्थानच्या मदतीची गरज आहे. त्या मदतीमुळे हिंदुस्थानवर धडधडीत अन्याय करून असंतोषात आणखी भर घालणं सरकारला परवडणार नाही. या अंदाजाने मी खटला भरायचा विचार केला. महायुध्द चालू असेपर्यंत खटल्याचा निकाल लागेल असा अंदाज होता. पण आम्ही विलायतेला पोचून पंधरा दिवस होतात न होतात तोच युद्ध संपलं. मी दादासाहेबांना तेव्हाच म्हटलं की आता खात्री समजा की खटला आमच्यावर उलटणार. युध्द संपल्यावर कोण हिंदुस्थानच्या असंतोषाची पर्वा करतो? "

**विलायतेला जाण्यापूर्वी लोकमान्यांनी आपल्या जवळच्या लोकांना सांगून ठेवलं होतं की निकाल माझ्या बाजूने लागला आणि भरपाई मिळाली तर मी काय करीन ते सांगायला नकोच पण जर केस हरलो तर एक वर्षाची केसरीची हक्काची रजा घेऊन माझे राहिलेले ग्रंथ पूर्ण करून त्यावर हजारो रुपये मिळवीन. माझ्या ग्रंथांचा योगच असा असतो की ते अडचणीच्या वेळी लिहून पूर्ण होतात.**

**वकील असून आरोपी म्हणून पिंजऱ्यात उभा राहण्याचा, गुन्हेगार नसतांना लोखंडी सळयांच्या मागे राहण्याचा, शहाण्या माणसाने कोर्टाची पायरी चढू नये असा जग म्हणत असतांना, कोर्टासाठीच ऋषितुल्य प्रज्ञा वेचण्याचा आणि त्यात आयुष्य खर्ची घालण्याचा आणि तुरुंगातच अमर वैदिक साहित्य लेखनाला जन्माला घालण्याचा काय योग लोकमान्यांच्या ललाट लेखात सटवाईने का लिहिला होता हे अगम्य आहे.**

१९१९ सालच्या ६ नोव्हेंबरला लोकमान्यांनी लंडन सोडलं. २२ नोव्हेंबरला ईजिप्त बोटीने ते भारतात परतले. सरदारगृहात उतरले. संध्याकाळी शांतारामाच्या चाळीत त्यांचा मोठा सत्कार झाला. १ डिसेंबरला ते पुण्यात पोचले. त्यांची भव्य

मिरवणूक निघाली. ७ डिसेंबरला त्यांना मानपत्र देण्याचा कार्यक्रम झाला. नेमस्त आणि ब्राह्मणेतर त्यास विरोध करणार असं पत्र रँग्लर परांजपे आणि गुप्ते वकील यांच्या सहीने समितीकडे पाठवण्यात आलं. कार्यक्रमाचे संयोजक चिंतेत पडले. त्यांची चिंता लोकमान्यांनीच दूर केली. हे लोक सभेत दंगा करणार अशी बातमी होती, म्हणून लोकमान्यांनी संयोजकांना सल्ला दिला की यांची व्यवस्था वेगळी करा. म्हणजे कोण लोक आहेत ते लगेच कळेल. पण नेमस्त काही आलेच नाहीत.

मद्रास, दिल्ली, अमृतसर, सांगलीचं पंचांग संमेलन, जुन्नर, अजमर, सिंध प्रांताचा दौरा, यात ते व्यस्त राहिले. सिंध प्रांतात त्यांचा भव्य सत्कार झाला. सांगलीच्या पंचांग अधिवेशनाच्या काळात जाहीर सभेत एक घटना घडली. लोकमान्यांचे भाषण ऐकायला खूप गर्दी जमली. भाषण चालू असतांना अचानक मागच्या रांगेतील लोक धावत सुटले. काहीतरी गडबड झाली. पण लोकमान्य बोलतच राहिले. गडबड झाली त्याच कारण सभेतला एक माणूस शर्टात साप घुसला म्हणून जोरात ओरडला आणि लोक घाबरून पळायला लागले. तेव्हा लोकांना कर्मयोग या विषयावरच्या वाक्यांमधे ते म्हणाले, परिणामांकडे लक्ष न देता स्वत:चं कर्तव्य करा हे माझ्या विषयाचं सार आहे, आणि तुम्ही तर य:कश्चित सापाची हूल उठल्याबरोबर पळत सुटलात.

तुमच्यासारखे लोक मोहामुळेच रज्जूला साप मानतात. तो मोह घालवण्यासाठीच वेदांताचा अवतार आहे. वेदांताचे तत्त्व मनावर बिंबवलं की ते इतका आत्मविश्वास निर्माण करतं की सर्पाला रज्जुप्रमाणे पिरगाळून टाकतं. एवढा आत्मविश्वास तुमच्यात हवा.

लोकमान्यांचे दौरे चालूच होते.

यानंतर मात्र सूर्यास्ताची वेळ जवळ यायला लागली. लोकमान्यांचं वय आता ६४ वर्षे झालं होतं. मधुमेहामुळे कित्येक वर्षे ते सातूच्या पिठावर राहिले होते. बुध्दीचा तल्लखपणा तसाच होता, पण पाय लटपटायला लागले होते. दूरचं दिसणंही कमी झालं होतं. पायात मोजे घाला म्हटलं तर त्यांना ते कबूल नसायचं. हातालाही कुणाचा तरी आधार लागायला लागला होता.

यातच १९२० साल उजाडलं. जुलैमधे जगन्नाथमहाराजांचा खटला परत उभा राहिला होता. जगन्नाथ महाराजांची इस्टेट ही कोल्हापूर महाराजांच्या देणगीची आहे असा मुंबई सरकारला सामील करून घेऊन बाळा महाराज आणि कोल्हापूर छत्रपतींनी १८७६ सालच्या कायद्याचा आधार घेत अर्ज भरला होता. त्याची कैफियत लिहिण्याचं काम चालू होतं, त्यातच बारीक ताप यायला लागला. अर्जाची सुनावणी १४ जुलैला मुंबईत होती. म्हणून मुंबईला जाणं जरूरीचं होतं. तेव्हाच

मलेरियाचा ताप सुरू झाला होता. मुंबईत तोही हटेल या विचाराने १२ जुलैला ते मुंबईत आले. सरदारगृहात नेहमीप्रमाणे उतरले. पुढचे दोन दिवस वकिलांना कैफियत समजावून सांगण्यात गेले. ठरल्याप्रमाणे १४ तारखेला सुनावणी होऊन २० तारखेला जगन्नाथ महाराजांच्या बाजूने निकाल लागला. छत्रपती आणि मुंबई सरकारचा अर्ज फेटाळला गेला.

बुधवार २० जुलैला दिवाण चमनलाल सहजच लोकमान्यांच्या भेटीला आले होते. लोकमान्यांना किंचित ताप होता, म्हणून ते आपल्या गाडीतून त्यांना फिरायला घेऊन गेले. त्या रात्री लोकमान्यांचा ताप वाढला. तेव्हापासून दुखणं वाढतच गेलं. बुधवार २० जुलैपासून पुढच्या सोमवारपर्यंत ताप येतच राहिला. त्यातच न्युमोनियाची लक्षणं दिसायला लागली. उजवीकडच्या फुफ्फुसाचा खालचा भाग सुजला. मग कोठाही सुजला. वरचेवर उचकी लागायला लागली. मुंबईभरचे डॉक्टर्स आपापले उद्योग सोडून या थोर पुरुषाच्या सेवेत गुंतले. आठ दिवसात सारी आशा संपली. त्यांना पाहायला लोकांची रीघ लागली. भाविकांनी आपापल्या परीने श्रद्धेने धर्मकृत्य चालू केली. शनिवारी त्यांना श्वास लागला.

शेवटच्या चार दिवसांमधे त्यांना भ्रमही झाला. बेशुद्धीत ते लांब लांब व्याख्यानं म्हणू लागले. व्याख्यानात ते म्हणत असत...२८ जुलैला भ्रमात - " १८१८ साली हे असं झालं.... आणि हे १९१८ साल...१०० वर्षांची हिस्टरी...आम्ही हे असे हीन झालो..." ...२९ जुलैच्या रात्री १ वाजता भ्रमात - ." माझी अशी खात्री आहे की हिंदुस्थानाला स्वातंत्र्य मिळण्याखेरीज तरणोपाय नाही. ....रात्री २ वाजता.. आपण आणि जनता यांनी जे श्रम केले त्याबद्दल मी आपले आभार मानतो...या अस्पष्ट बोलण्यात घरगुती खासगी आठवणींचा लवलेश नसायचा.

**३१ जुलैची रात्र सुरू झाली. डॉ. देशमुख, डॉ भडकमकरांनी बाहेर जमलेल्या लोकांना सांगितलं... टिळक आता ईश्वराधीन आहेत. मध्यरात्री १२ वाजून ४० मिनिटांनी या दिव्य तेजस्वी दीपशिखेच्या शरीरातली स्निग्धता संपली. मोठा उल्कापात घडला. महाराष्ट्रभर शोकसंदेश पोचायला लागला. अवघा महाराष्ट्र शोकसागरात बुडाला.**

**ही बातमी विनायक दामोदर सावरकरांना अंदमानातल्या तुरुंगातही मिळाली. आधी रात्री उडत उडत मिळाली आणि सकाळपर्यंत निश्चितपणे मिळाली. कारावासातील सर्व राजबंद्यांना अतीव दु:ख झालं. ते व्यक्त**

**करण्यासाठी एक दिवसाचा उपास पाळण्याचा त्यांनी निश्चय केला. आणि जेवणाच्या वेळेपर्यंत सबंध अंदमानातल्या कैद्यांमधे वाऱ्यासारखी गुप्तपणे ही बातमी पोचली. त्यादिवशी अंदमानच काय पण दूर रास बेटावरच्या आणि इतर भागातल्या साऱ्याच कैद्यांनीही जेवण नाकारल्याचं पाहून जेलर थक्क झाला पण त्याला कारण कळलं नाही. हजारो बंदिवानांनी राष्ट्रीय दु:ख असं पाळलं.** कैद्यांच्या खोल्यांच्या मागच्या भिंतीच्या तळाशी वाऱ्यासाठी एक जाळी होती, त्यातून निरोप पोचवला गेला.

या महान भारतातील भक्ति – ज्ञान – वैराग्ययुक्त महामानव, जो तन, मन, धन, सर्व जनहिताकडे लावतो, बुद्धीने ग्रंथ अर्पण करतो, उपदेश करतो, जरूर पडल्यास शारीरिक श्रम जगासाठी घेतो, जवळ धन असल्यास ते लोककार्याकडे लावतो, नसल्यास बुद्धीच्या बळावर ते निर्माण करून देशकार्यासाठी लावतो, जनात अलिप्तपणे मिसळून जनांसाठी खपतो, तो अनंतात विलीन झाला. तळपणारा सूर्य मध्यरात्री क्षितिजापलिकडे अनामिक विश्वात गेला.

ज्या सरदार गृहात लोकमान्यांचा कैलासवास झाला, त्याचे मालक विसुभाऊ साळवेकर मात्र एक जुन्या आठवणीत गेले

होते आणि उदास झाले होते. साल १८९८ मध्ये सरदारगृहाची संस्था ग्रँट रोड वरच्या टोपीवाला बंगल्यात सुरू झाली होती. तिथे लोकमान्यांचे घनिष्ठ मित्र महाडकर जोशी राहायला आले आणि आजारी पडले. त्यांची ती गंभीर परिस्थिति पाहून विसुभाऊंनी घरच्यांना बोलवायचं का असा विचारल्यावर त्यांनी लोकमान्यांना बोलावून घ्यायला सांगितलं. लोकमान्यही लगेच दुसरे दिवशी आले.. त्यानंतर १५ दिवसात जोशीबुवांचं निधन झालं..त्यानंतर मित्रमंडळीत बसलेले असतांना लोकमान्य म्हणाले की विसुभाऊंनी जोशीबुवांची सेवा इतकी छान केली की मरावायचे असेल तर सरदारगृहात येऊन मरावे..

सर्वार्थाने आज त्यांचे शब्द खरे झाले होते..

## अलौकिक अंत्ययात्रा.

**लोकमान्यांच्या कैलासवासाची वार्ता कळल्यावर लोकांच्या झुंडीच्या झुंडी सरदारगृहाकडे यायला लागल्या. सरकारने पुण्याहून एक स्पेशल मेल सोडली. त्यादिवशी तिकीट कुणी काढलंच नाही. लोकमान्यांचं शव व्यवस्थितपणे एका चौरंगावर बसतं करून त्यांच्यावर शालजोडी घालून कपाळाला भस्म लावून पुष्पहार घालून सरदारगृहाच्या गॅलरीत आणून ठेवण्यात आलं. लोकांना तिथूनच दर्शन होत होतं. पुढचा प्रश्न होता तो अंत्यसंस्कारांचा. कारण स्मशानाची जागा पुरणारच नव्हती. दुसरी जागा बघायची तर सरकारची परवानगी लागणार होती. मग काहीजण पोलीस कमिशनरांना जाऊन भेटले आणि चौपाटीवर अंत्यसंस्कार करण्याची परवानगी मिळाली तीसुद्धा एका अटीवर. ती म्हणजे त्याउप्पर कुणासाठीही अशी परवानगी मिळणार नाही.**

स्मशान यात्रेसाठी लांबचा मार्ग निवडला गेला. अफाट गर्दीत यात्रा सुरू झाली. रस्ते, गॅलऱ्या, गच्च्या, खचाखच भरल्या होत्या. संन्यासी वृत्तीच्या माणसाच्या शवाला अन्त्ययात्रेच्या वेळी

बसवलेलं असतं. लोकमान्यांना आसनावर बसवलं होतं. त्यावर लोक पुष्पवृष्टी करत होते. दिंड्यांमधून लोक भजनं गात चालले होते. यात्रा चौपाटीवर पोचली आणि प्राणहीन देह अग्नीच्या स्वाधीन करण्यात आला. अंत्यसंस्कार संपले.

२ तारखेला रात्री ३ वाजता स्पेशल ट्रेनने अस्थी कलश घेऊन लोक सकाळी ७ वाजता पुण्यात पोचले. आगगाडीही फुलांनी सजवली होती. एका रथात पालखीत अस्थी असलेली चंदनी पेटी ठेवण्यात आली. पुण्यातले लोक रथ स्वत: ओढत होते. पालखीमागे लोकमान्यांचे चिरंजीव चवऱ्या ढाळत उभे होते. पालखीवर डेरेदार रेशमी छत्री उभारली होती. रामकृष्णहरीच्या गजराने वातावरण भरून गेलं होतं. रस्ते खचाखच भरले होते. पालखीवर फुलांचे हार ढिगाने पडत होते. लोक अनवाणी चालले होते. बोडक्या डोक्याने चालले होते. रडत होते. दारूवाला पुलाजवळ रथयात्रा आली. आणि सगळी वाद्ये थांबली. हिंदू-मुस्लीम की जय असा मोठा जयघोष झाला. पुणे स्टेशनच्या पश्चिम टोकाने निघालेली रथयात्रा ससून हॉस्पीटल, रास्तेवाडा, रविवारपेठ, असं करत ५ तासांनी केसरी वाड्यात आली. लोकमान्यांच्या वाड्यातल्या माडीवर करंडक नेला. लोकमान्य ज्या खुर्चीवर बसत असत, तिथे करंडक नेऊन उंच केला गेला. त्याचं दर्शन घेऊन लोक माघारी परतले. तोपर्यंत दुपारचे दोन वाजले

होते. ८ ऑगस्टला अस्थी प्रयागच्या त्रिवेणी संगमात विसर्जित पावल्या.

ग्लानिर्भवती भारताला एक महामानव जागृत करून गेला.

**दृढनिश्चयी भीष्मांनी परत एकदा भरतभूमी पाहिली... शिवाजीमहाराजांच्यानंतर परत एकदा रयतेचा राजा येऊन गेला. भास्कराचार्यांच्यानंतर एक गणिती, अवतार घ्यायला आला.. ..ऋग्वेदातला एक ऋषि परत एकदा भरतभूमीचं दर्शन घेऊन गेला. कलियुगातल्या राजकारणातला मुत्सद्दी कृष्ण कलियुगातल्या अनेक शिशुपालांशी लढून गेला. ... लोकमान्यांना सिंहगडावर राहायला फार आवडायचं. आपण आकाशाच्या जास्त जवळ जातो असं वाटतं, असं म्हणायचे. सिंहाची छाती - सिंहाची आदब असलेले, त्यांची गर्जना भारतभर घुमली. गडासारखेच कणखर- भक्कम, संकटांच्या वादळ-वारे-पावसात अविचल राहणारे. जनशक्तीला शिवाजी आणि गणेशोत्सवाच्या रूपाने संघटित करून मनाने कणखर बनवणारे. चैतन्याचे अंगारे फुलवणारे. होमरूलची स्थापना करून स्वराज्य शब्दाला " मिळेल " च्या कल्पनेचा फुगा फुगवून "मिळवणारच" पर्यंत**

**फुगवणारे. केसरीच्या अग्रलेखांमधून जनता आणि इंग्रज या दोघांना सतत सावध ठेवणारे.**

लोकमान्यांना शेवटच्या काही वर्षात आपल्या मागे आपली ही मशाल कुणी तरी हाती घेईल असं वाटत होतं. पण ते घडलं नाही. " कुणीतरी मुलगा पुढे होईल आणि म्हणेल, की तुम्ही आता म्हातारे आहात. बाजूला सरा. आता मीच तुमची मनीषा पुरी करतो. माझे डोकीवर पाय देऊन वर चढणारा मुलगा मी माझे हयातीत पाहीन असं मला आता वाटत नाही " असं म्हणाले. पण त्यांची धुरा महात्मा गांधीनी आपल्या खांद्यावर घेतली. पुढे चालवली. तसाच तुरूंगवास सोसला, तसाच, लोकसमुदाय गोळा केला. लोकांच्यात चेतना निर्माण केली. थंड भारतात अग्नी फुलवायची कामगिरी लोकमान्यांनी केली आणि ते स्फुल्लिंग विझू न देण्याचं असिधारा व्रत गांधीजींनी अंगीकारलं.

सी. गोपालाचारी यांनी लिहिलं,

**He himself was like a lamb. There was no politician so blunt and uncrompomising, in point of fact as Lokamanya himself. No one ....practised Truth and Ahimsa better than Lokmanya.**

ते पुढे लिहितात, अहिंसा आणि सत्य यांच्यावर गांधीजींची दृढ श्रद्धा असली तरी, घनघोर सुरू असलेल्या युद्धात कणखरपणे, अविचल मनाने उभ्या असलेल्या नेपोलियनसारखेच ते कठोर असत, त्या उलट अत्यंत आाक्रमक, आग्रहक असलेल्या लोकमान्यांचा स्वभाव मात्र कुसुमादपि कोमल होता. माशीला मारलेलंही त्यांना सहन होत नसे. सत्याचा आग्रह धरणारे गांधीजी परिस्थिती पाहून आपल्या मनाला मुरड घालून रणनीती आखत आणि त्याउलट लोकमान्य मात्र प्राण गेला तरी आपला सत्याचा आग्रह सोडत नसत, म्हणूनच त्यांनी मंडालेच्या तुरूंगवासाची शिक्षा झेलली.

अंतर्बाह्य कवीमनाच्या असलेल्या सरोजिनी नायडू लोकमान्यांची आठवण सांगतांना आपल्या लालित्यपूर्ण शब्दांमधे म्हणतात,

**" Tilak was the human counterpart of his own rich and rugged landscape that veils the stubborn strength of its formidable mountains with the laughter of streams and the loveliness of woods. I still hear his living voice chanting the prophetic strain ‘ Swaraj is my birth right and I**

**will have it. The refrain of his imperishable mantra, is mixed forever in my years . "**

**त्या उलट अरबिंदोबाबू घोष यांची लेखणी मराठा स्वभावाचं गुणवर्णन करतांना थांबतच नाही. लोकमान्यांचा स्वभाव हा किती मराठा स्वभावाचा आदर्श होता हे सांगतांना ते म्हणतात,**

**" Tilak was the very type and incarnation of Maratha character, the Maratha qualities, the Maratha spirit,** but with the unified solidity in the character, the touch of genuis in the qualities, the vital force in the spirit, which make a great personality readily the representative man of the people. The Maratha race, as their soil and history have made them, are a rugged, strong, sturdy people, democratic in their every fibre, keenly intelligent, and practical to the very marrow, following in ideas, even in poetry, philosophy, and religion, the drive towards life and action, capable of great ferver, feeling and enthusiasm, like all Indian people, but not emotional idealist: having in their thought and

speech always a turn for strength, sense, accuracy, lucidity, and vigour, in learning and scholarship, patient, industrious, careful, thorough and penetrating, in life simple, hardy and frugal, in their temparament courageous, pugnacious, full of spirit, yet with a tact in dealing with hard facts and circumventing obstacles, shrewed, yet agressive diplomatist, born politician, and born fighters.

**गांधीजींनी म्हटल्याप्रमाणे लोकमान्य सर्वार्थाने डेमोक्राट होते. डेमॉक्रसी म्हणजे बाय द पीपल, ऑफ द पीपल, फॉर द पीपल. ते लोकांचे, लोकांसाठी आणि म्हणूनच लोकमान्य होते.**

**मनुष्य सुखासाठी जन्मतच नाही. जो मनुष्य सुखाची आशा करतो, तो निराश होतो, हे त्यांचंच वचन होतं. या एका सूत्रावर त्यांनी राष्ट्रमुक्तीसाठी आपला स्वराज्याचा यज्ञ मांडला आणि आपल्याच समिधा त्या कुंडात हवन करून हा आत्मा मुक्त झाला. तेजातच जनन मरण असा हा महानायक अस्ताला गेला.**

---------------------------------------------------------------




सत्यभामाबाई टिळक





ई साहित्य प्रतिष्ठानने प्रकाशित केलेली डॉ. स्मिता दामले यांची इतर पुस्तके.


कव्हरवर क्लिक करताच ते ते पुस्तक उघडेल











**इतिहासाचे अवजड ओझे**

**डोक्यावर घेऊन ना नाचा**

**करा पदस्थल त्याचे; आणिक**

**चढुनी त्यावर भविष्य वाचा**

**-विंदा करंदीकर**

ई साहित्यचा इतिहास विभाग समृद्ध आहे आणि तो अधिकाधिक समृद्ध व्हावा असा प्रयत्न आहे.

कृपया भेट देत रहा, वाचत रहा. कोणत्याही प्राण्याला, सजीवाला, अनुभवाने शहाणपण येतं. इतर प्राण्यांना काही प्रमाणात त्यांचे जन्मदाते थोडंफ़ार शिक्षण देतात. पण मानव हा असा प्राणी आहे ज्याला स्वतःचे अनुभव व आईवडील यांसोबत पुर्वी जगलेल्या आणि आता जिवंत नसलेल्या माणसांचे अनुभवही शिकता येतात. ते पुस्तकांद्वारे. माणसाला आपल्या सभोवताली नसलेल्या, दूर देशातल्या माणसांचे अनुभव समजून घेऊन शिकता येतं. तेही पुस्तकांद्वारे. प्रत्यक्ष अनुभवांहून चांगला शिक्षक नाहीच. पण इतरांना आलेले अनुभव, त्यांनी खाल्लेल्या ठेचा याही माणसाला शिकवतात आणि शहाणे करून सोडतात.

म्हणून वाचा. वाचत रहा. www.esahity.com